# रेंदाळकरांची कविता

प्रथम खंड.

संग्राहक
वामन जनार्दन कुंटे

(-सर्व हक्क संग्राहकाचे स्वाधीन. )

किंमत सव्वा दोन रुपये.

१९२४

रेंदाळकरांची कविता

द्वितीय खंड

लौकरच प्रसिद्ध होईल.

मुद्रक
अनंत विनायक पटवर्धन
आर्यभूषण प्रेस, किबेवाडा, पुणें.

# दोन शब्द

मित्रवर्य कै. एकनाथ पांडुरंग रेंदाळकर यांस स्वर्गवासी होऊन आज पुरीं चार वर्षें झालीं. एवढ्या दीर्घ कालानंतर कां होईना, त्यांच्या समग्र कवितेचा प्रथम खंड प्रसिद्ध करून आज मी मित्रऋणांतून अंशतः मुक्त होत आहें. कै. रेंदाळकरांचे व माझे स्नेही रा. विष्णु गणपतराव चव्हाण, कोल्हापूर; रा. बाळकृष्ण महादेव गद्रे, सांगली; रा. रघुनाथ श्रीपाद कुलकर्णी व शिवराम श्रीपाद वाशीकर, मुंबई; हे या कार्यांत माझे सहकारी असून त्यांच्या तर्फेनेंच मी हे दोन शब्द लिहीत आहें.

कै. रेंदाळकरांचा लेखनविस्तार फार मोठा आहे. त्यांच्या गुणावगुणाविषयीं माझे मित्र रा. माडखोलकर यांनीं प्रस्तावनेंत मार्मिक विवेचन केलेलें असल्यामुळें मला कांहींच लिहावयाचें नाहीं; व लिहिण्याचा माझा अधिकारही नाहीं. येथें मला पुस्तकांतील कवितेच्या मांडणीबद्दलच थोडें स्पष्टीकरण करावयाचें आहे.

कै. रेंदाळकरांनीं नीतिमंडन, बुद्धनीति यांसारख्या कवितांपासून पूर्ण शृंगारिक कवितांपर्यंत विविध विषयांवर अनेक कविता लिहिल्या. अंतरंगावरून वर्गीकरण करण्याचे प्रकार आपल्यांत रूढ झालेले माझ्या पाहण्यांत नाहींत. प्रत्येकजण रुचिभेदानें निरानिराळ्या तऱ्हेनें वर्गीकरण करीत असतो. आम्हीं रेंदाळकरांच्या समग्र कवितेचें बहिरंगावरूनच वर्गीकरण केलें आहे. त्याप्रमाणें सकृद्दर्शनींच रेंदाळकरांच्या कवितेचे दोन खंड पडतात; एक 'स्फुट–कविता' व दुसरा 'खंड–काव्यें.' हें दोनहि खंड एकाच पुस्तकांत काढण्याचा प्रथम विचार होता; परंतु हा प्रथम खंडच अदमासाबाहेर वाढल्यामुळें तेवढाच आज कै. रेंदाळकरांच्या चतुर्थ पुण्यतिथीचे दिवशीं रसिकांस सादर करीत आहों.

या प्रथम खंडाचेही पांच विभाग केलेले असून त्यांस ‘ मंदारमञ्जरी ’ वगैरे निरनिराळीं नांवें दिलेलीं आहेत. कै. रेंदाळकर ‘विजयी मराठा’ या पत्रांत ‘मंदार’ या टोपण नांवाखालीं लेख व कविता लिहीत असत; तेव्हां त्यांनीं आपला पहिला कवितासंग्रह पुस्तकरूपानें प्रसिद्ध केला, त्याला ‘ मंदारमञ्जरी ’ हें नांव दिलें. ‘ काव्य–कुसुम–माला ’ व ‘ कर्ण–मंगल ’ हीं नांवें, कै. रेंदाळकर ज्या वहींत कविता लिहून ठेवीत त्यावर त्यांनीं स्वतःच घातलेलीं दिलीं आहेत. त्यानंतर करमणुकींत प्रसिद्ध झालेल्या व नंतरच्या कविता ‘ काव्य–गुंफा ’ या कै. रेंदाळकरांनींच दिलेल्या नांवाखालीं दिल्या असून ‘स्फुट कविता’ हें नांव मात्र आम्हीं घातलेलें आहे. कविता साधारण-पणें कालानुक्रमानें छापलेल्या आहेत, त्यावरून त्यांच्या कवितेचा उत्तरोत्तर कसा विकास होत गेला आहे, याचा वाचकांस विचार करतां येण्याजोगा आहे. यांतील शेवटचें ‘ स्फुट–कविता’ हें सदर परिशिष्टासारखें आहे. या कवितांचा व मंदारमञ्जरींतल्या कवितांचा काल साधारणपणें एकच आहे. ‘विजयी मराठा’ पत्रांत प्रसिद्ध झालेल्या व आणखी कांहीं अप्रसिद्ध कविता एकत्र करून त्यांनीं ‘ मंदारमञ्जरी ’ १९१० सालीं प्रसिद्ध केली. तेव्हां ‘ मंदारमञ्जरींत ’ न आलेल्या अशा ‘ विजयी मराठा ’ पत्रांत प्रसिद्ध झालेल्या ज्या कविता आढळल्या, त्या ‘ स्फुट–कविता ’ या सदराखालीं दिल्या आहेत.

या संग्रहांतील ‘ मंदारमञ्जरी ’ या कविताच तेवढ्या पुस्तकरूपानें प्रसिद्ध झालेल्या असून बाकीच्या, नियतकालिकांत निरनिराळ्या ठिकाणीं प्रसिद्ध झालेल्या असल्या, तरी पुस्तकरूपानें एकत्रित अशा आतांच प्रसिद्ध होत आहेत. या संग्रहांतही कै. रेंदाळकरांच्या एकूणएक स्फुट कविता छापून निघाल्या आहेत असें म्हणणें धाडसाचें होणार आहे. त्यांचा लेखनव्यवसाय जबरा व कविताही बहुतेक सर्व मराठी मासिकांत येत होत्या. ते कविता फार व्यवस्थित लिहून व जपून ठेवीत असत; तरी त्यांच्या पूर्ववयांतील बऱ्याच कविता मला मिळालेल्या त्यांच्या

हस्तलिखित संग्रहांत नाहींत. त्यामुळें कांहीं कविता, विशेषतः सुरवातीच्या काळांतील, छापल्या न गेल्याचा संभव आहे. हा संग्रह प्रसिद्ध झाल्यावर कोणाच्या आढळांतील कविता मिळाल्यास त्या द्वितीय खंडांत प्रसिद्ध करतां येतील.

रेंदाळकरांनीं कविता लिहिली ती साधारणपणें प्रचलित वृत्तांतच लिहिली आहे, म्हणून प्रत्येक कवितेवर वृत्ताचें नांव घालून जागा अडवलेली नाहीं. तरी पण नवीन वाचकांस सोईचें व्हावें म्हणून पुस्तकाचे शेवटीं अनुक्रमणिका जोडली आहे त्यांत वृत्तांचींही नांवें दिलीं आहेत. चालीवरच्या कवितांच्या चाली तर हल्लीं पुष्कळच प्रचारांत आलेल्या आहेत. त्यांचींही नांवें संक्षेपानें दिलीं असून तीं प्रो. माधव त्रिंबक पटवर्धन यांच्या ज्ञानकोशांतील ‘चलनी वृत्तें’ या लेखाचे आधारानें दिलेलीं आहेत.

कै. रेंदाळकरांच्या कवितेचा द्वितीय खंडही लागलांच छापावयास सुरवात करणार आहों. त्यांत सारजा, मोहिनी, विज्ञानसार, बुद्धनीति वगैरे खंडकाव्यें येणार असून अद्याप कोठेंच प्रसिद्ध न झालेलें ‘यमुनागीत’ हें सुंदर खंडकाव्यही या खंडांत प्रथमच प्रसिद्ध होणार आहे; एवढेंच सांगून वाचकांची रजा घेतों.

मुंबई,
१५ नोव्हेंबर १९२४.

वामन जनार्दन कुंटे

# प्रस्तावना

माझे स्नेही रा. वामनराव कुंटे यांनीं, रेंदाळकरांच्या समग्र कवितेचा हा प्रथम खंड प्रसिद्ध करून, केवळ मित्रकार्यच साधलें आहे असें नाहीं, तर मराठी भाषेचीहि महत्त्वाची सेवा केली आहे. दोन वर्षांपूर्वी, रेंदाळकरांच्या कवितेला प्रस्तावना लिहितां कां, म्हणून जेव्हां त्यांनीं मला विचारलें, तेव्हां ती गोष्ट एकदम कबूल करणें मला थोडें अवघड वाटलें. कारण, रेंदाळकरांविषयीं आदरापेक्षां अवज्ञेचे शब्द माझ्या कानावर अधिक पडले होते; आणि त्यांच्या-संबंधानें उपेक्षेचीच वृत्ति सामान्यतः दृष्टीस पडे. वस्तुतः नवीन पिढीतील कवींना त्यांच्याविषयीं विशेष अभिमान वाटला पाहिजे. परंतु, मराठींत निर्यमक कविता लिहिण्याचा प्रघात पाडून, त्यांनीं आपला मार्ग किती सुगम केला आहे, याची जाणीव अलीकडील कवींत दिसत नाहीं. पुष्कळदां असें होतें, कीं ऊन, वारा, पाऊस यांना न जुमानतां, चंद्रमौळी घरांत जन्म काढून, ज्यांनीं रानांत शहरें उठविलीं, त्या पराक्रमी पूर्वजांच्या उपकारांचें स्मरण त्यांच्या टोलेजंग वाड्यांत नांदणाऱ्या वैभवशाली वंशजांना बहुधा रहात नाहीं. तसाच प्रकार रेंदाळकरांच्याहि बाबतींत झाला आहे. निर्यमक कवितेचे प्रवर्तक म्हणून त्यांनीं केलेली कामगिरी मराठी वाङ्मयाच्या इतिहासांत चिरंतन होऊन राहील. केशवसुतांच्या नंतर आणि गोविंदाग्रज पुढें येण्यापूर्वी मध्यें जो काळ गेला, त्या काळांत रेंदाळकरांचीच कविता अतिशय लोकप्रिय होती. पण संधिकाळांत चमकणारा तारा कितीहि तेजस्वी असला, तरी सूर्याचा प्रखर प्रकाश व रात्रीचें राजस रूप यांच्यामुळें, त्याच्या रमणीय तेजाचा प्रभाव पहाणारांवर फार थोडा काळ टिकतो. गोविंदाग्रजांच्या कवितेच्या जादूनें रसिकांचीं मनें पुढें इतकीं भारलीं, कीं इतर कवींच्य काव्यांकडे लक्ष देण्याचें भान त्यांना उरलेंच नाहीं. आज तें भुरळ थोडें कमी झालें असून, एकंदर आधुनिक कवितेचें परिशीलन करण्याची प्रवृत्ति वाढत आहे. अशा स्थितींत, रेंदाळकरांच्या कवितेचें स्वागत चांगलें होईल, याबद्दल मला शंका नाहीं. तथापि, निर्यमक कविता प्रचलित करून, त्यांनीं मराठी वाङ्मयांत किती व्यापक क्रांति घडवून आणिली, याचें विवेचन करणें अवश्य होतें. आणि, तसा कांहीं प्रयत्न आपण करावा, या हेतूनें मी प्रस्तावना लिहिण्याचें कबूल केलें.

रेंदाळकरांचें चरित्र उल्कापाताप्रमाणें दृष्टीला दिपविणारें किंवा नंदादीपाच्या शांत तेजाप्रमाणें मनाला आनंद देणारें झालें नाहीं. अंधाऱ्या रात्रीं, पडक्या देवळाच्या उजाड गाभाऱ्यांत, धुमसून पेटणाऱ्या धुनीसारखें त्यांच्या चरित्राचें अवलोकन मनाला अगदीं उदास करून सोडतें. त्यांचा जन्म कोल्हापुरासारख्या मागसलेल्या संस्थानांत व त्यांतहि आडगांवीं झाला. त्यांचें मराठी शिक्षण खेडेगांवांत झालें; व तें संपतांच त्यांना नोकरी धरावी लागली. शहरांत शिक्षण मिळाल्यानें मनुष्य चौकस तर होतोच; पण तिथें नित्य घडणाऱ्या अनेक प्रकारच्या उलाढाली पाहून त्याचें मनहि निर्भय होतें. परंतु, विचारांची स्फूर्ति मिळून ज्या वयांत बुद्धीचा विकास होतो, त्या वयांत जगाच्या अनुभवाची आंच रेंदाळकरांना लागलीच नाहीं. त्यामुळें त्यांची वृत्ति स्पर्शानें कोमेजणाऱ्या पारिजातकाच्या फुलासारखीच अखेरपर्यंत राहिली. आधीं कवि; त्यांत दरिद्री; त्यांतच कमी शिकलेला; आणि त्यांतहि पुन्हा जग मुळींच न पाहिलेलें: अशा स्थितींत, रेंदाळकरांचा संसार जर सुखाचा झाला नसला, तर त्यांत नवल काय ! असेल त्या स्थितींत समाधान मानून रहाणें, हा कवीचा स्वभावच नव्हे. आपलीं दुःखें तो आपणच वाढवितो. जें असाध्य, जें अलौकिक त्याचा ध्यास त्याला लागलेला; व म्हणून आकाशांतील ताऱ्यांकडे टक लावून बघत वाट चालणाऱ्या इसापनीतींतील ज्योतिष्याप्रमाणें त्याची दुर्दशा होते. मानवी स्वभाव जात्याच इतका कुत्सित आहे कीं, केशवसुतांनीं म्हटल्याप्रमाणें, सुंदरतेला कुसें पाहण्यांतच त्याला आनंद वाटतो. अशा या कुटिल जगांत मन कणखर नसेल तर मनुष्याचा निभाव लागणें फार कठिण. रेंदाळकर अतिशय हळव्या मनाचे होते. कांहीं वनस्पति अशा असतात, कीं बाहेर पडलेल्या उन्हाची वाऱ्याच्या झुळकेबरोबर आंत आलेली झळहि त्यांना सहन होत नाहीं. शीतळ छायेचा गारवा सदैव लाभला, तरच त्यांची पालवी टवटवीत रहावयाची. रेंदाळकरांचा स्वभाव इतका तल्लख होता, कीं अपमानाच्या नुसत्या शंकेनेंहि त्यांच्या जिवाची तडफड होई. त्यांच्या या तापट व तऱ्हेवाईक स्वभावामुळें त्यांना सर्व आयुष्य दुःखांत काढावें लागलें. इंग्रजी विद्येचा संस्कार त्यांना मुळींच झालेला नव्हता. शिवाय, स्वतःच्या अभिरुचीला न रुचेल, असा कोणताहि धंदा पोटाकरितां करण्याची त्यांची तयारी नव्हती. त्यामुळें, उदरनिर्वाहाकरितां, बुद्धींत जोम असेपर्यंत, त्यांना लेखनकामाठी करणें भाग पडलें. बुद्धिमान् पण भाबडा

मनुष्य, परिस्थितिमुळें दीन होऊन, दारांत आला, कीं व्यापारी कसबांत निष्णात असलेले कावेबाज लोक, त्याच्या बुद्धीची खाण मन मानेल तशी खणून, स्वतःची धन करावयाला चुकत नाहींत. रेंदाळकरांनीं आपली बुद्धि जन्मभर हवी तशी राबविली; पण तिच्या कष्टांचें फळ मात्र त्यांच्या पदरांत कधींच पडलें नाहीं.

स. १८८९ पासून १९२० पर्यंत अवघ्या तीस वर्षांच्या आयुष्यांत, रेंदाळकरांनीं निर्माण केलेलें एकंदर वाङ्मय पाहिलें, म्हणजे आचंबा वाटतो. मानवी आयुष्याची मोजदाद करितांना, जन्म आणि मृत्यु अशा त्याच्या दोन सीमा कल्पून, मधील अंतर आपण एक क्षणहि न सोडतां, सगळेंच जमेस धरितों. पृथ्वीच्या विस्ताराचें प्रमाण अचूक कळलें असलें, तरी मनुष्यवस्तीच्या दृष्टीनें विचार करितांना, पाणी, बर्फ व उष्णता यांनीं व्यापिलेले तिचे प्रदेश वगळावे लागतात. त्याचप्रमाणें, केवळ कर्तृत्वच लक्षांत घेतलें, तर मानवी आयुष्यांतील निम्म्याहून अधिक दिवस फुकट जातात, असें म्हटलें पाहिजे. परंतु तसें कोणी मानीत नाहीं, व एका अर्थानें तें योग्यहि आहे. तरीहि, तीस वर्षांची आयुर्मर्यादा, ही असामान्य बुद्धीच्या मनुष्यालासुद्धां, आपलें कर्तृत्व दाखवावयाला अपुरीच वाटेल. विशेषतः, इतक्या थोड्या काळांत बुद्धीची परिणति होणें शक्य नसतें; व म्हणून, मनुष्य मूळचा कितीहि प्रतिभाशाली असला, तरी त्याची कृति तितकी उज्ज्वल निपजत नाहीं. शिवाय, रेंदाळकरांच्या कवितेची चिकित्सा करितांना त्यांना झालेला शिक्षणाचा संस्कार किती संकुचित होता, हेंहि विसरून चालणार नाहीं. संस्कृत कवितेचें परिशीलन त्यांनीं उत्तम केलें होतें; व बंगाली कविताहि त्यांनीं बरीच वाचली होती. परंतु इंग्रजी कवितेचा व्यासंग मात्र त्यांना मुळींच घडला नाहीं. हरिभाऊ आपटे यांच्या सहवासांत असतांना त्यांना इंग्रजी वाचनाची गोडी लागली. इंग्रजी कवितेशीं त्या वेळीं जी त्यांची तोंड-ओळख झाली तितकीच. पुढें फार दिवस ते जगलेच नाहींत. पण, नवीन शिक्षणाचा इतका कमी संस्कार होऊनहि, त्यांचीं मतें सर्वच बाबतींत अतिशय उदार होतीं. संस्कृत कवितेवर त्यांची निस्सीम भक्ति असली, तरी तिचा परिणाम त्यांच्या भाषेवर जितका झाला, तितका विचारांवर झाला नाहीं. लेंभे व चंद्रशेखर यांच्या कवितेवर संस्कृत

काव्याच्या अध्ययनाचा परिणाम इतका झाला, कीं त्यांच्या विचाराचें वळण प्रायः जुनेंच राहिलें. उलट त्यांच्या मानानें इंग्रजी कमी वाचलेल्या रेंदाळकरांचे विचार केशवसुतांच्या विचारांइतकेच प्रगमनशील व प्रखर होते.

संस्कृत कवींपैकीं कालिदास व विशेषतः बाण यांची कविता त्यांना अतोनात आवडे. 'कादंबरी'चें रूपांतर करावयाला त्यांनीं सुरुवात केली होती; पण त्यांच्या मृत्यूमुळें तें अपुरेंच राहिलें. त्यांची कविता आरंभीं संस्कृत धर्तीवर असे. त्यांच्या कांहीं शृंगारिक कविता वाचतांना ऋतुसंहारांतील वर्णनांची आठवण होते. समासप्रचुर अशी त्यांची ती जड पण जोरकस रचना पाहिली, म्हणजे ' ओजः समासभूयस्त्वम् ' हें दंडींचें मत त्यांना त्या वेळीं मान्य असावें, असें वाटतें. पुढें समासांचें हें अवडंबर कमी होऊन, त्यांची रचना प्रसन्न झाली. अखेर अखेर तर ते अगदीं साधें मराठी लिहूं लागले होते. टेनिसनच्या Enoch Arden या काव्याच्या आधारानें लिहिलेल्या त्यांच्या ' सारजा ' या काव्यांत भाषेचें हें साधें पण सुंदर स्वरूप दृष्टीस पडतें. मराठी भाषेवर त्यांचें उत्तम प्रभुत्व होतें. जुन्या कवींपैकीं ज्ञानेश्वर, तुकाराम व मोरोपंत यांच्या काव्यांचें त्यांनीं कसोशीनें अध्ययन केलें होतें. संस्कृत व मराठी कवींच्या वाङ्मयाचा खोल व्यासंग केल्यामुळें, मराठी भाषा ते मनाला वाटेल तशी लिहूं शकले. केव्हां संस्कृत समासांचे रत्नालंकार घालून, तर कधीं मराठी बोलीचा फुलोरा लेववून, त्यांनीं आपली कविता लीलेनें सजविली आहे. त्यांच्या रचनेइतकी सुश्लिष्ट, सावेश व सालंकार रचना दुसऱ्या कोणत्याहि मराठी कवीची असेल, असें वाटत नाहीं. केशवसुतांची रचना म्हणजे हातसुताच्या खादीची भरड वीण. टिळकांची कविता गोड असली, तरी भाषेचें गौरव, माधुर्य किंवा लालित्य हे गुण तींत फारसे आढळावयाचे नाहींत. लेंभे, गोविंदाग्रज व बालकवि यांच्या काव्यांत, रोज रस्त्यांत भेटणाऱ्या ओळखीच्या माणसांप्रमाणें, तेच ते शब्द हटकून यावयाचे. चंद्रशेखरांचें भाषेवर प्रभुत्व पहिल्या प्रतीचें; व त्यांची रचनाहि डौलदार असते. पण तिचा डौल जुन्या थाटाचा. रोजच्या बोलण्यांतले शब्द तींत सहसा सांपडावयाचे नाहींत; पंडिताची प्रौढ भाषाच नेहमीं कानांवर पडावयाची. विनायकांची वाणी जोरदार असली, तरी तींत नादगौरव नाहीं. परंतु रेंदाळकरांच्या कवितेंत बाण, मोरोपंत, व केशवसुत यांच्या लेखनशैलीचें मोठें मनोहर मिश्रण पहावयाला मिळतें. गजराजिप्रमाणें भव्य अशी समासश्रेणी

पाहून संतुष्ट होणाऱ्या साहित्यपंडितापासून, तों घरगुती भाषेंत लिहिलेलें कवन गोडीनें वाचणाऱ्या सामान्य वाचकापर्यंत सर्वांची सोय त्यांच्या कवितेंत झाली आहे. मखमलीवर केलेल्या जरीच्या कलाबतूपासून, तों पांढऱ्या सुताच्या साध्या कशिद्यापर्यंत हरतऱ्हेचें भरदार, बेडौल अगर बारीक विणकाम त्यांच्या काव्यांत आढळून येतें.

रेंदाळकरांची कविता स्वतंत्र व साधार अशी दोन्ही प्रकारची आहे. संस्कृत, बंगाली व इंग्रजी या तिन्ही भाषांतील काव्यांत त्यांना जें जें सुंदर म्हणून आढळलें, तें तें त्यांनीं मराठींत आणण्याचा यत्न केला. रेंदाळकरांच्या बहुतेक रूपांतरांतून मूळांतील कल्पनेचा फक्त आधार तेवढा घेतला आहे. सूत्र उसनें घेतलेलें, पण गुंफण त्यांची स्वतःची असते. कवि कितीहि स्वतंत्र प्रतिभेचा असला, तरी पूर्व कवींपासून विचारांची स्फूर्ति त्याला आपोआप मिळते. शिवाय, तो जर व्यासंगी असेल, तर आभाळांत घोटाळणाऱ्या अभ्रांची छाया जशी सरित्प्रवाहांत पडते, तसेच मनांत सदैव घोळणारे इतरांचे विचार त्याच्या वाङ्मयांत प्रतिबिंबित झाल्यावांचून रहात नाहींत. पण त्यामुळें त्याच्या कल्पकतेला कमीपणा येतो, असें कोण म्हणेल ? विमान आकाशांत कितीहि उंच उडालें, तरी भ्रमणाच्या गतीचा वेग त्याला भूमीपासूनच घ्यावा लागतो. कित्येक वेळां असेंहि होतें, कीं सहज वाचनांत आलेली एकादी सुंदर कल्पना मनांत राहून जाते; आणि तशाच स्वरूपाची पण निराळ्या अर्थाची कल्पना तिच्यावरून सुचून, आपण ती स्वतःची समजून लिहून टाकतों. तथापि, कल्पनेवरून कल्पना सुचणें, आणि आधारानें व रूपांतर करून लिहिणें, यांत अंतर आहे. दुसऱ्याच्या दिव्यावर आपला दिवा लावून घेणें वेगळें, आणि तोच दिवा उचलून आणून स्वतःचें घर उजळणें वेगळें ! कल्पनेवरून कल्पना सुचली, तरी ती स्वतंत्रच समजली पाहिजे. साधार हें स्वतंत्र नव्हे, तरी रूपांतराहून वरच्या दर्जाचें. पार्शियन साहित्यशास्त्रांत असा एक संकेत आहे, कीं दुसऱ्याची कल्पना घेऊन जर ती आपण अधिक खुलवून लिहूं शकलों, तर ती चोरी अगर उसनवारी नव्हे. हें मत जरी कुणाला पटलें नाहीं, तरी साधार हें जर मूळाहून सरस असेल, तर त्याला स्वतंत्र म्हणावयाला काय हरकत आहे ? त्या दृष्टीनें, चंद्रशेखरांचें 'काय हो चमत्कार!'

हें काव्य स्वतंत्र म्हटलें, तरी शोभून जाईल. रेंदाळकरांचें ' सारजा ' हें काव्य व विशेषतः ' कोकिळास, ' ' कृष्णा, ' 'वसंत' वगैरे कविता, जरी इंग्रजी कवितांवरून सुचल्या असल्या, तरी त्यांची गुंफण इतकी स्वदेशी आहे, कीं त्यांचें विषयसूत्र विलायती असेल, असें चुकूनहि वाटत नाहीं. संस्कृत व बंगाली कवितांच्या रूपांतरांवर मात्र भाषेवांचून दुसऱ्या कोणत्याच बाबतींत त्यांची मालकी नाहीं.

' विरहिणी राधा ' व मधुसूदन दत्तांच्या इतर कवितांचीं त्यांनीं केलेलीं रूपांतरें फार सरस आहेत. माधवानुजांनीं केलेलीं मधुसूदनांच्या प्रणय-पत्रिकांचीं भाषांतरें या रूपांतरांशीं तुळून पाहिलीं, म्हणजे रेंदाळकर रूपांतर किती सुंदर करीत, याची उत्तम कल्पना येते. माधवानुज हे कवितेचे मर्मज्ञ असून स्वतः कुशल कवि होते. पण त्यांनीं केलेलीं प्रणय-पत्रिकांचीं भाषांतरें वाचून मन निर्विकार रहातें. उलट, रेंदाळकरांनीं लिहिलेली शूर्पणखेची प्रणय-पत्रिका वाचून मनाला चटका लागतो. शब्दशः केलेलीं म्हणून माधवानुजांचीं भाषांतरें कदाचित् जास्त चांगलीं ठरतील. परंतु, मधुसूदनांच्या मूळ कवितांतील रसाचा जिव्हाळा रेंदाळकरांच्या रूपांतरांत अधिक उतरला आहे, यांत संशय नाहीं. रेंदाळकरांनीं रूपांतरित कविताच फार लिहिली असून, तीच तेवढी चांगली आहे, असे उद्गार नेहमीं ऐकूं येतात. परंतु त्यांत बिलकूल तथ्य नाहीं. त्यांची स्फुट कविता बहुतेक स्वतंत्र असून, त्यांनीं लिहिलेल्या दहा खंडकाव्यांपैकीं मोहिनी, बाष्पबिंदु, यमुनागीत, शिरक्यांची तारा, जाधवांची मंजुळा हीं काव्येंहि स्वतंत्र आहेत. त्यांची रचना उत्तरोत्तर किती रमणीय होत गेली, याची कल्पना हीं काव्यें वाचून येते. त्यांचें ' मोहिनी ' हें काव्य प्रसिद्धच आहे. त्यांतील शुद्ध प्रेमाच्या कल्पनेची चेष्टा झाली. सुशिक्षित किंवा सुधारक यांनाहि ज्या कल्पनांचा पुरस्कार करणें कठीण वाटलें, त्यांचा प्रसार करण्याची धडपड रेंदाळकरांनीं आमरण केली. पाश्चात्य सुधारणेचा संसर्ग त्यांना झाला नव्हता; तरीहि त्यांची विचारसरणी हरएक बाबतींत पराकाष्ठेची स्वतंत्र होती. वृत्ताला चरणाचें, कवितेला यमकाचें व स्त्रीला रूढीचें बंधन मुळींच नसावें, असें त्यांचें मत होतें. या मताला जों जों विरोध होत गेला, तों तों त्यांच्या काव्यांतून त्याचें अधिकच समर्थन झालें. केशवसुतानंतर इतक्या धडाडीनें रूढीचा उच्छेद करावयाला दुसरा कोणताच कवि उद्युक्त झाला नाहीं. त्यांच्या स्फुट कवितांतूनहि

सुधारणेचा अभिनिवेश पुष्कळ व्यक्त झाला आहे. 'मोहिनी' काव्यांतील विचारसरणीची महाजनीनीसुद्धां विक्षिप्त म्हणून संभावना केली! जॉन्सननें म्हटल्याप्रमाणें, मनाला जें सत्य वाटेल तें बोलून दाखविण्याच हक्क जसा प्रत्येकाला आहे, तसाच तें ज्याला पटणार नाहीं, त्याला टीकेचे कोरडे ओढावयालाहि तितकाच हक्क आहेः घाव घालावयाला जो सरसावतो, त्यानें सोसावयालाहि तयार असलें पाहिजे. हें तत्व रेंदाळकरांना मान्य होतें. कठोर टीकेनें ते सहसा कचरले नाहींत.

त्यांना विषाद किंवा वैषम्य वाटे, तें आपल्या दीन स्थितीचें. दुर्दैवानें त्यांची पारध मरेपर्यंत केली. कविता हाच काय तो त्यांच्या जिवाला एक विरंगुळा होता. आणि तिचीहि कुचेष्टा झालेली जेव्हां कानावर येई, तेव्हां त्यांच्या मनाला अगदीं पीळ पडत असे. 'डबक्यांत पडलेलें फूल' ही कविता प्रसिद्ध झाल्यावर त्यांची फारच निंदा झाली. निर्यमक कवितेचा पुरस्कार केलेला पाहून चवताळलेले टीकाकार त्यांच्यावर तुटून पडले. आणि संसाराप्रमाणें सारस्वतांतहि आपण अपेशी ठरूं कीं काय, अशी भीति त्यांना वाटूं लागली. या प्रसंगीं, स्वतःशिवाय कुणाचेहि दोष विनोदाखातर फुगवून दाखविणारे समकालीन कवीहि त्यांची चेष्टा करावयाला चुकले नाहींत. संसाराची दैना झालेली; व कवितेबद्दलहि लोकमत फिरलेलें. अशा स्थितींत मनुष्यानें कशाच्या आधारावर दिवस काढावे ! कांहीं तरी साहस केल्यामुळें अवचित कोसळणारें संकट हें दारुण तर खरेंच; पण ज्याची आंच लागून मन सतत पिचत रहातें, तें रोज अनुभवाला येणारें दुःख फार भयंकरः जीवितावर त्याचाच परिणाम अतिशय होतो. हे मेटरलिंकचे उद्गार कवींना तरी अक्षरशः लागू आहेत. इतरांनाहि दुःख होतें; पण तें मनांत सारखें वागवून जळत रहाण्याचा स्वभाव फक्त कवींचा. दैवी संकेतच असा दिसतो, कीं दुःखाची धग लागल्याशिवाय त्यांच्या प्रतिभेचें सुवर्ण शुद्ध व सतेज होऊं नये. रेंदाळकरांच्या कवितेंत आनंदाची भावना सहसा आढळत नाहीं. आणि जरी आढळली, तरी आभाळांत डोक्यावर ढग गर्द दाटले असतां, ओसाड माळावर उभें राहिलेल्या मनुष्याला दूर डोंगरपठारावर पडलेलें प्रसन्न ऊन पाहून जसा आनंद होतो, तशाच प्रकारचा त्यांचा आनंद असतो. त्यांत स्थिरता नाहींः ती एक विकाराची लहर

असते. त्यांच्या कवितेंत त्वेष, विषाद व निराशा यांचाच सूर ऐकूं येतो. 'गिधाड', 'कोरांटीचीं फुलें', 'निवडुंगांतून सुटका' या रूपकात्मक विचित्र कवितांत त्यांचा दबलेला त्वेष उफाळून प्रकट झाला आहे. शेवटीं शेवटीं तर,—

**काय निरुद्देश सर्व जीवन मम होतें ?**
**मरुसरितेपरि अवचित झरुनि जायचें तें ?**
**पुरे, पुरे, ही असली मुशाफरी आतां**
**या धूळिंत दगडावर टेकिलाच माथा !**

—अशीच त्यांची भावना झाली. 'अकाल वीणावादन' या कवितेंतहि त्यांनीं आपली निराशा तीव्र शब्दांनीं सांगितली आहे. इतकी कविता लिहिली, पण अखेर काय ! प्रथम प्रथम त्यांच्या ललित रचनेवर लोक फार लुब्ध होते. परंतु, निर्यमक कवितेच्या फंदांत पडल्यामुळें, त्यांची कविता रसिकांना दृष्टिसमोर नकोशी झाली.

पण यांत थोडा रेंदाळकरांचाहि दोष आहे. निर्यमक कविता लिहिण्याच्या बाबतींत त्यांनीं अतिरेक केला. नादाच्या माधुरीला ज्यांत अत्यंत महत्त्व असतें, तीं भावगीतें लिहितांनासुद्धां, त्यांनीं यमकाचें बंधन पाळलें नाहीं. 'शिंग', 'कवितादेवीचें आगमन' या त्यांच्या कविता वाचतांना यमकाची उणीव चांगलीच जाणवते. शिवाय, आणखीहि एक अविचार रेंदाळकरांकडून घडला. कवि जें लिहितो, तें सगळेंच सरस असतें असें नाहीं. स्फूर्तीचे दिव्य क्षण जर घडोघडीं येऊं लागले, तर कवित्वाची अपूर्वाई ती काय राहिली ! पण कित्येकांचा स्वभावच असा बनतो, कीं हरघडी जें मनांत दाटतें, तें लिहून टाकल्याशिवाय त्यांना चैनच पडत नाहीं. दिवसभर झालेल्या वाफेचें पहाटे थोडें तरी दंव होऊन पडलेंच पाहिजे; एरवीं मनाचें आभाळ स्वच्छ व्हावयाचें नाहीं. कविता ही एक त्यांची रोजनिशीच होऊन बसते: इतर लोक व्यवहाराचें टिपण जसें गद्यांत करितात, तसे हे विकारांचें टिपण पद्यांत करितात. इंग्रजी कवींतहि ग्रे किंवा गोल्डस्मिथ यांच्यासारखे घोटीव आरस्पानी कविता लिहिणारे थोडे. बुटाचे बंद सोडतांना सुद्धां आपले जळजळीत मनोविकार कसे तरी खरडून मोकळे होणारे बायरनसारखे उच्छृंखळ कवीच फार. परंतु त्यांत वाईट इतकेंच असतें, कीं बायरनसारखी ऊर्जस्वल प्रतिभा सर्वांच्या ठिकाणीं असत नाहीं. आणि म्हणून

कविता प्रसिद्ध करण्याच्या बाबतींत विवेक केलेला उत्तम. मन आवरत नसेल, तर लागेल तितकें लिहावें. पण प्रसिद्धीच्या लालसेला मात्र जरूर लगाम घालावा. आपलें लिखाण लोकांवर लादलें जाणार नाहीं, अशी खबरदारी कवीनें अवश्य घेतली पाहिजे. गद्य हा बोलून चालून सैल (Loose speech) वाङ्मयप्रकार आहे. तेव्हां त्याच्या प्रकाशनाच्या बाबतींत जर मनुष्य सढळ राहिला, तर तें तितकें अक्षम्य ठरणार नाहीं. पण, जें वाचून लोकांनीं लक्षांत ठेवावें असें आपण इच्छितों, तें सैल असून कसें चालेल ? केशवसुत, बालकवि वगैरे पूर्व पिढींतील कवींनीं आपली निकृष्ट कविता जाळून अगर फाडून आपल्या हातानें नाहींशी केली. परंतु रेंदाळकर जसजसे लिहीत गेले, तसतसें तें सर्व छापूनहि निघालें. याचें एक कारण, नियतकालिकें हाताशीं होतीं, हें तर उघडच आहे. पण, स्वतःच्या कवितेचा मन घट्ट करून विचार करण्याची संवय नव्हती, हेंहि तितकेंच खरें. या संग्रहांत काहीं कविता अशा आहेत, कीं त्या वगळल्या असत्या तरी बिघडलें नसतें. तथापि त्यांची धडाडी मोठी; म्हणूनच त्यांच्या सामान्य कविताहि वाचवतात. शिवाय भाषेच्या दृष्टीनेंहि त्यांच्या कवितेला फार महत्त्व आहे. मोरोपंतांनंतर इतकी बहुविध भाषा दुसरा कोणताहि अलीकडील कवि लिहूं शकला नाहीं, असें म्हटलें तरी चालेल. मराठी भाषेवर त्यांचें इतकें असाधारण प्रभुत्व होतें, म्हणूनच त्यांनीं यमकाविरुद्ध केलेलें बंड यशस्वी होऊं शकलें. गंधमादन पर्वतावरून सहस्रदलांचें सुवर्णकमल आणावयाला अंगांत बळहि सहस्रनागांचें असावें लागतें: सामान्य मनुष्याला तसलें साहस होणें नाहीं.

नियर्मक कविता लिहिण्याची स्फूर्ति रेंदाळकरांना संस्कृत कवितेपासून झाली. इंग्रजी निर्यमक कवितेशीं ( Blank verse ) त्यांच्या या बंडखोरीचा बिलकुल संबंध नाहीं. यमकाच्या आवश्यकतेचा विचार करितांना ते लिहितात:—

" प्रासानुप्रास, पुष्पयमकें, दामयमकें, चार सहा अक्षरांचीं अंत्ययमकें यांनीं कदाचित् भाषा ठसकेदार दिसूं शकेल. पण केवळ शेवटच्या एकाद्याच अक्षराच्या अनुवृत्तीनें भाषेंत सौंदर्याचा कळस होतो, किंवा अशा प्रकारांनीं रसाचा पोष होतो, असें मला वाटत नाहीं. यमकें हीं रसनाशक आहेत असेंच जरी माझें मत नसलें, तरी त्यामुळें प्रतिपादित विषयांत कांहीं अपूर्व माधुर्य उत्पन्न होतें, असें मला तरी वाटत नाहीं.

मराठी कवितेचा जन्मापासूनचा इतिहास पाहिला, तर यमकबद्ध असणें हा तिचा धर्मच आहे, असें दिसतें. पण याकरितांच आधुनिक कविवर्गानेंहि यमकें साधलींच पाहिजेत हा दुराग्रह आहे. आतां, कदाचित् मजसारख्या कवींच्या निर्यमक कविता वाचून त्या वाचकांस नीरस वाटत असतील. तो माझा दोष आहे. यमकाभावाचा नाहीं. देवाच्या दयेनें मराठीचा लवकरच एकादा राष्ट्रीय कवि निर्माण होईल. आणि त्याच्या निर्यमक कविताहि लोक मोठ्या प्रेमानें वाचून माना डोलवितील. अशा भावि कवींचा मार्ग सोपा व्हावा म्हणून मजसारख्या कवींची खडी रस्त्यावर पसरावी लागते.

निर्यमक कवितेच्या क्षेत्राची मर्यादा कोठवर आहे, याविषयीं माझें अजून निश्चित मत झालें नाहीं. गानकाव्य सयमक असावें असें मला वाटतें." यावरून रेंदाळकरांच्या मतांची उत्तम कल्पना येते. सर्वच कविता सरसकट निर्यमक असावी, असें त्यांना वाटत नव्हतें. यमकाच्या बाबतींत आग्रह नसावा, इतकेंच त्यांचें म्हणणें होतें. आणि त्याबद्दल त्यांना दोष कोण देईल ! केवळ नादाच्या दृष्टीनें विचार केला, तरी यमक हें निरुपयोगी आहे, असेंच म्हणावें लागतें. कवितेच्या सबंध चरणांत कुठेंहि नाद नसावयाचा; आणि शेवटीं एकाक्षरी यमक साधलें, कीं तिच्या माधुर्याची परिसीमा होते, हें मत कुणाला पटेल ! नादाचें गौरव, माधुर्य किंवा लालित्य हें एकंदर रचनेच्या सौष्ठवावर अवलंबून असतें. आणि त्या दृष्टीनें 'वर्णसाम्य' म्हणजे अनुप्रास हाच इष्ट आहे; मात्र तो रसानुकूल असला पाहिजे. बाणानें समासांची हारीनें उभी केलेली सांडण किंवा गोविंदाग्रजांची गौडी रीति म्हणजे नादगौरव नव्हे.

खुद्द संस्कृत कवींचाहि सर्व भर एकंदर रचनेच्या लालित्यावर असतो. जयदेवाचें 'गीतगोविंद' व कांहीं किरकोळ कविता सोडली, तर संस्कृतांतील आर्ष किंवा अभिजात कवींनीं सयमक रचना केलेली प्रायः मुळींच सांपडणार नाहीं. कालिदास, भवभूति किंवा जगन्नाथ यांची वाणी कानाला गोड लागते, ती केवळ सहज साधलेल्या वर्णसाम्यानें. पण त्याचाहि अतिरेक झालेला पाहिला, कीं अगदीं वीट येतो. इटलियन भाषेच्या मार्दवाची थट्टा करितांना—

I love the language, that soft bastard Latin,
Which melts like kisses from a female mouth,
And sounds as if it should be writ on satin,
With syllables which breath of the sweet south.

—असे उद्गार बायरननें काढले आहेत. त्यांची आठवण, जयदेवाचें गीत-गोविंद वाचतांना, कुणाला होणार नाहीं ? अशा कवींच्या शब्दसृष्टींत सोसाट्याचें वारें कधीं सुटावयाचें नाहीं; सदा मलयानिलाच्या मंद झुळका वहात असावयाच्या. तथापि, वर्णसाम्यानेंच रचनेला खरें लालित्य येतें, यांत शंका नाहीं. संस्कृत कवितेंत हें वर्णसाम्य इतकें उत्तम साधलेलें असतें, कीं ती वाचतांना, यमकाची आठवण चुकूनहि होत नाहीं. पण मराठींत मात्र यमक हें कवितेचें एक अंगच होऊन बसलें असून, तें साधण्याकरितां अभिजात मराठी कवींनीं आपल्या बुद्धीचा अपव्यय केला आहे. मूळ संस्कृतांत जरी यमक नसलें, तरी संस्कृत भाषेपासून उद्भवलेल्या बहुतेक हिंदी भाषांत यमक हें काव्याचें एक प्रमुख लक्षणच समजलें जातें. संस्कृत भाषा आणि या तदुद्भूत प्राकृत भाषा यांच्या प्रकृतींत असा काय भेद आहे, कीं ज्यामुळें यमकावांचून त्यांचा निर्वाहच होऊं नये ! संस्कृत सारस्वताच्या अथांग सरोवरापासूनच या प्राकृत वाङ्मयाच्या सरितांचा उगम झाला. आणि विजातीय विचारांचें उदक जरी कालांतरानें त्यांच्या ओघांत मिसळलें असलें, तरी त्यामुळें त्यांचें जीवन विकृत झालेलें नाहीं. तेव्हां, मूळ संस्कृतांत जें नाहीं, त्याला प्राकृतांत तरी महत्त्व कां द्यावयाचें ? मराठी कविता बाल्यावस्थेंत असतांना ही यमकाची उपाधि कदाचित् तिला उपकारक वाटली असेल. परंतु, आतां विचारांचा विकास होऊन, भाषेचा व्याप इतका विलक्षण वाढला आहे, कीं पंत–पंडितांनीं दुतर्फा बांधलेल्या या चिरेबंदी घाटांतून मराठी कवितेचा प्रवाह यापुढें संथपणें वहात जाणें शक्यच नाहीं. कुणी कितीहि विरोध केला, तरी ते आपोआप निखळतील. बाळपणीं जें बंधन मानवलें, ते प्रौढपणींहि मानावें हा न्याय कुठला ? या बाबतींत, इंदूरच्या साहित्यसभेला निर्यमक कवितेचा अर्ज सुनावतांना,––

**स्त्रीला प्रौढवयांत नूपुरझणत्कार त्रपा देतसे**

हे फणसेकवींनीं काढलेले उद्गार खरोखरीच यथार्थ आहेत.

आणि म्हणूनच, अलीकडे बहुतेक हिंदी भाषांनीं हें यमकाचें बंधन झुगारून दिलें आहे. प्रसिद्ध गुजराती कवि कलापि यांनीं निर्यमक कविता बरीच लिहिली असून, गुजराती काव्यांत आतां यमकाचा निर्बंध मुळींच राहिलेला नाहीं. लोकप्रिय हिंदी कवि मैथिलीशरण गुप्त यांनींहि निर्यमक कविता लिहिली आहे, असें म्हणतात. बंगालमध्यें तर निर्यमक कविता प्रचलित झाल्याला अर्ध-

शतक उलटून गेलें असून, आतां ती एक रूढि होऊन बसली आहे. पण, निर्यमक कविता लिहावयाला मधुसूदन दत्त यांनीं प्रथम जेव्हां प्रारंभ केला, तेव्हां त्यांना बंगालमधील जुन्या वळणाच्या कडव्या टीकाकारांनीं कसें धारेवर धरलें, याचें मोठें मनोरंजक वर्णन रमेशचंद्र दत्तांनीं केलें आहे. आपला निर्यमक कविता लिहिण्याचा विचार त्यांनीं आपले स्नेही जोतींद्रमोहन टागोर यांच्या कानावर घालतांच, निर्यमक रचना बंगाली कवितेच्या प्रकृतीला मानवणार नाहीं, असें त्यांनीं मधुसूदनांना निक्षून सांगितलें. परंतु, यमकांच्या शृंखला तोडल्याशिवाय बंगाली कवितेला ऊर्जित दशा येणार नाहीं, अशी त्यांची खात्री होऊन चुकली होती. आणि म्हणून, नाउमेद न होतां, त्यांनींहि जोतींद्रांना उत्तर दिलें कीं, 'संस्कृत भाषेपासून उत्पन्न झालेल्या भाषेला कांहींच अशक्य नाहीं!' त्यांचें पहिलें निर्यमक काव्य 'तिलोत्तमा' स. १८६० सालीं बाहेर पडलें. हें काव्य प्रसिद्ध होतांच, ज्यांची प्रतिष्ठा केवळ जीर्ण प्रघातांच्या पुरस्कारावरच अवलंबून असते, अशा शिष्ट साहित्यकोविदांनीं तर त्यांना नादान ठरविलेंच; पण बंगाली लेखकांचे तत्कालीन धुरीण पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर यांनाहि तें धाडस रुचलें नाहीं. तथापि, मधुसूदनांनीं, या प्रतिकूल टीकेच्या फूत्कारांनीं गांगरून न जातां, 'मेघनादवध' हें आपलें सर्वश्रुत महाकाव्य लवकरच प्रसिद्ध केलें. आणि तें वाचून पहातांच सरळ स्वभावाच्या विद्यासागरांनीं आपली चूक पदरांत घेतली. राजेंद्रलाल मित्र, राजनारायण बसू, कालिप्रसन्न सिंह, जोतींद्रमोहन टागोर प्रभृति मर्मज्ञ रसिकांनीं या काव्याची प्रशंसा केली; आणि साहित्यपरिषदेनेंहि या साहसी उपक्रमाबद्दल त्यांचा सन्मान केला. या काव्याची रेवडी उडविणारे कुटिल टीकाकार अगदींच निघाले नाहींत असें नाहीं. 'मेघनादवधा'ची नक्कल म्हणून त्यांनीं 'चुचुंद्रिवध' हें काव्य प्रसिद्ध केलें; व आपल्या मत्सराची आग निववून घेतली. परंतु मधुसूदनांचें हें काव्य आज बंगालमध्यें घरोघर म्हटलें जात असून, त्यांचें अनुकरण करणारे कवीहि त्यांच्या डोळ्यांदेखतच उदयास आले.

हेमचंद्र बानर्जी व नवीनचंद्र सेन यांचीं 'वृत्रसंहार' व 'पलाशीर युद्ध' हीं काव्यें निर्यमक असून, रवींद्रनाथ टागोर यांनींहि 'चित्रांगदा', 'विसर्जन' प्रभृति नाटकें व काव्यें निर्यमकच लिहिलीं आहेत. मधुसूदनांनीं नुसतें यमकाचेंच बंड मोडलें असें नाहीं, तर यतीचाहि निर्बंध काढून टाकला. आणि, रवींद्रनाथांनीं,

त्यांच्याहि पुढें जाऊन, कविता स्फुरतांना जी चाल सहज तोंडाला येईल, तींच रचना केली आहे. रेंदाळकरांना निर्यमक कविता लिहिण्याची स्फूर्ति जरी संस्कृत कविता वाचून झाली असली, तरी तिला प्रोत्साहन मधुसूदनांनीं संपादिलेलें हें यश पाहूनच मिळालें. परंतु, मधुसूदनांच्या मानानें रेंदाळकर हे कमी प्रतिभेचे कवि; व त्यांची संस्कृतीहि तितकी थोर नव्हे. मधुसूदनांनीं सगळें सुधारलेलें जग पाहिलेलें, व अनेक भाषांतील वाङ्मयाचेंहि त्यांनीं परिशीलन केलें होतें. त्यांच्या प्रतिभेवर एकंदर मानवजातीच्या विचारांचा संस्कार घडला होता, असें म्हटलें तरी चालेल. रेंदाळकर हे सगळ्याच बाबतींत कमनशिबी. सप्तसिंधूंच्या जलाचा अभिषेक घडलेला दिग्विजयी सम्राट् कुणीकडे, आणि स्वातंत्र्यप्राप्तिकरितां धडपडणारा धाडसी बंडखोर कुणीकडे! परंतु, सर्वस्वी प्रतिकूल परिस्थितीशीं झगडून, जें थोडें यश तो बंडखोर मिळवितो, त्याबद्दल अधिक कौतुक वाटतें. प्रतिभा विशेष प्रबळ नसूनहि, रेंदाळकरांनीं निर्यमक कवितेचा पुरस्कार तडफेनें केला, हें त्यांना निःसंशय भूषणावह आहे. मात्र, निर्यमक कविता लिहितांना, त्यांनीं जितकी दक्षता ठेवावयाला हवी होती तितकी ठेविली नाहीं. सयमक रचना कितीहि सैल असली तरी खपून जाते. कारण, शेवटीं येणारी यमकांची जोडी जर सज्जड असेल, तर कवितेचा बारीक विचार करण्याचा वकूब नसलेला सामान्य मनुष्यच काय, पण शब्दज्ञानांत घोटाळून राहिलेला साहित्यशौण्डहि अगदीं खूष होतो. उलट, निर्यमक कवितेंत अर्थ तर भव्य किंवा भेदक असावा लागतोच, पण भाषाहि भरदार असली पाहिजे. यमकविरहित रचनेंत नादाचें गौरव जर विशेष असेल, तरच ती मन वेधूं शकते. पदपूरणार्थ दडपून दिलेला शब्द हें निर्यमक कवितेच्या शरीरांत घुसून बसलेलें एक शल्यच होय. त्यांतहि तो शब्द जर चरणाच्या शेवटीं आला, तर त्याचा सगळा जोर नाहींसा करतो. रेंदाळकरांची ‘ माझ्याच सुखासाठीं ’ ही कविता या दृष्टीनें वाचण्यासारखी आहे. परंतु त्यांच्या सर्वच निर्यमक कविता कांहीं सैल व सदोष नाहींत. या संग्रहांतील ‘ केशवसुतास ’ ही एकच कविता वाचली, तरी त्यांची यमकविरहित रचना किती सरस असते, याची कल्पना येईल.

निर्यमक रचनेच्या क्षेत्राच्या बाबतींत त्यांचे विचार निश्चित झाले नव्हते. त्यामुळें एक चमत्कारिक चूक त्यांच्या हातून घडली. बंगाली कवींनीं निर्यमकाचें

क्षेत्र, सामान्यतः महाकाव्य म्हणजे प्रदीर्घ रचना याच्यापुरतेंच, मर्यादित केलें आहे. त्यांनीं घालून दिलेली ही मर्यादा अयोग्य आहे, असें म्हणवत नाहीं. महाकाव्याची महती विचार व वर्णनें यांवरच विशेष अवलंबून असते. भावनेपेक्षां कल्पनेवर त्यांत अधिक भर असतो. विकारांची खळाळी त्यांत प्रसंगानें काय उचंबळून येईल तेवढीच. तेव्हां यमकांचें बंधन त्याला घालणें अगदीं अनिष्ट होईल. महाकाव्याचा आस्वाद प्रायः वाचूनच घ्यावयाचा असतो. परंतु भावगीत हें 'गानकाव्य' आहे. तेव्हां त्यांत वर्णसाम्य जितकें अधिक असेल तितकें उत्तम; व त्याची रचना सयमक असलेली चांगली. रेंदाळकरांना महाकाव्य व भावगीत यांतील या रचनेच्या भेदाचें भान राहिलें नाहीं. त्यामुळें, 'डाकवाला' वगैरे त्यांचीं यमक नसलेलीं भावगीतें प्रसिद्ध होतांच, विषारी टीकेचें वादळ एकदम उठलें. ते कविच नाहींत, असेंहि कांहीं टीकाकारांनीं जाहीर केलें. रेंदाळकर मोठे धाडसी, म्हणूनच त्यांनीं, या तुफानाला दाद न देतां, आपलें व्रत धैर्यानें पुढें चालविलें. निर्यमक कवितेच्या प्रवर्तकांची केवळ महाराष्ट्रांत किंवा बंगाल्यांतच निंदा झाली असें नाहीं. इंग्लंडांतहि निर्यमक कविता लोकप्रिय व्हावयाला फार काळ लागला. रायमर किंवा जॉन्सन् हे टीकाकारच काय, पण ड्रायडन व बायरन यांच्यासारखे कवीहि निर्यमक कविता लिहिणें अगदीं नादानपणाचें समजत. व्हॉल्टेअर तर, एकादें कार्ड खरडण्याइतकेंच निर्यमक कविता लिहिणें सोपें आहे, असें म्हणे. परंतु प्रतिकूल टीकेमुळें आजपर्यंत कोणतीच सुधारणा घडून यावयाची राहिलेली नाहीं. 'It will be found that, speaking broadly, the whole history of criticism has been a triumph of authors over critics'.—हे मोल्टनचे उद्गार अनुभवसिद्ध नाहींत, असें कोण म्हणेल ? जें जें म्हणून अभिनव किंवा अपरिचित दिसेल, त्यावर जे रूढीचे दास बेलाशक शस्त्र उचलतात, त्यांचा सूड घेतल्याशिवाय प्रगमनशील काळ कधींहि रहात नाहीं. स्वतःच्या संकुचित मताचा अभिमान धरून, जे जगाच्या अभिरुचीला आळा घालावयाला प्रवृत्त होतात, ते कालांतरानें नादान ठरले, तर त्यांत नवल काय ! सुनीत, गजल व निर्यमक कविता यांच्या प्रसाराला टीकाकारांनीं यापुढें कितीहि विरोध केला, तरी त्यांचें उन्मूलन होणें आतां अशक्य आहे.

रेंदाळकरांच्या साहसामुळें निर्यमक कविता मराठींत रूढ झाली इतकेंच नव्हे, तर इंग्रजी Blank verse च्या धर्तीवर गद्यसदृश व यमकविरहित रचना सुरू करण्याचा प्रयत्न आज सावरकर करित आहेत. रेंदाळकरांनीं फक्त वृत्ताला असलेलें यमकाचें बंधन तोडलें. सावरकर त्याहून पुढें गेले असून, आणखी कांहीं काळानें चरणाची मर्यादाहि मराठी कवि मानणार नाहींत. जें सांगावयाचें असतें तें संपलें, तरी आज कवीला, केवळ चरण पुरा करण्याकरितां, फालतू शब्दांची भरती करावी लागते. खिळे जुळविणारा जसा अक्षरांच्या मधील मोकळी जागा लेडा घालून भरून काढतो, तशीच आज काव्यरचनेची स्थिति आहे. व्हिट्मननें हें चरणाचें बंधनहि पाळलेलें नाहीं. विचार संपला कीं वृत्तहि संपलें: कारण भाषेकरितां भावना नसून, भावनेकरितां भाषा आहे. ही जाणीव कवींना ज्या दिवशीं तीव्रतेनें होईल, त्या दिवशीं चरणाची मर्यादाहि ते झुगारून देतील. रसात्मकता हा कवितेचा प्राण आहे. रचना हें केवळ बहिरंग होय. हें तत्त्व कवींना आतां उमजलें असून, मराठी कवितेंत यापुढें सतत परिवर्तन होत जाणार. पण त्यामुळें टीकाकारांना इतकें भेदरून अगर भडकून जाण्याचें कारण नाहीं. फळ किडलें, कीं तें कुजून कालांतरानें आपोआप गळून पडतें. त्याची कीड वृक्षाला लागते, असें थोडेंच आहे ! सृष्टीचा हा नियम त्यांनीं लक्षांत घ्यावा. कोणताहि नवीन वाङ्मयप्रकार जर मराठी भाषेला मानवला नाहीं, तर तो कांहीं दिवसांनीं मागें पडेल. परंतु एकादा वाङ्मयप्रकार आपल्याला उमजत अगर आवडत नाहीं, एवढ्याच कारणामुळें त्यांनीं विरोध करावयाला पुढें व्हावें, हें अनिष्ट होय. कवीला बंडखोर म्हणणें सोपें आहे. पण त्याचें बंड मोडून काढणें मात्र सोपें नाहीं. कवि बंड करावयाला प्रवृत्त होतो, तो त्याला खुमखुम असते म्हणून नव्हे; तर, जगच त्याला सुखानें नांदूं देत नाहीं, यामुळें. त्याला स्वातंत्र्य हवें असतें; व तें जर त्याला मिळालें नाहीं, तरच तो बंड करितो. खरा कलावंत हा आपल्या प्रतिभेचा गुलाम असतो. स्वतःच्या मस्तकांतील मणि समोर भूमीवर काढून ठेवून नाग जसा त्याच्या तेजानें दिपून डुलतो, तशी त्याच्या मनाची अवस्था असते. त्याची प्रतिभा दाखवील त्या मार्गानें तो जातो; जगाची वाट त्याला दिसतच नाहीं. दुनियेंतील सगळ्या कलावंतांचा राजा जो कवि, त्याच्या स्वभावाचें हें मर्म न कळल्यामुळें, जग त्याला बंडखोर म्हणतें. परंतु, त्याच्या साहसामुळें समाजाची बुद्धि स्वतंत्र होते,

ह्या लाभ सामान्य नाहीं. साहसावांचून जगांत आजपर्यंत कोणती क्रांति घडून आली आहे ! 'The Danish poets never fell, because they never mounted to a height from which there was any danger of falling. They left it to others to ascend Mont Blank. They escaped breaking their necks, but they never gathered the Alpine flowers which only bloom on the giddy heights or on the brink of precipices' —हें डॅनिश कवींच्या दुर्बलतेचें जॉर्ज ब्रँडिस यांनीं केलेलें वर्णन मराठी कवींनाहि लागू पडतें. केशवसुत आणि रेंदाळकर यांच्याशिवाय एकहि साहसी कवि गेल्या शतकांत महाराष्ट्रामध्यें निर्माण झाला नाहीं. नवीन प्रदेश हुडकून काढण्याची हिंमत जे धरतात, त्यांचें गलबत खडकाला लागण्याचा संभव असतो, हें खरें. पण त्याला भिऊन साहस करूं नये, असें म्हणून कसें चालेल ! रेंदाळकरांनीं साहस केलें, म्हणूनच आज निर्यमक कविता मराठींत रूढ झालेली आपण पहात आहों. त्यांच्या या साहसाचें गौरव समकालीनांनीं केलें नसलें, तरी भावि कवि त्याबद्दल त्यांना धन्यवाद देतील, अशी मला खात्री आहे.

महाराष्ट्र–कचेरी,<br>नागपूर, ३०।९।२४

**ग. त्र्यं. माडखोलकर.**

# रेंदाळकरांची कविता.

## मन्दारमञ्जरी

### राधाविलाप

विरहाकुल राधिका मानसीं यदुनाथा चिन्ती
मन्दगतीनें विचरे विपिनीं कुन्दमुकुलदन्ती
स्कन्धीं रुळती कुन्तल कुरळे सुटुनि मलिन झाले
वसनहि मळलें इन्दुमुखीचें तेज लया गेलें !
शोकभरानें वाहति नयनीं प्रबला जलधारा !
कान्ति लोपुनी व्याकुल कोमल देह दिसे सारा !

"नन्दसुता, ही अनुचित करणी काय अशी केली ?
शठा, प्रीति मजवरिची सारी केवि लया गेली ?

"कालिन्दीपुलिनांत खेळलों बहुपरि आनन्दें !
भेटासि येउनि या कुञ्जीं जरि वारियलें नन्दें !

"विलास करुनी अनेक नेल्या पलापरी रजनी
पूर्वसुखाची अठवण देती स्थळें कितिक विपिनीं !

"हळु हळु कांहीं बोलत बसलों या आम्रातळीं
या लतिकेचीं पुष्पें गुम्फुनि माळ तुवां केली !

"पडुनि चांदणें चमकुनि यज्जल मोहितसे नयना
येथें बसुनि देखियली कितिदां बा ती ही यमुना

"लपंडाव खेळलों मजेनें निबिडलताकुञ्जीं !
विकसुनि कुसुमें जेथें घालिति मिलिन्द्गण रुञ्जी
"या लतिकेवरि बसुनि घेतले झोके यदुराया
दिन न जाहले फार तव स्मृति जाय कशी विलया ?
"रुसुनी बसतां मधुरवचांनीं आनन्दित करुनी
कृष्णा, माझें कबरीबन्धन केलें या स्थानीं !
"रसालविटपीं बसुनि कोकिला मञ्जुल करि गान
राहुनि येथें ऐकत होतों सोडुनिया भान
"तोच अहा ! तूं अससी कृष्णा, काय सांग आतां ?
या राधेचा विसर कसा वद पडला तव चित्ता ?
"मथुरेहुनि अक्रूर पातला न्यायाला तुजला
निघुनी जाशी पुसुनि न एका शब्देंही मजला !
"कार्य संपतां येशिल मागें भेटाया फिरुनी
दमलें कृष्णा, आजवरी तव वाट अशी बघुनी !
"उद्धव आला निरोप घेउनि शठा तुझ्याकडुनी !
कुशलहि पुसलें न मला ह्मणुनी बसलें रडरडुनी !
"आलें वैभव थोर म्हणुनिया गर्व काय आला ?
नीचजनोचितवृत्ती ऐसी उचित नसे तुजला !
"गवळ्याची मज पोर म्हणुनि कीं त्यजिसी अवमानें ?
तुझा जन्मही गाई वळतां गेलासे जाणें !
"माझ्या सहवासाची आतां लाज काय वाटे ?
नीचाहुनि तूं नीच ! मूढ तुज म्हणाति वृथा मोठे !
"मथुरेला तूं एकवार जो येथुनि गेलास
तिथेंच गुंगुनि अससी फिरुनी इथें न आलास !

'प्रथम मला वाटलें प्रेम तव माझ्यावरि भारी
परि आतां समजली खचित ती विषयेच्छा सारी !
' नेउनि निन्द्या मार्गीं मजला भ्रष्ट करुनि आतां
दर्शन राहो, निरोपहि न कां धाडिसि यदुनाथा ?
" देव म्हणे हा कसला मेला मांग असे दुसरा !
छळुनी दीनां, आनन्दें मनिं खेळ करी सारा !
" काय अलीका ! सगळी प्रीती लटकी तीं ठरली! –
शपथा साऱ्या व्यर्थ जाहल्या ?-वचनें तीं गेलीं ?
" नीचा ! फसवुनि दीनेला या काय लाभ झाला ?
जननिन्दा लागली पाठिशीं ! काय म्हणूं तुजला ?
" राजकुमारी बहुता वरिल्या तरि कृष्णा समजें
प्रेम मिळेल न केव्हांही तुज मत्प्रेमासम जें !
" प्रेमाचें परि काय तुला रे !-विषयीं ज्या गोडी
छे छे ! कृष्णा, योग्य नसे ही कपटवृत्ति सोडी !
" काय मला तूं खरेंच त्यजिलें सांगें यदुराया ?
तुझ्यावांचुनी प्राण पातले हे कण्ठीं जाया !
" पूर्वीपरि या कुञ्जीं दडुनी फसविसि कीं मजला ?–
ये ये झडकरि ! विलम्ब न करीं ! वांचिव दीनेला !
" थांब नाहिं तर–मींच काढितें तुजला हुडकोनी !
बाई, नाहीं या कुञ्जीं तरि !–गेला कीं पळुनी !
" थांब कसा पळतोस पाहतें, धरितें बघ आतां !–
काय इथेंही नाहीं ?–कोठें लपसी यदुनाथा ?
" गेला बाई ! मला फसवुनी हाय हाय गेला !"
कदलीपरि कोसळुनि पडली शोकार्ता बाला !

## प्रेमनिकृन्तन

आला भानु समीप हें बघुनिया प्राची हसे लाजुनी !
दावोनी निजराग तो हृदयिंचा टाकी तया मोहुनी
वेडा तोहि भुळोनि जाय न कळे वृत्ती तिची वञ्चका
झाला कामविचारमग्न ! पडला पाशांत तीच्या निका
सारोनी असिताभ्रवस्त्रपटला चुम्बी रवी तन्मुखा
वाटे त्यास तदा " अहा, न उरली सीमा मदीया सुखा ! "
मूढाला कळलें न, जीस दयिता मानोनि आनन्दला !
ती आहे कुलटा,-जिच्या न हृदयीं जागा मुळीं प्रीतिला !
" प्रेमाची पुतळी मदीय दयिता प्राची असे सुन्दरी "
ऐसें मुग्ध रवी गणोनि बहु तो सन्तोषला अन्तरीं !
प्रेमें घेउनिया निरोप सखिचा वेगें पिटाळी रथ
कान्तेच्या विरहें तया गमतसे कष्टप्रदायी पथ !
यत्नें चालुनि मार्ग थोर रवि तो अस्ताचलीं पोचला
घ्याया दर्शन एकवार सखिचें मागें करी दृष्टिला
तो रागान्वित पाहुनी तिज तदा प्रेमें करां लांबवी
वेढाया रमणीतनू बघतसे कामप्रमादें रवी !
हा हा ! तों कुलटा बघेहि न तया उन्मत्त होओनिया
प्रेमोत्साह तया कुठालिं रविचा हा हन्त ! गेला लया
हा उन्माद सखी कशास्तव करी नेणोनि हें अन्तरीं
औदास्यें भरला न राग मनिंचा चण्डांशु सोडी परी !
रागें पश्चिम दिग्वधू विलसते भानू न पाही तिला,
प्रेरोनी कर मागुती प्रियसखी वेढावया धावला !
कार्यत्याग करावया न शकला, कान्तेस सोडावया,-
झाला दीन उदास चञ्चल रवी,-आनन्द गेला लया !

प्रीतीचा महिमा असाच विलसे सामर्थ्य मोठें तिचें
दुःखानें दयितावियोगसमयीं कांहीं न लोकां सुचे !
कार्यव्यापृतमानसा गमतसे प्रेमीं बहू विश्रम
उत्साहें जन होय सङ्कुल,—करी यत्नें नवीन श्रम

शोकोद्भ्रान्त रवी वदे " सुरुचिरे, कान्ते, प्रिये, सुन्दरी !
हा हा ! कोप वृथा किमर्थ करिसी या सांग दीनावरी ?
केला काय तवापराध म्हणुनी गे रुष्ट होसी गडे ?
क्रोधानें फिरवून पाठ करिसी दृष्टी न माझ्याकडे !

" झालों उद्धत मी न, सोडुनि तुला कोपें नसें चाललों
स्वामीनें मज कार्य नेमुनि दिलें माझा न मी राहिलों
कान्ते, ही परतन्त्रता छळितसे, मद्दोष कांहीं नसे
माझा काय उपाय ? हाय ! सखये, आतां न वेडे रुसें ! "

राकानायक तों हळूच उदया आला, तया पाहुनी
झाला मत्सरमूढ भानु विकल क्रोधानलानें मनीं
आतां हन्त तयास येइ कळुनी वृत्ती सखीची खरी !
शोकव्याप्त रवी भ्रमे, बडबडे, वेडावला अन्तरीं

" हा दुष्टे ! अजि साधुगर्ह्यचरिता ऐसें कसें दाविलें ?
मोहीं गुंतवुनी मला- प्रथम गे आतां फशीं पाडिलें
कामोन्मत्त तुझा स्वभाव जर का होता मला ठाउका
मे नीचे तरि निश्चयें न कधिंही मी पाहतों त्वन्मुखा !

" आतां तें परि कासया?—गवसुनी पाशीं तुझ्या मी अहा !
झालों पात्र जनोपहासविषया कीर्तीहि लोपे महा !
भार्या हाय मदीय तूं म्हणवुनी उन्मत्त होसी कशी ?
दुष्टे, भीति समूळ सोडुनि अतां शीतांशुला पाहसी ?

"सारासारविचारणा त्यजुनि जो सेवी गुरूची सती
जो लोकीं उडुयामिनीकुमुदिनी यांचाहि आहे पती
ऐशा जारशिरोमणीवरि कशी झालीस तूं मोहित ?
प्राया कामविचारमूढ रमणी जाणें न कोठें हित !

" मूढे हें समजे न, सर्व भुवनें संगोपितों मी स्वतां
पर्यायें सकलङ्क हा विधु असे मद्भृत्य गे तत्वतां
देतों मीच तया प्रकाश म्हणुनी हा होय तेजोन्वित
ऐशा हीनगुणावरी तरि कशी गे भाळसी साम्प्रत ?

" माझें प्रेम गणोनि तुच्छ बघसी हांसोनि त्याला कशी ?
आहे चञ्चलवृत्ति ही समुचिता उन्मादिनी, कां अशी !
माझें वैभव काय हीन गमलें ?—कीं सोडिसी या जना
किंवा हेंच खरें-पल स्थिरपणा नाहीं स्त्रियांच्या मना !

" जा जा,—भोग विलास दम्भकुलटे, नानापरी त्यासवें
मी वेडा,—तव जाहलों पिउनिया उद्भ्रान्त ओष्ठासवें !
हा हा ! दुःस्थिति कोण ही मजवरी आली ? सुचेना मुळीं
मीं मूढापरि सेविली अहह, हीं हर्षें विषाची मुळी ?

"कैसा हा अपमान—वञ्चन कसें—दुष्कीर्ति सोसूं कशी ?
गेलें नांव लयास, वेळ फिरली हास्यास्पदा ही अशी
देवा जीवित हें नको,—जळतसे माच्चित्त शोकानळीं"
दुःखानें रविनें तदा जलनिधीमाजीं उडी घातली !

## कविता आणि कवि

जेव्हां निद्रित लोक होति सगळे सृष्टि प्रशान्ता असे
जेव्हां इन्दु डुले निरभ्र गगनीं ज्योत्स्ना प्रमोदें हसे
आनन्दें उडुबालिका विहरती स्वेच्छें नभःप्राङ्गणीं
त्या काळीं कविता प्रिया स्मितमुखें खेळे कवीच्या मनीं

वेगें सत्प्रतिभा मनीं उसळुनी तल्लीन होतो कवी
तन्द्री लागुनि देहभान विसरे हर्षा फुटे पालवी
तेजोगोल नभःस्थ, सृष्टि अथवा कांहीं तया न स्फुरे
सारें तेजच तेज पूर्ण !—सुटती काव्यामृताचे झरे !

सृष्टी ही ललना, कवी पति तिचा, नातें असे हें खरें !
भोक्ता अन्य तिचा कवीविण जगीं आहे कुणी कीं बरें ?
या कान्तेस बघोनिया कवि डुले उन्मत्त होई मनीं,
प्रेमालाप करी अनेक,—म्हणती त्या काव्य ऐसें जनीं !

## उत्कण्ठिताचें गाणें

निशिदिनिं न सुचे कांहीं मजला ध्यास तुझा लागला
शोधुनी तुज हा जन भागला
भ्रान्त जाहली मति चञ्चल बहु कवणाहि विषयिं न रमे
तुझ्याविण मन्दभाग्य हा श्रमे
अवनी सारी शून्य भासते तुजवांचुनि राजसे !
भरलें मनोरमे मज पिसें
तव चिन्तनिं सारी घालवितों यामिनी
परि कृपा न करिसी दीनावरि भामिनी !
अनुकम्पा कैसी येईना त्वन्मनीं ?
अहा, सकल ही शांति लोपली धैर्यहि गेलें लया !
गडे दे दर्शन दासास या !

फुलुनी कमलें प्रभातसमयीं गाते भ्रमरावली
जाउनी तेथ तुला शोधिली
पुष्पितलातिका रम्य उपवनीं तरुसङ्गें क्रीडती
धुंडिलें तेथहि तुजसी किती !

वृक्षवल्लरींमधुनी निर्झर हसत हसत चालला
हुडकिलें तिथेंहि सखये तुला
परि हाय कुठेंही यश नाहीं लाभलें !
हृदयेश्वरि, तुजासि न एकदांहि देखिलें !
मग आलिङ्गन वा चुम्बन दुरि राहिलें !
मनोहरे, तुजवीण शून्यता आली हृदयाला
गडे दे दर्शन दासास या !

त्वद्दर्शनलालसा धरोनी चढलों मी अम्बरीं
पुसिलें चान्द्रिकेस बहुपरी
उडुललनांसह खेळ खेळसी काय अशा सम्भ्रमें
तयांसहि पुसुनी जन हा श्रमे
नभःप्राङ्गणीं सजलजलधरासवें ताडित् विहरतां
तिलाही बहुपरि पुसिलें स्वतां
करि रसालविटपीं मधुर गान कोकिला
उपवनीं सुगन्धित लहरि फिरे आनिला
परि सांगे वार्ता तुझी न कोणी मला !
कविते ! अससी कुठें ?—समुत्सुक झालों भेटावया
गडे दे दर्शन दासास या !

## उद्यान

लतिकाविकासितकुसुमसौरभा हरितो वायु तसा
यौवनललिताप्रियावदनमधु युवजन सेवि जसा
कपटचरित उन्मत्त मधुप हे येती झोंबाया
वितानरज्जू वळुनि ठेविले त्यांतें बांधाया
विकसितकुसुमच्छद्में दाविति हास्य, लास्य करिती
प्रियमन्दानिलसङ्गमनवसुख हृदयीं अनुभविती !

करुनी कम्पित शाखाकर जणु झिडकारिति अनिला
पुन्हा विनोदें कुसुमें फेकुनि भूषविती महिला

मधुप्राशनोन्मत्त मधुकर स्वच्छन्दें फिरती
स्वयंसिद्धकविसम आनन्दें गायन हे करिती

श्रान्तपान्थविश्रान्तिप्रद हे अवनीरुह डुलती
नूतनकिसलयिं राग हृदयिंचा जाणों दाखविती

लतिकाशाखान्दोलीं बसुनी विहङ्गगण गाती
मञ्जुलनादें अम्बर भरिती ! धन्या खगजाती !

इकडे कुसुमें ! तिकडे कुसुमें ! भूमिवरी कुसुमें !
रम्यताच सर्वत्र ! न तुलना या उपवनसुषमे !

जिकडे तिकडे हरितपल्लवा दिसते तरुराजी !
मृदुता विलसे इथें ! न मावे मोद मनामाजीं !

कारंजें रञ्जवी जना, जलतुषार उडवि अहा !
मानस भुलवित जणु आनन्दचि वरती उसळत हा !

सन्ध्यारागें रञ्जित अम्बुदखण्डें नभिं फिरती
अनुरागें स्मित करित विहरती उपवनिं युवयुवती

लतिकाकुञ्ज प्रणयकथांनीं पवित्र हे होती !
रभसालिङ्गनचुम्बनदाना उचित भूमि हो ती

कोणी ललना उत्सुक विहरे प्रियदर्शनकामा
रामा कामाहता न गणिते उपास्थिता यामा !

रमणीगणमधुरस्मितनादें मोहित जन होती
उपवनशोभा देखुनि दीप्ता हो प्रणयज्योति !

शीतलमन्दानिललहरी श्रमपरिहारा करिते
सुधाशीकरोत्सेकें जणु मनिं नवोत्साह भरिते !

शान्तिपथोन्मुख सन्ध्यासमयीं भुवन सकल दिसतें
प्रखर भानु जाउनि रमणीया रजनि पुढें येते

अचिरसङ्गमोत्सुकनवबाला यामागमिं हर्षें
दृढपरिरम्भादानकाङ्क्षिणी सुप्रणयोत्कर्षें

तिमिरपटल हळुहळू पसरलें जगतावरि दाट
उद्यान त्यजुनी जन धरिती सदनाची वाट

परि मज कसलें सदन ! प्रियजनविरहानल भाजी
उद्यान न सोडवे ! गुंगली इथेंच मति आजी

बा उद्याना, धन्य धन्य तूं मनस्ताप हरिसी
जनसुखवर्धनकरा, दयाळा, हृदयिं शान्ति भरिसी

सदन नको मज ! पद न उचलवे ! इथेंच बैसोनी
वाटे नूतनकवितानन्दीं जावें गुंगोनी !

## माझ्याच सुखासाठीं !

प्रभातसमयीं अहा ! हरुनिया तमःसञ्चया
स्वकोमलकरीं जनार्तिकर शीत संहारुनी
सुगन्धहृतमानसा कमलकानना हासवी
मलाचि सुख द्यावया खचित हा झटे भास्कर !

विलास लतिकांसवें करि शिशूपरी खेळतो
हळूच सुम हालवी भ्रमित भृङ्गपङ्क्ती करी
तरङ्ग उठवी जळीं पुनरपी फिरे मागुता
मलाचि सुखवावया पवन गन्ध घेऊनि ये !

करी मधुर गायना मधु पिऊनि भृंगावली
सहास्य मदनोद्धता करिति या लता नर्तन

विहङ्गगण मञ्जलस्वनभरें नभातें भरी
मलाचि सुखवावया झटत सृष्टिदेवी अहा !
विभूषावीति कामिनी श्रमुनि अंगगें आपुलीं
मुलें चिमकुलीं सहासमधुरध्वनी काढिती
अनेकजनसङ्कुला दिसत राजरथ्या कशी !
मलाचि सुखवावया श्रमति पौर सारे खरे !
वनें उपवनें अनन्त सदनें चमत्कार ते
न कां नयनरञ्जना आजि करूं सुखें पाहुनी ?
निवारण करी मला कवण या जगाभीतरीं
मलाचि सुखवावया भुवन हें उदेलें असे !
सतार जवळी नसे स्वरहि गोड नाहीं मला,
नकोच परि तें !—करी कवण यत्न भृत्यापरी ?
नृपापरि बसूनिया श्रवणसौख्य मी सेवितों !
मलाचि सुखवावया करिती यत्न सारे जन !
दिनान्तसमयीं रविप्रखरतापतप्तां जनां
करी सुरभिशीतलानिल सुखप्रहर्षान्वित !
कुणी मनुज दीन वा नृपति सारखे त्या जला
मलाचि सुखवावया श्रमतसे न कां मी म्हणूं ?
सुधामधुर शीतल स्वकर चन्द्रमा फेकितो
सुशान्त हृदया करी तमहि वारितो लीलया !
असे समचि शीतता कुटाजिं राजसौधावरी !
मलाचि सुखवावया करित यत्न निःसंशय !
अनन्त मधुरोज्ज्वला गगनिं तारका शोभती !
महीवरि सुकोमला पसरिती स्वकान्ती अहा !
विलास करिती बहू रिझवितात मल्लोचनां
मलाचि सुखवावया उदय पावती निश्चयें !

मला स्थिति न एकली रसविहीन व्हावी असा
विचार करुनी भला निपजवी ऋतू सृष्टि ही !
रसालविपटीं अहा ! बसुनि कोकिला मञ्जुल–
स्वनें रमवि कीं मला सुखविण्या वसन्तीं अहो !
ताडिद्विलसितें नवाम्बुधरगर्जना प्रावृषीं
नवीन हरितां तृणीं भरुनि शोभती काननें
गभीर सरिता महाचपल मोहिती निर्झर
मदीयसुखवर्धना सकल चालला खेळ हा !
शरत्समयिं लाभती मधुर कैक धान्यें नवीं !
कृषीवल मनोहरें करिति गायनें हे पहा
असे अखिल सृष्टि ही मम, दिली जनां भोगण्या !
मलाचि सुखवावया श्रमति खास सारे जन !
अहा ! प्रभुवरें दिली अनुपमा मनःशान्तता !
अहा ! भुवन सर्व हें मम सुखा असे निर्मिलें !
पदार्थ सगळे जनां वितरुनी बघे तो प्रभू
तसा बघत मीहि हो सकळ सृष्टिलीला मुदें !

## कोकिल

कोठें काढुनि कर्कश ध्वनि जनां सन्त्रासवी काक हा !
घूत्कारें भिववी सुकोमलमना हा घूक कोठें पहा !
कोठें हाय ! विचारशून्य शुक हा स्वच्छन्द काढी ध्वनी
लोकानन्दन एकलाचि दिससी तूं कोकिला, या जनीं !

गड्या ! श्रवुनी तव मञ्जु मञ्जु गान
रसिक विसरे सानन्द अहा ! भान
फिरुनि फिरुनी ऐकिली तुझी वाणी
तरिहि उत्कण्ठे न ये कदा वाणी !

प्रतिश्रवणीं नव माधुरी निराळी !
नुरे भुवनस्मृति तुझ्या गानकाळीं !
सुधानिस्यन्दन करी तुझी वाचा
प्राशुनी मी उन्मत्त होय साचा !
अमरललनांची मधुर म्हणाति वाणी
मधुर वीणारव वानिताति कोणी
परी लटिकें तें सर्व मला वाटे
तुझ्या गानें आनन्द मनीं दाटे
कुठें नैसर्गिक रम्य तुझी वाचा ?
कोण करितो अनुकार मधुरवाचा ?
गड्या मजला नावडे जडा वीणा
जवळिं असतां तूं गायनप्रवीणा !
अमृत वर्षी यामिनीपाति करांहीं
तुझ्या मञ्जुल नादांत तेंच राही
करुनि सिञ्चन तूं विहङ्गमा, त्याचें
लोकमानस पल्लवित करीं साचें !
वचःपीयूष न करी मुदित कोणा ?
सेवुनी त्या विसरे न कोण भाना ?
तुझ्या गानें तल्लीन वृत्ति होय
लया क्षणभरि संसारदुःख जाय !
जशी निर्मलता जान्हवीप्रवाहीं
सुकविवचनीं माधुर्य जसें राही
जातिकुसुमीं सौगन्ध्य मिळे जेवी
तुझ्या गानीं सौरस्य होय तेवी !
विरस लोकीं दिसतात विषय सारे
पिका ! अद्भुत रस निपजविशि कसा रे ?

कुणाजवळी शिकलासि कला ऐसी ?
प्रमोदानें जी भरित सज्जनांसीं
बसुनि विकासितसहकारविटपदेशीं
रवें सारें गजबजुनि विपिन देशी !
बघुनि सृष्टीचे रुचिरतर विलास
ध्वनिव्याजें ते सांगसी जनांस !
सृष्टिदेवीचा कवी जसा भक्त
तूंहि अससी बा तेविं विपिनसक्त !
निसर्गाच्या वर्णनीं उभयतांही
तुम्ही झटतां सन्तत प्रयत्नांहीं !
मीहि आहें कवि, रञ्जवीं जनातें
तुझें माझें अजि होय एक नातें !
तुझ्या वाणीची माधुरी विहङ्गा !
ओतुनी मद्वाचें करी खेदभङ्गा !
कला माझी शिकवीन मीहि तूतें
करूं आतां ये स्वगुण-विनिमयातें
तुझें सांगें माधुर्यबीज काय ?
होय जेणें रोमाञ्चयुक्त काय
अरे–हां हां–हें काय? थांब थांब !
पिका, कोठें उडुनियां जासि लांब?
प्रश्न तूतें मी कवी हा विचारीं
नभीं गर्वें मारिसी कां भरारी ?
नसे निन्दक मी तुझा भक्त आहें
दाविसी बा उन्मत्तवृत्ति कां हे ?
वृथा रसिकावरि असा काय राग?
तान तरि जा घेऊनि महाभाग !

गायनाची फेकीत पिक लकेर
उडुनि गेला तो हाय हाय ! दूर
बीज त्याचें वाङ्माधुरिचें काय
नाहिं कळलें शेवटीं मला हाय !

## कांता आणि कविता

कांते ! शांते ! ये ये झडकरि ! कविते ! दयिते विलम्ब न करीं
परस्परांच्या करिं कर घालुनि हासत हासत या गे धावुनि !
हृदयदेवता तुम्ही उभयतां मदीय सुखसर्वस्व तत्वतां !
असतो संतत तुमच्या चिन्तनिं अन्य विषय धरि हा जन न मनीं !
मधुर मधुर आनन्द वितरुनी मनस्तापतति सहसा हरुनी
कवण देत ती शान्ती चित्ता ? कान्ता किंवा दुसरी कविता !
कान्ते ! ये तर लाज कशाला ? ओढ पुढें निज मुग्ध सखीला !
वेडी दुरि दुरि कां ही सरते ? उत्कण्ठेनें मन्मन भरतें !
चल चल ! वेडे लाज किती ही ? अशा समयिं समुचित तुज नाहीं !
हासत मुरकत कटाक्ष एक एकवार तरि मजवरि फेक !
कान्ते ! तूं तरि शिकवीं तिजला ! मदनुराग तिज न दिसे कळला
मुळची कविता आहे लहरी कोण तुजविणें तिला आवरी ?
अरे–काय हें ? कान्ता रुसली ! प्रिये तुला ये शङ्का कसली ?
"कवितासवतीवरी गुंगला !" छे छे ! वेडे, भ्रम हा तुजला !
अधर कापतो थरथर, गालीं गुलाबसम कोपें ये लाली !
मुख फिरवुनि दुरि सरली कान्ता ! कौतुक झालें कविच्या स्वान्ता !
हळूच मागुनि वदनाखालीं हात घालुनी, कवि त्या कालीं
बळेंच सम्मुख करि दयितेला ! म्हणे–" वृथा कां राग पातला "
कवि हसतां कांताही हसली ! कोपवृत्ति ती लया पावली !
उत्कण्ठेनें अधरखण्डना नेलें कविनें जवळीं वदना !

लज्जामन्दसुहास्यामिषानें अधरिं वसति केली कवितेनें
यथेच्छ कविनें सुधा प्राशिली तदा मनीं कविता सञ्चरली !
कवि बोले उन्मत्त होउनी "सखये! कविता तूंच मम जनीं
अधर तुझा करि अमृतस्यन्दन कवितेचें हा विलासभवन !"
सजीव कविता आहे कान्ता ! मधुर विलासीं भुलवी स्वान्ता !
वचन, दृष्टिविक्षेप, अधररस, यांही कविता निपजे सरस !

## दे माझी भगिनी मला

[ या कवितेंत स्त्रीपुरुषांत बन्धु-भगिनी भाव असूं शकणार नाहीं असा आक्षेप घेणारास उत्तर दिलें आहे. ]

आलिङ्गी शशलाञ्छनास विमला प्रेमें अहा ! चन्द्रिका
तो संयोग असे जनांस निखिळां आनन्ददायी निका !
बन्धुप्रेम धरूनि उत्सुक सती भेटो मला लौकरी !
दे माझी भगिनी मला ! न उभयां आतां विरोधा करीं !

ही तारा करिते विलास विविध प्रेमें नभःप्राङ्गणीं
इन्दूला गतिविभ्रमें भुलविते चित्तीं समानन्दुनी !
बन्धुप्रेमभरें स्वकोमलकरी वेढो मला सत्वरी !
दे माझी भगिनी मला ! न उभयां आतां विरोधा करीं !

भानूची दयिता उषा मज बघे होऊनि रागान्वित !
आम्राची प्रियवल्लरीहि सुमनोव्याजें मला तर्पित !
हा साऱ्या भगिनी मदीय ! मज का भीती जगाभीतरी ?
दे माझी भगिनी मला न उभयां आतां विरोधा करीं

लोकीं प्रेम असे अनेकपरिचें सारें पवित्र स्वतां
प्रेमाची अनुगामिनी परी असे ही योषिता तत्वतां
ज्या मार्गें प्रणयोपलब्धि घडते ती तो स्वयें आचरी
दे माझी भगिनी मला ! न उभयां आतां विरोधा करीं !

आहे कान्त जसा तिला प्रिय तसा बन्धू नसावा कसा ?
कीं कान्तप्रणयप्रदानसमयीं बन्धू गमो शत्रुसा ?
केलें बन्धुवरी, करी न दयितप्रेमांत वाटा तरी
दे माझी भगिनी मला ! न उभयां आतां विरोधा करी !
मेघें सिन्धुंतुनी गिरीवरि नदी आणोनि निक्षेपिली
तों ती सागरबन्धुदर्शन करायातें जवें धावली !
लोकीं दग्ध करील बन्धुभगिनी कोणी वियोगान्तरीं ?
दे माझी भगिनी मला न उभयां आतां विरोधा करीं !

## सुप्तशिशुप्रबोधन

ऊठ मुला झडकरी पसरला प्रकाश अवनीवरी ॥ ध्रु० ॥
गेली रजनी, उडुगण लोपे, तिमिर जाय तें दुरी
मधुरनिनादें सुखविति उडती विहङ्गगण अम्बरीं
मञ्जुलझंकृतिसंकुल केल्या सकल दिशा मधुकरीं
पसरे नूतनविकासितसुमनो–गन्ध सरःपरिसरीं
शीतलमन्दानिल सुखकारी मनोऽलसा झाणें हरी
पूर्वदिशा उजळुनी हळुच ये भानुरथध्वज वरी
बालरवी हा धरादेविला आलिङ्गी निजकरीं
चन्द्र निशाचर म्हणुनि गतप्रभ झाला गगनान्तरीं
शय्या त्यजुनी उद्यमरत हो विमल यशातें वरीं
भाव धरुनि जगदेकनाथपादिं लीन होइं लवकरी

## अमर कसें व्हावें ?

वीरा ! जाण वृथा पराक्रम तुझा जो दाविसी सङ्गरीं
वेड्या, धैर्य विशाल खड्गपटुता हीही वृथा भासती !

---

१ नदी व सिन्धु दोन्हीही जलमय असतात म्हणून येथें सिन्धुवर बंधुत्वाचा आरोप केला आहे.

होतां लुप्त करालकालवदनीं राहील वार्ता तरी ?
जा जा शीघ्र कवीकडे ! अमरता देईल तोची तुला !

राजा ! वैभव थोर भोगिसि, असे सामर्थ्य मोठें तुझें !
बा सामन्तकिरीटरत्नकिरणीं त्वत्पादही शोभती !
मोठा कोश असे प्रचण्डबलही कांहीं न तूतें उणें
या लोकीं कविवांचुनी परि दुजा कोणीं तुला वांचवी !

आहा ! मञ्जरि होसि कामतरुची नाहीं तुला गे तुला
सौन्दर्या उपमा न, लोक ललने ! त्वद्दर्शनें मोहती !
ही कान्ती मृदुताहि ही परि गडे कालापुढें का टिके ?
जा गे सूरिकडे! बघूं मग कसा तो काल नेतो तुला !

जें जें रम्य उदात्त कांहिं म्हणुनी आहे जगाभीतरीं
तें सारें विलयास जाइल पुढें कालोदरीं निश्चयें !
त्याचा पाश करोनि दूर फिरवी मागें धरोनी तया
ऐसा विक्रमशालि कोण भुवनीं आहे कवीवांचुनी ?

## चिरसम्मेलन.

" मेघव्याप्त नभांतुनी उतरली विद्युल्लता खालती
कान्ते ! न स्थिर राहिली परि, निघे भूगोल सोडून ती
मागें भीषण अन्धकार पसरे ! वार्ता न याची तिला ?
झाली दुःस्थिति चारुहासिनि ! तशी; कां दास हा वञ्चिला ?

" दिव्यप्रेमसुधारस प्रियकरे ! मीं स्वादु आस्वादिला
आलिंगूनि दृढ त्वदीय अधर प्राणेश्वरी ! खण्डिला
तेव्हां मीं बहु धन्य धन्य गणिलें लोकान्तरीं जीविता
दुःखव्याप्त वियुक्त काल असला आला पुढें हा अतां ?

" गेलें तें सुख ! कोठुनी पुनरपी भोगावयातें मिळे ?
व्हावें दग्ध तुला स्मरून सतत प्रोद्दीप्तशोकानळें !

झाला क्रुद्ध कराल काल तुजला नेलें हरोनी बळें !
नाहीं होत विवेक यद्यपि अशी लोकस्थिती ही कळे !
“ कोठें स्वर्ग कुणास ठाउक ? नसे तन्मार्ग ठावा तुला
कैसी जाशिल एकलीच सुभगे, टाकून येथें मला ?
मी येतों तुजसङ्गती, क्षणभरी थांबे गडे. अम्बरीं
गे नाहीं मजवीण नन्दनवनक्रीडास्पृहा ही बरी !
“ माझें प्रेम असत्य काय गमलें ? कीं मन्तु कांहीं घडे ?
तें मातें कथितां न चालसि नभीं, हें योग्य नाहीं गडे !
नाहीं येत रुची खरीच कलहावीण प्रिये, प्रीतिला
हें तों सत्य असे; परी तव सखे हा मार्ग नाहीं भला !
“ या मार्गावरुनी कशी परतुनी येशील मागें बरें ?
दासाचे नयनाम्बुबिन्दु पुससी तूं केविं आतां करें ?
शोकध्वान मदीय, वायुलहरी ओतील कर्णान्तरीं
भ्रान्ता होशिल तेधवां ! परतणें नाहीं परी त्वत्करीं !
“ केले रम्य विलास जे बहुपरी होतां तयांची स्मृती
वेडें होय मन प्रिये ! तव कशी झाली कठोरा मती ?
गाढालिङ्गनकालिं वस्त्रहि गमे शत्रूपरी सुन्दरी
आतां मीं पडलों महीवरि अहा ! तूं नांदसी अम्बरीं !
“ हा ! हा ! अंगुलिमात्र दूर असतां शय्येवरी तूं निशीं
तेंही सह्य न होतसे मज मुळीं, हें तूं स्वयें जाणशी
आतां दूरवरी कुठें निवससी ठावेंहि नाहीं मला !
कण्ठावें वद केविं जीवित ! कसा हा काल गे पातला !
“ स्वर्गीं प्रेम वसे अशी प्रियकरे, लोकोक्ति आहे परी
प्रेमाची मम त्यास सत्य वदतों येणार नाहीं सरी !
जेथें कल्पलतासुधादि वसती आनन्द खेळे सदा
सत्प्रेमोद्भव काय होइल अशा रम्य प्रदेशीं कदा ?

"प्राशोनी नव अप्सरोधररसा पीयूषगर्वापहा
जेथें देवगण प्रमत्त फिरती उद्यानभागीं पहा
तेथें सात्विकभावरम्य मधुर प्रीती मिळावी कशी ?
सोडोनी मजला किमर्थ सखये, गलीस सांगे अशी ?

" ये ये धांवत ! दास हा श्रमित गे झाला तुला बाहुनी
शोकक्लान्त तनू मदीय सखये वेढी स्वयें बाहुंनीं
हा ! हा ! हा रुसवा तुझा न कधिंही जाणार हें जाणतों
मोहोद्भ्रान्त परी पुनःपुनरपी मुग्धापरी बोलतों !

" आं !–हें काय ? सखी–सखी उतरली स्वर्गातुनी खालती ! !
ये गे ये जवळी अशी ! कर तुला वेढावया धावती !
अश्रू गाळिसि कां ? प्रिये वद पुढें तूतें न कीं यववे !
मी येतों ! – स्थिर राहिं तेथ ! बल गे आलें मला हें नवें !

" न्याया नन्दनकाननीं मज, पुन्हां आलीस मागें प्रिये ?
प्रेमाला तुझिया जगान्तरिं खरा देतां तुलाही न ये !
आलों !– थांब ! – रहा उभी क्षणभरीं ! आलों प्रिये हा पहा!"
होवोनी प्रिय निर्गतासु पडला भूमीवरी तो अहा !

ढळे शुद्ध प्रीती न, शिरिं जरि आपन्नग पडे
परी आपत्तींनीं उलट भरती प्रीतिस चढे !
न कालाही भेद प्रणयियुगलीं सत्य करवे
उपाधि भ्रंशोनी घडत चिरसम्मेलन जवें !

## सुधाकल्लोल

जहालों कीं लोकीं विधिविलसितें धन्य गमतें !
नसे कांहीं पाहीं अवनिंतील मत्सौख्यसमते !
अहाहा ! साठे हा मधुर नव आनन्द न मनीं !
यदंशच्छायाही खचित न मिळे नन्दनवनीं !

विशुद्ध प्रेमाची कवण असते वाम न कृती ?
मिळाला प्रेमाचा मजसि पुतळा वामन कृती !
हृदाकाशीं झाला प्रणयतरणी हा समुदित
फुले वेगें चित्ताम्बुरुह करुनी हास मुदित !

सुखाचें सर्वस्व प्रगट करि सम्मोहलहरी
हरी सर्वा खेदा, झणिं हृदय मोदाकुल करी
तुलावी कीं जीशीं कनकमणिगर्भा न वसुधा
परेशानें प्रीती अहह । सृजिली हे नवसुधा !

सुधेतें प्राशोनी वसति बहु मोदें सुर चिर
परंतू त्यां नाहीं प्रणयमधु ठावा सुरुचिर !
जयाची–राहे न स्मृतिहि असतां सेवत–रुची
जया देती कष्टें सुकवि उपमा देवतरुची !

प्रिय स्वातन्त्र्याही त्यजुनि नमते कीं जनमती
तरङ्ग प्रेमाचे प्रबल हृदयीं जैं जनमती !
मिळाया आलों मी सरलहृदयें वामन ! तुला
तुझ्या प्रेमा लाभे जगतिं मज कीं अन्य न तुला !

कराया पार्थातें सुखभरित दामोदर सजे
तसें वर्षी नेमें मजवरि सदा मोदरस जें !
कठोरा रत्नाशीं उपमित मृदुत्वें न करवे
मिळालें हें दैवें अभिनव सुहृद्रत्न बरवें !

दिपे यत्प्रेमाला शशधरकराची धवलता
वसन्तींच्या रम्या कुसुमित अशा त्या नव लता
अहा ! व्हावें लज्जावनतमुख वीणामधुरवें
मिळालें हें दैवें अभिनव सुहृद्रत्न बरवें !

हरोनी खेदाच्या तिमिरपटला इन्दुसम जें
—मम प्रीती यत्प्रीत्युदधिपुढती बिन्दु समजें

समुत्पन्ना माझ्या सुखलहरि चित्तीं करि जवें
मिळालें हें दैवें अभिनव सुहृद्रत्न बरवें !

सुगन्धातें शीतानिल वरि करी पञ्चमरवा
वसन्तीं सम्फुल्लीं कमलिं अलिझङ्कार बरवा
विधू ये आकाशीं शरदृतुमधें षोडशकल
तथापि त्वत्प्रेमापुढति गमती व्यर्थ सकल ! !

मृगाङ्काची कोर प्रगटुनि चकोर प्रमुदवी
मृगा होतो किंवा सुखकर पयोदागम दवीं
तसें मित्रश्रेष्ठा ! सुखवित तुझें दर्शन मना !
अहा ! तूं प्रेमाचा उचित मज आदर्श नमना !

अहा ! औदास्यातें सुमधुर पिकालाप हरवी
तशी त्वद्वाणी ! तूं मज अलसशैत्यापह रवी !
तुला रत्ना गर्वें त्यजुनि धरिं मी कांच न करीं !
विहारा मोदें सन्मणिसह सदा काञ्चन करीं !

## यथार्थ दर्पोक्ति

“ वेडा हा करितो प्रलाप, उमजे याला न वस्तुस्थिती !
झाली मग्नचि कल्पनामय अशा सृष्टींत याची मती !
निद्राविश्रम ठाउका नहि सदा गुंगे विकारभ्रमीं !
कांहीं लाभ नसे तरी सतत हा होतो वृथा कां श्रमी ?

“ आम्हांला उपयोग काय तरि या आहे कवीचा वदा ?
याचे तर्कट तर्क ऐकुनि सुखी होईल कोणी कदा ?
नाहीं उद्यम ज्यास त्या नृपशुनें स्वच्छन्द काव्यामृत
प्राशोनी भुवनीं खुशाल, असुनी जीवंत, व्हावें मृत ! ”

ऐशीं ऐकुनि सोपहास वचनं सक्रोध झाला कवी
ईषन्मीलितलोचनें उघडुनी पाही सभोंवार तो
गाम्भीर्यें निजहेलना परिसुनी धिक्कारिलें दूषका
थांबोनी क्षण एक त्या समयिं तो वाणी अशी बोलला–

“ जा जा येथोनि मूढा !–पळभरि न रहा ! तोंड दावीं न मातें !
रे तूतें बेडकाला मधुरमधुरुची सांग कैसी कळावी ?
चण्डांशूसा कवी हा चमकत भुवनीं, घूक तूं दुष्ट कोठें ?
माझें सामर्थ्य ठावें तुजसि न, न तरी बोल घेतास मागें !

“ राजेही मस्तकातें नमविति चरणीं ज्याचिया आदरानें
इन्दूसा जो जनांला प्रिय बहु गमला बोलती ‘धन्य धन्य ’
लीलामात्रेंचि ज्याच्या सहज अमरते पावती क्षुद्र लोक
तो मी आहे कवीन्द्र ! त्वरित मुख तुझें आवरीं निन्दका रे

“ कोठें सामर्थ्य माझें ? अबल मनुज तूं मन्दबुद्धीहि कोठें ?
वाचाळा, योग्य नाहीं बडबड असली, बोलसी काय कोणा ?
आहे ब्रह्मा दुजा मी रचिन ! अभिनवा सृष्टि अव्याजरम्या !
काळाचाही सपाटा जिजवरी न चले, मानवांची कथा का ?

“ सृष्टी ही नाशवंता, घडिभरि न टिके चालला फेरफार !
ही माझी काव्यसृष्टि प्रलयसमय तो येइपर्यन्त ऐशी !
वृद्धावस्था न ईतें सतताचि सुभगा यौवनोत्फुल्लकान्ती !
ब्रह्म्याची थोरवी का मजपुढती टिके ? काय मी क्षुद्र कोणी ?

“ आहे संसार सारा चलचि, दिसतसे कल्पनेचा पसारा !
सौख्यें दुःखें नराला कवळिति सहसा कल्पनेवीण काय ?
युष्मद्भालप्रदेशीं असुखचि दिसतें दीन झालां कळेना !
आनन्दाचाचि वांटा त्यजुनि असुख, मी सेवितों–कां ? कवी मी !

" जारे जा ! मंदबुद्धे ! श्रम मम सगळा हा तुला फोल वाटो !
नाहीं माझ्या सुखाचा खचित तुजवरी ठेविला जाण पाया !
अन्नाचे चार गोळे उदरिं उतरणें हाचि कीं फायदा रे ?
हा मूढा ! गाढवेंही सतत उकिरडा फुंकिती तींच थोर !

" जा जा ! उद्योग कांहीं करुनि मर ! तुला कोण बोलावितो रे !
तोरें जा भारवाही ! विषय न तव हा, आवरीं जीभ वेगें !
जेथें तेथें असा कां धडपड करिसी गर्दभासारिखा रे ?
सारे वाक्पाटवातें तव परिसुनि या थक्क होतील खास !

" पोटाची खाच मूढा, भरुनि विहरणें हेंच कीं लोककार्य ?
मारावी कीं भरारी जनपदविहगें प्रीतिच्या अम्बरांत !
अंगींचें वीर्य सारें उघड करुनियां दाखवावें प्रचण्ड !
याचेसाठींच लोकीं कवि अवतरला हा असे जाण सत्य !

" बांधावीं स्नेहपाशीं अखिलजनमनें,–काव्य गातों म्हणून !
लोपोनी वैर सारें मुदित जग असो,–काव्य गातों म्हणून !
अंगींचें लोक वीर्य प्रगट झणिं करो,–काव्य गातों म्हणून !
लोपो नैराश्य, आशा निखिल जनिं भरो,–काव्य गातों म्हणून!
प्राण्यांचा प्राणसार प्रणय उपजवी हा कवी मी स्वकाव्यें !
माझें सामर्थ्य मोठें कुठुनि तुज कळे मन्दधीला विचित्र ?
कां आतां लाजलास ? स्वमुख करिसि कां हीनतेजस्क खालीं ?
कोठें मी ? तूंहि कोठें ? चल चल निघ जा–येथ राहूं नको–जा !

## कवितादर्शन

सुधामधुर चन्द्रिका फेकितो इन्दू भूमीवरी
 तारका चमकति नीलाम्बरीं
अभिनवसुमनःसुरभि गन्धवह मन्द मन्द वाहतो
 सकलजनमनस्ताप वारितो

ऐशा समयीं सौधावरती मी कविताचिन्तनीं
 होतों शान्तमनें पहुडुनी
रजनीवल्लभ निजकोमलकरिं झाकी मम लोचनां
 आलिंगी मज निद्राङ्गना
 तों अवचित उठला नूपुरमधुरध्वनी
 देखिली सुन्दरी पद्मायतलोचनी !
 नवयौवनरम्या पाही मज हासुनी
लज्जारुणवदनेन्दु वळवुनी चमकुनि होई दुरी
 फेकी मधुरदृष्टि मजवरी !

"ललितविलसिते ! तव प्रीतिला पात्र असें काय मी ?
 बुडवी मज न निराशातमीं
"हृदयमन्दिरीं तुला सतत गे, स्थापिन मी आदरें
 विसंबिन पलहि न चेतोहरे !
"तूं जीवित मम ! तुजवांचुनि जग शून्याचि मज सुन्दरी !
 जिवलगे, या दासा स्वीकरीं !"
 स्मित करित हळुहळू मजसान्निध पातली
 प्रेमें मज चुंबुनि अन्तर्हित जाहली !
 ती पुनरपि नाहीं हाय अजुनि देखिली !
राचित मनःशान्त्यर्थ तिजवरी गाणीं मी बहुपरि
 कण्ठितों जीवित कैसें तरी !

## प्रेममाहिमा

शरच्चन्द्रज्योत्स्ना हरि जनमनस्ताप सहसा
अहा ! वाहे सायंसमयमधुमन्दानिल कसा !

नभःप्रान्तीं तारा बहुविध विलासीं विहरती
विभूति प्रेमाच्या परि मजसि या खास गमती !

अहा ! नाहीं प्रेमाविण लवहि सत्यांश भुवनीं !
सुखाचें साम्राज्य प्रणयमहिमा स्थापित वनीं !
मधुप्रेमास्वादें नर अमर आनन्द वरितो
न लाभे ज्या प्रीती, हतनर गमे भूमिवरि तो !

प्रिये ! तूं प्रेमाची असासि पुतळी भावललिते !
मनीं माझ्या रात्रन्दिन विहरसी शुद्धचरिते !
चलद्दृक्पातानें सुखविसि मला मन्दहासिते !
अहा ! प्रेमानन्दाकुल करिसि कान्तास दयिते !

## प्रेमसाम्राज्य.

प्रेमें चमकें उडुमाला — मोहित करिते रसिकाला !
प्रेमें कुसुमें फुलतात — मोद अन्तरीं भरितात !

प्रेमें अम्बुदपंक्ति फिरे — वर्षुनि करिते सुखित धरे !
प्रेमें वाहत जाय नदी — बुडवी सकलां प्रचुर मुदीं !

जिकडे तिकडे प्रेम दिसे — माझ्याही हृदयांत वसे !
प्रेमावांचुनि शून्य असें — स्थळ एकहि जगतांत नसे

सत्प्रेमाचा अधिकारी — नाहीं नर अथवा नारी !
प्रेमाचा सम्भव कोठें — होतो हें गूढाचि मोठें !

बाह्य गुणांचें स्तोम जिथें — बहुधा न मिळे प्रेम तिथें
प्रेम न सौंदर्यीत वसे ! — प्रेम द्रव्याजवळ नसे !

प्रेम न मधुरवचोजालीं — प्रेम न वाढे सुखकालीं
असेल जैशी परिस्थिती — तशी फिरतसे लोकमती–

आहे अचल प्रेम परी — भिन्नत्व न केव्हांहि धरी
स्वयंस्फूर्त हें प्रेम असे — बाह्योपाधिप्रभव नसे

प्रेम न नाकाडोळ्यांत प्रेम न सुललित वर्णांत
प्रेम जडांत न बद्ध असे मन्दमती परि नित्य फसे !

प्रेमाचें क्रीडास्थान केवळ नाहीं उद्यान
माळ शैलशिखरें विपिनें व्यापुनि गेलीं प्रेमानें !

प्रेम अम्बरीं धरेवरी ! प्रेम अन्तरीं बाहेरी !
सभोंवतींही प्रेम असे ! सकल व्याप्त प्रेमरसें

प्रेम प्रकाशातिमिरांत समचि प्रेमा दिनरात
बोलुनि उघड प्रेम दिसे न बोलतां झांकतहि नसे !

मूकपणें तें बोलतसें ! दुःखांतहि तें गूढ हसे !
गाम्भीर्यांतहि खेळ करी ! औदास्यांतहि नृत्य करी !

जीवित आर्द्र प्रेमरसें होतां ये स्वर्गत्व रसे !
जीवितकर्तव्य न दुसरें डोलावें सत्प्रेमभरें !

प्रेमाचि यत्नें मिळवावें ! प्रेमीं जीवित वळवावें !
प्राशुनि मधुरप्रेमसुधा वाटे व्हावें गुंग सदा !

काव्यमाधुरी तुच्छ गमे प्रेमरसीं मन आनिश रमे !
व्हावें चित्त प्रेममय मग मज कसलेंही न भय !

## सुहृद्दर्शन

खचित फिटलें पारणें लोचनांचें
महा आनन्दें कसें हृदय नाचे !
गड्या ! दर्शन जाहलें तुझें आज
मधुर अपुली ती वचःसुधा पाज !

किती गेल्या यामिनी चिन्तनांत !
ध्यास धरिला तव सतत मी मनांत !

मना रमवाया स्मरुनि तुला प्रेमें
काव्यकुसुमें वाहिलीं करुनि नेमें !

तुझ्यावांचुनि कवितेस विषय नाहीं !
मनोवृत्ती जाहली अशी कांहीं
प्रणयमूर्तिस तुज वर्णितां स्वभावें
काव्यरसपाना रसिक तूर्ण धावे !

तुझ्यावांचुनि पूजुं मी कोण देव ?
मनोमन्दिरिं नांदसी तूं सदैव
प्रेम तूं ! तूं सौंदर्य ! तूं विसावा !
गड्या ! नाहीं मज अन्य देव ठावा !

हृदय माझें निर्मलाकाश आहे
त्यांत विहरसि तूं शरच्चन्द्र पाहें !
तुला पाहुनि आनन्द मनीं दाटे
अहा ! वाहे तो उभयनेत्रवाटें !

देइ आलिङ्गन गाढ या जनातें !
नसे नांवाचें उघड मित्रनातें !
हृदय हृदया लावुनी वेढ हातीं !
परिष्वङ्गें जन भिन्न एक होती

नको आतां सोडून मला जाऊं !
एक ठायीं आमरण सख्या राहूं !
अतां पुनरपि तव विरह सोसण्याला
खचित नाहीं रे शक्ति या जनाला !

कोण तुजविण मज सांग असे लोकीं
अदय होउनि ढकली न विरहशोकीं !

नको मित्राला हेंहि कथायास
काय होती त्याला न महायास !

वियोगाचा तो समय आठवोनी
उभयतांचें हृदय ये तैं भरोनी !
बघत अनिमिष दृष्टिनें एकमेकां
यौगपद्यें वरियलें मुदा शोका !

उभयतांही करपाशिं बद्ध झालों !
शून्यहृदयें क्षणभरीं स्वस्थ ठेलों !
पुन्हां भानावरि पातलों तदाचा
मोद निस्तुल तो अवचनीय साचा !

प्रेमकल्लोळीं लोल हृदय होतां
दयित जन तो लोचनापुढें येतां
मनोवृत्ती जी होतसे विचित्र
तिचें काढावें लिहुनि केविं चित्र !

## कवीचें मन

लक्ष्मीचें रमणीय लास्य न कदा तन्मानसा मोहवी
दृष्टी लावुनि उन्मनी विचरतो स्वच्छन्द लोकीं कवी !
सृष्टींतील न वस्तु एकहि तया मोहांत पाडूं शके
मोहानें जरि हासुनी भुलुनिही कोणीकडे तो भके !

आहे जीवित चारुताच कविचें प्रीतींतही गुंग तो
होतो बद्ध न त्यांत तो परि, दुरी राहूनही रंगतो !
डोले तो रमणीय वस्तु बघुनी हासे समानन्दुनी
त्याची दृष्टि परी असे , न कळते, कोणीकडे लागुनी !

कान्तेचें स्मित रञ्जवी , भुलवितो त्याला प्रियालाप तो
नाना विभ्रम दावितां प्रणयिनी उन्मत्तसा डोलतो

त्या कालींच परी तदीय मन तें अज्ञान कोण्या स्थलीं—
होतें मग्न ! कुणा कळेल जगिं तद्वृत्ती कुठें लागली ?

लोकांना दिसतो तसाच कविचा आचार नाहीं खरें
त्याचें गूढ विचारमग्न मन कीं जाणील कोणी बरें ?
सामान्याहुनि तो विचित्र ! कुठुनी अज्ञांस हें आकळे ?
हें तत्व व्यवहारभिन्न, न जडव्यापारमग्नां कळे !

लोकांना समजे न. आंतुनि तसा बाहेर नाहीं कवी !
भिन्ना दृष्टि तदीय ! सत्य मुझला आणील तो पालवी !
त्याचें ज्ञान अतर्क्य ! शक्ति अतुला ! सामान्य नोहे मती !
गर्वा सोडुनि थोर थोर कविला अत्यादरें वन्दिती !

## पश्चात्ताप

मधुरदर्शने ! प्रणयदेवते ! भक्तवत्सले ! विबुधसंस्तुते !
दावुनि मजला भीषणचरितें वञ्चियलें कैसें ?

पिशाचरूपा वरी अप्सरा ! हिमांशुलेखा होय प्रखरा !
कैसा केला विचार न जरा ! दुःखीं लोटियलें !

हात तुझा विश्वासें धरुनी होतों विचरत विशङ्क भुवनीं !
त्या मज नीरस कूपीं लोटुनि काय तुला मिळलें ?

प्रीतिसरित्कल्लोललोल मन पवित्रतानौकेवरि बैसुन
जातां खडकावरी आपटुन हाय ! फुटुनि गेलें !

सौन्दर्यावरि नयन लोभती, परि ती वृत्ती नोहे प्रीती !
वैपरीत्य शिरलें मग चित्तीं हाय ! कोण पापें ?

यौवनललिता मुग्धा बाला कां वाटावी प्रिय हृदयाला ?
पूर प्रीतीचा हा आला हें म्हणणें लटकें !

बाह्य हेतुनें प्रीति न जडते परि हें मानिति असत्य, जड ते !
हें जाणुनिही चञ्चल होतें कां हें हतहृदय ?

विशदस्मितमधुराधरपल्लव तेथुनि होतो सत्प्रेमोद्भव
हेंहि खरें मज वाटेना तंव जंव मज असति सखे !

भगिनीप्रेमसुधारस सेवुनि कितीकदां मी गेलों मोहुनि !
तो तरि निपजे पावित्र्यांतुनि ? अनुभव मज आहे !

सुन्दर वस्तु, जडचि परी ती ! कैसी निपजे शुद्ध प्रीती ?
ऐसें असतां सौन्दर्याप्रति मानूं श्रेष्ठ कसें ?

कळतें हें परि मन कां चञ्चल झालें ऐसें ? स्थिर नाचि तें पल !
हाय ! शिरीं पडला दुःखाचल ! सुटका होय कशी ?

ज्ञान असोनी मूढ ज्याहलों ! पापकर्दमीं पूर्ण बुडालों !
पावित्र्याला मुकलों ! मुकलों ! आतां काय जिणें ?

विद्वत्वाला डाग लागला ! हीनपणा सुविचारा आला !
पवित्र मित्रस्नेहसुखाला अपात्र मी ठरलों !

जडासक्त मी बनलों कैसा ? अविवेकीही झालों ऐसा !
दुर्दैवाचा पडला फासा ! आतां काय जिणें ?

मनावरी तनुची पावनता, तनु भ्रष्टली मन भ्रष्टतां
पावित्र्याचा गर्व तत्वतां आज लया गेला !

हाय हाय ! ही कोण दुःस्थिती ? मानव्याला मुकलों सम्प्रति !
झाली हा रे ! शोकमूढ मति काय करूं नकळे !

स्पर्श न करिं मज मित्रा आतां ! घडली हा हा ! कृती अनुचिता !
भ्रष्टचि होशिल मला स्पर्शितां ! दूर सख्या होई !

पवित्र दृष्टी तिकडे फिरवीं, त्यजुनि जाय मज विवेक केवीं !
काय करूं ? मज अजुनी ठेवी कृतान्त तो कैसा ?

पापमूर्ति मी खल अविचारी अनीतिपङ्कीं रमलों भारी
देवा ! नेशिल तरि आभारी होइन फार तुझा

विषयाला प्रीतीच मानुनी गेलों सौन्दर्यावरि मोहुनि
प्रमाद घडला मोठा हातुनि क्षमा कशी मागूं ?

विषयवासनामरुप्रदेश, न तिथें प्रीतिसलिललवलेश !
उलटे पडतां नाना क्लेश, परि मन ऐकेना !

होय न वस्तुस्थितिचें भान म्हणुनी धावे मृगजलपान
करावया मृग !—असुनी ज्ञान झालों मूढ कसा ?

विकारसलिलप्रवाहवश मी गेलों सम्प्रति बुडुनि गाढ तमीं
दीनदयाळा ! तुजला प्रणमीं, सत्पथ दावीं मला !

इन्द्रियसंयम मला घडेना; होतें ऐसें काय कळेना !
देवा ! आतां नसे तुजविना आश्रय मज दुसरा !

अज्ञानी मी असुनी ज्ञान अवनत्युन्मुख होतों कळुन !
फळलें पाप असें हें कवण ? कां व्हावें ऐसें ?

वस्तुस्थिति तरि नीट जाणतों कूपीं जाउनि कैसा पडतों
कोण कळेना मला ढकलितो ? देई हात विभो !

विवेकबल तें गेलें लोपुनि ! भयविव्हल जाहलों मन्मनीं
देवा ! ऐशा बिकट व्यसनीं तूं आश्रय एक !

कामवृकमुखांतून सुटाया बहुपरि धडपड केली वायां
अश्रांत श्रमली मग काया, ये धावुनि आतां !

सुन्दर रूपें व्यसनें येती,　　तेणें होते मोहित वृत्ती
बनते पंगू विचारशक्ती　　तुजवांचुनि देवा !

चञ्चल झालों स्थिरधी असुन, दावूं आतां कैसें वदन ?
क्षमा करिल मज लोकीं कवण तुजवांचुनि देवा ?

शुद्ध हृदय हें भ्रष्ट जहालें　पश्चात्तापजलानें धुतलें
प्रभो ! तुजपुढें आज ठेविलें　तें स्वीकारावें !

मित्रांनो ! हा खरा अभागी, मनोधैर्य तें नसे मदंगीं,
परी विचारें प्रीतीरंगीं　　होतों दंग पुन्हां !

स्वतःसिद्ध जगिं पवित्र मानव कुठुनी मिळतो ? विचित्र हा भव
यत्न करुनि विमलप्रेमास्तव　सेवावें नित्य !

उदात्त गुण सम्पादन करणें, विकार जिंकुनि विजय पावणें,
पवित्रता अकलङ्क राखणें,　हेंच मनुजकार्य !

व्यसनकण्टकोद्धरण करोनी　धैर्यकवच अंगीं लेवोनी !
सुखमन्दिरिं यत्नें प्रविशोनी　शान्ति मेळवावी !

बहिरंगावरि लुब्ध न व्हावें　आन्तर सद्गुणिं लक्ष असावें
प्रीतिसरित्सलिलांत रमावें　　स्वच्छन्दानन्दें !

समयीं घडतें चूक परी ती　यत्नें बुधजन नीट करीती
हें ठेवुनि मनिं तैशी रीती　　नित्य आचरावी

विश्वनियामक दयालु आहे, ही साधूक्ती असत्य नोहे
अज्ञजना ! विश्वासुनि राहें　त्याच्यावरि नित्य

कठिणसमयिं मन हताश होतां धैर्यवृत्ति ती लयास जातां
येतो साहाय्या अबलातां　　त्या प्रभुला वंदीं

दुर्बल मानव काय करील ? प्रभू कृपालु न जरि होईल
नीतिपथाक्रमणीं याया बल　प्रभुला शरण चला

## कविविभ्रम

जिकडे तिकडे जडचि दिसतसे ! विचित्र अद्भुत कांहींच नसे !
पुनरपि भुलविल मनास असलें सृष्टींत काय असे ?

वासवचापाविभूषित अम्बर, अथवा चमकति तारा ज्यावर,
एकवार बघुनीही होवो उत्सुक कोण नर ?

कुसुमोद्यानीं लतिकाकुञ्जीं घालित असतां मिलिन्द रुञ्जी
पुनरपि पुनरपि जाया होतो कोण बघूं राजी ?

क्षुब्ध सागराचें खळखळणें, गिरिसरितांचें चपल वाहणें
नवीन दृष्टीनें पाहियलें आहे का कोणें !

बालनिर्झरांचें बागडणें; वन्य सुमांचें कोमल हसणें
नयनां कितिदां हरिततृणांचें मोहवील डुलणें ?

विपिनदेवता करिती गान; उमटे कीचकरन्ध्रांतून
असेल मञ्जुल, परी पुन्हां तें भुलविल काय मन ?

तरुशाखांवरि बसुनी नाना विहङ्ग अम्बरिं फेकिति ताना
पुन्हां ऐकतां काय न वाटे कलकलाट काना ?

इन्दू असतां क्रीडत गगनीं जातें क्षणभरि मानस भुलुनी
परी विजेची पुनरपि गोडी येइ तदा कुठुनी !

तमोव्याकुला सृष्टी असतां, तोष होय बहु रवी उगवतां
सर्व दिवसभर ती उत्कण्ठा व्यापी कीं चित्ता ?

असेल रमणी सुन्दर भारी, जाय परिचयें रुचि ती सारी,
विटुनी सहवासा मन वेगें फिरतें माघारीं !

तेच तेच ते पुष्पित वृक्ष हजार किंवा असोत लक्ष
पुनःपुन्हां तद्दर्शनिं कैसें होय दक्ष लक्ष ?

लेशहि नाहीं विचित्रता जरि सर्व पसारा फुकट समज तरि
तेंच पाहणें तेंच सेवणें, —गोडी काय परी ?

सतत मनाला बुडविल मोहीं ऐशी सृष्टिंत जादू नाहीं !
एकावांचुनि विचित्र दुसरें नाढळतें कांहीं !

सृष्टीची ही अशी जडस्थिति सुचिर मोहविल कशी रसिकमति ?
चटक न लागे जिच्या विलासें ती कसली युवती ?

अश्रू ढाळित सृष्टी गेली कविच्या सन्निध जाउनि ठेली
कविनें तिजला बघुनि लेखणी ठेवियली खालीं

घेउनि जवळीं डोळे पुसुन प्रेमें कुरवाळी तद्वदन
अपुल्याजवळीं बसवी तिजला कवी हास्य करुन !

काय नवल हो ! अवचित आलें सृष्टिवरती तेज कोठलें !
सौन्दर्य तिचें प्रतिक्षणाला नवीनसें गमलें !

साधेपणाच सगळा जगतांत आहे
कीं नव्यभक्त चिरकाल रसज्ञ मोहे ?
फेकी यदा कवि सुधोपम दिव्य दृष्टि
ही नित्यनूतन दिसे रमणीय सृष्टि !

सृष्टी मनोज्ञ गमते सुकविप्रभावें
पाहून जीस रसिकांहिं भुलून जावें !
लोकीं कवीच नसते तरि शून्य सारें
आनन्द ओतिति कवि स्ववचःप्रसारें !

## कवितेचा जन्म

कान्तापल्लवकोमलाङ्कफलकीं स्थापूनिया मस्तक
होतो मी प्रणयोत्तरङ्गितमनें पाहात तीचें मुख

आनन्दोर्मि खळाळुनी विसरली कांताहि देहस्मृति !
झाली सर्वहि सृष्टि लीन उभयीं ! वेडावली मन्मति !
होता रम्य निशीथकाल, चमके तारावली अम्बरीं,
मोदें हासुनि चंद्रमा निजकरीं पीयूषवृष्टी करी !
ही शोभा बघुनी कुतूहलवशा संस्तब्ध सृष्टी दिसे
आम्ही प्रेमरसीं निमग्न ! दुसरी वार्ताहि ठावी नसे !
योगी जाउनि काननांत वसती, न द्वैत भंगे परी
नाना दुष्ट विकार उद्भवुनि ना शान्ती टिके अन्तरीं
संसारीं वसुनी अम्ही समजतों अद्वैततत्त्व स्वयें !
प्रेमाचा महिमा अगाध ! तुलना त्याची कुगाही न ये !
कण्ठीं घालुनि हस्त एक, वदलों कान्तेस मी तेधवां—
" भार्ये ! हा अमृतप्रवाह असुनी कां निन्दिती या भवा ?
आनन्दप्रचुर स्थितीस असल्या भीती वृथा कां जन ?
देती फेकुनि कालकूट म्हणुनी वेडे पयोभाजन !
" प्राशायास पुढें सुधाचषक जो केला जगन्नायकें
तो गर्वें दुरि सारिला फळ तरी येणार त्यासारखें !
आनन्दास्थिति लाभली मजसि जी ती गोड मी मानितों
हें स्त्रीरत्न मिळे करीं म्हणुनिया दैवासही वानितों !
" तूं माझी हृदयेश्वरी प्रियतमा मच्चित्तसम्मोहिनी
तूं मन्मानसकैरवेन्दुकलिका तूं प्रीतिसौदामिनी !
या दासा सुखवावया झटसि तूं आर्ये, अहर्यामिनी !
हावें काय उदास मी उपगता सौख्यास धिक्कारुनी ? "
कान्ता हासुनि बोलली " प्रियकरा, ही गोष्ट आहे खरी
दासीची परि एकवार परिसा प्राणेश ! ही वैखरी
ऐसें प्रेम मिळे कुठेंहि नाचे, मी याची असें स्वामिनी !
ही लोकस्थिति पाहतां मज गमे मी धन्य आहें जनीं !

" प्रेमाची स्मृति या, जनांस बहुधा होईल ऐशी कृती
कांहीं आचरुनी करा मज सुखी, व्हावें तुम्हींही कृती !
प्रेमाचा पुतळा म्हणून अपुली होईल लोकीं स्तुति
नाथा ! मीहि तुम्हांसवें जनमुखीं होईन धन्या अति !

" विद्युत् दिव्य घनान्धकारिं चमके लोपे सवेंचि स्वयें
युष्मत्प्रेम तसेंचि चञ्चल असें कोणीहि बोलूं नये !
नित्य प्रीतितडित् चकाकुनि तमोव्याप्ता जनाभ्यन्तरीं
दावो दिव्य पथ प्रमोदकर ती सारोनि शङ्का दुरी !

" हीं पुष्पें फुललीं सुगन्ध न उद्यां राहील यांचा परी !
हेंही कोकिलमञ्जुगान पवनें वाहोनि गेलें दुरी !
आतां वाहत ही गभीर सरिता ग्रीष्मीं दिसे कोरडी !
प्राणेशा, विधुकान्ति फार तर ही राहील कांहीं घडी !

" दिव्य प्रेम असेंच काय अपुलें जाणार नाशाप्रती ?
नाथा ! काल न सत्य राखिल जनीं माझ्या सुखाची स्मृती !
हें सारेंहि टिकेल काय करितां तें आचरावें झणीं
त्यावांचून न शान्तता क्षणभरी नांदेल माझ्या मनीं !

आश्चर्याकुल जाहलों श्रवुनिया वाणी प्रियेची अशी
ही स्वर्गीय मला विदग्ध वनिता देवा मिळाली कशी ?
व्हावी पूर्ण तिची स्पृहा म्हणुनिया सानन्द रात्रन्दिनीं
सोडोनी श्रम अन्य, जाय कवितादेवीपदीं गुंगुनी !

## देवगिरींतील सायंकाळ

६ सन्ध्यारागसुरञ्जिताभ्रपटलें संकीर्ण शोभे नभ
सायंस्नानकुतूहलें रवि शिरे सिन्धूंत मन्दप्रभ

६ हें वर्णन कवीच्या एका अमुद्रित काव्यांपैकीं आहे. प्रसंग रामदेवरावाच्या वेळचा.

आनन्दें विहगांहि मञ्जुलरवें केल्या दिशा संकुल
झङ्कारें नवमल्लिकापरिसरीं क्रीडे अलींचें कुल !

मोजाया नभउच्चता विहग जे वेगें नभीं धावले
पाहोनी क्षितिजातळीं तम महा खालीं भयें पातले !
शोभे निर्मल शान्त अम्बर, दिसे विस्तीर्ण सिन्धू जसा
तो अस्तोन्मुख शोभला दिनमणी कीं वाडवाग्नी तसा !

सूर्याचे कर कोवळे पसरले चोहांकडे शीतल
कीं माधुर्यचि सांडलें चहुकडे ! तें शोभलें भूतल
झालीं काञ्चनयुक्त हर्म्यशिखरें कान्तिप्रकर्षाकुलें !
शोभे देवगिरी, सुमेरुगिरिचें सौन्दर्य कीं पातलें !

जैशी सागरगर्जितस्तुतगुणी द्वारावती शोभली
तैशी देवगिरी मनोहर महत्तेनें निजें भासली !
व्यासाची तिजला स्वभावमधुरा वाणी स्तवाया झटे
येथें साम्य नसे, हिचा स्तव करी हा मन्दधी मी कुठें !

फेटा बांधुनि झोकदार बरवा, मंदील कोणी शिरीं
कोणी खोवुनि पुष्पगुच्छ सुरभी, पोषाखही भर्जरी
ऐटीनें बहु धुंद दृष्टि वरती फेकीत मानी जन
स्वातन्त्र्योद्धत हिंडती चहुंकडे, ज्यां गोड वाटे रण !

नाहीं ठाउक ज्यांस नम्र करणें शत्रूपुढें मस्तक
दंडावें समरांत नित्य रिपुंना हें ज्यांस वाटे सुख !
संग्रामीं रुधिरासवा पिउनिया आकण्ठ मत्ता जशा
समशेरी करितात भीषणरवव्यामूढ सार्‍या दिशा !

घ्याया दर्शन चालल्या युवतिही या अम्बिकामन्दिरीं
कांहीं दर्शन घेउनी परतल्या जाया गृहा सुन्दरी

ते घण्टारव ! शब्द ते ! भरुनिया देवालयें गर्जलीं !
दाटी होय अपार वाट न मिळे जाया जनांतें मुळीं !

“ देई थोर वियोगदुःख सविता तो जाय अस्ताचलीं
कान्ताची करि भेट तीं रजनि ही मैत्रीण कीं पातली!”
ऐसें चिन्तुनि मानसीं बघुनिया अस्तोन्मुखा भास्करा
बाला मुग्धगुणान्विता झडकरी सोत्कण्ठ चाले घरा !

हा संध्यासमय स्वयें पतिसवें कान्तेस संयोजवी
हा हा ! तो परि चक्रवाकमिथुना दुष्टापरी दूरवी !
गेली एक सुखीं बुडून दयिता आलिंगुनी कामिनी
झाली त्या समयींच एक विरहें दीना वियुक्ता मनीं !

रात्रीं नूतनकामिनीरतिसुखा घेवोनि कोणी युवा
झाला चिन्तनिं त्याच मग्न, हृदयीं आनन्द भोगी नवा!
तो गेहांतुनि देवदर्शन करायातें अहा चालला
आला भ्रान्तमनें फिरूनि फिरुनी मागें विलासस्थला !

ताजे हार तुरे सुरेख करुनी हे पण्यरथ्येवरी
मालाकार विकावयास बसले, सौरभ्य धावे दुरी
सारी देवगिरी तदा दिसतसे वासन्त कालापरी
या भृङ्गासम गन्धलोलुप जनीं संभ्रान्त भासे पुरी !

मोहोनी गतिविभ्रमें युवजनां मार्गांत वाराङ्गना
फेकोनी विषदिग्धदृक्शर झणीं त्या भेदिती तन्मना!
रम्य स्मेरमुखा पुन्हां वळवुनी मागें, तया पाहती !
दृष्टी घेति न ओढुनी हृदयही त्यांचें अहा ओढिती !

कोणी वीर गडी बसून फिरतो डौलांत अश्वावरी
घोडाही बहु ऐटिनें निजपदा टाकी डुले अन्तरीं

केव्हां मन्दगती धरी दुडकिही भर्धाव धावे कदा
ऐसे स्वार अनन्त दौड करितीं देशांत या एकदां !

लाजावी अमरावती दिसतसे ऐसी पुरी तेधवां
विद्याकाव्यकलाकलाप विलसे, होती रुची भूधवा
कोठेंही नव्हती अनीतिरति ती, सर्वत्र शांती वसे
रागद्वेष परस्परांत लवही तेव्हां न कोठें दिसे !

पाहोनी पुर तें मनीं गमतसे कीं रामभूनायका
मोहोनी जणु खालतीं उतरला हा स्वर्ग येथें निका !
शोभा ऐसि दुज्या स्थळीं न मनुजा पाहावयातें मिळे
हें सौन्दर्य बघून सर्व पुरिंचा कीं गर्व सारा गळे !

आतां मात्र न वाचकांस दिसुनी येणार हें वैभव
तें सौन्दर्य न होय गोचर, जनां आनन्द दे जें नव !
ते प्रासाद विशाल ! हर्म्य नव ते ! प्राकार विस्तीर्ण ते
गेले सर्व लयास ! काल–वदनीं हा ! जाहले लुप्त ते !

कैसा वीररसांत हाय पडला देवा, मिठाचा खडा ?
बा रे, कां लिहिलासि शोकरसची दैवीं अम्हां रोकडा ?
जे सूर्यापरि एकदां चमकुनी गेले जगीं विक्रमें
त्यांचीं वैभवहीन दीन वदनें पाहोनि चित्त भ्रमे !

## अर्थ कीं अनर्थ ?

व्यवहार कोणता वद ? गोपन ज्यामाजि होय सत्याचें !
व्यवहार कुशल ? जो व्रत धरि ‘ हांजी हां ’ सदा करायाचें
कोण शहाणा ? नर जो द्रविणोद्धतचरणसेवनीं दंग !
थोर कुणास म्हणावें ? लाजेना करुनि जो वचनभंग !
मूढ कवण ? सत्यास्तव जो स्वार्थाची वृथाचि हानि करी !
दाता कोण ? करी जो अर्थिजनां तुष्ट निजवचोक्तिकरीं

बलवंत कोण ? दीनच्छल करि सस्मितमुखें बलोत्कर्षें !
ज्ञानी कोण ? करोनी सुजनाधिक्षेप अंतरीं हर्षें !

रसिक कवण ? भलत्याही वचनें सानन्द डोलवी मान !
सत्कवि कोण ? मनोहर पदपंक्तींनेंच लोभवी कान !

काव्यप्रसाद ? यमकश्लेषादिक विलसती अलंकार !
स्त्रीप्रीति कोणती ? रुचि चपलविषयजडसुखांत जी फार !

कोण स्वदेशभक्त ? स्ववचोजालांत बद्ध करि सकलां !
कोण प्रख्यात कथा ? आत्मस्तुतिलाचि जो सदा विकला !

लेखक कोण ? कशाही शब्दांनीं भरुनि काढितो पानें !
वाचक ? पुस्तक संपवि झरझर वाचून ! भाव जन जाणे !

## यामिनीवल्लभ

प्रदोषसमयीं अहा ! पवन वाहतो शीतल
मदान्धनृपतीपरी तिमिर आक्रमी भूतल
भयाकुलितमानसें शिराति बालकें मन्दिरीं
समुत्सुक सुखावती रमणदर्शनें सुन्दरी !

प्रिया मधुर हासुनी प्रियकरा बघे चोरुनी
प्रमोद दयितागमें मुळिं न मावतो तन्मनीं !
वियुक्तहृदया तिच्या गमत शान्तता कालिं या
अहा ! सकल पावती प्रियवियोगदुःखें लया !

विशाल नभ निर्मल स्वविभवें दिसे भूपसें
अनंत नव मौक्तिकें उधळि हें भरोनी पसे !
नभःसुरनदीमधें जलविहारकामेंचि का–
निघे अमरवृन्द हें हळुहळू, न या तारका !

अशा समयिं निर्मला उदयादिग्वधू भासते
जणो बहुत हर्षुनी बघुनिया प्रिया हासते !
तमःपटल सारुनी दुरि हळूच शीतप्रभ
महीध्रशिरिं ठेवितो चरण यामिनीवल्लभ !

विनाश तम पावलें ! पसरली प्रभा क्ष्मातलीं
सुखावुनि विकासलें कुमुदवृन्द ! गुंगे अली !
सरोजलिं भरोनिया विमल चन्द्रिका कोमला
मनोज्ञ सुषमा तदा बघुनि तोष झाला मला !

सुधांशुकर शोभती तरल रौप्यतारांपरी !
कुतूहलभरें भरे न नर कोणता अंतरीं ?
विलास करि मेदिनी मधुर मोदसिन्धूमधीं
न भान विसरोनिया रसिक जाय कैसा सुधी ?

नटूनि अभिसारिका दयितमन्दिरीं चालती
प्रदीपसम मानिला हृदयिं त्यांहि इन्दू पथीं !
करीं धरुनि पोंचवी अहह ! तोहि कामोद्धते !
महाजनहि कर्म जें न करितो असें कोणतें ?

हळूच मग बोललों वचन काय मित्रास मीः—
" सख्या, जनसुखार्थ हा किति शशांक होतो श्रमी ?
स्वसौख्य मिळवावया पथ न यास ठावा मना !
असे सतत सारखाचि सुजनां शठां वामना !

" करो स्तुति कुणी परी मद न अल्प ये याजला
कुणी अवगणो तरी कधिं न ताप देई मला !
स्वकर्मरत हा खरा मन न लोकवादाकडे
गणी सुजन सारखे हृदयिं हर्म्य किंवा कडे !

" मनोज्ञ गणितीं न मी जरिहि लोभवी लोचना
मनोज्ञ कृति याचिया ह्मणुनि आवडे मन्मना
जनांस सुखवावया झटुनि होतसे हा कृश
म्हणोनि सकलांस हा दयित जाण वाटे भृश !

" असो उदय अस्त वा ग्रहणकालही यास रे
परी सहजशीतलप्रकृति सोडिना हा बरें !
प्रसंग कसलाहि ये अचल मस्तकीं कोसळे
स्वभाव निज सोडुनी कधिं न धीरवृत्ती ढळे !

" न लोकसुखवर्धनीं झटत, काय तो मानव ?
त्यजोनि निजबान्धवां तरुनि जाय कीं तो भव ?
सबन्धुजन उद्धरे जगतिं तो भला एकला !
अहा ! न तरि ते किती असति भार या भूतला ! "

हसोनि मम वामनें वचन हें तदा बोलिलें:–
" न कर्म अमृतांशुचें गमत कोणतेंही भलें !
पडे व्यसनिं मित्र तैं विभव इन्दुचें वाढतें !
स्वमित्रविपदेंतही स्वसुख इच्छिती नीच ते !

" न मित्रसहवास या सुखद वाटतो कीं पल !
नसे गगनिं तो तदा बहुत डौल दावी खल !
फिका पडत लाजुनी कुटिल चन्द्र मित्रोदयें
गतप्रभचि होतसे सदनिं भेट होतां भयें !

मनीं चकित जाहलों प्रणयसिन्धुला ये भर !
न मित्रवचनें मुदें भरत, कोण ऐसा नर ?
अहा ! अचलदृष्टिनें बघत तन्मुखा हासुनी
सुखार्णविं बुडोनिया प्रणयिं लीन झालों क्षणीं !

## प्रेमासाठीं !

प्रेमासाठीं वेडा झालों ! मिळेल तें कोठें मजला ?
अमुनी गेलें मन हें माझें, द्या हो कोणी प्रेमजला !
वणवण फिरलों माळावरतीं गिरिशिखरेंही लंघियलीं
शिलाखण्ड तुडविलें पदतलीं श्रान्त विकल ही तनु झाली !
झोंप सुखाची मज मुकली !
उदासीन वृत्ती भकली
जीवित–मधुकलिका सुकली !
शून्य त्रिभुवन भासे सारें, नयनजलें भूतल भिजला !
अमुनी गेलें मन हें माझें, द्या हो कोणी प्रेमजला !

गुलाबकलिका घेतां हातीं कण्टक टोचुनि मध न मिळे !
हताश होउनि तेणें माझा धैर्यशैल हा ! हाय ! ढळे
विपरीता झाली सृष्टी
भकली किंवा मम दृष्टी
होतों अन्तरिं बहु कष्टी
इकडे वळतों तिकडे पळतों अंकुर न कुठें परि रुजला !
अमुनी गेलें मन हें माझें, द्या हो कोणी प्रेमजला !

मृगजल भरलें, जलाविण सुदुर्लभ; मिळे कोठुनी इथें सुधा ?
सोडुनि वेडा छन्द मनांतिल खेद करावा मी न मुधा—
परि तळमळ मनिंची न सरे,
प्रेमाविण न प्रिय दुसरें !
मिळेल तें मज कसें बरें ?
चैन पडेना क्षणभरि, कांहीं उपाय सांगा हो मजला !
अमुनी गेलें मन हें माझें द्या हो कोणी प्रेमजला !

भूवरिचीं विकासित प्रसूनें कशास ? जीं सुकुनी जाती
नित्यविकासी नन्दनवनिंचीं कुसुमें येतील का हातीं !

गन्धें भरतिल सकल दिशा !
हृदयवृत्ति होतील पिशा !
दुःखतती टिकतील कशा ?

त्यांची माला घालुनि कण्ठीं हिंडावें गमतें कविला !
भ्रमुनी गेलें मन हें माझें द्या हो कोणी प्रेमजला !
काय करावा उपाय आतां ? कायाहि जडसा हाय गमे !
विचार करुनी मस्तक फिरलें, मानस कोठेंही न रमे

रत्न म्हणूनी दीपाशिखा
धरुनी कितिदां मुके सुखा !
वाट दाखविल कोण सखा ?

सजला सोडुनि शरद्घना हा हाका मारुनि जिव दमला !
भ्रमुनी गेलें मन हें माझें, द्या हो कोणी प्रेमजला !

## कविता.

शोकें आम्ररसार्द्रमञ्जरि अहा ! जाईल वाळोनिया
दुःखें प्रेमतरङ्गलीनहृदया सेवील मौन प्रिया !
औदास्यें न करील गान विपिनीं मञ्जुस्वना कोकिला
पाहोनी कवितावधूस बुध न स्वान्तीं जरी तोषला !

शोभावें बकुलप्रसून अलिच्या झङ्कारनादीं जसें
सूरींचें मधुरम्य काव्य रसिकोद्घोषीं वसावें तसें !
वीणानादमरन्दपान करवी येथें स्वतां शारदा !
आली या स्थळिं इन्दुकान्ति उदया आनन्दिनी शारदा

कान्तेचें स्मित रम्य मन्द करि जें पीयूषनिस्यन्दन
बालेचें मधुमाधुरी वितरि जें मुग्धाक्षिचें चुम्बन
प्रेमार्द्रान्तरकामिनीसह निशीं सोत्कण्ठ संलाप जो
हें सारें सुख सेवण्या रसिक तो तेथें प्रयत्नें सजो !

## सुन्दरी

वाटे अम्बर सोडुनी उतरली ही चंद्रलेखा खरी
किंवा काननदेवताच सलिलक्रीडार्थ आली सरीं
कामाची रमणीय खड्गलतिका स्वच्छन्द कीं चालली
बाला ही बघुनी विलासललिता मुग्धा मती जाहली !

कोणाच्या निटिलांत रत्न लिहिलें आहे विधीनें असें ?
कोणाचें गृह भूषवी निशिदिनीं ही रम्यलीलारसें ?
कोणा हासुनि मन्द ही निजभुजीं वेढी स्वयें सुन्दरी ?
प्रेमालाप कुणासवें करितसे ?– तो धन्य लोकान्तरीं !

नाहीं का मिळणार ही मज कदा रामा मनोमोहिनी ?
प्रेमें पाहिल काय ही मजकडे चन्द्रा जशी रोहिणी ?
लागे वेड हिचें जसें मज तसें लागेल माझें हिला ?
प्रेमव्याकुल कीं मदीय विरहें गाळील दुःखाश्रुला ?

हातीं वासवचाप घेउनि घनीं आरोहुनी अम्बरीं
नेसोनी विलसत्तडिद्वसन जी स्वच्छन्द केली करी
ती कां प्रेम करील हो मजवरी ? मी कोण आहे असा !
रम्य प्रेमकटाक्ष दुर्लभ तिचा लाभेल मातें कसा ?

हें सारें समजे परी तिजवरी हें चित्त जें बैसलें
तें लीलाकमलापरी चुरुनिया तीनें जरी टाकिलें
मागें घेइन मी घडीभरहि न प्राणान्त झाला तरी !
व्यर्थ प्रेमहि सौख्यदायक बहू वाटे मदभ्यंतरीं !

रागानें फिरवील ती मुख जरी होईन दृष्टीपुढें
गेली दूर कुठेंहि जाइन तरी धावोनि तीच्याकडे
प्रेमाचीं मधुगायनें निशिदिनीं घालीन कर्णावरी
नाहीं का करणार ती निजकृपा केव्हांहि माझ्यावरी ?

# आलिंगन

प्रीतिगायनें गात गात या सागरलहरी किती
धावुनी शैलां दृढ वेढिती

कठिण मार्ग आक्रमुनी वेगें प्रेमें होउनि पिशा
कवाळिती सरिता सिन्धुस कशा !

जातिसुमांचा शालु नेसुनी करित स्मित चन्द्रिका
मारिते मिठी महीगोलका

प्रेमगन्ध पसरित प्रसूनें उधळित लतिकासती
तरूला प्रगाढ आलिंगिती

प्रीतिगायनप्रतिरवनादित करित पहा कन्दरा
वेढिती निर्झरिणी निर्झरा

विद्युल्लतिका धावत जाउनि अम्बुदकण्ठीं पडे
प्रेमें वियुक्त घनही रडे

चन्द्र स्वकरीं ओढी क्रीडासक्त सागरोर्मिला
धाराकरिं घन वेढी इला

प्रभा रवीला रवि प्रभेला सोडुनी न राहती
दाखवूं प्रणयियुग्मकें किती !

प्रेमोर्मी हृदयांत दाटतां प्रणयी सम्मेलती
तयाला आलिङ्गन बोलती

लावुनि हृदया हृदय परस्पर करीं गाढ कवाळिती
अमित सुख ते प्रणयी सेविती !

आनन्दाचा सत्प्रेमाचा महोत्कर्ष हा खरा
जहाली सुखमय यानें धरा

उग्र संकटें, प्रखरहि दुःखें, मनस्तापसंतती
आलिङ्गनापुढें लोपती

प्रणयियुग्मसम्मेलनकालीं हर्षें नाचे धरा
स्वर्गही तुच्छ तिजपुढें खरा !

वायू गाती आनन्दानें वृक्षलता डोलती
प्रसूनें प्रेमभरें हासती !

परिष्वङ्गसमयीं जे गळले प्रेमाश्रू भूवरी
प्रसूनें तींच जहालीं खरीं !

प्रीती आज्ञापी आश्लेषीं सुटला निश्वास जो
' वायु तो सुखवूं विश्वा सजो ! '

मायाब्रह्मालिङ्गन होउनि सृष्टी ही निपजली
वियोगीं तिची स्थिती कोठली ?

सखये, ये ये कमलनालमृदुभुजपाशीं कवळुनी
ठेव मज, धन्य होउं दे जनीं !

तव वक्षावरि असतां पडुनी मरणहि येवो सुखें
नाहीं परवा त्याची सखे !

तव करपाशीं बद्ध करीं, मज हीच मुक्ति आवडे
सर्वही सुखें तुच्छ इजपुढें !

कविते, कां मग दूर राहसी सखये, ये जवळ गे !
दासा आलिङ्गी जिवलगे !

तुजसाठीं सोडिला जलाञ्जलि संसारीं गुणखनी
आप्तजनकोप न गणिला मनीं !

' वेडा ' म्हणुनी जनोपहासा विषय जाहलों पहा !
करिसि मग मजवरि कां कोप हा !

जातिकुसुममृदु मानस न करीं कठोर तव सुन्दरी !
नसे ही वृत्ती तुजला बरी !
विश्वसुनी तुजवरी राहिलों दुःख किती साहिलें
अनन्य प्रेम तुला वाहिलें !
न करीं आतां वञ्चन माझें न करीं लोकीं हसें
जीवित कण्ठावें मग कसें ?
सखये आले नेत्र भरोनी पुसासि न कां अञ्चलें ?
काय तूं खरेंच मज वञ्चिलें ?
दुःखोर्मी हेलावति हृदयीं, त्वदालिंगनाविणें
जाहलें भारभूत हें जिणें !

## गुणज्ञ पाहिजेत !

करी कोकिल पञ्चमीं मधुर गान
श्रवुनि जावें विसरोनि जनीं भान
परी घायाचें त्यजुनि त्या सहाय
काक चञ्चू मारिती हाय हाय !
सुरभि परिमल कोंदला दशदिशांत
मना भुलवी आनन्द जना देत
बघुनि चन्दन मोहुनि न कवण जाय ?
मूढ घालिति परि घाय हाय हाय !
मधुरगन्धें मल्लिकाकुसुम आहा !
करी उत्सुक कवणाहि शीघ्र पाहा !
मन्दमति परि त्यावरी देइ पाय
चुरुनि टाकी गर्वांत हाय हाय !
विनयवति नवयौवना मुग्ध बाला
कामललिता सुस्तनी कुरलबाला

स्वयें शयनीं पातली परी काय ?
मदें अवमानी मन्द हाय हाय !

इन्दु पसरी चहुकडे शीत कान्ती
ताप वारी भरि मोद जनस्वान्तीं
भुवन सुखसिन्धूमधें बुडुनि जाय
परी कमलें मिटतात हाय हाय !

सुखोत्कर्षा पाहुनीया दुजाचे
खला शल्यापरि मनीं तेंच जाचे
होय रोमाञ्चित जयें सुजन–काय
तेंच नीचा वाटतें दुःख हाय !

तशी सत्कविची सहजमधुर वाणी !
रसिक येती परि विरल आढळोनी !
वन्यचम्पककलिका न रम्य काय ?
परी मधुपाविण वृथा ! हाय हाय !!

जरी कौतुक करण्यास रसिक आहे
कवी वाग्विभवें सिद्ध असे पाहें !
मधुर काव्यें निर्मून रञ्जवाया
झटे संतत जरि यत्न हो न वाया !
खाचित भुवनीं हो गुणा नसे तोटा !
गुणज्ञाला धुंडण्या यत्न मोठा !
चन्द्र अवनीवरि करी सुधावृष्टी
चकोरातें परि मात्र मिळे तुष्टी !
प्रियाधरमधुसममधुरकाव्यमाला
करुनि अर्पिन मी रसिकसत्तमांला
डोलवावा सानन्द तयीं माथा
थोर उत्कण्ठा अशी एकनाथा !

## सत्कविवंदन

शृंगारानें बहु सजविली काव्यदेवी जयानें
जी दृक्पातें भुलवि रसिकां चित्तवृत्ती लया ने
आनन्दाम्भोनिधिंत बुडवी, जी न ठेवी उदास
तो सप्रेम प्रथम विनयें वान्दिला **कालिदास** !

करी अमित शोक जी रडविते सर्व सज्जना !
परी सुखाचि देतसे करुनि तन्मनोरंजना !
अपूर्व गुण देइ जो सुकवि काव्यदेवीप्रती
कसें स्मरण होय त्या न **भवभूति**चें संप्रती !

कादम्बरीपान होतां उडे भान जी मोहवी सानथोरांसही
चित्तीं न ये भ्रान्ति लाभे महाशान्ति यत्सद्यशःकान्ति भूषा मही !
ध्वंसे वपुःपाप नासे मनस्ताप वाणी पिकालापगर्वापहा
जो स्वःप्रमोदास दे शारदादास त्या **बाणपादास** वन्दीं पहा

पदलालित्य जयाचें पाहुनिया रसिक थाकवी मान
त्या **दण्डीस** प्रेमें देईल न केविं हा कवी मान?
जो मूर्त प्रतिभारवी चमकला चण्ड स्वतेजें अहा !
नक्षत्रांपरि ज्यापुढें कवि दुजे लोपोनि जाती पहा !
कण्ठीं वाग्वधुला मिठी प्रियसखा जो मारुनी बैसला
तो **ज्ञानेश्वर** तत्पद स्मरुनिया सप्रेम मीं वन्दिला !

जयाचें सुखी काव्य ठेवी जनाला
भवें तापल्या जें करी वीजनाला
अहो शारदेच्याहि यावा मनाला
कवी वन्दितो हा तया **वामनाला** !

माधुर्य यत्काव्यरसीं अपार
सुधाहि ज्याचे पुढतीं असार !

ज्या सेवितां तोष मनीं न मावे
**मुक्तेश्वरा** त्या न कसें नमावें ?

" तनू भववनिं त्रितापदवपावकें कावली
म्हणोनि करुणास्वरें करि **मयूर** केकावली "
अहा ! श्रवुनि त्या डुले गहिवरें भरे सज्जन
तया नमनिं होय मी मग कसा बरें सज्ज न ?

बालेन्दुची गगनिं शोभत साच कोर
होले परी सुखभरांत कसा चकोर !
त्याची कृती सरसरम्य असेल सान
तत्रापि वन्य **रघुनाथकवी** कसा न ?

द्राक्षापाकमधुर तीं यत्काव्यें भुलवितात रसिकांस
**चिपळूणकर** ' बृहस्पति ' मम वन्दन हें असो अतां त्यास
जो दे सत्सुख दावुनी सहृदयां कादम्बरी माधुरी
उत्कण्ठा निजरम्यकाव्यकुसुमीं लोकान्तरीं जो भरी
यत्नांनीं बहु शारदोपवनिं जो लावी जणों मोगरे !
आनन्दें कविरत्न सादर अतां तो वंदितों **मोगरे** !

ज्याची सुधामधुर मञ्जुल रम्य वाणी
ऐकोनिया रसिक जाय अहा ! भुलोनी
पाही जयास कवितारमणी सहास
हें त्या असो नमन **केरळकोकिळास** !

यौवनविकासितगात्रीकाव्यवधूभालिं शोभला तिलक !
हन्त ! प्रेमानन्दें न कसा वर्णीन तो भला **तिलक** ?
**यशवंत**जनक धन्य स्वगुणोत्कर्षेंहि **वासुदेव खरे** !
तत्काव्यसुधापान न मिळे म्हणुनि दीन होत देव खरे !

यल्ललितसरससूक्ति श्रवुनि यशोविभव अतुल वानु जन
रसविन्मानसहंस प्रणमूं तो केविं **माधवानुज** न ?
त्या **चंद्रशखराचें** या समयीं होय केविं विस्मरण ?
तत्काव्यरसास्वादनसुख करि संसारतापतति हरण !
प्रतिभानभोविहारी **केशवसुत** कविखगेन्द्र वन्दावा
**राधारमण**हि शुभगुणवाञ्छूनें मीं हृदन्तरीं ध्यावा !
श्रीमन्मयूरकेकारवानुकारी **भिडे**द्वय प्रणयें
**कानिटकर** कविरायहिं आठवुनी वन्दितों तया विनयें
असो आतां, लोकीं कविवर असंख्यात असती !
किती झाले मागें ! कितिक तरि आतांहि वसती !
तयांना सर्वांना सविनय करी वंदन कवी
" रचाया ठेवा मच्छिरिं कर कृपेचा कृति नवी ! "

# का व्य कु सु म मा ला

## शोकाचा आनंद !

पुष्पावली सुरभि रम्य विशीर्ण होओ
जाओ गळून ललिता मृदुपर्णराजि !
होतात नव्यविभवें तरु शोभिवंत
शोक त्यजून डुलतात नवप्रमोदें !

ग्रीष्मांत सैकत पडे उघडें सताड
लोपून तीं मधुर चंचल वीचिलास्यें
वर्षागमें पण अहा ! स्थल तेंच कसें
पावे प्रकंप नवपूरविगर्जितानें !

तारे शशांक रवि लुप्त समस्त झाले
चारुत्व सौख्य हृदयोत्सव सर्व लोपे
होतां न हें तरिहि अंबर खंड खंड
नव्य प्रमोदरसमग्नच होत आहे !

संतापहारक पयोद नवांबुधारा
वर्षून नंतर कुठें तरि लुप्त झाला
तें विस्मरून वनराजि निलाजऱ्या या
होतात अन्यजलवाहरसें कृतार्थ !

जें एकदां हृदयलोभन वस्तु झालें
यत्सन्निधान सुखसारच होत होतें
ज्याचा प्रभाव जगतास नवीनता दे
पीयूषसीकर समुत्सरणैकपात्र !

तन्नाश होय सहसा विधिदुर्विलासें
किंवा चिरंतन वियोग घडे म्हणून
जावें तयास विसरून घडीभरानें
व्हावें नवीन सुखसेवनमग्न काय ?

कोणी जगांत असतील विचारशील
हा स्वार्थ निंद्य पशुचा अवडो तयांस
सृष्टिक्रमास परिचालन द्यावयाचा
मक्ता असोच लखलाभ खुशाल त्यांना !

गेलें जळून अथवा नरकीं बुडालें
हें विश्व सर्वहि उद्यां जरि नष्ट झालें
सांगा तरीहि मजला परवा कशाची ?
होणार याहुनिहि काय अनिष्ट माझें ?

या रौरवासम जगांतिल कायद्यानें
स्वार्थांधदुर्मति विचारबल प्रकर्षे
होईल वर्तन मदीय जमा पिशांत
लोकांतलें मज नकोच परी सुधीत्व !

विश्वाकडे करुनि पाठ, मिटून डोळे
साराहि तो तुडवुनी व्यवहार पायीं
कल्पद्रुफुल्लकुसुमावलिचारुभूषा
देवी दिवंगत सदोदित चिंतणार !

## अधर

हा अधर, नव्हे ही सुधांशुलेखा आहे
पीयूषबिंदुमय सरिता तींतुनि वाहे
कीं मरंदगर्भा ललित मालतीकलिका
बघतांच एकदां, वेड लागतें रसिका !

हा अधर-सुरलतामृदुकिसलय नव विलसे
प्रत्यक्ष चारुता पाहुनि ज्याला हांसे !

या तारा मंथुनि रम्य निघालें सार
विधि बनवी त्याचा कौशल्यें हा अधर

माधुर्य जगांतिल एकवटुनि या ठायीं
विश्वास विमोहन घालाया जणुं राही !

तें वचनातीत स्मित उपजे एथेंच
तें बघुनी करिती फूलपांखरें नाच !

या अधरसुधौघीं वाहत वाहत जावें
किंबहुना जीवित त्यांतच मम झिरपावें !

हा अधररक्तिमा—उषःकाल मज नित्य
गाववी सारखें स्वर्गींचें संगीत !

या अधररसें निःसार सरस जग झालें
मग नवल काय मम वचन काव्य जर बनलें !

## प्रकृति

हंसे उदय भानुचा बघुनिया उषःसुंदरी
तदीय विरहें सदा रडत पश्चिमादिग्वधू !

वसंतऋतुच्या शिरीं विलसती फुलांचे तुरे
अहोरजनि वर्षते अविरलाश्रु वर्षा पहा !

विकासवि निशीथिनी कुसुमकुड्मलां प्रेमला
दिवा पण सुकोनिया विकचपुष्पमाला गळे !

रमे मधुरतारकाकरसुधारसीं मेदिनी
कधीं अहह जाळितो तरणिरश्मिवन्ही तिला !

रसाल डुलती वनीं स्तविति कोकिला त्या किती

इथें करित बाभळीवरि कशब्द काकावलि !
जिथें स्मित असे तिथें उठति ऊर्मि त्यांच्या सदा
उदश्रुसरितेस ये सतत पूर लोकांतरीं !
असे खचित निष्ठुर प्रकृतिदेवता वाटते
कुणावरि तरी तिची जडत अंधभक्ती दिसे
कुणा हसविते कुणा रडविते निजेच्छेपरी
स्वतंत्रपण लेशही क्षणभरीं अम्हांला नसे !
तिला प्रिय गमे, असे म्हणुनि नित्य कोणी सुखी
तिला प्रिय गमे, असे म्हणुनि नित्य दुःखी कुणी
विचार न भलाबुरा प्रकृति केधवां पाहते
फिरे लहर त्यापरी दिसतसे तिचें वर्तन !
किती नृपशु—ठेवणें उचित ज्यांस कारागृहीं
असे विभवमंदिरीं विहरती सुखें सर्वदा
किती अधम पातकी—न करणें जयां स्पर्शहि
खुशाल जगतामधें म्हणवितात सन्मान्य ते !
मृदुत्व कुसमांस ये मधुर ज्यांचिया मार्दवें
करीत शुचितारकाततिस शौच ज्याचें अहा
यदीयं गुणगौरवें जगतिं होय नीत्युद्गम
महापुरुष होति ते अहह ! मग्न कष्टांमधें !
उषःपवन ज्यां कधीं न शिवला असे दुर्भग
तमांत फिरती कितीतरि पहा कुठेंही जगीं
अशा प्रहतभागिंचे विषमयाश्रुसंमार्जन
करील नर कोणता ?—गणित त्यास मी ईश्वर !

## आलिंगन देशील तर

जाइन नन्दनविपिनीं, मिळविन विकासित कल्पलतासुमनें
दिव्य परिमलें भरुनि दशदिशा करीन चञ्चल रसिकमनें !

मधुर रुचिर पीयूष वर्षुनी दीन जनांतें हसवीन !
झटुनी आविरत गाढ निराशातिमिर स्वबळें पळवीन !

स्वर्गा आणिन खालीं, निश्चित खेचिन वरती पाताळा !
सहज दृष्टि फेकुनी वाकडी करिन स्थिर चञ्चल काळा !

पूर्ण चन्द्रमा शीत दिवाकर निर्मुनि सकलां सुखवीन !
द्वेष नाशुनी शुद्ध प्रेमीं सानां थोरां बुडवीन !

हा हलका, हा श्रेष्ठ, असा हा भेद हानिकर मोडोनी
वन्द्य बन्धुता–समता हितकर सकलां देइन पटवोनी !

हाय ! नीच ते दीन अनाथां पोंचविती पशुकोटीला–
झटुनि अहर्निश सुरपदवीला नेइन निश्चित मी त्यांला !

ऋभूंसारखें गायन करुनी चराचराला भुलवीन
कोमल भेदक सूर काढुनी पाषाणाही उलवीन !

उदात्त अन्तर्वृत्ती करुनी उत्तेजित मञ्जुल गानें
प्रेमालापें भरुनी टाकिन शून्य वाटतीं जीं रानें

करीन सारें, निर्मीन प्रतिसृष्टी, काय अशक्य असें ?
लावुनि सुरतरुवृन्द तयांच्या फलभारें झाकीन रसे !

उडुरत्नांचा हार घालुनी विहार करणें महीवर
कठीण नाहीं मला सुन्दरी ! आलिंगन देशील तर !

## भगिनी–प्रेमाकारितां !

वारिते तृषा मधुर सलिलें
निर्झर दर्शनसमुत्सुका ही निर्झरिणी विमले !
पतितजनपापध्वंस करी
जलनिधि कण्ठालिङ्गनतरला गंगा होय जरी !

वेढिते शाखाकरिं तरुला
तरी लता ही विकसित कुसुमें रमवितसे मजला ?

अर्पिते मकरन्द भ्रमरा
तरी मालती निज सौगन्ध्यें सुखवी अखिल नरा !

काय तनुताप न दूर करी
सुधाकराची प्रिया कौमुदी आहे सत्य तरी !

सती या दृष्टिपुढें ठेवीं
वाग इन्दिरे ! मनास तुझिया रुचेल मग जेवीं

पति प्रिय आहे तुज भारी
असो; म्हणुनि मजवरिची प्रीति काय सरे सारी ?

भानू तेजस्वी आहे
तरि निस्तेजहि शशीस अम्बर वागवी न का हें ?

जीवित निष्फळ हें भासे
निष्प्रणयाची स्थिती परी हे दुःसह शुचिहासे !

तुझ्याविण कोण असे मजला ?
गडे इन्दिरे ! बन्धु तुझा हा अश्रुजलें भिजला !

गेले त्यजुनि तातजननी
तवाचि प्रेमावरि विश्वसुनी आहें मी भुवनीं !

मित्रप्रेम तीव्र गमतें
कर्तव्यास्तव मार्दव चरणीं हरहर ! तुडवी तें

भार्याप्रेमहि तें नलगे
कामविलासीं परिणत होतें वाटे निष्फल गे !

जाहला बन्धु तुझा श्रान्त
शुद्ध प्रेमामृता वर्षुनी त्यास करी शान्त !

कोणता कळे न सत्य पथ
असें शहाणा वा वेडा मी ?–सांग तुला शपथ !
विचित्रचि विचारसरणी ही
बघुनि हासतिल लोक परी तूं हासुं नको कांहीं
मम स्थिति आधीं नीट पहा
दिसेल मग तुज बन्धु तुझा गे आहे सुज्ञच हा !

## वृथा निंदक आणि कवि

मुक्ताहार सुरेख वायुतनया दे जानकी आदरें
आहे कीं रघुनाथ आंत म्हणुनी संचूर्णिला तो तयें !
ही त्याची बघुनी विलक्षण कृती सामान्य ते हासले
अन्तस्तत्व निगूढ मन्दमतिला कैसें कळावें बरें ?

मी काव्यांश न ज्यांत लेशहि मिळे त्या गौणसें मानितों
याचा विस्मय मानुनी ठरविती वेडा मला कीं जन !
बाहेरील न थाटमाट मजला संमोह पाडूं शके
आहे चम्पक पुष्प सुन्दर परी त्या भृङ्ग कीं लोभती ?

आनन्दें जन हिंडती स्मितमुखें नाना नवीनोत्सवीं
त्या कालीं तनुपोषणार्थ बघतों मी राक्षसी वासना !
नाना मण्डनभूषितां सुवसनां लोकां सुखी मानिती
सौख्याची, न कळे मला, करिति हे व्याख्या तरी कोणती !

छे छे ! लोक किती वहावति पहा सन्मार्ग सोडोनिया–
जाती हे भलतीकडेच ! मग त्या कां हो हसावें मृगा ?
त्याला ज्ञान नसे, न बोधहि कुणी द्याया तया ये पुढें ! –
हे बोधा अवमानुनीहि पडती दुःखांत गर्वें कसे ?

अज्ञानावृत–मानसां मग तया भ्यावें वृथा काय मीं ?
स्वैरालाप हवेंत जे चढति ते ऐकूं कशाला वृथा ?

माझा मार्ग विभिन्न, भीषणदरीमध्येंच त्यां सोडुनी—
मी जातों उडुनी नभांत धरुनी स्वर्गप्रमोदस्पृहा !
माझा दोष न, मी झटें हतजगन्मोदाभिवृद्धीस्तव
रम्येन्दूदय जाहल्यावरिहि हे कां झाकिती लोचनें !
गेले यत्न मदीय सर्व विलया, जाओत गेले तरी
कां हे तद्धितकारका अरिपरी निन्दानलें भाजिती ?

## प्रियेचें हास्य

तिमिर नाशुनी फुलवित कुमुदा इन्दुकला उदया आली
तेविं सखीच्या हास्य मुखांतुनि निघुनि नृत्य करि तें गालीं !
अशोकपल्लवसम स्निग्ध मृदु अरुण अधर तो विकसवुनी
खेळत खेळत आलें अवचित सुधवलरदनद्युतिमधुनी !
चकित भुवन जाहलें, लागलें वस्तुमात्र तें हासाया !
पीयूषार्णवलहरींमाजीं निमग्न झाली मम काया !
अनिमिष दृष्टी तिथें लाविली प्राशाया सौन्दर्यसुधा
भावपूर्ण रमणीय सखीचें हास्य करी संमूढ बुधा !
काय असावी तिथें माधुरी अशी मनीं जी मोह भरी
प्रतिक्षणाला नव्य रम्यता येते ही कोठून तरी ?
हृदयस्थित अनुराग काय हा हास्यमिषें बाहेर पडे
अहा ! खरी रमणीय चारुता फिरे न दृष्टी तिथें जडे
गडे, रहा स्मित करित अशिच तूं वाहूं दे ही प्रेमसुधा
हें आनन्दस्थल त्यजुनि मी अन्यत्र न जाइन कदा
हास पुन्हां तूं ! हास पुनरपी ! आनन्दाची वृष्टि करी !
रमणी तूं ! रमणीय शुचि स्मित करुनि निराशा तिमिर हरीं !
लाजुनि सखिनें वदन फिरविलें कृत्रिम कोपा दाखवुनी
चञ्चल चपलेपरी हास्य तें गेलें हा हा ! मावळुनी

झटकन उठुनी प्रेमोन्मादें दृढ करपाशीं तिज धरिलें
उचलुनि मुख वरि बळेंच बघतां हास्य न कोठें तें दिसलें !

हां हां ! मुग्धे, पूर्ण समजलों कोठें तूं तें लपवियलें
म्हणुनि असें खंडिला अधर मी कपोल पुनरपि चुम्बियलें !

होतें बसलें स्मित वञ्चक तें लपुनी तेथें फसवोनी
काय सोडितों मीहि, घेतलें हृदयीं त्याला शोषोनी !

पहा हवें तर हृदय चिरुनि हें येथ नांदतें तें अजुनी—
प्रेमोज्ज्वल रमणीय शुचिस्मित ! साक्ष तीच आहे रमणी !

## माझी प्रीति

“ कां प्रीती करितां तुम्ही मजवरी ? ” कान्ता विचारी मला
“ सौंदर्यास मदीय काय भुलतां ? किंवा वपुःकान्तिला ?

माझें हास्य तुम्हांस मोहित करी ? कीं मञ्जु मञ्जु स्वन ?
नक्षत्रोपम लोचनें बघुनि वा वेडें जहालें मन ?

“ भृङ्गश्यामल कुन्तलांहिं तुमची कीं वृत्ति आकर्षिली ?
किंवा गाल गुलाबसे बघुनि हे ती नाथ ! वेडावली ?

माझी ही गति मन्द मन्द बहुधा तुम्हांस झाली प्रिय ?
कीं सांगा मम यौवनें भुलविलें ? होईल यांचा लय !

“ नाथा ! काय अशा जडांत तुमची प्रीती असे साचली ?
मी ती तुच्छचि लेखितें प्रियकरा ! वाटो तुम्हां ही खुळी ! ”

“ वेडे ! कोण खुळी म्हणेल तुजला ? ” मी बोललों हासुनी
“ प्रीती मी करितों तुझ्यावरि सदा प्रीत्यर्थची भामिनी!

“ बाह्योपाधि अनेक आढळति या प्रीती न तेथें वसे !—
होती साधन मात्र, त्या मग तयां सर्वस्व मानूं कसें ?

ये अम्भोरुह कर्दमांतुनि वरी राही अलिप्त स्वतां
प्रीती उद्भवली तुला बघुनि, ती नांदे न देहीं अतां !
" भक्षो यौवन ती जरा, तनुलता कालानलें वा जळो,
दुर्दैवें अथवा तुझा जड जगा सोडून आत्मा पळो,
माझी प्रीति अखण्ड ! निश्चल ! सखे होईल कालान्तही
तेजें व्यापुनि सत्य राहिल अहा ! तो स्वर्ग हीही मही ! "

## इंद्रधनुष्य

बालभानुप्रभा चुम्बिते क्ष्मातला
सृष्टिला नव्य उत्साह तो पातला
वायु वेडावुनी गातसे अम्बरीं
पद्मखण्डें हसूं लागलीं तीं सरीं !

इन्द्रकोदण्ड तों उद्भवे सुन्दर
चारुतेचें दुजें भासलें मन्दिर !
रम्य आकाश तों रम्य वाटे अति
लोचनें वेधुनी गुंग झाली मति !

काय ही रम्यता ! काय ही दिव्यता !
मानसाला पडे मोहिनी तत्वतां
स्वर्ग आहे असे चाप हें दावी
थोर आशातरू अन्तरीं पालवी !

गूढ सन्देश हें देत कांहीं तरी
स्वर्गवासस्पृहा लोकचित्तीं भरी
दुःखमग्ना जना शांतछाया नभीं
सांगतें हें ' असे शांत, वायां नभीं '!

बद्ध झाली तिथें दृष्टि वेडावली !
ही फिरेना जरी मागुतीं ओढिली !

तेंच आहे धनू रम्य वाटे परी
त्यांत जादू असे सत्य कांहीं तरी !

वीट नाहीं कसा स्वर्गता हीच ती !
एरवीं कां बरें लोचनें गुंगती ?

स्वर्ग नाहीं कसा ? साक्ष घ्या त्यास ही !
वाटते रम्यशी त्यामुळें ही मही !

दर्शनें वाटतो तोष ऐसा जरी
काय वाटेल हो लाभतां तें करीं !

टेकलें काय त्या तुंग सानूवरी ? –
भास हा ! राहतें अम्बरीं तें दुरी !

लोचनांची जरी तृप्ति झाली तरी
हाय ! येणार तें नाहिं माझ्या करीं !

लाभ नाहीं तरी चित्त होतें खुळें
वाटते स्वस्थिती हीनशी त्यामुळें !

मानसीं ऊठती रम्य आशा किती
पूर्ण होतां न त्या हाय ! हा ! लोपती

भास होती किती वीज जैशी लवे
नष्ट होती मना दुःख देती नवें !

कोण ही चारुता स्वर्धनूची अहा !
भूवरी या किती रुक्षता हो पहा !

काय आहे इथें ज्याकडे पाहुनी
हाय ? घ्यावें बरें सौख्य मी मानुनी ?

स्वस्थिती पातली पूर्ण दृष्टीपुढें
खेद वाटे अतां, हाय आलें रडें !

अश्रु ढाळीत तैं खालिं पाहात मी
बैसलों व्यापुनी हा ! निराशातमीं
वायु गोंजारुनी अश्रु माझे पुसे
देखियेलें तदा मी रसे नीरसे !–
दृष्टि केली वरी स्वर्धनू अम्बरीं
लोपलें तों दिसें ! वृत्ति हो बावरी !
इन्द्रचापा ! तुला वन्दितों आदरें
स्वर्ग तूं दाविला आजि मातें बरें !
लुप्त झालेंस बा तूं जरी अम्बरीं
नांदशी सर्वदा या मदभ्यन्तरीं

## आशेची निराशा

जावें आनन्दानें जीवित, चिरसौख्य तेविं लाभावें
म्हणुनी उत्कण्ठेनें भजलों मी काव्यदेविला भावें
द्रविणार्जनीं न रतलों, धरिली लोकेषणा कदा नाहीं
झटलों मिळवायाला मी न कदापीहि नाक दानांहीं
व्यवसाय त्यजुनि दुजे भजलों सप्रेम दयित भारतिला
भार तिला जाणविला जेविं चकोरें विधुप्रभारातिला
नाहीं परंतु नाहीं शान्ति मिळाली मला कदापी ती
कोठुनि शमे पिपासा उन्मत्त जरी सुरा सदा पीती !
होतों उदास आधिंच त्यांत स्वर्गीय कल्पना अमित
पसरुनि या कवितेनें केलेंचि मदीय मानस भ्रमित
चित्तीं मीं प्रेमाची व्याख्या जी करुनि ठेविली हो ती
भीषण अनुभव येतां दुर्दैवें भंग पावली होती !
कविच्या उन्नत हृदयासम तत्परिवार कोठुनी मिळतो ?
ढळतो धृतिनग म्हणुनी नैराश्यें हाय जीव तळमळतो !

जिकडे दृष्टि करावी तिकडे ये दिसुनि पाशवाचार
स्वर्गीयता न कोणा ठावी, हा बोल होय साचार
पाहुनि नीलाकाशीं कल्पुनि कांहीं प्रसंग काव्य करीं
म्हणती मज आनन्दी परि अन्तःस्थिति कळे न त्यांस खरी !
कांहीं उदात्त, अभिनव, मधुर, स्वर्गीय रम्य भाव नसे
तरि तें व्यर्थचि जीवित ! गाणितों भवना गतप्रभा वनसें
गातों यश दुसऱ्याचें, मज्जीवनिं काय हो असे तसलें !
रुसलें तें सुख मजवरि, मानसिं मम हा विचार सतत सले
कां ते चिररमणीय स्वर्गीय प्रेम लाभतें न मला ?
आम्ही प्राशावें जल, सुरगण पीयूषपानिं कां रमला ?
होतों आजवरी मी अज्ञ म्हणुनि सुखाचि वाटलें सारें
आतां नित्य रडावें ! झालें विपरीत काय हें हा ! रे !
कविते ! काय असें हें केलें त्वां ? फसविलेंस काय मला ?
सुखदे, छळिसी कां गे ? दास तुझा दुःखतप्त हा भ्रमला !
चमके, घनान्धकारीं चमकन् विद्युत् सर्वेंचि लोपतसे
दावून तेज ढकालिशि तिमिरीं हें उचित खाचित तुजासि नसे !

## रम्य कुसुम

कोप लटका आणुनी एकदां मी
मौन धरुनी बैसलों अहा ! धामीं
शून्य दृष्टी लाविली व्योमदेशीं
तदा वाटे बहु विषाद प्रियेशीं !
म्लानवदना निश्वास सोडुनीया
गाल कोमल करतलीं ठेवुनीया
भावमंथर मजवरी दृष्टि लावी
प्रेम हृदयींचें उघड जणों दावी !

असा तेव्हां लोटला काल कांहीं
राग माझा परि संपलाच नाहीं !
निराशेनें तेधवा दीन बाला
उठे हळु हळु सोडुनी स्वस्थलाला

मन्दगमनें पातली मजसमीप
मम स्कन्धीं स्थापिला कर सकम्प
अन्य हस्तीं मम हस्त धरुनि कान्ता
ठेवि मजवरि आपुली दृष्टि शान्ता !

हाय ! तरिहि न मम शान्त होय राग
प्रिया होती जरि बघत सानुराग
क्षणामध्यें प्रेमौघ तिचा वेगें
अश्रुरूपें धावला नेत्रमार्गें !

हाय ! केलें मीं काय दुष्ट कर्म ?
नष्ट करितिल हे अश्रुबिंदु शर्म
प्रिया निष्कारण गांजिली कशी मीं ?
विनोदें या पेरिलें दुःख धामीं !

नेत्र आले मम भरुनि आसवांनीं
मनोद्रावक तो समय कोण वानी ?
प्रियाश्रूंशीं मम अश्रु तैं मिळाले—
देह भिन्नहि आमुचे एक झाले !

* * *

अश्रुबिंदू जे तेधवा गळाले
रुक्ष माझें मन त्यांहि आर्द्र झालें
प्रीतिलतिका उगवलीं त्यांत कालें
तिला ऐसें हें रम्य कुसुम आलें !

## पुनर्मेलन

होता प्रकाशत निशाकरसा प्रदीप
काव्यें मनोहर किती पडलीं समीप !
लागे न लक्ष तिकडे परि आज कांहीं
आहे तरंगत मन प्रणयप्रवाहीं !

वाटो न विस्मय कुणा असल्या स्थितीचा
हा होय सर्व परिणाम सखीरतीचा !
आली घरीं प्रियतमा बहुतां दिसांनीं
हा पर्वसा समय मी विरहार्त मानीं !

सोत्कण्ठ सारुनि झणीं गृहकार्य सारें
होतां निशासमय आवरुनी पसारे
मद्दर्शनोत्सुक अशी रमणीय दारा
दारांत येउनि उभी स्थिरली उदारा !

दृष्टीस दृष्टि भिडतां तनु कम्प पावे
उत्कण्ठित प्रियतमा जवळीच धावे !
अम्भोजनालनिभपेशलबाहुपाशीं
वेढोनिया मज सखी बहु दे सुखाशीं !

वक्षःस्थलीं कुरलकुन्तल ठेवि माथा
प्रेमाश्रु वर्षुनि जगीं करि धन्य नाथा !
वेढी पुनःपुनरपी करिं गाढ मातें
कीं सौख्य तें अतुल या हृदयीं न मातें !

देहस्मृती हरपली, हृदयें मिळालीं,
अद्वैत पूर्ण ठसलें; असुखें पळालीं,
मी चुम्बिला रसभरें हसुनी गुलाब
कोणास होइल असा सहसा न लाभ !

होतें मनांत मज पुष्कळ बोलण्याचें
ते स्पष्ट भाव न यथातथ व्हावयाचे
केलें म्हणूनिच ममाधरदान तीतें
प्रेमाप्रती अधरखण्डन वाढवीतें !

वेढोनिया दृढ करांत परस्परांस
होतों किती समय न स्मृतिही अम्हांस !
प्रेमांत कालगणती कसली करावी ?
प्रेमी जनास खल काल न भीति दावी !

मोदाश्रुसेक दयिता करि लोचनांहीं
प्रेमा तदीय जगतीं तुलनाच नाहीं !
कान्ते ! तुझा कवण यांत असेल हेतू
सुप्रेम कां मजसि दाखवितेस हें तूं ?

प्रेमास कोण बघुं दे तरि निंदितो या ?
कोणी म्हणे मलिन अम्बुदपंक्तितोया ?
स्वर्गीय तें विमल त्यांत नसे विकार
पीयूषसार तव ही नयनाम्बुधार !

प्रेमें उषासतिस चण्डमरीचि भेटे
चित्तीं तिच्याहि अनुराग अपार दाटे
आनंदवी अमृतरश्मिहि यामिनीला
ती ही तदीय करि कान्तिविवर्धनाला !

शाखाकरांहि लतिका तरुलागिं वेढी
आलिंगिते नभिं घना चपलाहि वेडी
ही सर्व धन्य म्हणुनी कवि वर्णितात
ती धन्य केविं नच हें उतरे मनांत !

कां वर्णिती कवि तयां ? सुख काय त्यांत ?
आलिंगना स्तविति कां समजे न मात !
माधुर्य अद्भुत तयामधिं काय आहे ?—
तें मूर्तिमंत मृदुलांगि ! समोर राहे

मोदोर्मि ज्या उसळतीं मधुरा मनांत
कोठून आणवति त्या जड वर्णनांत ?
दृष्टि प्रियावदनिं लावुनि शान्त ठेलों
स्वर्गांत—या महिवरी असुनीहि—गेलों !

* * *

चित्तीं असेल तुझिया प्रणयांश कांहीं
हें प्रेमचित्र बघुनी बुडशील मोहीं
रे वाचका ! पुनरपी करि पाठ याचा
मी स्वाद चाखित जसा दयिताधराचा !

## कवि आणि जग

मरन्द प्राशोनी मधुर आलि मन्दारकुसुमीं
अहा ! होतो हो तो पुनरपि कसा लुब्ध कुटजीं ?
लसत्काव्यानन्दीं गढुनि कवि पीयूषमधुरीं
पुन्हा गुंगे कैसा इहजडसुखीं तो स्थिरमति ?

जगीं विद्वेषाग्नी भडकुनि सुखें होरपळती
लया गेले आपद्व्यसनिं किति आनन्द पडुनि !
विकारप्राबल्यें प्रणय सुखहेतू हरपला
रहावें या दुःखप्रचुर भुवनीं केविं कविनें ?

जगाला मूढाला विदित न महोदात्त विषय
कवीला डोलानें परि अहह ! वेडा ठरवितें !

श्रमें वा मौख्यैं दे हरहर ! गुणां रूप भलतें
कवींना राहाया अनुचित असे ही वसुमती !

जहाली मानव्योन्नति दिसतसे सत्कविमनीं
जगत् आहे प्राया समवनति पंकांत बुडलें !
न मुक्ताशी हंसा सहगति घडे वायसकुलीं
जगद्व्यापाराशीं विसदृश असे सत्कृविकृति !

परीहासीं निन्दावचनिं जग गांजी कविस हें
तरी त्यातें द्याया सुख कवि किती हा झटतसे !
निशीं रम्या निद्रा अवगणुनियाही श्रम करी
स्वसंसारीं ओती जल, परसुखार्थींचि झटतो !

जनाज्ञानध्वंसा भुवनपति दीनोद्धरणिं वा
धरी ज्या ज्या इच्छा, कवि करिति त्या सिद्ध कृतिनें
प्रभु प्रेरी तैसें कवि वदति, तत्किंकरचि ते
जगा सूरी आणि प्रभु मिळुनि यत्नें नियमिती !

स्वसौख्याची व्हावी स्मृति तरि कशी त्यास मग हो ?
कवी ईशांशानें उपजति परार्थींचि जगती !
असे विश्वेशाज्ञा न तरि कवि सोडून सदना
चिरानन्दीं होते रत, विपिनिं वास्तव्य करुनी !

नको या लोकांचा असुखकर सम्बन्धाचि नको !
असूया सन्निन्दा श्रवुनि उठतो शूलचि शिरीं
अनीतिप्राबल्य प्रगट दिसतें कीं चहुकडे !
कशाला या लोकीं हरहर ! विभो जन्म दिधला ?

तुझी आज्ञा देवा ! म्हणुनि जगिं कर्तव्य करितों
परी औदास्यानें हृदय सतत व्याप्तचि असे !

जगन्नाथा ! हा हा ! बघुनि जगतीं ही विषमता!
कशाला मी झालों कवि तरि असें वाटत मनीं !

बरी ती अज्ञान स्थितिच परमेशा, गमतसे
भविष्यज्ज्ञानाचा खचिताचि तिरस्कार उपजे
कवी झालो तेणें विशद सुखदुःखें समजती
सवालाखाची ती अहह उघडी मूठ दिसते !

जगा, मूढा, गर्वें कविस अवमानी न कधिंही
तुझ्या सौख्यासाठीं निशिदिनिं पहा तो झटतसे
नको चिन्तारत्ना उपलशकलांमाजि ढकलूं
नको चण्डांशूच्या समुदयिं बसूं नेत्र मिटुनी !

कवि स्वर्गांतूनी भुवि परसुखार्थें उतरले
सुरेशाज्ञा होतां निजसदनिं जातील परत !
नको त्यां धिक्कारूं निजहित करोनी त्वरित घे
पुढें पश्चात्तापानलिं खचित जाशील जळुनी !

## कादम्बरीप्रवाह

### चषक १ ला

सम्राज्ञी विलासवती पुत्राकरितां अत्यंत दुःखित झाली असतां सम्राट तारापीड तिचें समाधान करीत आहे हा प्रसंग या प्रकरणांत वर्णिला आहे.

पुरे पुरे हा शोक आवरीं, क्षुब्ध हृदय करिं शान्त
देवि ! चुकेना सुरासुरांहि असेल जें दैवांत !

पापी आपण ! नसे अनुग्रह आम्हांवरि देवांचा
येइल कैसा समय सुखाचा मग गे आनन्दाचा ?

पुत्रालिङ्गनसुधास्वादसुखसेवन घडेल कैसें ?
पूर्वजन्मिं आचरिलें नाहीं आपण कर्मचि तैसें !

जन्मान्तरकृत कर्म सुखीं वा दुःखीं पुरुषा ठेवी
विचार करुनी असा प्रयत्नें शमवीं शोका देवी !

दैव अन्यथा पंडितांसही करवेना हें सत्य
सुरनरदानव किन्नर सारे हे दैवाचे भृत्य !

शक्य मनुष्या असती ते ते उपाय करुनी पाहीं
ईशोपासनगुरुजनसेवानिरता संतत राहीं

काय मलाही तुजसम नाहीं उत्कण्ठा पुत्राची ?
उपाय नाहीं परी गोष्ट ही दैवाधीनचि साची !

प्रवृद्धगर्भालसा कदा तुज पाहिन पाण्डुरगात्री ?
आसन्नेन्दूदया मनोज्ञा जशी पूर्णिमारात्री

केव्हां आत्मजजननमहोत्सविं निर्भर आनन्दानें ?
करीन परिजन सन्तोषित मी देउनि इच्छित–दानें ?

अङ्कीं घेउनि पुत्रा केव्हां हर्षविशी मज देवी ?
बालदिवाकरयोगें सुन्दर गगनश्री ही जेवीं !

दशनशून्यमुख उत्तानशय स्वाङ्गुलि वदनिं धरोनी
रम्या लीला करुनि कदा सुत टाकिल मज भुलवोनी ?

अन्तःपुरयोषाकरभूषा यदीय मूर्ति अदोषा
दोषाकरसा प्रदीपसा कीं देइल तिमिरीं तोषा ?

मोहित दृष्टिस करीत हृदया आकर्षीत सलील
रजोमलिनतनु मम भवनाङ्गण माण्डित कदा करील ?

स्फटिकरत्नभित्तिप्रतिबिम्बित धरण्या बालकुरङ्ग
रांगत रांगत जाइल केव्हां मृणालदलमृदङ्ग ?

अन्तःपुरनूपुररवमोलित गृहकलहंस धराया
सोडुनि धात्रीजना समुत्सुक लागेल कीं पळाया ?
रत्नखचितभूमधें आपुलीं प्रतिबिम्बें पाहोनी
हास्य मनोहर करिल कुतूहलतरलनयन होओनी !
होतिल भीतित्रस्ता लपुनी बसतां तो गृहकोणीं
कनकमेखलाघण्टानादें अनुसरतिल त्या कोणी !
देवि ! तुझे पद भूषवुनी जो अलक्तकद्रव राही
तेणें कञ्चुकिमुखें रंगविल हसत कदा स्वकरांही ?
सभामण्डपीं ध्याया बघतां नरेन्द्र पसरुनि हात
चकित मजकडे येइल भूषणमयूखजाल पहात !
धीरललित तच्छैशवलीला पाहुनिया सानन्द
मम प्रजा मद्भाग्या केव्हां वर्णितिल स्वच्छन्द ?
असे मनोरथ बहुप्रकारें चिन्तित असतां स्वांतीं
कान्ते ! बहुधा माझ्या रजनी निद्राविरहित जाती !
पुत्राभावोद्भवशोकानल रात्रंदिन मज जाळीं
देवि ! त्रिभुवन मजला शून्यचि भासतसे या काळीं
अप्रतिशासन राज्य सकल हें निष्फळ चित्तीं वाटे !
नैराश्योद्भवभीषण तिमिरें मन्मानस गे दाटे !
दैवगती ही ! काय करावें ? उपाय माझा नाहीं
प्रिये म्हणोनी शोक सर्वही सोडुनि शान्तचि राहीं
निराश होऊं नको, धरोनी धैर्य आचरी धर्म
धर्मपरायण मनुजाजवळी समजें आहे शर्म !

## रंगपंचमी

मधुमधुर प्रेमरंग उसळुनि करि खेदभंग
युवहृदया करित गुंग रंगपंचमी !

चंड किरण आलोहित    फेकित हो रंग उदित
हसत हसत करि रंजित    पूर्वदिग्वधू !

चपलेसम चमकति अति    विलसति किति नव युवती !
सस्मित पति तनुवरती    रंग उधळिती !

प्रेमरंग भरला मनिं    जाय तनुहि भिजुनि वरुनि !
सकल शिरति कर धरुनी    प्रेमसागरीं !

विलसित हें प्रेमाचें    तरल करी मन कविचें !
वेड भरे गानाचें    वृत्ति मोहुनी !

फेकिन मधुगानलहरि    स्वर्ग करिन अवनिवरी
समजा मम तरिच खरी    काव्यचातुरी !

रंग भरुनि रसिकमनीं    गळविन मोदाश्रु नयनिं
रंजित नव मधुगायनिं    करिन दश दिशा !

होइल रसहीन उदधि    रवि वरिल भ्रंश कधीं
राहिल तरिही निरवधि    प्रेमरंग हा !

## अहाहा कवे !

तुझें ऐकुनी गान मोहून सारे    नभीं धावती घेत ताना विहंग
तुझा मंजुगानप्रतिध्वान रम्य    दरींकंदरींही घुमे तो अखंड !

तुझें काव्यमाधुर्य सेवून दिव्य    मधू अंबुजीं हृत्पुटीं सांठवीला !
तुझी कीर्ति वर्णीत दासापरी हा    नभस्वान् पुरीं काननीं धावताहे !

तुझें काव्यपीयूष ओतून इंदू    करांहीं निशीं ताप सारा निवारी
नभीं तारकावृंद सानंद नाचे    करीना तुझी मंजुला काय वाणी !

तुझीं ऐकुनीं प्रेमगाणीं प्रमत्त    नद्या धावती सागराश्लेषकामें !
उड्या शैल सानूवरूनीहि घेती !    करी काय न प्रेम! लीला तुझी ही

तुझा सूर जाई भरूनी नभांत    अहा ! गाळिती मेघ मोदाश्रु तेव्हां !
तुझी वाङ्नटी नाचतां सूरिराया    करी नृत्य विद्युलता व्योमभागीं !

न जाऊं शके जेथ सूर्यप्रकाश    तिथें कल्पना धावतांहे त्वदीय !
करोनी जडालाहि उन्मत्त मित्रा    तुझें गान शून्यांतही धावताहे !

नभीं लावुनी दृष्टि तूं गान गासी    कवे, स्वार्गिंचा मोद देसी आम्हांला !
तुझे सर्वही यत्न होती तदर्थ    अहा भूवरी सर्वदा स्वर्ग नांदो !

गड्या, सोडुनी दिव्यपीयूषपान    त्यजूनी सुखें नंदनांतील मौज
तुझें गान माधुर्य सेवावयाला    निशीं तारका-देव ते येति खालीं !

प्रभावें तुझ्या हास्य खेळे जनांत    प्रभावें तुझ्या प्रीतिगंगा वहाते !
प्रमोदाश्रुयोगें घडे तापनाश    जगत् त्वत्प्रभावें असे हें जिवंत !

गड्या ! लुप्त होईल गाणें तुझें हें    तरी सत्य होईल सारा अनर्थ !
कशाला स्त्रिया स्वप्रिया पाहतील    समाश्लेष द्याया तरी धावतील ?

अहो नष्ट झालें जरी प्रेममूल    घडावे कसे अन्य सांगा विलास ?
कवे ! प्रेमवृद्धी जरी तूं न केली    कशा प्रेमलीला दिसाव्या जगांत

कशाला स्त्रिया भूषणें घालितील ? कशाला वदा लोकही हासतील ?
मनें सर्व बा सत्य होतील शून्य    कुठें प्रेम आनंद, आशा दिसेल

गड्या ! ईश्वरें निर्मिली सृष्टि सारी    तिला स्वप्रभावेंच तूं चालवीसी
तुझें काय माहात्म्य वर्णूं मुखानें    अहाहा ! कवे धन्य तूं धन्य लोकीं

## प्रबोधन

उघाडि नयन ! रम्य उषा हसत हसत आली
अरुणकिरणमय वसना अवनी ही ल्याली !

मंजु मधुर गान करित    आनंदें भुवन भरित
विहगवृंद गगनिं उडत    या सुरम्य कालीं !

हसति फुलें, तरु डुलती लतिकागण नृत्य करिति
धावति या भ्रमरततीं सुप्ति तुला आली !

स्निग्ध दृष्टि तव पडतां होय वृत्ति सुखभरिता
रविकरिं घनपंक्ति तथा स्वर्णमय जहाली !

सुप्रभात सुखकर हा दारुण तिमिरोत्करहा
रमवी सकलांस पहा दिव्य विभवशाली !

ऊठ ऊठ ! तुजविण परि नीरस हें सुख सुन्दरि !
विफल गमत तें ज्यावरि दृष्टि न तव गेली !

विकचकमलगंधि पवन शीतल करि तापशमन
त्यांत परी श्वसन तव न तप्त तनु जहाली !

खगकूजित अलिगुंजित लतिकातरुगणसिंजित
सुदति ! विफल सकल गमत तुजविण या काळीं !

गगन तरणिकररंजित चपल धवल घन विहरत
क्षणहि परि न दृष्टि वळत तव मुखिं दृढ ठेली !

ऊठ ऊठ ! सखि झडकरि नयनद्युति चपल पसरिं
रम्य मधुर हास्य करीं स्वर्ग आण खालीं !

प्रेमाचा ओघ सरल वाहो तव मुखिं अविरल
अचरहि जग करुनि तरल बुडविं सुखिं विशालीं !

## निःस्वार्थ प्रेम

कां करिसी मज दूर असा दयिता ! निर्दय होसि कसा !
निशिदिनिं चिंतन तव केलें वेडें होउनि मन गेलें

सुख हेतु न तुजवीण जगीं चढलों प्रेमानंदनगीं
सुधास्यंदिनीं तव दृष्टि पडतां मधुर हसे सृष्टि

मंजु स्वन तव ये श्रवणीं वृत्ती जाय तदा भुलुनी
मधुर स्मित करितां सहसा ज्योत्स्ना जगतिं भरे दिवसां !

आलिंगिसि जैं गाढ करीं वेढिति गमत सुधालहरी
आनंदाशा संसारीं आहे तुजवरि मम सारी

ढकलिसि कां मग दूर मला शोकें हतजन हा भ्रमला
दोष काय तुज आढळला ? किंवा मंतु असे घडला ?

तूं आत्मा मी जड देह सखया यांत न संदेह
सेवक मी, तूं खरा धनी शिरिं न, ठेव मज तरि चरणीं !

तुच्छ गणी कितिही मजला परंतु म्हणवी मज 'अपुला'
करूं नको मज दूर कदा राहिन सान्निध तुझ्या सदा

अवलोकित तव मुख हसरें हतजीवित कंठीन बरें !
होउं नको बा तूं 'माझा' या दीना तरि मान 'तुझा' !

स्वस्थानीं स्थिर सिंधु! रहा धावत येत पहा नद हा
अचल! सलिल तलिं फेकुनि दे तरि घन हा करि वृष्टि मुदें !

सरसिज ! फिरवी मुख सहसा तरि विधु वर्षी अमृतरसा
प्रीति फलाशा मम न धरी खुशाल मज तूं धिक्कारीं !

भास्कर जाळी चंड करीं कमलें विकसति कीं न तरी ?
शिलाशकलयुत गिरिवरि का नाहीं वाढत मृदुलतिका ?

प्रचंडतरु उपवनिं न मिळे नगशिरिं तो स्वच्छंद डुले !
सुखचि पाहिजे मत्प्रणया नाहीं असली स्थिति सखया

तव आचरणावरि नाहीं माझा प्रणय कदा पाहीं
अनंत निर्मल आहे ती आकाशासम मत्प्रीती !

## चंद्रास पाहून

दारुण तिमिरपटल गेलें अंबर तेजानें भरलें
मधुर स्मित करिती कुमुदें आलिगण गाती गान मुदें

तों ये उदयाचलिं इंदू वर्षित अमृताचे बिंदू
हृदयीं उठल्या सुखलहरी दृष्टि स्थिरली तयावरी !
प्रेमानंदें नयनजलें नीरस हें भूतल भिजलें
उन्मादें झटकन उठुनी वदलों बाहू पसरोनी—
" ये ये दयिता ये जवळी या दीना करिं दृढ कवळीं
उतर उतर गगन त्यजुनी काय असासि तेथाचि अजुनी
ये रे सखया ! एथ कसा दे आलिंगन मज सहसा !
वाट तुझी पाहत आहे भेटसी न कां लवलाहें ?
वेढूं दे तुज गाढ विधू सेवूं दे तव वदनमधू !
सुधाप्रवाहीं रुचि न लव परिरंभण बहु सुखद तव
ये तर सखया ! महीवरी या दीनातें सुखित करीं ! "
" हाय हाय ! हें घडे कसें ? स्वतंत्र मी हृदयेश ! नसे
उतरतां न मज ये महिला देउं कसा आश्लेष तुला ? "
"हर हर ! दुःख असह्य किती झालें हृदय भ्रांत अती !
समोर माझा प्रिय आहे नयनिं त्यास मी बघताहें !
स्पर्शवे न मज परि त्याला काय करूं दुर्भाग्याला ! "
पडलों शोकें महीतलीं शिरे इंदुही घनपटलीं !

## इंद्रधनुष्यास पाहून

विश्वीं सुंदर दिव्य मोहक असें जें जें दिसे लोचना
तें सारें जमवून इंद्रधनु हें केलें असे निश्चित
वैचित्र्यें निज संतत क्षम असे लोकीं मनस्तर्पणा
पाहोनी परि यास चित्त सहसा हें होतसें दुःखित !

केलें यास चिरायु न प्रभुवरें, आतां दिसे अंबरीं
जाईल भ्रमदभ्रपंक्तिंत तरी लोपूनिया हें क्षणें !

कां लोकोत्तर वस्तु चंचल अशी केली तयानें बरें ?
नाहीं का टिकणार सुस्थिर जगीं स्वर्गीयता दुर्विधे ?

व्हावी नष्ट सुरम्यता मग जनीं होऊनि शोकाकुल
ढाळावे नयनाश्रुबिंदु, वद हा आहे तुझा हेतु कीं ?
कां रे व्यर्थ निशीथ गाढ तिमिरीं विद्युत् प्रकाशूनिया
दृष्टी आमुचिया अशा दिपविसी गर्वांधदृक् निष्ठुरा !

## माझें तें माझें नव्हे ?

आशाभंग होत नाहीं असा कोण आहे ? हें दुःख प्रत्येकास थोड्या बहुत अंशानें भोगावें लागतच आहे. खालील कवितेंत वर्णिलेला अनुभव ज्यास आला नाहीं, असा कोणी महाभाग दैवशाली असेल काय ?

गेला भानु कुठें त्यजून भुवना वार्ताहि त्याची नसे !
पीयूषांशु करालराहुवदनीं संलुप्त तो जाहला
गेला सर्व अकालमेघपटलीं झाकून तारागण
त्या काळीं अहह ! प्रगाढ तिमिरीं होती बुडाली रसा !

मी अंधापरि कंटकांकित पथीं गेलों श्रमोनी अति
आले लोचनिं अश्रुबिंदु, हृदयीं दुःखोर्मि हेलावुनी !
झालों शून्यमनस्क, जीवित वृथा माझें तदा वाटलें
आहा ! रम्य दिसे प्रकाश सहसा तों दूर एका स्थलीं !

गेलों धावत देहभान सगळें सोडून उन्मत्तसा
तेजस्वी नयनाभिराम दिसलें सद्रत्न तेथें मला !
आनंदें कुतुकें क्षणैक अचला दृष्टी तदा जाहली
घ्याया तें रमणीय रत्न हसुनी केला पुढें मी कर !

तोंची एक गभीर नाद उठला जो मन्मना कापवी
“ त्वत्स्पर्शें रमणीय रत्न सहसा होईल रे नष्ट हें ! ”

हा हा निष्ठुर दैव ! हेंहि सुख कीं त्या पाहवेना पहा
त्या रत्नावरि दृष्टि लावुनि किती दुःखाश्रु मी गाळिले !
आहे जें अपुलेंच तें विधिवलें व्हावें ' परा ' सारखें ?
लोकीं याहुनि दुःख थोर दुसरें सांगा असें कोणतें ?

## पतंग

"आहे या जगतांत काय ? दिसती सर्वत्र दुःखेंच तीं !
होतां दूर, अनेक मोह फिरुनी मागें पहा खेचती !
भासे भीषण सर्व हें, क्षणभरी येथें रहावें कसें ?
स्वर्गा शोधित अंबरांत विचरू सोडूनिया या रसे ! "

ऐसें बोलुनिया पतंग चढला व्योमीं तदा तो जवें
डौलानें हसुं लागला, न मजला तद्दर्प हो मोजवे
झाला स्वार समीरणावरि, हळू स्पर्शे घनांचीं शिरें !
वाटे जीवित धन्य धन्य बहु त्या उन्माद अंगीं शिरे !

" माझें भाग्य किती विशाल ! अवनी सोडून आलों इथें
आतां स्वर्ग असेल दूर कितिसा ? जाईन वेगें तिथें !
धिक् धिक् ! दुर्भग मेदिनी ! सुख न हें तूतें कदाही मिळे
आहे काय तुझ्या समीप ? तिकडे हें चित्त जेणें वळे ? "

मूढाचीं असलीं कठोर वचनें ऐकूनिया मी मनीं
झालों क्रुद्ध सवेंचि अश्रुसरिता वाहावल्या लोचनीं !
" देवा ! का सुखदायिनी अवनि हे लोकीं तिरस्कारिली ?
कोठें स्वर्गहि कल्पनागत असे ? ही रीत नाहीं भली !

" स्वर्गीं काय असे विशेष ? भुवनीं आहे कमी कोणतें ?
कां निंदा करिती वृथा अवनिची हा ! थोरही जाणते ?

कीं हा होय जनस्वभावाचि, घडे तेणेंच निंदा अशी ?
नाहीं स्वर्ग महीविना, मग तिची निंदा करावी कशी ?

स्वर्गाभास–निमग्न मूढ जन ते पृथ्वीस या निंदिती !
कोठें स्वर्ग ? कुठें सुधा ? सुरलता ! वेड्यापरी धावती !
उन्मादें त्यजुनी सुखा करगता गोडी भ्रमीं मानिती
कांहीं मानसिं कल्पुनी मग तया रात्रंदिनीं वानिती ”

होता दोर मदीय हस्तिं, हिसडा देतां तया सत्वरी
झाला भ्रांत पतंग भीतिवश तो होता जरी अंबरीं
‘ गेला डौल तुझा कुठें वद अतां ? कां हा असा नाचशी
स्वर्गीं जा, सुख भोग, सोड अवनी; मारीं भरारी कशी !

“ ही दुःखप्रचुरा प्रमोदरहिता आहे पतंगा ! रसा
बा रे हा तव दुर्विचार हृदया पोळीत अंगारसा !
हा पृथ्वीस्थित दोर जोर करितो, जाशी म्हणोनी वरी
तूं आहेस कुठें ? कळे न तुज कां ? वृत्ती नसे ही बरी ! ”
मी हातांतुनि दोर सोडुनि दिला तों होय कैशी स्थिती ?–
तत्स्वर्गच्युति जाहली, गरगरा धावोनि आला क्षिती !
एका कंटकिता तरूवरि पडे, झाली विदीर्णा तनू
कीं ही मानुं अधोगतिप्रवणता ? स्वर्गस्पृहा वा गणूं ?

## मुलें !

शोभविती हे गगना तारे कल्पतरूचीं जणूं फुलें
तींच हंसत महिवरि खेळाया अवतरलीं होऊन मुलें !
काय मधुरता ! काय रम्यता ! मोहकता ही काय तरी !
स्वर्गींचा आनंद उतरतो तल्लीलांनीं महीवरी !
पाहुनि त्यांचें मनोहर स्मित कुसुमें शिकलीं हांसाया !
दुडदुड पळतां पाहुनि त्यांना निर्झर लागे नाचाया !

आनंदाशा सुख शांती ही बालदर्शनें उद्भवते !
प्रेम उसळतें ! हृदय नाचतें ! अश्रुजळें दृष्टी भरते !

आनंदाचें स्थान माझिया जगांत असतीं मुलें फुलें !–
फुलें मुकीं परि ! म्हणुनी पाहुनि मुलांस माझें चित्त भुले !

गुलाब गालीं अधरिं जाइजुइ मृदुहस्तीं कमलें वसती
सर्व फुलें जमवुनी बालकें विश्वेशें घडिलीं असतीं !

मुलांवांचुनी फुलें कुठें तीं फुला मूल हें नांव दुजें !
फूल मूल हा भेदाचि नलगे ! मुला फूल हा कवि समजे !

पृथ्वीवरचीं गंधपूर्ण हीं नक्षत्रें मृदु हसणारीं
स्मितप्रभा फाकुनी आपुली उजळितात जगती सारी

नसे निराशा उदासीनता ठावी ज्यांना घडीभरी
उत्साहाचें तेज सर्वदा पडलें ज्यांच्या मनावरी

पवित्र मानस, उदार वृत्ती, निर्मळ आचरणें असती
धन्य धन्य ते ! –अशीं बालकें क्रीडा ज्यांच्या गृहिं करिती !

## प्रेम आणि व्यवहार

कापट्य दंभ शठतादि अनंत दोष
संव्याप्त यांहिं सकल व्यवहार आहे !
झालें पदोपदिं जरी नुकसान मोठें
प्रीती खरोखर जगांत असे पवित्र !

द्रव्यादि हानि बहुवार घडेल सत्य
निंदोपहासविषसेवनही पडेल
बेतेल येउनि जिवावरिही कदाचित्
तत्रापिही प्रणय आवडतो जनातें !

प्रीती असे सुखनिधान वृथा न बोल
याचा असे अनुभव प्रणयी जनातें
दुःखस्वरूप तिजला व्यवहार देई
जें रम्य तें अहह भीषण का गमावें ?

लोकांतली मधुरता सगळी मिळाली
प्रेमांत एकवटुनी रमणीय भासे !
संयोग हा प्रिय किती गमतो मनाला
त्या हाय ! निंदित खल व्यवहार पाहीं !

न द्वैतभाव लवही प्रणयांत नांदे
ईशस्वरूप दुसरें प्रणयाविना न !
दोषैकदृक् कुटिल हा व्यवहार आहे
कैसा प्रिय प्रणय त्यास तदा गमावा ?

स्वार्थाविणें न दुसरें दिसतें जयास
कैसा उदात्त गुण त्याप्रत आवडेल ?
प्रेमा खुशाल समल व्यवहार निंदा
आहे जगांत मम जीवनसार तेंच !

## माझी ज्योत्स्ना

निदाघकाळांतिल दारुण तो अस्तंगत रवि झाला
हृदयकैरवा हासवीत विधु उदयगिरीवरि आला

मधुर सुधेच्या ओघीं बुडवुनि तरल करीत जगास—
पसरे त्याची रम्य चंद्रिका, झाला तापविनाश !

रोमहर्षण प्रसंग तो, जड जावा वेडावून !
काय नवल जरि कवि मी गेलों आनंदांत बुडून !

प्रेमाश्रूंचें वर्षण करुनी भिजवियला भूभाग
मीलित-लोचन बसलों स्तब्धचि, काय करि न अनुराग !

ब्रह्मानंदीं घडिभरि वृत्ती झाली होती लीना
नयन उघडिले, सुभग मेदिनी दिसली तों बहु दीना !

अकालजलधरपटलें भरुनी गेलें अंबर सारें
तिमिरमाज्जिता शून्या मजला दिसली हाय ! रसा रे

हतनयनांचें आनंदैकस्थान जाहली होती
गेली कोठें अवचित मधुर ज्योत्स्ना प्रेमज्योती ?

प्रतिक्षणाला नवरस दे जी दावुनि मृदु मधु केली—
सांग सांग ती हृदयबिलोभन करुनी कोठें गेली ?

मरुप्रदेशीं भ्रमतां दिसली निर्झरिणी नयनांला—
मृगजलसम ती गुप्त जहाली ! ये न दया दैवाला !

कुठें लाडकी माझी ती मज फिरुनी सांग मिळेल ?
प्रियोत्तमा ती स्थलीं कोणत्या या दीनास दिसेल ?

केव्हां प्रेमें पाहुनि मजला गालीं मंद हसेल ?
गाढ करांनीं पुन्हां काय ती मजला आलिंगील ?

अहा ! कसा मी स्वर्गसुखाचा अनुभव होतों घेत ! —
पूर्वजन्मिचीं दुष्कर्मै हीं सांप्रत छळिताहेत !

काय करावें ? कसें करावें ? प्रिया कशी भेटेल ?
ताडिल्लता ही तरी काय मज नभिं घेउनि जाईल ?

क्रूर मेघ हे करिति गर्जना विपत्ति मम पाहून
दुष्टांचें मन कठोर गमतें बहु पाषाणाहून !

कुठें लाडके असासि चंद्रिके ? शोकाकुल हा दास !
अमृतपूरित स्निग्ध दृष्टिनें अवलोकन करिं यास !

सुटला झंझावात जवन तों देव कृपाळू झाला !
सकलहि मेघप्रांत अकस्मात् अहा ! लयाला गेला !
पूर्ण कलेनें रम्य इंदुचा पुनरपि उदय जहाला !
माझी ज्योत्स्ना अहा ! सुधेनें न्हाणी अवनितलाला !
मृदुल करांनीं अश्रु पुसुनि मम चुंबी वदन प्रेमें ! —
आलिंगियलें मींहि समुत्सुक हासुनि त्या अभिरामे !

## भाऊ भाऊ ! आम्ही सारे भाऊ !

भाऊ भाऊ ! आम्ही सारे भाऊ आहों बरें !
स्वर्गावाचुनि दुसरें कांहीं भुवनीं नाहींच रे !
जिकडे तिकडे पीयूषाच्या मधुलहरी उसळती !
जिकडे तिकडे शांत मनोहर तेजें कोंदाटती !
नक्षत्रांच्या माला घालुनि सारे आनंदुनी
कल्पतरूंचा कुसुममरंद प्राशितात नंदनीं !
रविकररंजित घनशकलांवरि बसुनि मुदें विहरती !
स्वयंप्रकाशें निबिड तमीं ही स्वच्छंदें चालती !
'मी' 'माझें' यावाचुनि जगतीं कांहीं नाहीं दुजें !
आत्मत्वाचें बीज पेरिलें तेंच चहुकडे रुजे !
देश जाति वा धर्मपंथ ही, तिकडे पाहीं न मी !
सान थोर वा वृद्ध, भेद हा मानुनि होऊं श्रमी ?
असोत कोणी ते ! —ते माझे, मी त्यांचा हें खरें !
प्रेमगुणानें गुंफूं आपण सकलांचीं अंतरें !
प्रेमसमुद्रीं जलप्रवाहासम जाऊं मिसळुनी !
"भाऊ आपण !" या गीतानें नभ टाकूं कोंदुनी !
एकत्वाची स्फुरद्दीपिका धरुनी हातीं चला !
अवनतिचा अंधार नाशुनी कांति भरा निर्मला !

जग हें सारें प्रेमज्योती लावुनि उजळूं त्वरें !
भाऊ आपण सर्व ! तत्व हें लोकां पटवूं खरें !
चला चला तर करित गर्जना जाऊं द्वैतावरी–
अद्वैताचें साम्राज्य प्रिय पसरूं अवनीवरी !

## निज नीज लाडके !

निज नीज लाडके आतां ! रजनी बहु झाली आहे !
तारका चमकती गगनीं प्रेमाच्या विमल ज्योती
फेकुनी मृदुल करजाला आलिंगन तुजला देती
ही नूतन मधुर ज्योत्स्ना संवाहन तव करिते ती !
प्रेमाचीं मंजुल गानें
गात गात आनंदानें
करवाळित तुज शुचिवदने !
मंदानिल शीतल वाहे !
मम वक्षःस्थलिं या विमले ! शिर कुंतलभूषित ठेवीं
लावून गाल गालाशीं वा नीज सुखानें देवी !
परिरंभण दे कीं हृदयें हृदयाला मिळुनी जावीं !
फिरवित तव तनुवरि हात
जड नयनें तुजासि पहात
होउं दे मग्न मोदांत
हो निद्रावश लवलाहें !
कुंतल तव उडती पवनें प्रीतींचे चामरभार !
उच्छ्वासगंध हा ललिते ! मलयानिल करि निःसार !
हे इंदुकिरणमृदु बाहू अवगणिति जातिसुमहार !
चंदनरसशीतलतनु ही
मज बुडवी चिरतर मोहीं
यापुढें दुजें सुख नाहीं
स्वर्गीशा गमे अवनी हे !

ही शांत यामिनी दिसते ! अंबरीं इंदु हा शांत !
ही शांत तारकामाला ! दशदिशाहि गमती शांत !
ही शांत चंद्रिका विलसे ! भूदेवी आहे शांत !
साम्राज्य शांतिचें सारें !
वाहती शांत हे वारे !
हो शांत वृत्ति तव तारे !
सुखवो तुज शुभ वेळा हे !

## शीघ्रकवि नरहर गंगारामसा गुजर यांस दिलेलें शिफारसपत्र

आश्चर्यस्तिमिता क्षणैक सहसा झाली मदीया मति
पाहोनी तव शीघ्रशब्दरचनाचातुर्य हें संप्रति
वाणी धावत नीट जाय पुढती वर्षानदी तो जशी
तेवीं अद्भुत धारणा तव कवे, ही विस्मरावी कशी ?

भाषेची परवा नसे, मग तिथें कोणी कवीला पुसे ?
झाला गौरव येथ फार तव, हें भासे महाश्चर्यसें !
लाभे आज सहानुभूति कविला, संतोष याचा गमे
सर्वांच्यापरि हर्ष पूर्ण मजला झाला तुझ्या आगमें !

ये मित्रा ! यश सर्वदा तुज असें लाभून सर्व स्थलीं
लोकीं बा कविची ध्वजा निजगुणें तूं पाहिजे लाविली
होतें–निद्रित हा समाज म्हणुनी–गाणें कवींचें वृथा
त्याला जागृति द्यावया तुजपरी व्हावे कवी सर्वथा !

## उन्मत्ताचे प्रलाप

कशास तेजोलवें चमकसी गगनीं तारे ! अशी ?
दिसेना मम तारा तुज कशी ?

कशास कुसुमा ! उद्यानीं तूं लतेवरी हाससी ?
कुसुम हें काय न तूं पाहसी ?

कशास गर्वें वृथा चंद्रिके महीवरी नाचशी ?
चंद्रिका ही नच अवलोकिशी ?

कशास वल्लरि ! उन्मत्तेपरि रत होसी नर्तनीं ?
वल्लरी मम ही बघ लोचनीं !

विफल कोकिले ! डौलानें कां ‘ कुहू ’ ‘ कुहू ’ लाविलें ?
कोकिल मम नाहीं देखिलें !

सायंसमयानिललहरी ! तव आलिंगन कासया ?
असतां सान्निध माझी प्रिया !

बकुलकुसुममालिके दूर जा ! संग नको तव मला !
आहे दयिता ही कोमला !

विकसितजातिप्रसूनहारा ! कशास लोळसि उरीं ?
जिथें मृदु विलास रमणी करी !

या हृदयाची या देहाची प्राणाची ही जनीं
एक प्रियाच ही स्वामिनी ! !

बघिन लोचनीं रूप श्रवणीं श्रविन मधुर भाषण
देइन दृढ करिं ! परिरंभण !

अधरमधुरमधु यथेच्छ सेवुनि उन्मन होउनि जनीं
वाटतें हिंडावें मन्मनीं !

स्वर्गा खालीं ओढावें वा न्यावी वरि मेदिनी
नादीं त्याच सदा गुंगुनी !

मेरुनगाच्या तुंग सानुवरि आरोहुनि सत्वरीं
गमे विधु कवळावा निजकरीं !

सप्तपयोनिधि शोषुनि घ्यावे दिव्य मणी वेचुनी
करावी माळ. हौस ही मनीं

सन्निध असतां दयिता माझी करीत मधु हास ती
देवही वाकवीन खालती !

गाढ करांनीं आलिंगुनि हिज जेव्हां असतों असा
इंद्रही गमे चरणधूलिसा !

## मुलांचें गाणें

हासूं खेळूं नाचूंया　आनन्दानें गाऊं या !

चमकति तारा गगनांत　हसती कुसुमें विपिनांत
मन्द मन्द वायू विचरे　मधुपरिमल सुखकर पसरे !
चंद्र डुले
गगन खुले
चित्त भुले
प्रेमें उन्मन होऊं या　प्रेमीं गुंगुन जाऊं या !

कोमल किरणें चन्द्राचीं　हास्यें मोहक तारांचीं
नील नभाची निर्मलता　कुमुदांची मधु सुन्दरता
बहु यत्नांनीं
ही जमवोनी
मुलांस निर्मुनि
मण्डित केली देवानें　ही अवनी उत्साहानें !

गिरिसंगें गातो वारा　प्रदेश नादित करि सारा
खेळत हसत झरे पळती　विहंग आकाशीं उडती
तरू डोलती
लता नाचती
पुष्पें हसती !
क्रीडा मोदें अशी करूं　एथें तेथें मोद भरूं !

नक्षत्रें संतत फिरती    नभा स्वगतिनें भूषविती
गरगर झरझर फिरूं तसे पाहूं स्थिर जग राहि कसें !
खालीं वरती
मागें पुढती
व्यर्थ भ्रमती
भेद सर्व हे नष्ट करूं ! एकीं सगळें विश्व भरूं !

## शरत्कालांतील एक रमणीय रजनीप्रसंग

निशिथीं डुले इन्दु नीलांबरीं    सुधाबिंदु वर्षीत भूमीवरी
दिसे सस्मिता सर्व सृष्टी तदा    फिरे वातही गात गाणीं मुदा
नभःप्रांगणीं तारका नाचती    बघोनी प्रसूनें सुखें हासती
प्रमत्ताप्सरोवृंद आनंदुनी    दिवीं गुंगती मंजुला गायनीं
इथें सूर त्या देति भृंगांगना    प्रमोदें करी वल्लरी नर्तना
शरच्चंद्रिका रम्य आनंदिनी    इनें होय धन्य प्रिये ! मेदिनी
सुखप्रेमकल्लोललोल स्वयें    नभश्चुंबना सिंधु वाढून ये !
हसे हासवी चारुचंद्रप्रभा    इनें आणिली स्वर्गता या नभा
कुठें कौमुदी ? सृष्टि कोठें पहा ?    म्हणावा चिरप्रेमसंयोग हा
अहा ! काय ही चारुता नव्यता    तशी दिव्यता सन्मनःसंमता !
प्रिये ! निर्मलव्योमभागांतरीं    पहा केविं आकाशगंगा तरी !
त्वदीय स्मितौघ प्रमोदोद्भव    जणों वाहतो तेथ रूपें नव !
सुधास्यंदिनी इंदुकांति स्वयें    त्वदीय स्मितीं सत्य राही प्रिये !
तुझें हास्य हें फांकतां अंबरीं    करी केलि आनंद या भूवरी
लसल्लोचनें तारका जाहलीं    मिळे त्यांस तेजस्विता एथली !
करी शांतता वास सर्व स्थलीं    पुरीं काननीं शांतता बिंबली
निशा शांत ही चंद्रमा शांत हा    प्रिया शांत ही सुप्त झाली पहा !
गडे स्फूर्ति ! हो शांत तूं ही कशी    सुखें घालवूं शांत आतां निशी
रहा तूं प्रियेच्या सुरम्याधरीं    निजें मीहि तत्पीनवक्षावरी !

## नैराश्याचें साम्राज्य

परिमलमोहितमिलिन्दमाला मुकुरप्रतिबिंबितकुसुमाला
बघुनि घ्यावया उत्कंठेनें हात पुढें केला !

निकटवर्तिनगाशिखरसंस्थिता अमरनाथधनु रम्य पाहतां
गेलों धावत कंटकमार्गें तिकडे हाय वृथा !

विमलसरोजालिं मधुविधुकलिका हांसत असतां अमृतवल्लिका
कवळाया निज सलिलीं शिरलों पावूं केविं सुखा ?

लतिकाकोमलकिसलयिं सुन्दर प्रभातिं विलसे नवमुक्तासर
कंठीं घालाया तो जावें नष्टच होय तर !

वसंतकोकिलगानमाधुरी कुसुमसुगंधितसमीरलहरी
हास्यें तारारमणींचीं तीं येतिल काय करीं ?

हाय हाय ! ही कोण निराशा शून्य दग्ध भासती दशदिशा !
आहे कोठें तरी काय हो प्रेमानन्दाशा ?

जें जें व्हावें तें तें न मिळे झटतां इच्छित दूर कां पळे
वाहुनि गेली प्रमोदसरिता मागें केविं वळे ?

काय करावें कोठें जावें जें व्हावें तें कसें मिळावें !
काय निराशातिमिरीं बुडुनी अश्रू गाळावे ?

माझें तें मज मिळेल काय ? काय करावें अथवा 'हाय' ?
आनंदामृतसरित्प्रवाहीं बुडेल का काय ?

दुःखी सृष्टी काय हसेल ? शरच्चंद्रिका कीं उगवेल ?
तें माझें का पुन्हां दृष्टिला गोचर होईल ?

आनंदाचें सत्प्रेमाचें नवीनतेचें माधुर्याचें
विलासमंदिर आहे माझें तें कोमलतेचें !

वेडा झालों त्याकरितां मी अहर्यामिनी न सुचे धामीं
आहे झाली वृत्ती मम त्या अनुरत अभिरामीं !

## अद्वैताची अनुभूति !

कुशल कवीनें रसाळ सुंदर विरहकाव्य रचिलेलें
वाचित असतां सहसा माझें चित्त विमोहुनि गेलें !

चंद्रवियोगें नभीं आसवें ढाळित होत्या तारा
निबिड तमानें व्यापुनि गेला हा भूगोलहि सारा

मदीय मंदिरिं मृदुल शयनिं मी पडलों होतों शांत
हृदयदेवता मम वक्षावरि होती निद्रा घेत !

कुरल कुंतलासवें तिच्या मी क्रीडत त्या मधुकालीं
कुरवाळित तिज असतां वृत्ती काव्यीं तन्मय झाली

प्रियावियोगें व्याकुल होउनि नायक करि बहु शोक
सारी सृष्टी तेव्हां मजला दिसली विगतालोक !

शून्य ! शून्य सर्वत्र ! दिसेना कोठें लव आनंद !
वाहे हा ! हा ! तदा लोचनीं अश्रुसरित् स्वच्छंद !

शोकावेगें काव्य करांतुनि फेकुनि दिधलें दूर
आहे हातीं काय कुणाच्या ? खेळे दैव क्रूर !

तों वक्षःस्थितदयितास्मृति मज होतां मन उल्हासे
शरच्चंद्रिका देखुनि विमल, न कुमुद कोणतें हासे ?

निश्चल दृष्टी लावुनि तिजवरि किती काल होतों मी !
आनंदाची तडित् तरल मम नाचे रोमीं रोमीं !

दुःखाश्रूंचे आनंदाश्रु क्षण न लागतां झाले !
प्रेमानंदें तेव्हां माझें हृदय व्यापुनि गेलें !

हळूच उचलुनि मृदुल कुसुम तें संमोहन हृदयाचें
अहा ! चुंबिलें मांगल्याचें निधान सत्प्रेमाचें !

चुंबन होतां तें, ती–मी हा भेद शीघ्र लोपोनी
आत्मा अमुचा एक जाहला एक रसीं मिसळोनी !

तेज आमुचें पसरत पसरत गगन भेदुनी गेलें
विश्व सर्वही त्यांत भासलें तदा निमज्जित झालें !

## कांहीं स्मृतिचित्रें

होती हार करीत सुंदर गृहीं ताजीं फुलें गुंफुनी
माझी पाहत वाट उत्सुक मनें दृष्टी बसे लावुनी
गेलों अन्यपथें हळूच तंव मी तीच्यापुढें हासत
लाजोनी उठली प्रिया चमकुनी तेव्हां करीत स्मित !
राहे हार तसाच तेथ पडुनी विद्युल्लता ती तदा
गेली शीघ्र पळून हासुनि मला पाहोनिया एकदा !
सौधीं स्वस्थ मनें प्रिया निजशिरा अंकीं मम स्थापुनी
आकाशांतिल तारका हळुहळू मोजी मनोमोहिनी
पूर्णेंदु स्वकरीं तयांस धरुनी होता मुदें चालत
हा ! हा ! तों उडु एक दीन सहसा तेथून झाली च्युत !
ती तारा पडतां, विकंपितमनें माझी प्रिया तेधवा
वेंढोनी मज गाढ वक्ष भिजवी गाळोनिया आसवा !
उद्यानीं फिरतां अनेक कुसुमें संफुल्लशीं पाहुनी
आनन्दें बहु एक त्यांतिल तदा मी घेतसें तोडुनी
तत्सौन्दर्य बघून, गन्धहि तसा सेवूनि संतोषुनी
ध्याया रम्य लताप्रसून दुसरें मीं तें दिलें फेकुनी !
रागानें मजला पहात रमणी तें पुष्प घेई करी
प्रेमें केशकलाप भूषित अहा तत्सान्निवेशें करी !

होतों जात गृह त्यजून सहसा दूर प्रवासार्थ मी
झाले त्या समयीं मदीय विरहें सारेहि आप्त श्रमी
बाष्प–व्याकुल दृष्टि कातर अहा माझ्या प्रियेची परी
पाहोनी मम काय काय न तदा आलें मनोभ्यंतरीं !
प्रेमें कोपुनिया प्रिया मजसवें बोलेचना एकदा
मीही हासत सारखा तिजकडे पाहात होतों मुदा
" आला क्रोध कुठून दुष्ट उसना हा आज देवीकडे
छे हें योग्य न, हास ! हास ! हसली ! हा राग कैसा गडे !"
माझें हें वच संपलें न तव ये धावोनि माझी प्रिया
हासे हासवि रम्य बाहुलतिका कंठांत घालोनिया !

ताजें एक गुलाबपुष्प सखिच्या वेणींत मी खोविलें
आनंदें कुतुकें पुनः पुनरपि प्रेमें तिला पाहिलें
तेव्हां जो करि दृष्टिपात मधुरा साकूत माझ्यावरी
रेखायास समर्थ तो कवण या भूमंडलाभ्यंतरीं !

## माझें पिशाच !

पवनाविकंपित अभिनवविकसित मृदुल कुसुम उद्यानीं
परिमळ पसरीं, अवलोकुनि तें जाय वृत्ति मोहोनी !
हासत नाचत धावत गेलों पुढें करूनी हात
शिरीं धराया, चुंबाया वा स्थापाया हृदयांत !

आनंदाश्रू घळघळ वाहुनि दृष्टी अंध जहाली
दिसलें नाहीं निर्दय विधिनें लिहिलेलें मम भाळीं
कंटक टोचुनि रक्तस्रावें गेला देह भिजोनी
प्रेयोलाभा केली नाहीं अशी तपस्या कोणी ?

नेला पुढतीं हात कुसुम तें आतां ' मम ' होणार
सुधाप्रवाहीं विशुष्क जीवित मिसळोनी जाणार !

तों दुर्दैवें माझ्या तेव्हां पूर्ण साधिला दावा !-
हाय ! हाय ! अहि का कडकडुनी फलसमयींच डसावा !'

त्या दंशानें तीव्र गरल मम देहीं भिनुनी गेलें !
झालें जीवन दग्ध, या स्थलीं शरीर केवल ठेलें !

प्रनष्टाश मी पिशाच होउनि भटकें रानोमाळ !
येइल का हो केव्हांतरि मम वद्‌ा मुक्तिचा काळ !

नलगे कांहीं दुसरें मजला ! एक मिळो तें फूल !
मलाच केवळ नव्हे, जगालाही पाडिल तें भूल !

त्याच फुलावर आशा सारी माझी बसली आहे
पिशाच मी ! मी ढाळित अश्रू निशिदिनिं भटकत राहे !'

## गानलुब्ध

झालें निद्रित विश्व, पूर्ण पसरे सर्व स्थलीं शांतता
आनंदें हसुनी अनंत गगनीं आल्या पुढें तारका !
प्रेमानें धरुनी परस्पर करीं नाचूं रमूं लागल्या
झाली स्वर्गाचि मेदिनी चहुकडे माधुर्य सांडूनियां

उल्हासें मग मुक्तकंठ रमणी गाती मधू गायनें
त्या नादांत समस्त विश्व बुडुनी हर्षें करी नर्तन !
प्रेमाच्या लहरी अनंत उठल्या त्या गायनापासुनी
आला धावुनि इंदु ही कुठुनसा सोत्कंठ त्या सुस्थलीं !'

उन्मत्तासम दृष्टि लावुनि वरी बैसें तदा स्वस्थ मी
स्वर्भूसंगम जाहला गमतसे त्या गायनें आजि हा
मीही हासत भान सोडुनि जवें गेलों नभीं धावुनी
तारामंडलिं गात डोलत अहा ! नाचावया लागलों !'

या हो या सुखालिप्सु सर्व जन हो माझ्या घरोनी करा
आनंदें करुं गात गायन नभोगंगातटीं क्रीडन !

## शेवटची निराशा

तापानें रमणीय तत्तनुलता अत्यंत कोमेजली
हा ! हा ! अल्पहि दिव्यलोचनयुगीं कांती न ती राहिली !
झाले गाल गुलाबपुष्पसम ते निस्तेज तेव्हां तिचे
ऐशी तत्स्थिति दारुणा बघुनिया कोणा न कांहीं सुचे

होती शांत पडून मृत्युशयनीं माझी विरुग्णा सखी
आम्ही सन्निध बैसलों निज दृशा लावूनिया तन्मुखीं
नैराश्यें भय दुःख दाटुनि मनीं अश्रू किती गाळिले
वंदोनी करुणार्वचें स्तवुनिया देवासही प्रार्थिलें

हा ! हा ! दुर्विधिला परंतु अमुची नाहींच आली दया
डोळे झांकुनिया क्षणैक पडली निश्चेष्ट माझी प्रिया !
यत्नानें तिजला कशीतरि तदा शुद्धीवरी आणिली
स्निग्ध प्रेमल दृष्टि तोंच सखिनें माझ्यावरी प्रेरिली !

होते सन्निध आप्त, पूर्विल परी झाली विनष्ट स्मृती
उन्मत्तासम मन्मुखावरुनि तें दृष्टी न काढीच ती !
हासोनी मधु ओष्ठ कंपित करी मच्चुंबनाकांक्षिणी
प्रेमानें कृश दीर्घ बाहु पसरी सोत्कंठ आलिंगनीं !

"नाथा" अस्फुट शब्द ऐकुनि असा प्रीती तिची पाहुनी
दुःखोर्मी उसळोनि अश्रुसरिता वाहे तदा लोचनीं
मूर्खें मी तिजला तदाहि जवळी नाहीं परी घेतलें !
मर्यादा धरुनी वृथैव न कसें ओष्ठामृता सेविलें !

पाहोनी मजला क्षणैक सखिनें आलिंगना विन्मुख
दुःखाश्रू नयनीं भरून सहसा बाजूस केलें मुख !

आले हस्तहि खालती जडपणें, झाली तनु पांडुरा
प्राणज्योति तिची क्षणांत विझुनी गेली नभीं सुंदरा !

हा ! हा ! शेवटचें तुला न मधुरे ! लाभे ममालिंगन
अंतींही सखये ! कठोर हृदयें मी मोडिलें त्वन्मन !
अश्रुव्याकुल दृष्टि, ते कृश कर, म्लानानन, प्रेयसि !
होतां तत्स्मृति कोठुनी तुज कळे होतें कसें मानसीं !

## भारतसम्राट् पंचम जॉर्ज यांचें राज्यारोहण

ला हांसत आज भानु उदया, सानंद गाती खग,
झाले कोमल रश्मिरंजित पहा हे मेघ तैसे नग
डोले वृक्षततीहि, नाचति लता, पुष्पें सुखें हांसती,
सारें विश्व किमर्थ हें दिसतसे सोत्कंठसें संप्रती ?

राज्यश्रीहृदयैकवल्लभ लसद्भूपालचूडामणी
श्रीमज्जॉर्ज विभू अधिष्ठित असे हा आज सिंहासनीं !
वाहे मोदभरोत्थलोचनजलस्रोतस्विनी ही कशी
झालीं भारतवासिलोकवदनें संफुल्ल पद्में जशीं !

विद्या, वैभव, लोककार्यपरता, सच्छील, निर्मानिता
हीं एकेकहि मानसा निजगुणें संमोहिती तत्वतां
सर्वांच्या शुचि मेळनीं प्रभुवरें ईशांश जो निर्मिला
पुण्यश्लोक नृपाल जॉर्ज आजि तो सिंहासनीं बैसला !

देवांनीं स्वकृपैकपात्र तुजला केलें असे निश्चित
कीर्तिश्री दृढ जाहली नरमणे ! त्वत्पादपद्मीं रत
भाग्याचा पुतळाच तूं, तुजसि बा आहे कमी कोणतें ?
ईशप्रार्थन मी परी करितसें प्रेमामुळें भूपते !

आहे मंगल काल हा, पसरलें मांगल्य सर्व स्थलीं
प्रेमें वर्षित मीहि हा तुजवरी आशी:प्रसूनांजलि !
राज्यारोहण हें सदा तुज असो कल्याणकारी नृपा
राहो निश्चल आतपत्रमय ती विश्वप्रभूची कृपा !

आहे त्वत्कुलगौरव प्रचुर या भूमंडलाभ्यंतरीं
धर्मन्याय धरून त्या द्विगुणित क्षोणीश ! तूंही करीं
दुष्ट ध्वंसुनी सज्जनां सुखवुनी लोकीं भरीं शांतता
सांगें याहुनि राजधर्म दुसरा आहे तरी कोणता ?

होती रक्षित ज्यांस नित्य सदया व्हिक्टोरिया माउली
प्रेमाची करि एडवर्डहि सदा शांतिप्रदा साउली
ते हे आज पहा प्रजाजन तुझे आलक्षिती त्वन्मुखा
यत्नें भारतभूमिपालतिलका ! दे सर्वदा त्यां सुखा !

हा भूगोल विशाल नित्य पुरवो सारीं तुझीं वांछितें
हें आकाश विकाशदायक सदा देओ सुखा सन्मते
प्रेमें सागर वीचिभूषित तुला अक्षुब्ध सेवो नृपा
चंद्रार्कद्युति नव्यरागमधुरा ठेवो अनंता कृपा

नक्षत्रावर बैसुनी विहरती स्वच्छंद ज्या देवता
वांछा त्या पुरवोत सर्वहि तुझ्या विद्वत्सभासंमता
दिग्देवीहि करोत रक्षण सदा त्वद्राज्यसीमेप्रती
पावो चंडमरीचि अस्त न कदा भूपा ! धरोनी रती

वर्षोनी स्वकृपासुधाकण करी दीनार्तिविध्वंसन
व्हावें लोकहितेषणारत नृपा ! धीरोन्नत त्वन्मन
शुक्लेंदूसम थोर वैभव तुझें वाढो अहर्यामिनी
होओ त्वच्छुभदिव्यकीर्तिपटहध्वानाकुला मेदिनी !

## तारकोद्धार

शरदिंदु नील गगनीं हासे, वसुधे करामृतें न्हाणी
शीतल मंद समीरण नवविकसित कुसुमपरिमला आणी !

ताराविलसनमधुर व्योमश्री रम्य लोचनां रमवी
भवदववन्हिज्वाला ताप क्षणभरिं मनांतला पळवी

आनंदाचें राज्य प्राया गगनांत जाहलें भासे
शोभा पाहुनि मीच न आनंदें कुमुदवृंदही हासे !

तों अवचित एक नभीं तारा स्वस्थान सोडुनी ढळला
वेगें भूवरि येउनि मत्सान्निध हाय ! हाय ! आदळला !

ही शोचनीय त्याची स्थिति पाहुनि गहिंवरून दुःखानें
भिजवियलें मीं तेव्हां त्याला मल्लोचनाश्रुतोयानें !

तो हासला परंतू ! मज विस्मय वाटला तदा थोर !
" आनंद मानिसी कां झाला असतांहि पात हा घोर ? "

या माझ्या प्रश्नाला उत्तर त्यानें दिलें करुनि हास्य
" स्वर्गीं काय असे ? या भूवरि आनंद करि सदा लास्य !

कारण दिव्य प्रीती स्वोज्ज्वलरूपें कवे ! इथे विहरे
सुरतरु फुलतो नंदनिं, परि भूवरि या प्रसूनगंध भरे !

प्रेमावाचुनि शून्य स्वर्ग ! नसे चारुता तिथें लेश !
स्पृहणीय वैभवांतहि होती आम्हांस त्या स्थलीं क्लेश !

आनंदखनि मही ही प्रेमाश्रुसमार्द्र मोहवी सकला
म्हणुनी स्वर्ग त्यजुनी सुरगण अजवरि अनंत अवतरला !

वेड मानव खचित ! स्वर्गसुखास्तव वृथाचि धडपडती
गाढ निराशाकूपीं अंतीं जाऊन निश्चयें पडती !

अवनीच स्वर्ग असे, स्वर्गाची करुनि कल्पना भलती
न कळे मजला कां हे स्वर्गसुखस्पृह विमूढ जन भुलती !

प्रीति स्वर्गीं नाहीं, तन्निवसनभूषिता रसाच खरी
घनवृंद फिरे अंबरिं, पण जलवृष्टी महीवरीच करी !

सुखखनि अवनी जाणुनि आलों मी खालती कवे, मोदें !
दिव्य प्रेमविकाशें बघ रे सर्व प्रदेश हा कोंदे ! ''

स्तंभित विस्मित झालों ऐकुनि हे रम्य तारकोद्गार
रसिकांनींही घ्यावें या बोलांतील निवडुनी सार !

## दावाग्नि

कोठें त्या रमणीय पुष्पलतिका चेतःसमाल्हादिनी !
नांदे स्वर्ललनाकपोलमृदुतामाधुर्य यत्पल्लवीं
ज्यांचा सौरभ सेवुनी सहृदय प्रेमें शिरा डोलवी
तीं पद्में मकरंदपूर्ण दिसती आजी न कां लोचनीं ?

स्निग्ध श्यामल रम्य नव्य तृण हो झालें तरी काय तें
गेला अंबरचुंबि वृक्षगण तो विध्वंसुनी कां असा ?
हा ! हा ! सुंदर भूप्रदेश सगळा निस्तेज झाला कसा ?
देखावा बघुनी भयाण असला मच्चित्त हें कापतें !

कोठेंही खगकंठनिःसृत कसें गाणें न ये मंजुल ?
क्रीडाचंचल खेळतां मृगशिशू कोठें न कां भेटती ?
गेल्या आटुनि या कशा गिरिनदी, ज्या सर्वदा धावती ?
ती रम्या वनभूमि ही बघुनिया वाहे जवें दृग्जल !

हा ! हा ! काय म्हणूं तरी वद तुला दावानला! निष्ठुरा!
दुष्टा! कानन जाळुनी खचित हें तूं नाश केला पुरा !

## मुग्धकालिका

वातांदोलनिं एक मुग्ध कालिका डोले प्रमोदें इथें
आतां हास्य करील ही विकसनप्रोद्दामगंधोत्कटा—
आशा ही धरुनी मनीं तिजवरी लावून मल्लोचनें
आहे पाहत वाट–होइल कदा हा विश्वभाग्योदय !

भावी वैभव कल्पुनी प्रमुदिता नाचे लता चंचला
गाती भृंगततीहि धावत तिथें गाणीं किती मंजुल
प्रेमानें कुरवाळुनी मृदु करें वायू तिला डोलवी
खेळे तत्प्रतिबिंबभूषित सरीं कल्लोलमाला मुदें

विश्वाचें सुख राहिलें तिजवरी मी काय वेडा तिथें
चार्वंगी कलिका बघून सहसा गेलों पुरा मोहुनी
होओ सत्वर ती प्रफुल्ल, पसरो सौरभ्य चेतोहर
डोलो विश्व तदीय हास्य बघुनी ही एक वांछा मनीं !

आहे प्रेमरसानभिज्ञ कलिके ! सारें जगत् निश्चयें
त्याला देशिल तूं खरी रसिकता स्वीयप्रभावें गडे !
हास्याच्या मधुर च्छटा पसरतां श्यामांबरीं गे तुझ्या
स्वर्भूमी करितील नर्तन मुदें एकत्र होऊनिया !

नाहीं यौवनदर्प, दंभ अथवा ठावा न केव्हां तुला
प्रेमें तूं हसणार निश्चित सदा अव्याजचेतोहरे !
वायू हा सुपरागरेणुनिकरीं होईल गंधान्वित
मोदें चारु विकास पाहुनि तुझा हासेन नाचेन मी !

मुग्धे ! त्वद्रसमाधुरी अभिनवा आतृप्ति संसेवुनी
स्वच्छंदें भटकेन उन्मन सदा मी गात कांहीं तरी
त्या गाण्यांत नसेल अर्थ कसला, वाटेल विक्षिप्त तें
आत्मत्वा विसरून विश्वहि परी राहील गे डोलत !

किंवा हे विफल प्रलाप वदुनी आहे नफा कोणता
मुग्धे ! हासच एकवार मग तूं होतें कसें तें पहा !
वेडें होउनि वस्तुजात सहसा लागेल नाचावया
तें संप्रेक्षुनि लाजशील मजला पाहोनि मंदस्मिते !

## तुषारकण

सौख्यानंदाचा सुरम्य प्रभात मौजेचा
बालभानुकिरणीं जाहली रंजित ही धरणी
गृहसौधावरुनी हर्षला शोभा कवि बघुनी
मंद वायुलहरी फुलांचा मधुर गंध पसरी
त्या लहरीवरती बसोनी तुषारकण येती
करिती मधुलीला चुंबिती तरुणीवदनाला !
कुसुममृदुल शिशुचे कपोलहि भूषविती साचे !
हासविती सकलां बालकें करिती वृद्धांला !
प्रेमल हृदय जसें सुकोमल तुषारकणाहि तसे
स्वर्गीच्या देवी सुनिर्मल शोभति हे तेवीं
स्तिमित तदा झाला बघुनि कवि वेडावुनि गेला !

* * *

कमलदलांवरती निवसुनी कांहीं कण हसती
लतिकांवरि बसुनी डोलती रमती स्मित करुनी
आनंदानंद ! धावती गगनीं स्वच्छंद
खेळ बघुनि त्यांचे हरपलें भान तदा कविचें
बालच तो झाला विसरुनी स्वप्रौढत्वाला !
बाल्यानंदांत गुंगलें विदग्ध तच्चित्त !

* * *

चिंता लेश नसे ठाउकें केवळ एक हसें !
हसा ! हसा ! सारे विश्वही हसो तदनुसारें !
नाचा ! डोला हो ! चराचर पावो सुखलाहो !
गा ! गा मधु गाणीं ! स्वर्गही येइल तीं श्रवुनी
वृष्टी ही तुमची विनिर्मिल माला सुरतरुंची !
प्रेमाचा सेक करुनि हा हलवा जड लोक !
हृदय पातक्यांचें निकेतन करा सुशांतीचें !
प्रेमपरीवाह वाहुनी वाढो उत्साह
गाइन मग गाणें तुम्हांला मी आनंदानें !

* * *

साडुनि आकाशा उतरले तारे कीं दिवसां ?
रत्नें उधळीलीं ? देवतरुकुसुमें कीं गळलीं ?
मोत्यांची माला दिनश्री बघे करायाला !
हास्यविनोदाचे लोटले अश्रु अप्सरांचे !
दिव्यें स्वर्गींची घेउनी रूपें कणिकांचीं–
नीरस लोकीं या सुधारस आलीं वर्षाया !
नित्यनूतना ही चारुता भूषवि काय मही !
दुःखें झाकाया प्रमोदचि जगांत पसराया–
भाग्योदयकालें कुतूहल मूर्तिमंत आलें

* * *

असां तुम्ही कोणी परी जग गेलें मोहोनी !
युष्मत्कांतीनें शिरविलीं भूविवरीं रत्नें !
तारा लाजोनी स्ववदनें घेती झाकोनी !
काय मधुर तेज ! जाहलों धन्य खचित आज !

हांसा ! हो हांसा ! स्वर्ग हा आला भुवि सहसा !
वेडे व्हा नाचा ! काल हा प्रेमानंदाचा !

* * *

होतें आकाश शांत परि करीत शुचि हास !
तरुगण निष्पंद ! गंधवह वाहे बहु मंद !

लता ताल देती ! प्रमत्तहि मधुप सूर धरिती
पुढें पुढें आला दिवाकर मुग्ध जसा झाला !

मोदें अनुरागें चराचर डोलाया लागे !
भूतमात्र गेलें खरोखर वेडावुनि गेलें !
निघतां कविवदनीं रुचिर ही नवपद्यश्रेणी !

* * *

कुतुकें बसलेला अकस्मात् चमकुनि कवि उठला
काय कुणां झालें? न कळतां कोठें ते गेले ?

दुःखपूर्ण अवनी म्हणोनी गेले कीं गगनीं ?
पाप्यांच्या, भासे, पळाले विषमय उच्छ्वासें ?

चारुत्व न एथें म्हणुनि कीं गेले परतुनि ते !
अदृश्य कां झाले ? कळेना कोठें ते लपले !

मीही जाईन तयांसह गाणीं गाईन !
आशाभंगांत कशाला राहूं मी एथं ?

उपलब्धी त्यांची काय मज कदा न व्हायाची !
कोठें असतील ? मला ते केव्हां दिसतील ?

त्यांचा कर धरुनी अंबरीं जाइन मी उडुनी !
तारामंडल तें ज्या स्थलीं प्रेमगान करितें—

तेथें जाईन चिरसुखीं विलीन होईन!
काय इथें आहे ज्यावरी मन गुंतुनि राहे!

तुषारकण परि ते भेटतिल कुठें कसे मातें?
हीहि अभाग्याची आस कीं पूर्ण न व्हायाची?

* * *

उदास कवि बसला टेकुनी करतलिं शीर्षाला
अश्रुनदी प्रबला लोटुनी भिजवी भूमीला

गाढ तिमिरराशी राहिला वेढुनिया त्याशी
मग कांहीं काळें उठे तो पुसुनी नयनजलें
बघुनि सभोंवार विषण्णहि झाला अनिवार
" तुषारकण गेले! खरोखर नष्टचि ते झाले

माझी ही आस सत्य कीं आहे तो भास?
मग तें मरण बरें! कशाला जगणें दुःखभरें!"

वेडावुनि गेला! कवी तो शून्यहृदय ठेला!
प्रेयास्तव कोणी न झाला वेडा या भुवनीं?

## गंगावतरण

कल्पलतांचीं पुष्पें विकसित
गळुनि जिचें जल झालें गंधित
सुरलोकींची भूषा अद्भुत
हासत खेळत गात गान ती गंगा उतरे महीवरी!

चकित स्तिमित प्रमोदनिर्भर
झालें भूगत अखिल चराचर
जिकडे तिकडे उठति मनोहर हास्यसुधेच्या मधुलहरी!

शिखरश्रेणी उंचावुनि गिरि
गंगास्वागत सादर हा करि
तरुगण वंदी वायुविनतशिरिं
गगनमंदिरीं प्रमत्त मारुत मंजुल गायननाद भरी !

सिकताकणसम उडुगण लोटित
पीयूषाचे तुषार उडवित
गंगा आली उठवित चंचल आनंदोर्मी हृदंतरीं !

ये ये गंगे ! प्रीतिरूपिणी
स्वागत करितों प्रेमाश्रुकणीं
स्वगुणें धन्या कर ही अवनी
पापध्वंसन करुनी स्वर्गीत पवित्रता जगता वितरीं !

कानीं पडतां तव कलकल रव
हृदयीं भरतो प्रमोद अभिनव
तुझ्या दर्शनें अनंत पापें प्रदग्ध होती खरोखरी !

स्पर्श तुझा मग काय करील ?
सदेह मनुजा स्वर्गीं चढविल
गाढानंदीं संतत बुडविल !
ये तर गंगे ! हासत हासत भूगत सत्वर पाप हरीं !

पडतां मधुजलतुषारकण तव
माळावरिहि उठे उपवन नव !
अभावांतहि प्रगट भाव करि समर्थ ऐशी तूंच खरी !

प्रखर निराशावह्निज्वाला
भडकुनि जाळिति मम हृदयाला
जीव नकोसा खराच झाला !
या पाप्यावर—दुर्भाग्यावर अल्पहि तव जळसेक करीं !

गंगे ! देवी ! सद्गुणजननी !
होय दीन हा नत तव चरणीं !
ताप वारुनी धन्य करीं त्या विश्वसला जो तुझ्यावरी !

## संयोग

विरह संपुनी संयोगाचा चिरवांछित दिन आला
उरली नाहीं उत्कंठेला सीमा आनंदाला !

वाढविली जी नयनांबुकणा सेचुनि वारंवार
आशालतिका करी आज ती धारण मधुफलभार !

विरहज्वाला भडकुनि झाले शुष्क कपोलप्रांत
त्यांवर हास्यच्छटा झळकली गभीर मोहक शांत !

अश्रु गाळुनी श्रमलेले स्मित करिती आतां डोळे
मुग्ध जाहले येतां पुढती प्रियजन मनिं जो घोळे !

उत्कंठेनें भरलें मानस, कंठहि रुद्ध जहाला
हात धांवले पुढें प्रगाढ प्रियजन वेढायाला !

भिडतां हृदया हृदय, वियुक्तां झालें जें त्या काळीं
तें वर्णाया भूगत वाणी नाहीं प्रतिभाशाली !

कसें कसेंसें होउनि लोचनयुगलातें भेदोनी
परस्परांतें भिजविति अश्रू झरझरझर वाहोनी !

गगनश्रीनें त्या अश्रूंची केली सुंदर माला
कुतुकें भूषवि रजनीदेवी स्वीय अलकराजीला !

कृपण सागरें उल्हासानें अश्रू ते वेचोनी
निधि आपुला पूर्णच केला तेजस्वी मुक्तांनीं !

पुष्पामिषानें अश्रुच धरिती स्वशिरीं सादर वेली
फूलपांखरें त्या अश्रूंस्तव वेडीं सत्यच झालीं !

त्या अश्रूंनीं स्नात होउनी धन्य प्रेमी झाले !
दृश्य मनोहर पाहुनि कविच्या नयनीं अश्रू आले !

गुंग होउनी हासत डोलत सोडुनि सारें भान
कळलें नाहीं कोठें गेला कवी गात मधु गान !

त्या गानानें कपोल झाले रोमांचित तरुणींचे
शोभा बघुनी ती संमोहित हृदय होय युवकांचें !

धन्य प्रणयी ! धन्य कवी तो ! धन्य धन्य तें गान !
या धन्यांनीं रसज्ञभाग्या तदा उरे सीमा न !

## माझें हंसरें फूल

आशा सर्वहि सोडुनी निशिदिनीं ढाळीत मी आंसवें
होतों हें जड दग्ध जीवित जगीं कंठीत कैसें तरी
तों झाला सहसा खरोखर गमे मत्पूर्वपुण्योदय
कीं हें आज सुरम्य पुष्प हसरें आलें दिसोनी मला !

पानाआड कसें लपून बसलें लाजून वेलीवरी
पाहोनी मजला हळूच करितें सानंद मंद स्मित
माझ्यावाचुनि चिंतनीय दुसरें कांहींच याला नसे
हेतू एक—मला पहात मधुर प्रेमें हंसावें सदा !

देखोनी मज गाळितां कुसुम हें अश्रु प्रमोदोद्भव
त्यांला बालदिवाकर स्वकिरणीं रत्नांपरी झेलितो !
मातें चिंतुन उन्मन प्रमुदित प्रेमांत हें डोलतां
गाती मंजुल गायन भ्रमरही मोहें तयाभोंवतीं !

विश्वाला हंसवावया विकसलें हें पुष्प माझें खरें
वाटे तुच्छच निश्चयें मजपुढें स्वर्गांतला इंद्र तो !

प्रेमस्फूर्त तदीय हास्य बघुनी वेडाच मी जाहलों
किंवा मीच कशास विश्व सगळें जाईल वेडावुनी !

केव्हां चुंबित हांसतां कुसुम हें ठेवीन केव्हां शिरीं
केव्हां स्थापुन हें मदीय हृदयीं होईन आनंदित !
केव्हां पाहत याकडे स्थिर असा बैसेन रात्रंदिन
गाणीं गाइन रम्य जीं श्रवुनियां डोलेल सारें जगत् !

ये माझ्या हसऱ्या फुला ! तुज कुणी लावील दृष्टी गडे
माझें चुंबनरूप तीट म्हणुनी लावून मी ठेवितों !
प्राणेशा ! करितों मदीय हृदयीं आतां तुझी स्थापना
कीं कोणी मजपासुनी हरवुनी नेणार नाहीं तुला !

## रडगाणें !

सारें जीवन–मधुसुख ज्यावर
एक ! एक तें प्रसून सुंदर !
परिमल ज्याचा जगन्मनोहर
तेंच हरपतां अवचित, शोकें चढला ज्याला उन्माद !

पिशासारखा अश्रू ढाळित
कुणी एक जगिं होता भटकत !
निःश्वासानें भरीत अंबर घालित त्या कुसुमा साद !

हृदयतंत्रिची चढवुनि तार
गाई मग तो गाणीं भेसुर
रवें होत त्या भ्रांत चराचर
भुतें स्मशानीं काढिति दारुण त्या गानाचा पडसाद !

दाट धुक्याचें पटल पसरलें
तारक रवि शशि कुठें पळाले !
मधुनी मधुनी मेघांच्याही रडण्याचा उठला नाद !

फिरतां फिरतां ग्रहमालाही
स्तब्धच उद्भ्रांतासम राही !
सुटला मारुत विषकणवाही !
सारी सृष्टी होय अचेतन ! गेला मरुनी आनंद !

पुष्पें सुकती ! लतिका रडती !
पुरीं काननीं तरु थरथरती !
जिकडे तिकडे औदास्यांतिल पसरे दारुणतम खेद !

त्यांतच विसरुनि सारें भान
रडत रडत तो गाई गान
हृदयविदारक ऐकुनि तान
ज्वालामुखिंचीं हृदयें फुटलीं ! उत्कंपित झाली अवनी !

हळू हळू तो सूर हरपला
गायकही शून्यांत बुडाला
रडगाणें तें मात्र वेधितें चराचरालाही अजुनी !

## जातिकलिका

गंधें नूतन पारिजातकुसुमें होओत कोणा प्रिय
सौंदर्यातिशयीं गुलाबहि कुणा प्राणाहुनी आवडो
कोणी प्रेमभरें खुशाल, अथवा, घेओ करीं मालती
वाटे केवळ मुग्ध जातिकलिका ही एक मातें प्रिय !

नाहीं सौरभ चारुताहि अथवा कांहीं तुझ्या सन्निध
लीला अन्य असोत दूर, अजुनी ठावें न तूंतें हंसें !
उन्मत्त भ्रमरावली न तुजला ढुंकूनही पाहते
देखोनी तुज जाहलों जिवलगे, मी मात्र वेडा खरा !

धिक्कारें फिरवून पाठ तरलप्रेमोत्सवां गुंगुनी
सारेही जन हांसती मजसि, कीं झालों तुला मोहित !

शून्यीं लावुनि दृष्टि नित्य रचितों त्वत्प्रीतिच्या कल्पना
कोणी कींव करून इच्छिति गडे व्हावें परावृत्त मी !

निंदो नित्य कुणी, हंसोहि अथवा कोणी करो कींव वा
नाहीं प्रेयसि ! सोडणार तुजला कांहींहि झालें तरी !

वाढे निंदकदुर्वचांहि उलटी मत्प्रीति वेगें गडे
कृष्णांभोधरगर्जना श्रवुनिया विद्युत् कडाडे नभीं !

आहे काय तुझ्या समीप असलें जें मुग्ध मातें करीं
तें अन्या सहसा खरेंच मधुरे कैसें कळावें बरें ?

जेव्हां भाग्यवशें मनोहर तुझें होईल उन्मीलन
हास्याच्या उठतील रम्य लहरी सर्वत्र गे तेधवां !

तेजें हीरकखंडशा चमकती नीलांबरीं तारका
केव्हां होय तुझा विकास सखये सोत्कंठ त्या पाहती

व्हावा मोद तुला, जगा हंसवित प्रेमें हंसावें तुवां
गाती नाचति हांसती म्हणुनि त्या, पाहीं वरी एकदां !

आहे विश्व समस्त उत्सुक तुझ्या मंदस्मितप्रेक्षणा
विश्वाची परवा नसे पण तुला हें पूर्ण मी जाणतों !

दावी हास्यमुख त्वदीय न कुणा, पाही न कोणाकडे
हांसें लाजत एकवारहि परी देखून भक्तास या !

तें लज्जामधुर त्वदीय तरलप्रेमस्मित प्रेक्षुनी
मुग्धे ! गीतरसाभिषेक करुनी स्वर्गीं तुला नेइन !

स्वेच्छें नंदनकाननीं सुरलतापुष्पासव प्राशुनी
फेकूं आपण दिव्य तारकमणी या भूवरी लाडके !

तारामंडलिं गात मी विहरतां दे सूर तूंही मला
त्या गानें मग सर्व लोकहृदयें स्निग्ध प्रिये, होतिल !

दिव्य प्रेमगुणें अनंत भुवनें एकत्र गुंफूनियां
घालूं सुंदर हार तो जिवलगे ! विश्वेशकंठांतरीं !

माझें गायन, मोहक स्मित तुझें, हीं एक झाल्यावर
या साऱ्या जगतांत दुर्घट असें कांहींच नाहीं मला !

ज्योत्स्ना निर्मल शारदीय दिसतां चारुस्मिताची तुझ्या
माझा गायनमंजुनाद करिल प्रत्यक्ष शून्यासही !

देवी ! हास्यसुधा त्वदीय मधुर प्राशून आकंठ मी
स्तोत्रें सुंदर मुक्तकंठ तुजला गाईन आनंदुनी !

तेणें पल्लवित प्रदग्धहृदयें होतील चेतोरमे,
लज्जाप्रेमभरें प्रियास दयिता देतील आलिंगन !

ये ये हांसत मंद मंद कलिके आतां पुरे लाज ही
वेडे सांग वृथा अशी लपविशी पर्णांतरीं कां मुख ?

नेओ दिव्यपरागसौरभ तुझा वाहून संध्यानिल
त्या लोभें उतरेल भूमिवर या आनंदुनी स्वर्गही !

## दग्ध प्रेम

उद्यानांत सुरम्य एक लतिका सोत्साह मी लाविली
वारी सेचुनि नित्य वाढवियली तीतें जशी कन्यका
स्वर्वामाधरकोमलां किसलयां पाहून संतोषलों
इच्छा ही—मधुरम्य मुग्ध कुसुमें चुंबीन केव्हां तरी !

या आशेवर कंठिले दिवस ते, होतों सुखी मी खरा,
हा धिक् ! दुर्विधिलालसें हरपलें माझें कुठें स्वप्न तें !

वेलीची मृदु पालवी हळुहळू जाऊन आलीं तिथें—
पत्रें तीक्ष्ण कठोर फार उठले काटेहि अंगावरी !

पुष्पें ? तीं तर गंधहीन नव्हतें सौंदर्यही त्यांजला !
गुंफूं दाम वृथा कशास ? धरितो हातांत कोणी तया ?
राहो अन्य परंतु लेश नुरलें औत्सुक्य माझेंच कीं ?
मी व्यर्थ श्रम दीर्घ सोसुनि करूं अन्यांसही श्रांत कां !

गेल्या त्या मधु कल्पना मम, पुरे आतां पयःसेचन
उत्कंठा तुडवून मी चरणिं हा निस्संग झालों पुरा !
कोणाला उपचार ते सकलही व्हावेत आतां बरें ?
आशा सर्वहि होमुनीच बैसलों नैराश्यवन्हींत मी !

विश्वाची मज राहिली न परवा, होओ सुखें ध्वस्त तें !
स्वर्गाला नरकांत मी ढकलुनी झालों असें मोकळा !
तारांच्या दिवट्या करांत धरुनी आतां नभोमंडपा
लावोनी बघ आग विश्व सगळें हें जाळुनी टाकितों !

झालें आजच नष्ट केंवि सगळें विश्वांतलें मार्दव ?
शुद्ध प्रीतिहि हाय ! हाय ! ठरली आभास !—दृष्टिभ्रम !
देतों फेकुनि चंड चंड गिरि हे श्यामांबराभ्यंतरीं—
कीं कोठें लपवील शीघ्र अपुलें हा भानु काळें मुख !
नाहीं कांहिंच दर्शनीय उरलें, शून्यीं बुडालें जग
नैराश्योद्भव अश्रु गाढ तिमिरीं ढाळीत हिंडेन मीं !
माझीही नलगे स्मृती मज ! पुरे प्रेमप्रतीक्षाहि ती !
सर्वस्वावर शांत आज बसलों सोडून बाष्पांजली !

## पुष्पास—

ताजें सुंदर फुललेलें तेथें तें मम कुसुम डुले
हळु हळु हसतें गालांत हास्याचे उठवित झोत

स्रोत वाहवी प्रेमाचे शांतीचे आनंदाचे !
केलिसदन विश्रामाचें माझें, साऱ्या जगताचें !

मधुसौरभ अनुपम पसरे विश्वहि नाचे मोदभरें
मी तर बनलों पूर्ण पिसा खुशाल कोणी मजसि हंसा !

* * *

ये ! ये कुसुमा ! ये इकडे लाजत लाजत हंसत गडे !
हासूं खेळूं प्रेमानें गाऊं या आनंदानें
व्योमधरेला एक करूं गगनीं तारकमाणि विखरूं !
प्राचीच्या गालांवरती प्रेमच ठसवूं मधुगीतीं !

घाल दिशांसह तूं फुगडी मीहि नाचतों तुझा गडी
मी तूंचें विसरुनि भान गाऊं प्रेमाचें गान !
नाचूं नाचवुं विश्वाला आनंदीं बुडवूं त्याला !
विश्व कुठें पण तें दुसरें तूंच ! तूंच सर्वत्र बरें !

* * *

वससी अजुनी कां तेथें ? फुला ! कधीं येणार इथें
दृष्टि लावुनी तुझ्याकडे बसलों आहें पहा गडे !
तेथें तूं, मी एथ वसें होय कधीं हें नाहींसें ?
मधली भीषण खोल दरी कधीं बरें होईल दुरी ?

दूर दूर हे वसण्याचे केव्हां दुर्दिन जायाचे !
अंतरिं शोकाचे वणवे वरती उसनें हास्य नवें !—
स्थिति दुःसह ही पुरे पुरे भेटणार तूं कधीं बरें ?

* * *

जाइल मधली घोर निशा येइल सुखकर रम्य उषा
तेव्हां हास्यच हास्य गडे भरेल निश्चित चोंहिकडे !

खरें ! खरें ! पण काय करूं ? तोंवरि कैसा धीर धरूं ?
कशी आवरूं उत्सुकता ? दृष्टिसमोराचि तूं असतां !

"माझें तें माझें नाहीं "— स्थिति ये कैशी मजलाही ?
तव लाभें मी धन्य खरा ! तव विरहें दुर्भाग्य पुरा !

अधिपति असतां स्वर्गाचा लेश नसे मज सौख्याचा !

* * *

कशास पण ही विषण्णता फुला ! दाखवूं तुज आतां ?
ज्ञात असे तुज मन माझें मीहि जाणतों प्रेम तुझें
माझे दुःखाश्रू तुजला अनलासम होतिल मृदुला !
हे मम नैराश्योद्गार कष्टवितिल तुज अनिवार !

झालों मी विक्षिप्त पिसा श्रमवूं पण तुज फुला कसा ?
निधान तूं मृदुलत्वाचें शुचितेचें चारुत्वाचें !
आनंदानें हांसावें मला, जगाला हंसवावें !
निर्विण्ण तुला करूं कसा ? शोकीं बुडवूं केंवि रसा !

हांस ! हांस तूं ! बघूं बरें डोलो स्थिरचर मोदभरें !
मीहि फुलां विसरुनि भान गाइन अभिनव मधुगान !

## तारा

झालें अंबर मेघमेदुर, भरे अंधार सर्व स्थलीं
नक्षत्रें गगनांतलीं सकलही चंद्रासवें लोपलीं
वायू गायन गात भीषण रवें स्वच्छंद धावे जवें
आक्रंदून नभःकटाहहि पहा ढाळीतसे आसवें !

मेघांचा पडदा हळूच करुनी बाजूस लीलाभरें
हांसे मंद पहात लाजुनि मला ही कोण आहे बरें ?

तेजाचे मृदु शांत दिव्य किरण प्रेरोनिया भूवरी
या दीना तम वारुनी बुडवि ही आनंदरत्नाकरीं

झालें जीवित मग्न घोर तिमिरीं आशालता वाळली
होतों सोडित मी विषण्ण हृदयें नेत्रांबुधारावली !
तारे ! तों उदय त्वदीय अमृतस्यंदि प्रभा फेंकित
झाला शांत ! मदीय भाग्यचं खरें हें पूर्वजन्मार्जित !

पूर्णेंदू अथवा रवी तळपती तेजःप्रभावें खरे
या काळीं पण तूंच एक मजला आनंद देशी बरें !
घे घे रम्य गलन्मरंदसुरभिप्रोद्दाम पुष्पावली
गुंफोनी नयनांबुसिक्त सखये कंठीं तुझ्या वाहिली !

हास्याचे किरण त्वदीय भरले सर्वत्र जे उज्ज्वल
त्यांयोगें मधुनंदनासम गडे सारें दिसे भूतल !
मुक्ता, तारक दिव्य, कल्पलतिकानव्यप्रसूनें, मणि
यांना लाजवित त्वदश्रु गळुनी ही धन्य हो मेदिनी !

वीणेची चढवून तारं गगनप्रासादपृष्ठावरी
देसी फेकुनि रम्य गानलहरी पीयूषसिक्त स्वरीं !—
तैं रोमांच थरारुनी गळति गे प्रेमाश्रु मल्लोचनीं
तूंही ते पुससी स्वकोमल करीं अश्रु स्वयें गाळुनी !

ते तेजोनिधि इंदु भानु धजले नाहींत याया पुढें
गाढ प्रेम तुझें खरें मजवरी, आलीस कीं तूं गडे !
स्वार्थत्याग दिसावयास नलगे, वाग्जालही व्यर्थ तें
होतो स्पष्ट दृढानुराग सखये एकाहि मंदस्मितें !

तारे ! प्रेममयी त्वदीय वदनश्री पाहुनी सुंदर
उत्कंठा उसळून मी पसारितों आश्लेष द्याया कर !

नाहीं तें पण भाग्य ! दूरुनिच गे पाहात देवी तुला
न्यावें जीवित सर्व मी, विधिबलें दुष्काल हा पातला !

ये खालीं उतरून तूं महिवरी मन्मानसानंदिनि !
किंवा मीच तुझ्या समीप सखये येतों त्वरें धावुनी
तारे ! त्वत्सहवासलाभ करिन त्यागूनही देह हा
आतां ही विरहस्थिती पण गडे झाली महा दुःसहा !

## कारावद्ध !

अष्ट दिशांच्या भिंती रचुनी
नील नभाचें झांकण घालुनि
बद्ध करुनिया देहबंधनीं
दुर्विधिनें मज असे कोंडिलें भीषण कारासदनांत !

जिकडे तिकडे तिमिर पसरलें
तेजाचें नच नांवहि उरलें
डोळे असुनी व्यर्थ जहाले
माझेंही मज रूप कळेना ! काय दुजाची मग मात !

सैरावैरा धावुनि धावुनि
गेलों विफल श्रांत होउनी
दरींत पडलों एका चुकुनी
तळमळ तळमळ करित लोळलों तीक्ष्ण महोपलखंडांत !

तडतड मस्तक करीं बडविलें
वैतागुनि बहु केश उपडिले
प्रबलाश्रूंचे झरे निर्मिले
दीर्घक्रंदनरवप्रतिरवें गांजविला सर्व प्रांत !

त्या देवाला – सैतानाला
दयालवहि पण नाहीं आला !

मुक्त न कोणी केलें मजला
हृदयास्थित शोकाग्नीवरती बसलों अश्रू ढाळीत!

भोकें पडलीं जीर्ण नभाला
प्रकाश दिसला मज पलिकडला
स्वर्ग तोच ! मी त्या स्थानाला
केव्हां जाइन सांगा कोणी, झालों पुरता उद्भ्रांत!

तेथें आहे आनंदाचें
मधुररसाकुल नव आशांचें
सुंदर सदन प्रीतिशांतिचें
कारासदनांतून सुटुनि या जाइन केव्हां मी तेथ !

नको नको हें जगणें आतां
मृत्युच केवळ तो सुखदाता
त्याविण नाहीं अन्य त्राता
या स्थानांतुनि-या नरकातुनि करील कां तो मज मुक्त !

## प्रतिबंधित स्त्रीवर्ग

जी दिव्यकल्पलतिका कुसुमासवाला
धिक्कारिते निज सुरम्य गलन्मरंदें
संव्यापिते दशदिशा मधुसौरभानें
ती मल्लिका अहह ! काय तमीं वसावी ?

पीयूषसेचन करून निजप्रभेनें
माधुर्य दिव्य पसरी अवनीवरी जी
ताराहि हाय ! गगनीं प्रणयोज्ज्वला ती
का कृष्णमेघपटलांत अदृश्य व्हावी ?

हा ! हा ! सुधोपम जलें सुखवी तृषार्ता
पद्मोत्करीं जिस विभूषवि सृष्टिदेवी

देवा ! अशी मधुर पुष्करिणी कशी ती
शैवालजाल पसरून दिसूं न यावी ?

जी वाढवील अमरेशकिरीटकांति
दिव्यांगनाधवलकंठ सुशोभवील
रम्यप्रभोज्ज्वल अलौकिक तीच मुक्ता
व्हावी अनंत जलराशिनिमग्न काय ?

सौंदर्यसार गुणकेलिनिकेतनास
योषिज्जनास बुध झाकुनि ठेविती कां ?
वारोनि शीतलशरन्मधुचंद्रिकेला
विश्वास कां बुडविती तिमिरप्रवाहीं ?

माधुर्यशौचमृदुतादि गुणैकपात्र
कां निंद्य मानिति जगीं महिलागणाला
जी गेह नंदन करीत निजाधिवासें
ती तुच्छ लेखिति कशी गृहिणी कळेना !

जें सत्य तें कधिं असत्य घडेल काय ?
नाहीं असत्यहि कधीं घडणार सत्य !
ठेवून बंधनिं कशी गुणवद्धि व्हावी
साधेंच तत्व पण हें न कळे कुणाला !

संगें जिच्या गुण समस्त पवित्र झाले
स्वर्गीय दिव्य शुचिता भुवि मूर्त आली
ती चारुशील ललना मुकवून विश्वा
आनंदशून्य सदनें करितात मूढ

सांगा जरी मिसळली वनिता समाजीं
होईल काय तरि फार असा अनर्थ ?

नाहीं कदापि मुख दाखविलें कुणाला
स्तंभ प्रचंड उठतो मग नीतिचा कीं ?

या बंधनें अमित हानि घडून आली
स्त्री जाहली खचित कीं पशुहून नीच !
पीयूषसिक्त भगिनीप्रणया मुकून
वेडें पहा धडपडे तिमिरांत विश्व !

स्त्री आणखी पुरुष सर्व मुलें प्रभूचीं
तीं होत बंधुभगिनी पण हाय ! हाय !
या काममूढ पुरुषांहिं खराच केला--
स्त्रीवर्ग सर्व अपुल्या विषयास पात्र !

देवा ! अधोगति कधीं वद ही सरेल ?
योषित्समूह कधिं होइल बंधमुक्त ?
उच्छिन्न तूंच कर ही झणिं दुष्ट रूढि
मी तत्पदीं भ्रमतसें नमवून माथा !

## तुफानांतील वारा

कमलविभूषित तडागतीरीं परागगंधित शीतल नीरीं
मधुलीलारस वेडा मारुत होता कांहीं गात बागडत !
झोंबे लतिकामृदुलपल्लवा हळूच प्राशी सरोजासवा
जमवुनि मधुचोरांचि टोळी धांगड धिंगा भारी घाली
गड गड गड रथ लोटित अपुला तों अवचित घनराणा आला !
कडड विजेचा चाबुक वाजवि चराचराला नादें भमवी
अवचित संकट असलें देखुनि क्षणभर चकितचि होय वायु मनिं
होउनि सहसा स्मृती कशाची भारी धांदल झाली त्याची !

धावूं लागे सैरा वैरा इकडुनि तिकडुनि वेडा वारा
काय हरपलें कुणास ठावें तें शोधाया वेगें धावे
अति दुःखें सुसकारे सोडित उन्मत्तासम चाले भटकत
काय शोधितो न कळे मजला असेल ठाउक त्याचें त्याला !

मुसळधार पाऊस कोसळत मधुनी मधुनी वीज कडाडत
मेघहि कर्कश नभीं ओरडत तिमिर चहुकडे दारुण पसरत
तरि न जुमानुनि असलीं व्यसनें घेत आडवीं तिडवीं वळणें
कोठें जातो वायु कळेना कारण त्याचें मज उमगेना
कांहीं कालें वादळ सरलें जिकडे तिकडे जलमय झालें
मारीत उड्या हासत खिदळत फेसाळुनि निर्झरगण धावत
वायु बिचारा बहु दमलेला एका झाडावर मग बसला
अश्रुबिंदु तै टपटप गळले दुःख त्यास हें असलें कसलें ?

मीच अभागी एक जगांत देवा ! होतों ऐसें समजत
नैराश्यें मम अंतर कढतें जिकडे तिकड शून्य भासतें
लोक दुजे असतिल सौख्यांत निदान जडतरि; होतों मानित
पण तें कुठलें हा वाराही रडतो कढतो भ्रमतो पाही !

काय प्रियकर त्याचें गेलें ? फिरुनी नाहिंच काय लाभलें ?
पिशापरी थैमान घालित होता, पण तें झालें व्यर्थ !
देवा ! अपुलें तें गमवोनी उदास अश्रू ढाळित नयनीं
पिशाच होउनि दग्ध जीवित कंठावें सर्वांहिं जगांत !—

हीच काय तव असे वासना ? कल्पनाहि ती सहवे न मना
दुःखाश्रूंच्या दुस्तर डोहीं कां करिशी रे विमग्न भू ही ?
जा ! जा वायो ! आकाशांत शोकाचीं तूं गाणीं गात !
त्या गाण्याला मीही एथुनि देतों अपुला सूर मिळवुनी !

## ओढ्याची खळखळ !

जिकडे तिकडे अंधाराचें
राज्य पसरलें भेसुर भारी
नांवहि नाहीं शांतिसुखाचें
किंकाळ्या फोडुनी भालुका गाजविती अवनी सारी !

आजूबाजुस काळा फत्तर
तुटके वरुनि कडे डोकावति !
झुडुप सानहि न हो दृग्गोचर
हिरव्या गवतांचे रे तेथें कुठुनि गालिचे मग दिसती !

हरिणांचीं चिमुकलीं पाडसें
या बाजुस केव्हांहि न फिरकति
क्रूर लांडगे अथवा तरसें
धुमाकूळ घालुनी भाग हा सारा खळबळुनी देती !

आशा ठेवुनि मेलेले किति
नाचति येथें भुतें होउनी
कर्कश भेसुर शब्द काढिती
तेणें ऐथिल दऱ्या गुहा या सगळ्या जाती गजबजुनी !

अशा स्थळीं मी जन्म पावलों
परिस्थितीचीं भूतें पाहुनि
खुळाच पुरता भ्रांत जाहलों
रडत ओरडत इकडे तिकडे आहे धांवत दग्ध वनीं !

काटेरी खडकाळ खबदडी
तिच्यांत बसतों लपुनि कसातरि
भुतें लांडगे हेच मम गडी
त्यांच्या संगें भटकत आहे स्वच्छंदानें कुठें तरी !

वाट न दिसते पुढची कांहीं
कोठें जावें मजहि न आशा !
कर्तव्यच मज कसलें नाहीं
जळक्या या रानांत राहतों शून्य गमंति मज दाहि दिशां !

आकाशांतिल गंगादेवी
तुजवर वर्षी बिंदु आपले
तिचा लाडका तूंच एक भुवि
कोठें तूं ? मी कोठें ? सांगे काय जवळ मम तुज दिसलें !

त्या गंगेनें--पवित्रतेनें
अश्रुजळानें तुज वाढविलें
तिच्या लाडक्या गड्या! तव मनें--
काय घेतलें ? म्हणुनी माझें पाणी तूं रे मागितलें ?

पाणी अमृत स्वर्गंगेचें
काळकूट हें माझें दुसरें !
सेवन करितां अल्पहि याचें
कांति हरपुनी वाळुनि जाशिल खुळया ! त्वरित तूं हेंच खरें !

सोड ! सोड तो हेतू सारा
जा ! जा एथुनि शीघ्र कुठेंतरि !
मलाहि जाऊं दे परभारा
रडणें हंसणें वद केव्हांही एक कसें होईल तरी ?

आनंदें तूं स्वर्गी जावें
कदा बोलवीं परंतु न मला !
खुशाल तूं स्वेच्छें हांसावें
मला रडूं दे पिशाचसंगें भटकत ढाळित अश्रुजला !

कां ? तें न पुसें ! दुःख मनींचें
सांगवे न मज तुला कदाही !
जा तूं भोगी सौख्य मजेचें
भटकत भटकत विलीन व्हाया शून्यांतरिं जातों मीही !

## डास !

केर साचला बहु खोलीभर
वरहि धरोसा फार मातला
किती जळमटें लोंबति खालीं
त्यांतच पडलों तसाच मळकी जुनी हांतरी पसरून !

खालीं वरती आजूबाजूस
उदासिनता नांदे दारुण
उदास अंतर, उदास विश्वहि !
कसातरी मी रात्र कंठण्या पडलों डोळे झांकून !

बाह्य उपाधी होतां दूर
तंद्री लागूनी गुंग होय मन
स्मृती होउनी पूर्वस्थितिची
प्रबळाश्रूंनीं दृष्टी भरली कसें कसेंसें होऊन !

स्वर्गीं जाउनि कल्पलतेच्या
फुलांतला रस जो प्राशन करि
तो मी सांप्रत विधिघटनेनें
पडलों आहें कोठें न कळे, पुरा पुरा झालों दीन !

कोठें ती स्थिति ? कोठें ही स्थिति ?
कशास कांहीं मेळ असावा !
हाय ! हाय ! ही काय दशा मम !
अवचित गेली प्रणयरूपिणी प्रिया मला कां सोडून !

असो ! असो तो विचार दुःखद
सुखद संगतिस्मरण करून
तद्गुणचिंतनिं गुंग होउनी
ध्यानीं आणुनि तिचें मधुस्मित जातों विश्वा विसरून !

गुङ् ! गुङ् ! गुङ् ! गुङ् ! अरे काय हें ?
स्वर्गांतहि ये नरककीट हा !
जा ! जा परता ! हो दूर कसा !
पहा प्रिया ही, बोलूं दे मज एकतरी तिजसह वचन !

ये, ये सखये ! जवळ ये अशी !
आजवरी होतीस कुठें वद ?
दूर दूर कां अशी राहसी ?
गुङ् ! गुङ् ! गुङ् ! गुङ् ! जा रे अधमा ! काळें कर जा एथून !

प्राणेश्वरि ! अनुराग गाढ मम
ठाउक असतां तुला निष्ठुरे !
घ्यावी गमली काय परीक्षा ?
गुङ् ! गुङ् ! गुङ् ! गुङ् ! कां रे नीचा ! त्रासविसी वटवट करून ?

पुरे ! पुरे हें रडणें आतां !
जाउं नको मज पुन्हां सोडुनी
ये ! ये मज ते अश्रु पुसूं दे
गुङ् ! गुङ् ! गुङ् ! गुङ् ! जा रे दुष्टा ! नरकीं बस मुख खुपसून !

आली ! आली ! पसरुनि करयुग
आलिंगाया जवळ लाडकी
अहा ! काय हें भाग्य अतुल मम
गुङ् ! गुङ् ! करुनी तों वैऱ्यानें मला दंशिलें कडकडुन !

सुखस्वप्न तें हाय निमालें !
हृदयदेवता गुप्त जहाली !
मंदभाग्य मी खराखरा जगीं
अंधकार बाहेर आंतही दारुण गेला व्यापून !

अहो ! कुणी तरि या डासाला,
करा खळाला कठोर शासन !
रुचिरप्रभ रत्नें भरलेलें
आकाशाचें अंगण त्याला खेळाया मी देईन !

## डाकवाला !

लहानशी पिशवी चमड्याची
गळयांत अडकवुनी डौलानें
दूत यमाचा, स्वर्गसुखाचा
रडवीं हंसवीं पत्रवाहका ! कर जा तूं अपुलें काम !

अर्धावृत भू तेजास्तिमिरें
सुधा हलाहल समुद्रगर्भीं
कंटक मधुसौरभ्य गुलाबा
परंतु हींही या तव पिशवीपुढें वाटती मज तुच्छ !

कुणास हंसवित, कुणास रडवित
करित कुणाला उत्कंठित बहु,
जाळित पोळित हृदय कुणाचें
गाढनिराशाकूपीं कोणा ढकलित जा तूं स्वच्छंद !

विद्युत्पतनें जाळी नवतरु
करकावर्षाणें छिन्न फुलें करि

लताकुंज मधुजलकणसेकें
नाचवि डोलवि घनराणा तो, तसाच तूंही अससि गड्या !

वनराजि हंसे वसंतागमें
तशीं तुजमुळें कितीक सदनें;
कुठें उद्भवे दीर्घ क्रंदन
वर्षाकाली देत हुंदके अश्रु ढाळितें गगन जसें !

प्रेमाचे संदेश पोचवुनि
दग्ध मना उज्जीवन देसी
अश्रुसिक्त त्या प्रणयपत्रिका—
भाग्यवान तूं ! धन्य खरा ! कीं तुझ्याच करिं येती आधीं !

दुःसह विरहें फिकट जहाले
त्या कोमलमधुकपोलभागीं
स्मितच्छटा झळकतां अकस्मात्
बघसी प्रियसंदेशहारका ! तूंच; तूंच त्या कारण ही !

गभीर सरिता, प्रचंड पर्वत,
कितिक योजनें माळ आडवा ! –
तरीहि सखया ! पत्रवाहका
वियुक्त हृदयां एक कराया समर्थ भुवनीं तूं एक !

सुखदुःखाचीं सूत्रें हातीं
धरुनी विश्वाला चाळविशी
काय थोरवी तुझी वदावी !
धन्य अससि तूं कीं निंद्य पुरा, हें कांहिं न मज पण कथवे !

धन्यच अथवा ! कीं प्रिय सखिचीं
लिहिलेलीं मधु मृदुल करांनीं

पवित्र पत्रें तुवां आणिलीं
तीं स्पर्शाया भाग्य कुणाचें या जगतावर मजवीण !

व्यवसायीं या कितीहि पातक
असो, घाल तें माझ्या माथीं
परंतु दे दे नित्य आणुनी
गोड सखीच्या गोड हातचीं गोड गोड पत्रें मजला !

## हृदयभेदन

जाती धावत शैल-निर्झर वनीं स्वेच्छें सरित्संगमा
देती पुष्पलता खुशाल तरुला विश्रब्ध आलिंगन
विद्युन्मेघ मिळून रम्य करिती व्योमांगणीं नर्तन
स्वैरालाप सरोजिनीसह सदा चाले अलीचा पहा !

तारा आणि विधु प्रशांत गगनीं गातात गीतें किती
चंडांशु प्रणयच्छटा उमटवी गालीं उषेच्या नव
वायूची लहरी करी हितगुजें शैलासवें सर्वदा
पद्में हीं हंसती क्षणांत रुसती प्रेमें तडागावरी !

विश्वांत प्रणयी सुखें विहरती सर्वत्र ऐसें दिसे
प्रीतीचा सुविलास अप्रतिहत प्राणेश्वरी ! चालला
नाहीं होत कदापि लौकिकभयें प्रेमाश्रुसंरोधन
औदास्यें अथवा कधीं न दिसती निस्तेज हास्यच्छटा !

आनंदें उघडें करून हृदय प्रेयास आलापणें
स्वच्छंदें करणें विहार सखये सोत्कंठ त्याच्यासवें
प्रीतीचें फल काय याहुनि दुजें लोकांत आहे खरें
नाहीं प्रेयसि ! हाय ! हाय ! पण हें दैवांत माझ्या सुख

तूं माझी परि दैवदुर्विलसितें नाहींस माझी अतां
हा ! हा ! दृष्टिहि फेकणें तुजकडे चोरीच झाली खरी

प्रेमालाप तुझ्यासवें मग गडे कोठून व्हावा बरें
स्पर्शाची तर आसही जळुनिया केव्हांच गेली असे !
अंधारांत बसून नित्य करितों नेत्रांबुसंवर्षण
हा दुष्ट व्यवहार अश्रुहि मला ढाळूं न देतो पहा !
झालें शुष्क शरीर, दग्ध हृदयीं शोकानलें जाहलों
उत्कंठा पण गे तुझ्याविषयिंची आहेच ही वाढते !

## तो काल !

होता डोलत इंदु अंबरिं, हंसे ज्योतिष्मती यामिनी
गाणीं मंजुल गात गात विहरे सोत्कंठ तारागण
वाहे कैरवसौरभाकुल अहा ! सानंद मंदानिल
कांतासंगतकोकिलस्वनभरें व्यापून गेलें वन !

वेढोनी दयितास गाढ लतिका प्रेमाश्रु ढाळी किती
हास्याच्या लहरी सरांत उठती हें चित्र पाहोनिया
आशा प्रेम कुतूहल प्रगटवी तो काल सर्व स्थलीं
प्रेयश्चिंतनिं मीहि गुंगुनि तदा होतों सुखें क्रीडत !

तो वासंतिक काल सुंदर परी गेला अकस्मात् कसा ?
हा ! हा ! सर्व जगास आज सहसा आली कशी रुक्षता ?
इंदू, तारक, वायु, कोकिलरव, प्रेमाश्रुवर्षी लता,
अद्यापी दिसती जगांत, पण ती जादू कुठें नाढळे !

विश्वाला रमणीयता अजवरी आली प्रभावें जिच्या
होती वर्षित नित्य नूतन सुधा माझ्यावरी जी स्मितें
ती तूं प्रेयसि ! आज नाहिंस इथें विश्वैकसंमोहिनी
सांगें रंजनशालि हें जड जगत् होईल कैसें मग ?

होता आजवरी वसंतचि जगीं, तूं माधवी देवता
दृक्पातें तव तारका निपजल्या शून्यांबरींही किती !

या दावानलधूसरा दशदिशा झाल्या पहा सांप्रत
व्योमीं हे भरले स्फुलिंग, म्हणती वेडे तया तारका !

शुद्धे ! या नयनास गोचर कधीं तो काल होईल का ?
माझी होशील काय तूं ? – पण गडे नाहींस माझी कदा ?
तूं माझीच ! पुनः पुन्हाहि म्हणतों माझीच तूं शोभने !
देवी ! या तव तीव्र दीर्घ विरहें झालों परी गे पिसा !

## मूक गायन !

तारांच्या मृदु हास्यरश्मिवरुनी आली इथें शांतता
दिव्यप्रीतिसुधातुषारकणिका वर्षीत सर्व स्थलीं
हर्म्याग्रावर बैसुनी सखिसवें दृष्टी नभीं लावुनी–
मी त्या शान्त निशीथ कालिं रचिलीं अव्यक्त गाणीं किती !

नक्षत्रावर लाविले नयन मी, माझ्यावरी देविनें
गेला काल असा किती झरझरा याची स्मृतीही नसे !
सारें विश्व न वाटलें मज तदा माझ्यांत सामावलें
दिक्काला विसरूनियां क्षणभरीं झालों अनाद्यंत मी !

गातां तें नव मूक गायन नुरे तेव्हां अहंभावही
व्योमस्थ ग्रहपंक्ति मत्पदतळीं लोळावया लागली !
अंगीं रोम थरारुनी जवभरें नेत्रांबु वाहे किती
तैं धावून सखी मला निजभुजीं देई दृढालिंगन !

व्यक्तांतून सुखप्रमत्त शिरलों अव्यक्तिं मी तेधवा
अव्यक्तांतिल रम्य सार धरिलें तें बाहुपाशीं मुदा !
स्वर्गंगापुलिनांत हासत जवें देवीसवें चाललों
तारारूप धरून सुंदर अम्हीं केलीं किती नर्तनें !

तेजोगोल अनंत ताल धरिती अव्यक्त गाना मम
आनंदाश्रु गळून पूर चढला मंदाकिनीला महा !
त्या काली लय पावलों उभयतां विश्वांत आम्ही अहा
किंवा विश्वच आमुच्यांत, न कळे झालें कसें काय तें !

## तूं !

नवेंदुकलिका नभीं पसरि चारुहास्यच्छटा
अहा ! दिसति कौतुकस्तिमितलोचना तारका !
परागकण फेंकितो सुरभिशीतमंदानिल
प्रमत्त जन डोलती भ्रमरमंजुगुंजारवें
तुझ्या विमल दृष्टिचा प्रचुर दिव्य आलोक हा
तुझें मृदुल लज्जित स्मित इथें तिथें नाचतें !
त्वदीय मधुरालसोच्छ्वसनगंधरेणुव्रज
भरी भुवनिं देवि ! हा अनिल गात संगीतिका !
मडे ! जनन पावला तवाचि कंठिं वीणारव
निनादमय अंबरा करि निज प्रभावें पहा !
मनोज्ञ तव रूप हें धरुनि सृष्टि सारी कशी
अहा ! मम विलोभना झटत आज जीवेश्वरी !
मनीं वससि तूं सदा सुमुखि ! तेंवि बाहेरही
नसे तुजविणें दुजें किमपि सर्व विश्वीं प्रिये !

## सायंप्रसंग

संध्यारविच्या मृदु किरणांनीं रंजित नभ झालें
लज्जित यौवनवतिच्या गालासम मोहक गमलें !
जरतारी नव शालु नेसुनी सरिता ही चाले
लाजत लाजत हळूच हासत करित किती चाळे !

कलकल नादें गात गात ती प्रेमाचीं गाणीं
या भूमीवर मधुनंदनवन मूर्तिमंत आणी !
शारदीय इंदुच्या करांतिल मधुर सुधाधारा
खेचुनि नीरस भूप्रदेश ही आर्द्र करी सारा !

मधुमासांतिल विकचकमलमधुसौरभ आणोनी
विषण्ण हृदयां पहा पहा ही टाकी हंसवोनी !
बघुनि ललितगतिविलास कुतुकें स्तंभित होऊन
तटतरुराजी उभीच राहे विसरुनिया भान !

मीही मुग्धासम तीरावर होतों किति वेळ
मूर्तामूर्तहि विविध कल्पना करिती मनिं खेळ !
परंतु अरसिक भानू गेला तोंवर अस्तास
भीषण तिमिरें पूर्ण व्यापिलें सर्वहि जगतास !

निरुपायें मग घरीं परतलों स्वर्गच सोडून
एकांतीं तर मारिच झालें मानस निर्विण्ण !
आद्यंतीं तम, मधेंच दिसतो तेजोलव नयना
कटु दुःखांचीं पुटें चढविलीं मानवसौख्यांना !

शोकक्रंदन असे सदाचें, केव्हां तरि हास्य
एथें तेथें चाले संतत दुर्विधिचें लास्य !
दुःखोच्छ्वासोद्भव झंझानिल वाहे जोरानें
पुष्पलतातरुवृंद ध्वंसुनि शून्य करी रानें !

कां हास्यांतहि औदास्याची छटा दिसे ऐसी ?—
उद्वेगीं कां विधि क्षेपितो प्रमुदित हृदयांसी ?
सुधाचषक कां विषप्रवाहीं जातो वाहून ?
या दुःस्थितिचें कारण सांगुनि देइल मज कोण ?

## शून्याकाश

होता शोभत केधवा दिनमणी कांतिप्रकर्षान्वित
केव्हां इंदुहि शारदीय अमृतोत्सेकीं मुदें डोलला
संशांतप्रभ तारकाविलसनें भूषा कधीं पावलें
केव्हां हें नभ जाहलें मधुवियद्गंगोर्मिघाताकुल !

श्यामांभोधरमालिका विहरलीं केव्हां जलोद्गारिणी
संध्यारंजितशुभ्रमेघशकलें चारुप्रभ क्रीडलीं
नाचे सुंदर इंद्रकार्मुक कधीं कौतूहलोद्दीपन
केव्हां मंडित जाहलें गगन हें चंचत्तडिन्नर्तनें !

होत्या हासत गात अस्फुट कधीं दिव्यांगना गायनें
प्रेमोद्दीपित लोचनांतुनि जलें संवर्षलीं केधवां
दिव्यांचीं मधुचुंबनें घडुनिया दाही दिशा रंगल्या
झालें विश्व समस्त निद्रित कधीं गुंगून वीणारवीं !

आनंदैकनिधान तेंच नभ हें संशून्य झालें कसें ?
शून्याचेंच पहा जगीं पसरलें साम्राज्य सर्व स्थलीं
आहे तीव्र चिताग्निधूम भरला फेकीत विश्वा तमीं
हा ! हा ! धावति लोचनांतुनि कशा उष्णाश्रुधारा पहा !

माझीही स्थिति जाहली विधिवशें देवा ! कशी सांप्रत
दग्धानंद मृताश शून्य हृदयें शून्यांत मी राहतों
हास्याच्या किरणावरी पसरला अंधार दुःखाश्रुचा
प्रेमाच्या रमणीय नंदनवनीं दावाग्नि संचारला !

पुष्पांतलि सुगंध, वायुलहरी, कृष्णेंदुमंदप्रभा
यत्नें आवरितांहि जाति सुटुनी हातांतुनी ज्यापरी
माझें तें मजपासुनी निसटुनी गेलें पळोनी तसें
आकाशांत अनंत दूर बसलें जाऊन ताऱ्यापरी !

जाते होउनि शीर्ण बाललतिका वज्राभिघातें जशी
माझें तें मजपासुनी हरपतां झाली तशी मत्स्थिती !
आहे सांप्रत गाढ नैश तिमिरें भूगोल हा झाकला
ती येईल कधीं तरी नव उषा—आशाच नाहीं मज !

प्रेमाचे मधुराश्रु, रम्य हसितें, आनंदसंगीतकें
प्रेमाचीं रमणीय चाटु वचनें, विश्रंभसंलापहीं
नाहीं याविण अन्य हेतु धरिला ज्यानें कशाचा मनीं
तो मी सांप्रत हाय ! हाय ! जळतों आहें वियोगानलीं !

## मुक्ता

यत्नें दुर्गम ते विशाल अचल प्रोत्तुंग उल्लंघुनी
गेलों बाहुबळें अनंत तरुनी चंडोर्मि उन्मत्तसा
नाहीं दारुण नक्रभीति धरिली प्रेमोत्सवें लेशही
सिंधूच्या तळिं जाउनी मिळविली ही चारु मुक्ता पहा !

प्राणाची परवा क्षणैक धरिली नाहींच नाहीं कदा
या मुक्तेस्तव संभ्रमें अजवरी केले अनंत श्रम
त्यांचें सार्थक होउनी विधिकृपें हातांत ही पातली—
ती माझीच अतां, तिचा मजविणें स्वामी न लोकीं दुजा !

रत्नांच्या मधुदामबंधनिं मुदें मुक्तेस या गुंफुनी—
कंठीं घालुनि मी विहार करितों स्वच्छंद कोठें तरी
तद्दिव्यामलरम्यकांति हृदयीं विस्तारतां माझिया
मी होईन अहा ! खराच सहसा प्रत्यक्ष देवापरी !

मुक्ते ! तूं असलीस सस्मित जरी वृक्षावरी लोळत
स्वर्गाचीहि मला क्षणैकहि कधीं होणार नाहीं स्मृति !

## स्वप्न

नंदनवनिंच्या दिव्यांनों ! आकाशांतिल तारांनों !
वासंतिक मधु मृदु वाता ! धावत सारे या आतां !
शारदीय रजनीकांत रम्य उषा, अरुणहि शांत
कोकिलकूजित अलिगान सुरेंद्रकार्मुकयुत गगन
दहा दिशांना घेऊन या रे सारे धावून
चटका लावुनि हृदयाला हाय ! करुनि वेडें मजला
पळुनी सहसा जें गेलें तुम्हां कुठें कां तें दिसलें ?

धरा धरा यत्नें त्याला द्या द्या माझें तें मजला !
होतों स्वस्थ इथें पडुनी तों अवचित दिसलें नयनीं
दिव्य सुगंधी सुंदर तें कांहिं तरी उज्ज्वल होतें !
बघुनि त्यास मी प्रेमानें अश्रु गाळिले मोदानें
नंदनवनगतसंगीतें भरुनि टाकिलें गगनातें !
जिकडे तिकडे दिव्यांच झोत उसळती शांतीचे !
होतों गुंगत हांसत मी अवचित पडलों कसा तमीं !
तें माझें कोठें गेलें शून्यीं हा ! हा ! कीं लपलें ?

दिसलें कां तें कोणाला ? द्या हो तें माझें मजला !
दया काय या दीनाची कोणाला येत न साची ?
कुठें पहा तरि शोधून द्या तें माझें आणून !
अश्रुबिंदुमुक्तामाला वाहिन आनंदें त्याला
पाहिन त्या डोळे भरुनी हीच वासना एक मनीं
तें जर मजला लाभेल भूचा स्वर्गच होईल !
पण कुठलें व्हाया असलें कसें मिळावें गेलेलें ?
हाय ! कधींही परि मातें खरेंच कां मिळणार न तें ?

## अनुताप

केलें आजवरी वृथा श्रम किती दुष्प्राप्यलाभास्तव
वाणीही जडवर्णनीं शिणविली मुग्धापरी सर्वदा
विश्वांतील रहस्य गूढ ह्रदयीं नाहीं कदा आणिलें
आत्मत्वस्मृति विस्मरून रमलों द्वैतामधें कौतुकें !

झालें विश्व किमर्थ हें उदित ? त्या कोणी कसें निर्मिलें ?
आहों आपण कोण ? काय अपुलें कर्तव्य लोकीं असें ?
विश्वाचा अपुला कसा नियमिला संबंध ? इत्यादिंचा-
एकांतीं बसुनी विचार कधिंही केलाच नाहीं पहा !

जाते जी घटकेंत लोपुनि उषा, किंवा क्षयी चंद्रमा
वल्ली चंचल, अल्पजीवि कुसुमें किंवा दवाचे कण,
यांना पाहुनि मोहुनी भ्रमितसा मी डोललों हांसलों
त्यांचा नाश बघून हाय ! रडलों स्वच्छंद उन्मत्तसा !

या तारा गगनस्थिता न मिळती माला कराया मला
नाहीं हें रुचिरेंद्रकार्मुक कधीं हातांत येत त्वरें !
पुष्पांचें हंसणें, नवेंदुकिरणें दावीं विणाया पट
ऐशी नित्य विचित्र हाव धरुनी मी यत्न केले वृथा !

मी ईशांश, जडांत काय रमण्या जन्मास आलों इथें ?
कां मी व्यर्थ विनाशि वस्तुवरती सारीं सुखें ठेविलीं ?
हा धिक् ! बैसुनि नित्य चंचल घनच्छायातलीं मूढसा
मी नैदाघ दिनेशभैरवकरीं संतप्त झालों पहा !

माझें भाग्यच थोर, कीं लवकरी शुद्धीवरी पातलों
सत्याचा सहसा प्रकाश नयना झाला भला गोचर !
शांतीचा अमृतप्रवाहि पथ मी स्वीकारतों आदरें
चिद्रूपांत विलीन आत्मविजयें होईन कीं निश्चयें !

## कवीचें आत्मसमाधान

गेलों दूर कुठेंहि, काय म्हणुनी व्हावें उदासीन मी
आहे काय इथें विशेष ? तिकडे आहे कमी कोणतें ?
स्वर्गंगा, विधु हासरा, विमल हे तारेहि गानप्रिय
कोठेंही असणार ना मजसवें आनंदवीत स्वयें ?

तेथेंही मज पाहुनी प्रिय उषा हांसेल लाजेल ना ?
मत्काव्यश्रवणास तो अरुणही प्रेमोत्सवें येइल !
यत्नें नूतन कल्पना जमवुनी आणील ना मारुत ?
श्रांतस्वांतविनोदना करिल हें आकाश दीपोत्सव !

ही चेतोरम दिव्य सृष्टि कविची मैत्रीण आहे खरी
जा कोठेंहि खुशाल, तेथ सरला राहील तैशीच ती
आत्मा नूतन, दिव्य दृष्टिहि जयां काव्योदयें लाधली
त्यांना शांतिसुखप्रमोद मिळतो सर्वस्थलीं सर्वदा !

## चिरदुःखी !

कुठेंहि गेलों तरी कसें सुख हतभाग्या लाभेल ?
कितिहि धावली ही रजनी तरि रवि तिज कां भेटेल
खळबळला जलनिधि भारी मेरुशिखरिं कां जाईल ?
भर्जित तरुला उठवाया मेघ कोणता वर्षेल ?
मृत आशेला फुलवाया समर्थ कुणि कां होईल ?
नैराश्यानल विझवाया जलद कोणता येईल ?
प्रबलाश्रुनदी अडवाया तट कोणी कां घालील ?
दुःखाग्निज्वालाताप कुठेंहि तरि कां सोडील ?
स्वर्ग निरामय केवळ तो तिथें कुणी मज नेईल ?
हाय ! हाय ! परि मत्संगें स्वर्ग नरकसम होईल !
जाऊं कोठें ? काय करूं ? शांति कशी मज लाभेल ?

दुर्विधि या हतभाग्याला छळीत आहे बहुकाल ?
देवा ! ने चरणाजवळी श्रमला भारी हा बाल !

## काव्याचें रसवत्त्व

व्योमीं दीप्तिमयी विलासललिता या हासती तारका
किंवा चंचल ऊर्मिपंक्ति करिती लीलोत्सवा सागरीं
उद्यानीं कुसुमें लता, स्मितमुखी भार्या मुलें वा गृहीं
काव्याला रसवत्त्व पूर्ण दिधलें यांनींच आहे खरें !

## प्रणयोद्गार

काव्यें आजवरीं कितीक कुतुकें वाचून मीं पाहिलीं
शास्त्रेंही पढलों गडे ! अनुदिनीं विश्रांति सोडोनिया
शब्दब्रह्म समस्त आजवरि मीं आलोडुनी टाकिलें
त्वन्नामाक्षरमाधुरी पण मला नाहीं कुठें लाधली !

वीणाझंकृति, मंजु कोकिलरव, स्वर्गांगनागानहि
केलें त्वन्मृदुरम्यमुग्धवचनें निःसार निःसार तें !
हास्यें लाजविलीं अहा ! तव सुधासंसिक्त इंदुप्रभा
शुद्धे ! देहलतेपुढें मग तुझ्या त्या कल्पवल्ली किती !

सोडोनी मलयाचला पवन ये त्वद्देहगंधस्पृहें
पाहाया तुजला अनंत जमती व्योमांगणीं तारका !
वाणी त्वद्गुणगौरवा बघ तिथें पद्माकरीं भृंग तो
स्वर्गीये ! कमलावलीहि मधुर प्रेमाश्रु ढाळीतसे !

तूं आहेस तशीच ! सृष्टि भुलली आश्चर्य याचें नसे
दिव्ये ! रुक्ष अनंत विश्वपुलिनीं तूं एक मुक्ता खरी !
चेतःकुंजिं मदीय बैसुनि अहा ! मद्वाक्झरीस्पंदनें
लोकां मोहविशी जशी विधुकला रम्या नभोवासिनी !

## शब्दसृष्टि आणि तूं.

शून्यीं धावत शब्दसृष्टि अवघी होती पिशाचापरी
चित्ताचा नव भाव रम्य तिजला व्यक्तीं न ये आणतां
अर्थावीण मृतापरी दिसतसे निस्तेज अद्यावधि
नव्योज्जीवन तूंच आज दिधलें देवी तिला निश्चयें
प्रेमाश्रूंत करून मज्जन तुझ्या जीवंत ती जाहली
तेजाचीं चढवी पुटें तिजवरी त्वद्दिव्य हास्यप्रभा !
शुद्धे ! त्वन्मुखसंगमें उपजले बव्हर्थ तीच्यामधें
आहे ही अनुभूति, कांहितरि मी नाहीं वृथा बोलत !

होती आजवरी प्रगाढ तिमिरीं ही शब्दसृष्टी खरी
तीतें प्रेमसुधांशुमुग्धकलिके ! व्यक्तांत तूं आणिलें !
विद्युद्दीप्त मनोविकार सगळे आले पुढें मूर्तिमान्
कोणाचा असला प्रभाव जगतीं आहे तुझ्यावांचुनी ?

हीं प्रेमांबुतुषारसिक्त करिती लोकांस मज्जलपनें
मीं कांहींतरि अर्थहीन लिहिलें वाचून तें डोलती !
उन्मत्तासम बोललों पण गडे ज्ञातेहि होती खुळे !
माझें क्रंदन रम्य काव्य म्हणुनी आनंद वाखाणिती !

नाहीं छंदहि तो, कुठून यमकप्रासादि येती तिथें ?
भाषेचें ललितत्व पादतलिं मीं केव्हांच संमर्दिलें !
जीं वाहून तथापि शब्दकुसुमें निर्माल्य झालीं तुला
प्रेमानें रसिकाग्रणीहि धरिती तीं आपल्या मस्तकीं !

याचें कारण काय तें समजुनी केव्हांच आलें मला
हा साराहि तुझा प्रभाव ! कळते माझी मला योग्यता
व्योमांतून यदा नवांबुकणिका कादंबिनी वर्षते
डोलें निर्जल शैलनिर्झर तदा माळावरी गर्जती !

## माझा भाऊ

बंधो ! मेळून आपलें पुनरपी होईल केव्हां बरें
दृष्टी लावुनि तन्मुखावरि पुसें मी शोकरुद्धस्वरें
तेव्हां सोडुनि दीर्घ निश्वसन तो निर्विण्णभावें महा
पाही शून्य नभीं उदश्रुसरिता तों लोटली दुर्वहा !

यत्नें आवरुनी विकार सगळे बोले तदा वैखरी
" भेटूं आपण त्या तिथें पुनरपी नक्षत्रकुंजांतरीं "
तेव्हांपासुनि हाय ! गाठ पडली त्याची न अद्यावधि
व्योमीं नित्य विलोकितों पण दिसे तेथेंहि ना तो कधीं !

## मनुष्याची परतंत्रता

आहे कंटकिता गुलाबकुसुमा कां एवढा सौरभ ?
कां कोणासहि वाटतें करिं तया यत्नें धरावें असें ?
जाते दृष्टि रजःकणांहिं फुटुनीं हा ! हा ! तथापी कसे
भृंगे केतककाननांत पडती जाऊन वेड्यापरी ?

होवो दग्ध वपू पतंग पण तो दीपावरी झेपतो
जावो प्राण सुखें, कुरंग न परी सोडी मृगांबुस्पृहा
चालोनी खडकाळ मार्ग पडती खाऱ्या समुद्रामधें
सांगा हो सलिलप्रवाह पण हे न स्तब्ध कां राहती ?

कोणी काळकुटास हाय नकळे माधुर्य ऐसें दिलें ?
कां डोळेहि मिटून दुःखचषक प्राशावया लागतो ?
जाणोनी व्यसनांत पाउल रुते तो ये न काढावया
कां जाळें विणुनी स्वतांच मनुज प्राणा करी बंधन ?

आहे ज्ञान, ' असें नको ' मन म्हणे, अश्रूहि ढाळी जन
त्याच्या हातिं नसे परंतु सुटणें त्या तीव्र दुःखांतुनी !

भूगोल त्यजुनी कुणीहि न कदा मेघावरी बैसती
तारे कोसळुनी क्षणांत मुकती रूपद्युतीला पहा !

आहे हा परतंत्र मानव पुरा, त्याचा न तोही कदा
विश्वाचा अधिप प्रमत्त असला सैतान आहे कुणी !
शांति–प्रेम–सुख–प्रमोद–लवही त्याला न केव्हां खपे
प्रेमाच्या शिशुला उगाच भिववी बागूलबावापरी !

ठेवी लोंबत अर्धदग्ध मनुजा आशानिराशांतरीं
त्यांचें क्रंदन ऐकुनी खदखदा सैतान तो हासतो !
हास्याच्या रुधिरप्रसक्त करुनी तो रौद्रमुंडावली
कंठीं घालुनि नाचतो थयथया सर्वत्र उन्मत्तसा !

त्याच्या या जुलमांत होरपळुनी गेलें जगत् सर्वहि
माझी काय कथा तिथें, विफल कां मी शाप देतों तया
ज्यानें अंबरचुंबि पादप किती स्वेच्छाक्रमें जाळिले
त्याला काय विशुष्क हीन दुबळें हें बाभळी रोपटें !

## उपचाराचें प्राबल्य

आहे एक मनांत, तेथ भलतें दावावया लागतें
तो मोठा हतभाग्य, सर्वच परी आहेत लोकीं तसे !
उद्यानीं जळती मढीं, विकसती पुष्पें स्मशानीं नवीं
तेथें सृष्टि समस्त होय उलटी आदर्शबिंबापरी !

अश्रूंचा प्रबलौघ आवरुनि ये जोरांत हांसें वर
फल्गूचा जलबिंदुही अजवरी आहे कुणी चाखिला !
क्रोधोच्छ्वास करून संयत नदी प्रेमाश्रुची लोटते
आहे बाडववान्हि सिंधुगत तो कोणीं कधीं पाहिला ?

कां लोकीं उपचार-बंड इतकें सांगा असे माजलें
कां आचाररुचींत भेद इतका होतो ? कुणाच्या बळें ?
आहे काय जनस्वभावच असा सर्वत्र घाणेरडा ?
कीं कोणी तिसराच दुष्ट छळितो ? तो कोण आहे बरें ?

नाहीं आत्मिक धैर्य, नीतिबलही वागोत कैसेहि ते
धीरांनीं पण निंद्य रूढिस पदीं संचूर्णिलें पाहिजे
आहे आंत जसें तसेंच दिसणें, हें केवढें भूषण !
धिक् ! धिक् ! दुर्बल आत्मवंचक जगीं कां माजले पोळसे ?

## डबक्यांत पडलेलें फूल.

किती किड्यांनीं बुजबुजलेलें
डबकें घाणेरडें माजलें
आंतिल पाणी सारें कुजलें
दर्प तयाचा दूर दूरही फिरवी डोकीं सर्वांची !

नाक धरोनी घट्ट मुठींत
निरुपायें मी होतों हिंडत
तरीहि कळमळुनी पोटांत
ओक ओकुनी तुट्टुनि आंतडीं व्याकुळ झाला मत्प्राण !

दिव्य गंध तों अवचित आला
रोमांचित मम देह जहाला
अननुभूत हर्षा भर चढला !
काय असे तें पहावया मी वळावियली तिकडे दृष्टी

अहा ! कथूं आश्चर्य काय तें
कल्पलतेचें सुम तें होतें
सौंदर्यानें भरित जगातें
फेंकित हास्यप्रभा खालतीं होतें उतरत मौजेनें !

तेव्हां वेडा झालों क्षणभर
झेलाया त्या धावत भरभर
गेलों पसरुनि मी दोन्ही कर
पहात वरती थेट पोंचलों अगदीं डबक्याच्या काठीं

पुढें बघत तों समोर डबकें
घाण तयाची वर्णू न शके
जवळ तयाच्या पशुही न टिके
पण हा दैवा !—सैताना रे ! काय निर्दया हें केलें !

डोलत डोलत गरगर फिरत
फूल रम्य तें हांसत हांसत
पडलें अवचित त्या डबक्यांत !
किडे अधाशी क्षणांत चढले झरझर त्याच्यावर सारे !

मुखें उघडिलीं अपुलीं कोणीं
टाकणार ते फुलास भक्षुनि
तों मी कर्कश हाक फोडुनी
उडी घालुनी पोहत पोहत त्या पुष्पाजवळीं गेलों

हातीं प्रेमानें तें धरिलें
एकवार सोत्कंठ चुंबिलें
माझ्या हृदयीं त्यास लपविलें
तों झालेले निराश सारे किडे तुटुनि मजवरि पडले !

लचके लचके माझे घेउनि
अर्धा केला जीव तयांनीं
हळू हळू निशक्त होउनी
गेलों मी त्या पुष्पासंगें पूर्ण बुडोनी डबक्यांत !

अहो किड्यांनों ! खुशाल सर्वहि
खाउनि टाका माझी तनु ही
पण त्या पुष्पाचें दर्शनही
आतां नाहीं तुम्हां व्हायचें, विसरा ते सारे मांडे !

## आशा—निराशा

निळ्या बिछान्यावर बसुनी गाती तारक नव गाणीं
मल कसलाही
तेथें नाहीं
मिळेल का मज अशी स्थिति ? पण कुठली सोडिल नियती !
फूलपांखरें बागेंत उडती फिरती मौजेंत
श्रमवीं चिंता—
लवहि न चित्ता
मिळेल का मज अशी स्थिति ? सोडिल पण कुठली नियती !
पद्मवनीं भुंगे रमती अभिनव सुरुचिर मधु पीती
कमलदलांवर
झोंपति निर्भर
मिळेल का मज अशी स्थिति सोडिल पण कुठली नियती !
लतिका किसलयिं हिमकणिका चकचकती भुलविति रसिका
रत्नें सुंदर
तुच्छ खरोखर
मिळेल का मज तशी स्थिति ? सोडिल पण कुठली नियती!
हंसरें फल गुलाबाचें शिरोविभूषण सृष्टीचें
हासहासुनी
डोलवि अवनी
मिळेल का मज तशी स्थिति ? सोडिल पण कुठली नियती !

## श्लोक

होतां मार्दव, चारुता शुचितमा कोठेंहि दृग्गोचर
त्यासाठीं मन बावरून बनतों मी शुद्ध वेडापिसा !
आशा आणि फलांत फारच परी आहे जगीं अंतर
नैराश्यें म्हणुनीच चित्त कढतें, वाहे नदी अश्रुंची !

## खरी उन्नति

झाडें भूंतुनि वाढती झरझरा, होतात मोठीं किती
जाती भेदुनि मेघमंडळ गिरी उत्तुंग उत्तुंगसे
ओढे चंचल वा प्रचंड सरिता खालीं सदा धावती
मेघांचे कण अंबरांतुनि पहा येतात या भूवरी !

नाहीं उन्नतिचें स्वरूप ठरलें बाहेरुनी एकलें
स्वार्था सोडुनि साधणें जगतिंचें आनंदसंवर्धन
आहे मूढ समाज, दृष्टि बहुधा त्याची भ्रमें झाकते
वेडे जीस अधोगती समजती, ती कीं नसे उन्नति ?

केव्हांही करिती विचार न मनीं, शक्तीच ती ज्यां नसे
ते बेलाशक आपलें मत पहा देती हवें त्यावर !
त्याला काय विचारशील मनुजें भ्यावें अजाणापरी ?
कोणी कांहिं ह्मणो, स्वतांस रुचला तो आचरावा पथ

सिंधूला भरती चढे किति तरी, होते पुन्हां ओहटी
माना लोकमता तसें, न पळही त्याच्यावरी विश्वसा
ज्याला आज समाज घेउनि शिरीं नाचेल आनंदुनी
क्रोधानें तुडवील त्यासच उद्यां उन्मत्तसा खास तो !

जो लोकप्रियतेस होइल वश, भ्रांतींत तो गोंविला
वागावें व्यवहार तुच्छ करुनी प्राज्ञें विवेकें सदा

निंदो कोणि ह्मणो कसेंहि, तिकडे केव्हांहि पाहूं नये
लोकांच्या शिरिं पाय देउनि सुखें स्वर्गांत जा चालत !

निंदा जे करितात नित्य, करुं द्या निंदाच त्यांना सदा
खातेऱ्यातिल सूकरा प्रिय कधीं होईल गंगारस
ज्याचा जो असतो स्वभाव, करितो तो त्यापरी वर्तन
त्यांचें दुष्फळ भोगितील खल ते, कां त्याकडे पाहतां ?

जे येतील तुझांबरोबर सखे येवोत ते बापडे
तुम्ही मात्र मुळीं क्षणैकहि कधीं धांवूं नका त्यांस्तव
वेगें गर्जत अंबरांत पवन स्वच्छंद जेव्हां फिरे
तेव्हां शुष्क तृणें कितीक उडुनी येती पुन्हा खालतीं !

या हो ! वासवचापदांडिं बसुनी सर्वांस मीं बाहतों
मत्संदेश कळावयास सकलां मेघांस मीं प्रेरिलें
विद्युत् कोसळतां कडाडत जवें व्योमांतुनी निर्घन
प्राणां हांकुनि तेथ ठेवि तिज जो, होईल तो उन्नत !

## समाज आणि व्यक्ति

पोरें नाचत होति बालिशपणें स्वच्छंद जीं एकदां
त्यांना दाढि मिशा फुटून बनलीं तीं थोरलीं माणसें !
ज्ञानाचें भरपूर माप पदरीं घेती वयोवर्धनें
कोणाहीवर तोंड टाकिति पुढें उन्मत्त कुत्र्यापरी !

सर्वांहून खुशाल कीं समजती जे शाहणे आपणां
ऐशांचीच जगांत आज भरती आहे, कुठेंही पहा !
त्यांचा संघ जिथें तिथें जमुनि हे रानांतले लांडगे
शांतीचीं मृग-पाडसें करकरा चावोनिया टाकिती !

भोळे पूर्वज वागले न कळतां, यांनाहि जें आवडे
तेथें वास्तविक प्रकार दुसरा नाहींच मौर्ख्याहुनी

यांना वाटतसे परी न अपुलें अज्ञान आहे असें !
कां कीं संघबल प्रचंड असतें त्यांच्याकडे सर्वदा
कांहीं दिव्य अपूर्व तत्त्व पुढती कोणी कधीं आणिलें
हें यांना कळतें न नीट, न चढे वृत्ती मनाची तिथें
ज्ञानाचा अधिकार सर्वहि परी त्यांनाच देवें दिला
त्या जोरावर नाक मोडुनि तया गर्वांध धिक्कारिती !

एकांतीं बसुनी विचार करुनी जें सिद्ध केलें मत
तें जातें सहज क्षणांत उडुनी वाऱ्यावरी पर्णसें !
जी सत्ता तुडवी शहाणपण ती मानील कोणी बुध
बोलो कांहिं समाज, मान हृदया ! जें आपलें तें खरें !

तूं जें शांतपणें मनीं ठरविलें, धिक्कारिलें तें कुणी,—
त्याची कींव करून वाग तुजला स्वेच्छें जसें आवडे
ज्यांनीं फूलच पाहिलें न दुसरें धत्तूरपुष्पांविणें
त्यां झाली प्रिय मालती न म्हणुनी ती तुच्छ होते कशी ?

लोकांतील सुधारणा घडतसे व्यक्तीमुळें सर्वदा
एकाद्यासच लाभतो चुकुनिया स्वर्गीय संदेश तो
अज्ञांना पण नेहमींच सहसा वाटे कसासाच तो
अंधारीतिल दृष्टि जाय दिपुनी दिव्य प्रकाशें जशी !

## अणु

सूर्याचा कर एक बारिक पडे खालीं झरोक्यांतुनी
होता एक तयांत नाचत अणु स्वच्छंद कैसा तरी
खेळे त्या किरणांत तोंवर दिसे नेत्रास सुस्पष्टसा
गेला बाजुस तों कुठें हरपला पत्ताच, त्याचा नसे !

आला एक अणू दुजाहि तिसरा दिव्य प्रकाशांत त्या
ते सारेहि किती चकाकत तिथें होते सुखें खेळत

गेले तेहि हळूहळू निघुनिया अल्पावकाशीं कुठें
आले तेथ पुन्हां अनेक अणु, हे सारेच होते नवे !

आले कोठुन एथ एकदम हे गेले कुठें नाकळे
हा ! हा ! निश्चित आमुचीहि सगळी आहे अशीच स्थिति
येतों कोठुनि, ओढल्यापरि पुन्हां जातों कुठें गूढ हें
भीतीनें म्हणुनीच नित्य अमुचें काळीज होतें द्विधा !

## गुप्त स्वर्ग

जा कोठेंहि जगांत नित्य दिसते सर्वत्र हास्यप्रभा
दुःखाचें वर अभ्र येत पण तें अल्पावकाशीं पळे
जाते धूम्रशिखेपरी क्षणभरें निर्विण्णतेची छटा
दुःखाची रजनी न जाय सरुनी तों रम्य येते उषा !

ऐका कांहिंहि, माधुरी कितितरी येईल कानीं पण
प्रेमाचीं वचनें पहा तरि जगीं थोडीं न कीं चाललीं !
नाहीं हो पण भागणार वरच्या कर्णेंद्रियें केवल
गुप्त स्वर्ग उगाच काय भलत्या हातांत येतो असा ?

कांहींही निरखा, दिसे चतुरता तेथें विधीची किती
जों जों नीट पहाल होतिल तशीं गूढें किती मोकळीं !
नाहीं दिव्य हिराच केवळ, तसा तो कोळसाही असे
ज्या घर्में सुरवल्लिपुष्प घडलें, त्यानेंच हा धोतरा !

झालें वाळुनि कोळ, फूल पडलें तें खालती वायुनें
तेथें सुंदर रोपडीं चिमुकलीं वाढून आलीं पुढें
दुःखीं तो रडतो फुलास्तव, हसे रोपे बघूनी सुखी
स्वर्गीं वा नरकीं स्वतांच पडती जाऊन सारेजण !

साधें फूलहि एक, पान हिरवें प्रेमें जरी पाहिलें
होतो रम्य सुखप्रवाह हृदयीं बाहेरही वाहता

ओढ्याची झुळझूळ, त्यांतिल तृणें खालीं वरी नाचतां
जो पाहील विमुग्ध दिव्य नयनें न स्वर्ग कीं त्या मिळे ?

आहे स्वर्ग इथें—घरांत अमुच्या, तो गुप्त झाला पण
हा निंद्य व्यवहार, खेळ सगळे त्याचेच हे चालती !
थोडा कोणि नसो समीप दुसरा, होतो कसा मानव—
येतां कोणि तिजा, क्षणांत बसते वेडी तिथें सभ्यता !

अन्यांला भिउनीच पूर्ण खुरटीं झालीं मनें आमचीं
खोटी भीति धरून हाय ! मुकलों सौख्यास सारेजण !
सर्वांना मनिं वर्तन प्रिय गमे, तें निंद्य कां जाहलें ?–
त्यांच्याशीं पण काय काम अपुलें ? जाओत मातींत ते

आहे हा व्यवहार—सभ्यपण हें लोकांतला रौरव
त्या पायीं तुडवून दृष्टि अपुली फेका जराशी पुढें
स्वर्ग ! स्वर्ग ! सुरद्रुरम्यकुसुमीं या भूतला झांकिलें !
आहे हांसत तेथ कोण बसलें !– तुम्हींच तें ओळखा !

## गिधाड

एका भेसुर मसणवटींत
धूर मढ्यांचा लागलागुनी
करपटलेल्या काळ्याठिक्कर
जीर्ण बाभळीवरी एकलें गिधाड होतें बसलेलें

मान करोनी उंच पुनरपी
अडवी तिडवी मोडमोडुनी
इकडे तिकडे पाहत पाहत
फडफड करुनी पंख, धावलें सरसर शून्याकाशांत !

धन्य ! धन्य तूं ! गड्या गिधाडा
मार भरारी जा जा वर वर
जग हें सारें मूढ पातकी
धिक्कारुनि त्या लाथ मारुनी जा गगनीं—जा स्वर्गीत !

जगास कंटाळुनि वैतागुनि
होतों भटकत कुठें तरी मी
जिकडे तिकडे घाण साचली
फुलांत कीटक, कलंक चंद्रा पाहुनी भारी हळहळलों !

पावित्र्याचें नांवच नाहीं
गटारांतले किडेच सारे
खुपसुनि घाणिंत तोंडें अपुलीं
गंगेला मनसोक्त निंदुनी टुरटुरती बेडुक धिक् धिक् !

त्या अधमांचा—निर्लज्जांचा
वाराहि नको मज लागाया
म्हणुनी आलों इकडे त्रासुनि
तूं तरि मजसम गड्या गिधाडा ! भेटलास मज खल वैरी !

आहे घाणेरडें जग, परी
सोडायाचें बळ मज नाहीं
तूं तरि दिससी तसें समर्थ
जा, जा व्योमीं उंच उंच जा ! खालीं येऊं नको पुन्हां !

गेलें गेलें उंच किती हें
धन्य गिधाडा नमो नमस्ते !
जा—जा वर, हो विलीन शून्यीं
सुटलेंस गड्या, पण मी बसलों इथेंच चिकटुनि काय करूं ?

अरे काय हें पण मी बघतों ?
सरसर कां हें आलें खालीं ?
हर हर ! मी स्वप्नांत तरि नसे
सडक्या कुत्र्यांच्या प्रेतावर गिधाड उतरुनि तें बसलें !
कुचक्या त्या मासांत मजेनें
खुपसुनी अपुली चोंच पुनरपी
तोडतोडुनी घाण आंतडीं
समोंवार डौलानें पाहत होतें तेथें नाचत तें !
देवा ! देवा ! काय स्थिति ही !
हीच काय उन्नति नीचाची ?
हें तर अधमांचा अधिराज !
समजुनि यास श्रेष्ठ पूज्यतम सादर मी वंदित होतों !
हतजगतीं या साधु, समुन्नत
जें जें नजरेसमोर येतें
गिधाड—माळेंतिल या तें तें
नीचांचा या संग नको मज !—देवा, पण जाऊं कोठें ?

## मी तुझाच आहें

कष्टें सोडुनिया तुला विधिबलें मी दूर आलों इथें
माझें प्रेम टिकेल काय विरहीं, कीं नष्ट होईल तें—
शंका घेउनि ही विचित्र लिहिसी सुस्निग्ध पत्रें तशीं
देऊं उत्तर त्यास काय ? न सुचे, वेडाच होतों खरा !
जेव्हां देवि ! निरोप घेउनि तुझा मी जावया लागलों
मद्वक्षीं शिर ठेवुनी भिजविलें उष्णाश्रुंनीं तूं मला
अश्रूंशीं तव अश्रु मीं मिळवुनी जीं मूक संभाषणें—
केलीं तीं इतक्यांत काय मधुरे ! झालीं तुला विस्मृत ?

हास्यें निर्मल, मंद मुग्ध वचनें, प्रेमाश्रुमुक्तावलि–
लाभोनी तव, एकवार बनलें यन्मानस त्वन्मय
गेला यद्यपि तो कुठेंहि तरि हा आहे तुझाच प्रिये !
दिव्यप्रेमनिबंधनांतुनि तुझ्या जाईल कैसा दुरी ?

आहे काय जगांत या, वद तुझी पाडील जें विस्मृति
जें त्वच्चिंतनमग्नमुग्धहृदया संमोहिल प्रेयसि !
देवी ! केवल एक हास्यच तुझें चित्तांत येतां क्षण
विश्वांतील समस्त रम्यपण गे निःसार होतें मला !

तूंही जाणसि ही त्वदेकनिरति प्राणा ! मुळापासुनी
दुःशंका धरुनी वृथा श्रमसि कां वेड्या ? खुळा काय तूं ?
पत्रीं जें लिहिलेंस तें तुज तरी वाटे खरें काय रे ?
वेडे ! कांहींतरी लिहून करिसी मातेंहि कां दुःखित

जातो चंद्रकलेस सोडुनि किती दूर प्रकाश स्वयें
धावे सस्मितपद्मिनीपरिमल स्वच्छंद वायूसवें
गंगेतून तरंगबिंदु उडती संध्यानिलानें वरी
तैसा सोडुनि तूज एथ वसतों, आहे परी मी तुझा !

रात्रीं भेसुर शब्द घूक करितो तेंही असे गायन
येतें बाभाळिलाहि कांहींतरि जें पुष्पेंच त्या मानितों !
वाहे जें सडकेंतुनी खळखळा पाणीच तें मी म्हणे
आहे हा तरि कोकिळे, सुरलते, गंगे ! तुझा भक्त मी !

प्रीती, सुंदरता, मृदुत्व, शुचिता हीं एक तूं एकलीं
सोडोनी तुज शब्द ते भटकती विश्वांत निःसत्वसे
त्यांचें सार समग्र एकवटुनी देवें तुला निर्मिलें
व्हावें मोहित मी कशास ? जगतीं आहे दुजें काय गे ?

जातो दूर पतंग उंच गगनीं नेत्रा दिसे शून्यसा
दोरी खेचुनि तो परी झरझरा हातांत ये आणतां
आहे दूर इथें जरी जिवलगे इच्छानुसारें तुझ्या
येतों धावत मी तुझ्याजवळ; कां ते अश्रु आतां बरें ?

## पुष्प आणि स्त्रिया

हां हां ! आवर हात, थांब, करिशी हें काय तूं सुंदरी ?
वेलीच्या बसुनी कडेवर कसें तें पुष्प हांसे पहा
तें तूं तोडिसि काय निष्ठुरपणें ? हें योग्य नाहीं तुला
देवी ! मार्दववर्धनास्तव जगीं त्वज्जन्म झाला असे !

हांसो पुष्प तिथेंच तें, जवळ तूं त्याच्या रहा हांसत
आनंदें मज डोलुं दे बघुनि तें सौंदर्यसंमेलन
काव्यांच्या नव मालिका ग्रथुनि मी वाहीन शुद्धे ! तुला
तेव्हां रूप तुझें विलोकुनि खुळ्या होतील दिव्यांगना !

तोडाया सुम तें जरी प्रियकरे गेलीस तूं सन्निध
नाहीं क्रोध तुझ्याकडेहि हसुनी तें सारखें पाहतें !
दिव्यानंदतरंगमग्न हृदयें होतात ज्यांचीं अशीं
केव्हांही न तयास दुःखलवही उद्विग्नता पोचवी !

थोडें कांहिं घडो, लगेच रुससी, अश्रू जसे ठेवले
या भोळ्या हंसऱ्या फुलाजवळुनी गे शीक कांहींतरी
केली न स्तुति केधवा, तर मम प्रीतीच खोटी गमे
भुंगे गाति किती, परंतु तिकडे याचें नसे लक्षहि

कोणाची अपुल्यावरी अविचल प्रीती असे कीं नसे
त्याचा नाहिं विचार, चित्त उघडें याचें सदाचें पहा !

माझें प्रेम किती असे तुजवरी हें लोकही जाणती
वेडे! संशय मात्र एक तुजला – हें बोलतांही नये!

हें पाहून मधु प्रसून कितिदां आलें मदीयांतरीं
केलें प्रेम तुझ्यावरी अजवरी मी निश्चयें निष्फळ
जें कोणाप्रति एकवार दिधलें घ्यावें न तें मागुतीं—
ऐसें सांगति साधु, नाहिं तर मी याचाच होतों खरा!

पुष्पा! मी फसलों खरोखर! नसे आतां उपायांतर!
मी होईन तुझा बरें, जिवलगा! आगामि जन्मीं तरी
प्रेमाची मम ज्या कळे न महती ऐशा मनुष्यासवें
आहे जीवित कंठणें, न चुकतें दैवांत जें लेखिलें!”

बोलूं काय पुढें, न शब्द पडले माझ्या मुखातून हे
तों गंगायमुना क्षणांत जमल्या नेत्रीं प्रियेच्या मम!
क्रोधें तोडुनि फूल तें चुरडुनी फेकोनि देई दुरी
गेली तेथुनि पाय आपटत ती गेहांतरीं भामिनी!

झालें काय पुढें, कसा शमविला सारा तिचा क्रोध मी
आहे मौजच ती, तुम्हांस पुढतीं सांगेन केव्हां तरी
पुष्पाचा इतिहास हा रसिक हो ठेवा परी मानसीं
थट्टा सोसत नाहिं लेश अगदीं माझ्या सखीला कधीं!

## रम्य कहाणी

रम्य कहाणी ही ऐका कशास अथवा ऐकुं नका
व्योमदेवता फिरतां फिरतां
आकाशाच्या बागेंत गेल्या नाचत मौजेंत!
खेळखेळुनी हांसहांसुनी
गोफ दिशांचा गुंफियला त्यांतच गुंफिति अपुल्याला!

मंजुळ गाणीं अमित गाउनी
मोहनमंत्रच मग जपला झोंप लागली जगताला
नाचुं लागला वायु हर्षला
डोंगरही पाषाणांचे लोट सोडिती अश्रूंचे !
शांतिसुधारस बुडवी अवनिस
ताज्या फुललेल्या तारा चिमटे घेती घनतिमिरा !
स्वर्गंगेला पूर लोटला
आले बुद्‍बुद अमित तिला नाचति त्यांवर सुरबाला
शब्द प्रेमळ अश्रु विनिर्मल
मुग्ध लाजरी दृष्टि अहा ! व्यापी सारें गगन पहा
भरभर फिरतां खदखद हसतां
व्योमदेवता त्या सगळ्या एका जागीं मग जमल्या
गात मधुस्वर तळहातावर
घेउनि तारा—रस पिळला शुष्क धरेवर तो गळला
तशाच नाचत गुंगत गुंगत
चंद्रावरती त्या गेल्या तमालतरुतालिं झोंपल्या !
तारारस जो तैं गळला एक घोट मी प्राशियला
मी तूं विसरुनि निंदा तुडवुनि
सर्वहि विश्व गिळनि हंसलों ढेकर देउनि हा बसलों !

## उलटी सृष्टि !

जे चालती करुनि दृष्टि सदैव खालीं
तारे शशांक दिसती डबक्यांत त्यांस
जो मंदबुद्धि मधुसेवनमत्त झाला
तो बोलतो गरगरा फिरती घरें ही

आनंदसिंधुजलधौत जगत् समस्त
वाटे कुणास जणुं शोक करीत आहे
नैदाघभास्करसमुज्ज्वलरश्मिदीप्त
अंधास भासत तमोमय लोक सारा !
नाहीं विवेकबल, तर्कवितर्क सारे
त्यां सत्य तत्व कळणार कसें अपाप !
यांनींच हाय भरलें पण विश्व सारें
स्वच्छंद मूढ करिती भलते प्रलाप !
लाखांत एक जन सत्यविचारशील
तत्वज्ञ त्यांत तर दुर्लभ फार फार
झाला पहा सुळसुळाट अजाणत्यांचा
तत्वज्ञ एकच तिथें करणार काय ?
खारा समुद्र भरला सगळा अफाट
कोठें तरी विलसतो मधुबिंदु एक
भेसूर कर्कशहि वाजति कैक वाद्यें
वीणानिनाद मधुमंजुल तेथ कोठें ?
सारेंहि भीषणतमोमय विश्व झालें
कोठें तरी चमकती गगनांत तारा !
स्वच्छंद ओरडति पद्मवनांत काक
तेथें हळूच पिक गात असे बिचारा !
ही होय सृष्टि उलटी सगळी अशानें
नक्षत्रजाल म्हणुनीच नभांत गेलें !
पुष्पें सुगंधि फुलतात इथें चुकून
जातात तीं सुकुनि याचमुळें अहाहा !
प्राबल्य मंदमतिचें जगतांत झालें
हा ! हा ! शुचित्व ठरलें म्हणुनीच निंद्य

स्वर्गीय भाव चरणीं तुडवी कुबुद्धी
जोत्स्नेसीं आडविति कृष्णपयोदखंडे !

निंदो कुणास सगळें जग तुच्छ मानो
त्याच्यावरी खल रचोत अनंत दोष
निःशंक त्यांत नसतें पण लेश तथ्य
लोकप्रवादवश होऊं नये कुणीही

## निरोप

जातों दूर म्हणून देवि ! अगदीं तूं दुःख मानूं नको
गे उत्कर्ष मदीय खास वदतों होईल त्याच स्थळीं
मेघाचे कण खालती न पडते व्योमांतुनी ते जर
मुक्ता होउनि केवि गे विलसते राजेश्वराच्या शिरीं ?

राहोनी गृहिं चांगले दिवस का येतील कोणा कधीं
अन्य स्थानिंच पूर्ण चीज जननी ! होते गुणांची बरें
गंगा सांग हिमालयाच धरुनी प्रेमें जरी बैसती
तीचें नांव तरी कुणास कळतें ? पूज्यत्व तें दूरच !

गेलों मी जर सोडुनी गृह अजी बाहेर कोठें तरी
माझें काढिन नांव, तूंहि तिकडे होशील लोकप्रिय
चंद्रापासुनि चांदणें शुचितमे ! येतें इथें भूवर
होतें आवडतें जगास, करितें तें वंद्य चंद्रासहि

वीणेपासुनि मोहवीत रसिका झंकार जातो दुरी
आहें जात तसा तुझ्याजवळुनी; कष्टी वृथा होसि कां ?
तूं प्रेमाश्रुजलाभिषिक्त सदये ! केलेंस ज्याला असें
विश्वांतील समस्त येतिल सुखें प्रत्यक्ष त्याच्यापुढें !

## भूतदयेचे अश्रु

रत्नें उज्ज्वल भूपकुंडलिं किती आंदोलती चंचल
मुक्ताहार रुळे मनोज्ञ तरुणीवक्षःप्रदेशावरी
उल्हासें हिमबिंदुही चमकती अंभोजपत्रीं कसे
नीलव्योमतलीं अनंत हंसती चेतोहरा तारका
येती जे परदुःखतप्तनयनीं उष्णाश्रुबिंदू पण
वाटे त्यांपुढती मला खचित हें सारेंहि निःसारसें !

## तूं—मी !

वेलीची जपमाळ घेउनि करी पुष्पें—मणी ओढित
घेते देवि ! विहंगगायनमिषें त्वन्नाम वृक्षावलि
वाहोनी तव दिव्य देहलतिका धन्या मही जाहली
आनंदातिशयें तिच्यावर तृणें—रोमांच आले पहा !

या त्वत्पादरजोभिलाष धरुनी सिंधूर्मि येती पुढें !
कोणीसें करितें तुझें मधुर त्या कुंजीं यशःकीर्तन !
विश्वाला गमसी खरोखर दुजी देवीच जी तूं गडे
झालों मोहित मी तिला तर असे आश्चर्य कांहीं तरी ?

साध्याही तव दृष्टिनेंच बनती पाषाण रत्नासम
निर्व्याज स्मितही तुझें शिकवितें मुग्धां धडे प्रीतिचे
त्वच्चेतोंबरचंद्रिकौघलहरी माझ्यावरी लोटतां
मी शुद्धीवर राहिलों तर खरा पूर्वीच बेशुद्ध मी !

नाना नायक भाग्यशील कविंनीं काव्यांत जे वर्णिले
सारे वाचक आज ज्यांस गणिती लोकांत भारी सुखी
त्यांचें तें सुख सुंदरी ! मजपुढें कांहींच नाहीं बरें
कोठें रूपगुणान्विता तुजहुनी झाली दुजी योषिता !

# विरही

किति दिवस लोटले सुंदरि ! तुजला बघुनी
हा विषमय दुःसह विरह न संपे अजुनी !

अंबरीं तारका स्निग्ध चमकती जेव्हां
तव दृष्टि लाजरी आठवते मज तेव्हां

मधुसंध्यारंजित अर्धस्फुट कुसुमातें
देखुनी चिंतितों हंसरें मुख तव ललिते !

झळकतां ताडित् घनमेघश्यामलगगनीं
आठवशी येतां अवचित अंतःसदनीं !

तीं साधीं भोळीं ऐकुनि निर्झरगाणीं
गुणगुणतों स्वन तव मंजुल मधुर श्रवणीं !

विधुकलिका निजतां अभ्रपटावर शांत
तव सुप्त तनुलता स्मरुनी श्रमतें स्वांत

झंकार विणेचा येतां कानीं दयिते
त्या स्वरलहरीवर दिव्य नाम तव दिसतें !

तरुलता समीरणकंपित मर्मर करिती
हितगुजें तुझीं तें कानीं माझ्या पडती !

मृदुकुसुमविभूषित डुलतां या कुंजांस
प्रेक्षुनि ये हृदयीं तव आनंदोच्छ्वास !

चुंबितों मल्लिकानवकुड्मलसंभार
अंगुलि तव आणुनि हृदयीं वारंवार !

सर्वत्राहि भुवनीं बघतों तुजला नित्य
पण देवि ! शांतता लवही न मिळे सत्य !

भेटशील केव्हां सांग जिवलगे सांग !
का विधिला न सहे अमुचा हा अनुराग ?

उष्णाश्रुबिंदुची त्वदर्थ गुंफित माला
हा दीन अभागी आहे एथें बसला !

## शिंग

तुंग गिरीची उशी करोनि
श्यामल तरुच्या मृदु शय्येवर
पांघरुनी मधुसमीरलहरी
पडलों होतों स्वस्थ आपला सुखकर तंद्रावस्थेंत

काय, कसें जाहलें, न ठावें
इंद्रकार्मुक व्योमीं उठलें
गुणगुणतां मी कांहींबाहीं
टोंक तयाचें एक चिकटलें येउनि माझ्या ओष्ठाला

एका हातें दंड धरोनी
केलें त्याचें शिंग तदा मी
विश्वांतिल आनंदोच्छ्वास
भरुनि त्यामधें वाजविलें तें, अनंतांत तो ध्वनि शिरला !

आनंदानें वेडच्या होउनि
'गिरगिर माता' तारा खेळति
ब्रह्मांडाचा गोल सर्वहि
नाचुं लागला डोलुं लागला, शून्याहि झालें प्रत्यक्ष !

आकाशांतिल काळे डोंगर
फुटुनी फुटुनी गेले कोठें !

तारामंदिर झालें निर्मल
मरुभूमीवर फलपुष्पान्वित नवतरुराजी उद्भवली !

रवि शशि तारा उदित एकदम
होउनि भरलें तेज चहुंकडे
गडबड झाली रात्रिचरांची
फुलांतल्या कीटांचीं हृदयें विदीर्ण झालीं शतवार !

आशा प्रीती उत्साहाची
उषा जगावर उदया आली
स्वर्णरसानें न्हालीं भुवनें
वियुक्तमेलनमधुसंगीतें दुमदुमला अंबरभाग !

निरुपचार विमल व्यवहार
पवित्र वांछा, उन्नत जीवन,
उघडचा हृदयें प्रेमभाषणें
या साम्राज्यीं गुलाब फुलला कंटक सारेही गळुनी !

वैराग्यावर गदाच पडली
प्रीतिसरिज्जलतरंग शीतल
अशांतिवन्हिज्वाला विझविति
त्या शिंगाच्या नादरसानें सेचित झाली रुक्ष मही !

हिंसा, द्वेष, क्रोध, निमाले
बंधुत्वाचें नातें पसरे
मंगल मंगल जिकडे तिकडे
हास्यें मंगल, गीतें मंगल, मंगल आनंदाश्रुनदी !

क्रंदनभीषणनाद हरपला
सर्व विश्व झालें नंदनवन

विषयेच्छा मग टिके कोठुनी
स्वर्गंगेसम पवित्र झाले माळावरचे निर्झरही !

नव कुसुमें अश्रुचीं विकसलीं
भूवर त्यांचा सडाच झाला !
शिशुसम थयथय नाचति वृद्धहि
दिव्य सौरभें एका ठायीं धावत आल्या दाहि दिशा !

खालीं वर हें कांहिंच नुरलें
मेघ उतरले भूवर सरसर
व्योमीं सागरवीचि उसळल्या
अनंत विश्वें गोळा झालीं एकच उज्ज्वल तेजांत !

त्या शिंगाच्या नादलहरिवर
बसुनी कुतुकें गुंगत गुंगत
हळुहळु मधुनी करित मधुस्मित
प्रणयी जन विहरती घालुनी हस्त परस्परकंठांत !

पापी हृदयें जळून गेलीं
पवित्रतेला फुटले किसलय
वृत्ति पालटुनि कलुषित सहसा
शुचिप्रणयरसमृदुकल्लोलीं करिती लीला नर नारी !

'तुझीच मी' 'मी तुझाच' मंगल
गान चाललें त्या शिंगावर
जड गिरि उठले तें ऐकाया
आत्मत्वा विसरुनी रंगलीं सारीं हृदयें प्रेयांत !

त्या शिंगाच्या गभीर नादें
गेल्या बाष्कळ रूढि ध्वंसुनि

क्षुद्र थोर हा निरसुनि भेद
एकत्वाचा समतेचा नव मधुर भाव सर्वत्र भरे !

त्यां शिंगाच्या नादवायुनें
जुनें पुराणें उडून गेलें
नावीन्याचें वर्षण झालें
पुष्पगुच्छसम विश्व सर्वही सुंदर हृदयंगम दिसलें !

उल्हासानें आवेशानें
शिंग फुंकतां मी त्या वेळीं
प्राणवायुसह शिरलों त्यांतच्च !
तेजाचे कण सरसर उठले अनंत आकाशांत तदा !

दिव्य कांतिनें त्या विश्वांतिल
भीषण सारें तिमिर नाशिलें
आहे अजुनी आत्मा माझा
अनंत तेजोगोलकरूपें तळपत या ब्रह्मांडांत !

## माझें राज्य

शेतास कुंपण सरितेला तट सागरास आहे वेलाबंध
विश्वाला दिग्भाग मर्यादा घालिती काळास मापिती आज–उद्यां
वाढला वाढला किती जरी चंद्र तरी त्याचें क्षेत्र ठरलें आहे
अनंत तारका! –दिसती मोकळ्या होईल तयांचें मोजमाप
अनंत हीं विश्वें म्हणती परंतु निमेषांत होती पाहूनीयां !

प्रकाश हा आहे सर्वगामी पण मनोभाव त्याला न दिसती
चारुत्व पावित्र्य वंद्य सर्वकाल पण पापमूल झालें आहे !
अशा या विषम स्थितींत कशाला राहतां ? चला हो माझ्या संगें !
समीरलहरींवर ताराशय्या तीवर साम्राज्य माझें आहे !
तेथें नाहीं भीति तेथें नाहीं बंध बसून स्वच्छंद गाणीं गावीं !

मर्यादा सोडून हासावें नाचावें अनंतांत जावें मिळोनियां
कुणाच्याहि गळां घालोनियां हात गुंगत डोलत विहरावें !
माझें—तुझें तेथें नाहीं भेदभाव एकत्वीं एकत्व लीन आहे
आज उद्यां, मागें पुढें, खालीं वर, व्यर्थ हा विचार कोण करी !
हसणारीं फुलें किंवा कंटकहि मृदुत्व सर्वांचें एक आहे !

अग्नींत बसावें चंद्रिकेंत न्हावें सुखें झोपी जावें जलपृष्ठीं !
शरीरीं शरीर मिळवून प्रेमी बाष्प—लोटासम फिरतात !
उठा ! उठा ! चला ! बसलां किमर्थ धरा माझा हात चला व्योमीं !
स्मशानें, गटारें, उकीरडे घाण नाहीं काय वीट आला यांचा !
विषारी हवेंत कुबटून गेलां पुरें झालें आतां वेगीं उठा

जगाचा या आहे नियमच ऐसा फुलांमधें किडे व्हावयाचे ?
बाळपणीं होतां हासत खेळत पण तो आनंद आतां नाहीं !
हृदयांत भरे दारुण निराशा कोरडें हासतां वरवर
बतावणी आतां पुरे ही सुखाची आंतील मजला ठावें सारे !
सोडा बंध सारे घाणेरडे पाश माझ्या राज्यीं चला उठा वेगें !

---

# क र्ण मं ग ल

## रानफूल

ज्याला कोमल आणिता युवतिचा निःश्वासही म्लानता
ही तारावलि भीतभीतच करी ज्याला करस्पर्शन
संध्यावात हळून दूरुनि जया चुंबीत होता मुदें
तें हें सुंदर रानफूल पडलें वाळून रुक्षोपलीं !

पुष्पा ! उज्ज्वल काय वैभव तुझें होतें, न ये वर्णिता
नित्य स्वर्णरसाभिषेचन करी तूतें प्रमोदें उषा
आनंदें विहगावळी तुजवरी गाणीं किती गातसे
होता फेकित रम्य मौक्तिकमणी सोत्कंठ दिव्यारुण !

वारा अंचल पालवून तुजला घालीत होत्या लता
वाराया रविरश्मिताप तरुही होते उभे उत्सुक
रुक्ष प्रस्तरखंडपूर्ण पथ हे उल्लंघुनी कौतुकें
होते धावत येत निर्झर तुला पाहावया लाडक्या !

यत्नानें मिळवूनिया गतकला संतोषवाया तुला
तारानायक येत आज उदया पूर्ण प्रकाशें पहा
पुष्पा ! ही पण दुःस्थिति तव अशी पाहून हृद्भेदिनी
गेलें चित्त तदीय भंगुनि, तया लागेल आतां क्षय !

हा त्वन्नाश बघून अंतरिं कसें होतें, न ये सांगतां
टाकावें बुडवून विश्व सगळें मी अश्रुपूरीं, पण
आहे हें दयिता-वियोग-दहनीं संदग्ध झालें मन
देऊं कोठुनि अश्रुबिंदुहि तुला, निःश्वास हा एक घे !

## शरत्संगीत

गाणीं भेसुर गात नाचत नभीं होतीं पिशाचापरी
काळींकुट्ट भयाण मेघशकलें गेलीं फुटूनी कुठें !
ओसाडींतिल आटले करिति जे आक्रोश ओढे सदा
या बेफाम गढूळ आज सरिता झाल्या प्रसन्नांतरा !

सृष्टी बागडते मुलीपरि जणों रानीं वनीं कौतुकें
हासे रानफुलांसवें खदखदा, गाई विहंगांसह !
हीं शेतांत पिकें नवीन डुलती, झिम्मा तिथें खेळते
उल्हासें फुगडी लतांसह पहा घाली, न थांबे क्षण !

वातें हालवितां मरंद गळतो जींतून खालीं जलीं
ऐशा अंबुजिनी–दलांवरि सदा जी शारदश्री वसे
ती ही आज नवेंदुदिव्यकिरणीं सोल्हास आंदोलत
विश्वें गुंफित गुंफित स्वविभवें व्योमांतुनी चालली !

नीलाकाश निरभ्र मोहवि मना आकर्षुनी लोचनें
कोणी त्यावरि तारकाक्षरिं जणों लेखी शरद्वर्णन !
त्या लेखांतिल कांहिं भाग गळला उद्यानकुंजांतरीं
हें एथें पहिलेंच पत्र दिसतें पद्माकरीं स्पष्टसं !

त्या पत्रांतिल अक्षरें कितितरी दृष्टीस आल्हादिती
अर्थ स्पष्ट जनां स्वतांच वदती, त्यांतून वाहे रस !
वेडे बोलति कीं रसार्द्र कमलीं गाते मिलिंदावली
खोटें तें !– मजलाच ठाउक असे त्याचा खरा अर्थ तो !

चंद्राचे मृदु शुभ्र रश्मि मथुनी ज्याचीं जळें निर्मिलीं
त्या स्रोतस्विनिंच्या हंसे बसुनि जी चंचत्तरंगावरी
वायूची करुनी सतार, लहरी–तारा करीं छेडिते
टाकी भारुनि शारदा भुवन ती अव्यक्तगानस्वनें !

गानाची न लकेर अस्फुटहि त्या, कर्णावरी पातली
गेलीं तोंच तुटून पार फुटुनि सारीं मनोबंधनें !
तो नादध्वनि दूर दूर सरुनी गेला अनंतामधें
आत्मा मी अपुला अनंतिंच दिला फेकून त्याच्यासवें !

मी शून्य स्थलिं–शून्य ? छे ! त्रिभुवनें होती जिथें शून्यशीं
ऐशा दीर्घ विशाल उज्ज्वल नव स्थानांत गेलों तदा !
दिव्याच्या किरणांवरी पडुनि जें अव्यक्त गातों तिथें
त्याचा हा पडसाद अस्फुट, कसें याला म्हणूं गायन ?

## कोरांटीचीं फुलें

शोभा नाहीं, सुवास दूरच कोरांटीचीं फुलें माजलीं
बाभळिचा पाला खाणारीं माकडेंहि त्या ढुंकुनि बघति न !
उपटसुंभ ये तेथें एक ओरबडुनि तीं फुलें तयानें
गुंडाळलिं एकत्र कशितरी केला त्यांचा तुरा विचित्र !

मला न पुसतां हळूच मागुनि येउनि माझ्या शिरीं खोविला
म्हणे " यास धर शिरींच संतत इकडे तिकडे नको पाहुंही
यासच पाहुनि तूं हासावें नसला गंध तरी डोलावें !
मधू मिळाला दैवें तर पी न तरि उपाशी रहा आपला !

जग मेलें तुज आतां सारें याच फुलांत त्रिभुवन भरलें
यांविरहित कांहीं न कुठेंही असलें तरि तुज नाहीं मिळणें !
साऱ्या आशा उत्कट हेतु याच फुलांवर तुझे असोत
यांना सोडुनि तुझी वासना अन्यत्र न केव्हांही जाओ

गुलाब, जाई, जुई, मोगरा, दवणा, मरवा, बकुल, शेवती
तुझी दृष्टि तवं मनोवृत्तिही आकर्षाया असति तयार
सावध ! सावध रे ! मन आवर सैरावैरा असा न धावें
सौंदर्याला भुलूं नको बा तें नरकाचें उघडें साधन !

कोरांटीच्या फुलावांचुनी अन्यत्र तुझी दृष्टी गेली
तर तें पातक असे केवढें ? छे ! तें वर्णन अशक्य आहे !
फुलें विकसलीं किंति या बागीं पडशिल मोहीं वेड्यासम तूं
तुजसम तरुणा भुलवायाला सैतानें बाजार मांडिला

गंध न हा, ही नरकघाण रे मधू नव्हे हा, तीव्र हलाहल
सौंदर्याचा देखावा हा नव्हे, खचित ही आगच सारी !
कोरांटीचीं फुलें घेउनी रहा तथांवर तूं संतुष्ट
अन्य फुलां बघणेंही पातक ! असोच मग तें दूर हुंगणें !

गटार घाणेरडें धांवतें बडबड तसली ही आश्चर्यें
ऐकत होतों वेड्यासम मी गेली पण ती पीडा नंतर !
तुरा दूर तो फेकायाला सहज लाविला डोक्याला कर
हरे राम ! हें काय जहालें ? धरलें त्यानें मूळच तेथें !

मारमारिले कितीक हिसके इकडुनि तिकडुनि ओढओढिलें.
हात दमोनी आला घाम पण सारे श्रम गेले व्यर्थ !
देवा रे हें झालें काय ? काय नशीबीं आलें माझ्या !
मनांत होते विचार कसले घडला कसला हा परिपाक

झाला न प्रिय गुलाब ज्याला मालतीहि ज्या पसंत नव्हती
कोरांटीच्या फुलासंगतीं कंठावें का जीवित त्यानें ! !

## निवडुंगांतून सुटका

सभोवार निवडुंग पसरलें सरडे उंदिर फुसफुस करिती
रानघुशीही घालिति धुडगुस कवसकुळि फोफावति सरसर
क्रूर विषारी पिवळे साप सैरावैरा धांवति भरभर
काळ्या काळ्या कितिक इंगळ्या शांतपणें मधुनी सरपटती !

गळलीं पानें कुजुनी कुबटुनि असह्य त्यांचा सुटला दर्प
त्या दर्पानें पोसविलेलें कुजक्या पाण्यानें जगलेलें
कांटेरी बाभळिचें झाड होतें झगडत वाऱ्यासंगें
जळक्या प्रेतांची नव शोभा होती त्यावर पसरुनि गेली !

दारुण देखावा तो तसला बघण्याहुनि दोनीही डोळे—
फुटुनी त्यांच्या खाचा व्हाव्या ! रमणारे ते रमोत तेथें !
बघणें कैसें पण चुकणार कर्म कुणाला नाहीं सुटणें
ऐसें हट्टानें तो सांगुनि गेला गीतेंतील सैतान !

क्षणभरही दृष्टी उघडाया पण मज होइ न तेव्हां छाती
तों अवचित यातना अनंत मम देहाला सुरू जाहल्या !
दचकुनि डोळे फाडफाडुनी पाहुं लागलों—तो— हा नशिबा !
ज्याला होतों भीत आजवर तेंच पुढें अवचित आलें कीं !

कोणी मज त्या निवडुंगांत होतें सहसा फेंकुनि दिधलें
कैक विषारी काटे शिरुनी तनुचें झालें नुसतें जाळें !
त्यांतच विंचू सापहि चावुनि घेती अपुला साधुनि दावा !
तीव्र यातना, दाह विषाचा यानें झालों तैं बेशुद्ध !

आजू बाजुस खालीं कांटे गगन मोकळें वरती मात्र
किती वेळ मी तसाच होतों भानरहित त्या स्थळीं पडून
आले आकाशीं नव तारक प्रेरक शांतीचे प्रेमाचे
त्यांनीं अवचित या दीनावर कल्पलतांचा सुरस वर्षिला !

त्या सुरसानें दिव्यत्वानें हळुहळु मी शुद्धीवर आलों
कष्टें कष्टें उठुनी नंतर यत्नें चढलों त्या बाभळिवर
तरीहि होता त्रास सारखा क्षणभरि नव्हती शांति मनाला
संधि साधुनी मधुनी मधुनी साप विंचुही चावत होते !

तसाच कष्टें अश्रू पुसुनी दृष्टि फेकिली नील व्योमीं
नव तेजाच्या मधुर रसांत होते उज्ज्वल तारे पोहत
सूर्येंदुग्रहमाला तळपत होती, तें पाहुनि बहु रमलों
तिथें कसा जाणार ना कळे एथुनि कैसा कधीं सुटेन ?

विचार हा घोळत मनिं होता तों दिसले मज विहंग कांहीं
आनंदानें स्वच्छंदानें होते विहरत किती तरी ते !
अहा ! अहा ! मी असा विहंग होइन काय कधीं उडणारा
ध्यास तोच घेउनी बैसलों लावुनि दृष्टी नीलाकाशीं

दिव्य पंख मज फुटले तोंच तेव्हांचें सुख वानूं काय ?
पाहुनि खालीं धिक्कारानें नभीं भरारी जवें मारिली !
निवडुंगांतील अनंत सरडे साप विंचु ओरडूं लागले !
" काय–काय हें ! नसे योग्य हें आहे नुसतें हें औद्धत्य !

नको कोण म्हणतो या उन्नति पण कांहीं सुविचार पाहिजे !
वंद्य–वंद्यतम हा बाभूळ नाहीं काय समुन्नतिशील ?
हळूहळू त्यासवें वाढत खुशाल जावें होतें गगनीं
पण त्याकरितां असें एकदम स्वच्छंदी का व्हावें कोणी !

परंपरा पूर्वींची सोडुनि आधाराविण शून्य नभांत
कसें धांवतां येइल कोणा ? छे छे ! ही मौर्ख्याची सीमा !
या निवडुंगीं पाया बळकट करुनी वाढत वाढत हळुहळु
व्हावें उन्नत–याविण दुसरा उपाय आम्हां तरि न ठाउका !

फार कशाला अमुचे पूर्वज जुने जुने कृतयुगांतलेही
सांगत आले कीं कोणाहि न आधाराविण चढतां येणें !
हेच एकटे दीड शहाणे दिवटे आले कीं जन्माला
वृद्ध वृद्ध ते पूर्वज मूर्ख हेच काय ते हुशार मोठे !

वा ! वा ! आतां काय म्हणावें ? आहे हा या कालिचा महिमा !
पूज्य बाभळिस या सोडोनी चढणें गगनीं—कोण निंद्य हें !
खेद वाटतो फार अम्हांला पुढें कसें होणार जगाचें !
परंपरा पूर्वींची सोडुनि गणुनि पूर्वजां मूर्ख, नाचती

सुवंद्य बाभुळ—हें निवडुंग हवा मोकळी ताजी इथली
सोडुनि हें भरकटत कुठेंतरि जाती वेडे उपाय नाहीं !
अम्हां सारख्या कितिक जणांना खेळविलें या निवडुंगानें
त्यानेंही हा स्वच्छपणाचा धरिला नाहीं मार्ग आजवर !

असो, बोलुनी काय अम्हांला ? भोगतील फळ ज्याचे तेच !
मरोत! —अमुचें जातें काय ? परंतु नाहीं उगिच राहवत !
वारुळामधें शिरले साप सरडे उंदिर बिळांत गेले !
मीही गेलों उंच उंच नभिं स्वच्छंदानें फिरलों रमलों !

## मनोगत

सुरेशवनवल्लरीकुसुमसौरभीं धुंडिलें
किती अहह! शोधिलें शिरुनि दिव्य गंगाजलीं
क्षणैकहि न देखिलें विमल चारुमुक्ताकरीं
वृथा पसरला नभीं रुचिर तारकापुंज हा !

मनोगत मदीय तें किमपि लुप्त झालें कुठें
विशाल जगदंड हें दिसत शून्य त्या वाचुनी !
विरक्त हृदयीं मम प्रियजनाश्रुसंवर्षणें
कदापि उठला क्षणैकहि न रम्य नव्यांकुर

मनोज्ञ वचनावली हृदयहारि मंजु स्मितें
प्रदग्ध मम मानसा न लव शांतता लांधली !
कुठें हरपलें बरें त्रिभुवनैकसंमोहन
अहोरजनि जीव हा धडपडे तया शोधित !

प्रफुल्लकुसुमोल्लसत्सुरभिवायु वासंतिक
सुधाकवलिता शरद्रुचिरचंद्रिका निर्मला
जगद्वलयमोहनस्वराविसारिवीणारव
प्रभातपवनोत्थितश्रवणहारि गंगास्वन

अहर्निश कुठें कुठें अहह ! धुंडिलें धुंडिलें
मनोगत मदीय तें पण अजून हातीं न ये !
वनीं कुसुमवाटिका फुलविल्या सुगंधान्विता
मनोहर नवे किती बनविले लताकुंजही

विशाल तरुमालिका उठविली नभश्चुंबिनी
सुरेंद्रधनुचीं अहा ! मधुर लाविलीं तोरणें !
सरिल्लहरिमंडिता रुचिर राजरथ्येवरी
उभे सतत ठेविले अमित हंसकारंडव !

नवारुणसुरंजितांबुधरचारुखंडावरी
उषा मधुरहासिनी बसुनि गातसे गीतिका
सुरामधुनि त्या इथें अवतरे पुढें मूर्तिमत्
क्षणांत हरपे मनोगत मदीय कोठें तरी

मनोबलहि होतसे विफल हाय ! तद्वर्णनीं
कशास पसरूं वृथा जगानिं कोरडे शब्द हे !

## भ्रम

गान पुरे, हास्य पुरे, दूर फेंक बासरी
होओ तिमिरांत लीन ही उषाहि हांसरी !

फोड मोड शून्यांतचि दे सतार झोकुनी
त्या बेसुर नादांनीं टाक अवनि जाळुनी !

आशेवर मार फुंक फुटुनि गगनिं ती उडो
खंडजाल विरल तिचें कृष्ण मेघपटलिं दडो !

गिरिराजिस लाव अमित सरितांच्या तुंबड्या
बिंदु बनुनि व्योमांतुनि घाल सागरीं उड्या

निवडुंगाचीं विपिनें पसरिं अखिल जगतितलीं
अश्रुवर्षणें घेओ वाढ कंटकावली !

फुटुनि गगन एथ पडो भंगुनि ते इंदुरवी
तिमिरावर तिमिरांची लोटणी वळो नवी

गाढ त्या तमांत जाऊं आपणाहि विस्मरुनी
लुप्त होउं शून्यांतरिं शून्य गडे होउनी !

## संकीर्तन

कुठे चालल्या मुग्ध तारा वृथैव
उड्या घालिती सागरीं कां रवींदु
पिसाटापरी धावतो वायु का हा
अरे जाहली काय गंगाहि वेडी !

वनीं दुर्गमीं हासताहे वसंत
फुलें दूर कोठेंतरी डोलतात !
नभीं मूढ मंदाकिनी कां पळाली ?
जगत् सर्व झालें खरें आज वेडें !

मनश्चंद्रिके ! तूं असूनी इथेंच
कुठें चालली सर्व ही अंधमाला ?
तुझ्यावांचुनीही मनोलोभनीय
दुजें देखिलें काय विश्वांत यांनीं

सुख प्रेम आनंद कैसा मिळेल
जिथें लाडके ! तूंच नाहींस देवी
परी बोध हा काय व्हावा जडांनां
कशाला वृथा आडवूं मार्ग त्यांचा !

जगांतील सर्वस्व तूं एक माझें
सुखें सर्वही नांदती त्वत्समीप
तुला सोडुनी सांग जाऊं कुठें मी
चकोरास संजीवनी चंद्रिकाच

जसा मत्त नागेश नैदाघतप्त
शिरे शीघ्र सोत्कंठ गंगाप्रवाहीं
तसा चारुशीले ! मधु त्वद्गुणाब्जीं
मनोभृंग माझा असे लुब्ध झाला !

## कवितादेवीचें आगमन

कल्पलतांचे करुनी दोले
हांसत मधु मृदु गाति तारका
गळले आनंदाश्रुपयःकण
त्यांत तरंगुनि उज्ज्वल जीवन जिला जाहलें संप्राप्त !

आकाशांतुनि कोसळणारी
चंचलवीचिविभूषित गंगा
तिच्या सुधोपम रसांत पोहुनि
जगत्पावनी निरुपम शुचिता जिला लाभली दैवानें

सरस्वतीच्या वीणावादनिं
नादस्रोतस्विनी उठे जी
तिच्या तुंग अभिनव कल्लोलीं
करुनी मज्जन जिच्यांत आलें मार्दव हृदयंगम दिव्य

रानफुलांची विमुग्ध वृत्ति,
बालनिर्झरांचा आनंद,
गिरिसारितांची ललित धीरता,
तडिल्लतेचे स्वैर विहार, व्योमाचें स्थिर गांभीर्य

वासवधनुची चिरनूतनता,
प्रिय वचनाची मोहकारिता,
रमणीचीही रुचिर सरलता,
घेउनि गुण हे कवितादेवी ज्योत्स्नेमधुनी अवतरली !

तिच्या दृष्टिच्या तेजें सारें
विश्ववलय जाहलें समुज्ज्वल !
दिव्य तारका, काळे फत्तर,
एकच तेजीं स्नात होउनी प्रतिबिंबित झालीं अन्यीं !

सारीं बिंबें, सारीं तेजें,
वस्तु समस्तहि, जगत् चराचर,
दूर दूरचे अनंत गोल,
येउनि झरझर तिच्या स्वरूपीं क्षणांत झाले ते लीन !

बघतां बघतां मीहि अहंता
विसरुनि बनलों कवितारूप;
जगांत कविता, हृदयीं कविता,
कविता-कविता एथें तेथें ! कवितेनें शून्यहि भरलें !

गुलाब आणिक त्याचे कांटे,
गंगालहरी, वन्हिज्वाला,
एकच एकच सारें झालें !
दुःखाश्रूंनां स्वरूप आलें क्षणांत आनंदाश्रूंचें !

शोक हरपला, हास्यहि गेलें !
आहे नाहीं सारें सरलें
परत्व लपलें, मीपण कुठलें ?
स्वयंज्योतिनें विश्व कोंदलें, तिमिराला कैसा ठावें ?

मी कविता, कविता मी, अथवा
नव्हेचि आम्ही कुणी तत्वतां
आहों नाहीं एकचि ही स्थिति !
या विश्वाचा जनिता अथवा मीच असें ! सारीं भुवनें–

केवळ माझ्या या दृक्पातें
होतिल भस्माचि अनंत काल !
अनंत विश्वें माझ्या उदरीं
मीच खळांचें शासन केलें पुरा घेउनी अवतार !

विभूति माझ्या जगीं पसरल्या
सर्व दृष्टिचें केंद्र एक मी
चिदानंद मी स्वयें प्रगटलों
स्वागत माझें करावया या चिमण्या तरण्या बाळांनों !

या या तारांनों ! या जलधर !
या सरितांनों ! वनपुष्पांनों !
यशोगीत मम गा चंडोला !
रजनिवल्लभा पीयूषाचा करी मजवरी अभिषेक !

अनंत भुवनांचा मी स्वामी
मालक कवितेच्या हास्याच्या !
कोण सांग मी ? वसतों कोठें ?
तुझ्यांत केवल नव्हे अहर्निश चराचरांतहि वसतों मी !

## अभिनंदन

होतां कालवशें प्रगाढ तिमिरें संव्याप्त सारी धरा
येतो कोमलरश्मिदीप्त सहसा धांवून दिव्यारुण
नैदाघप्रखरातपें सुरधुनी जाणार जों आटुनी
तों हैमाचलशीतलांबुलहरी वेगें तिला भेटती

झालें अंबर शून्य निष्प्रभ, रवी होऊन अस्तंगत
त्याला हांसवि इंदु शांत मधुर स्वीय प्रकाशें पहा
कोऽप्यंभोधरवर्धिता वनगता दावाग्निदग्धा लता
ती उज्जीवित जाहली आजि खरी नव्यांबुवाहागमें !

वर्णावें तव शुष्क शब्दनिवहीं कैसें यशोगौरव
शून्यांतीलच सृष्टि आज उदया आली प्रभावें तुझ्या !
ही दुर्दैवशताभिघातदलिता वैधव्यपंकांतुनी
धैर्यें उद्धरिली तुवां गुणवती बाला यशोमंडिता !

हास्याला हंसवावयास जगतीं कोणा नको सांगणें
पूर्णेंदू डुलतांहि अंबरिं पुन्हां येतात तारे किती !
सौख्यानंदविवर्धनास असती उद्युक्त सारे जण
पाथोधीवर वर्षणार दिसती थोडे न अंभोधर !

ज्यांना सोडुनि दैवदुर्विलसितें गेलीं सुखें सर्वहि
ज्यांचीं दारुण लोचनांबुतटिनीपूरीं बुडालीं शुभें
ज्यांच्याभोंवति गाढ पूर्ण भरलें निर्विण्णतेचें तम
निंदायास तयांस मात्र सहसा निर्लज्ज येती पुढें !

मूढांनीं अविचारुनी पसरिलीं निर्बंध वाग्जल्पनें
झाला निष्ठुर धर्म, पातक रची तोही निसर्गावर
अश्रूंचा प्रबलौघही, शमविण्या हा हट्ट, झाला वृथा
धिक्कारून मृदुत्व निष्ठुर मनें अस्निग्ध केलें जगत् !

जीं कांहीं विकतात आज ऋषिंच्या नांवावरी दुर्मतें
तीं त्यांचीं म्हणण्यास लाजच बरें वाटेल कोणासहि !
सोंगें घेउनि गोड, गोंधळ पुरा केला वृकांनीं मधें
त्यांचा फोलपण पुराच पटतो आतां विचारी मना

जी झाली परि हीन संस्कृति असे सामान्य लोकांवर
सर्वांचींच तिच्यामुळें दिसति कीं झालीं मनें दुर्बळ
धैर्याचे तुजसारखे नरमणी व्हावेत याया पुढें
दुःखाचा लवलेशही हतजगीं राहील कैसा मग ?

होतें पूर्वि कसें—विचार करुनी कांहीं नसे फायदा
व्हावें काय पुढें— पुढें धरुनियां हें ध्येय चाले बुध
येतां चारु नव प्रभात, पसरे सर्वत्र दिव्य प्रभा
तेव्हां काय तमोविचार करितो कोणी विवेकी नर ?

केले जे आविचार पूर्वजजनीं ते क्षम्य माना सुखें
आल्या चालत अंधरूढि भलत्या, त्यांची करा कींवहि
धैर्यानें परि मोह सारुनि दुरी, निंदेस धिक्कारुनी,
त्यांचा नाश करूनि उन्नतिपथ स्वीकारिला पाहिजे

बोलोनी कितिही निरर्थाचे असे सामान्य लोकांस तें
रूढीला दृढ रूढिनेंच सुजनीं बा पाहिजे जिंकिलें
मोठे ग्रंथ रचून आज कितिसा होणार तो फायदा ?
यावे हेंच खरें तुझ्यासम पुढें उत्साहशाली युवे !

वृद्धांच्या कटु निंदनोक्ति उडुनी जातील वाऱ्यावरी
आहे हें जग सत्य सत्य अपुलें, या या युवे हो चला !
धैर्याचा ध्वज अंबरीं फडकत स्वच्छंद राहो अतां
न त्रेतायुग—काल सांप्रत असे, भीऊं नका लेशहि !

सारे निर्दय कायदे स्मृतितले ते दूर फेका सुखें
हल्लींचे स्मृतिकार आपणच, हें ध्यानीं असू द्या पुरें !
भावी काल समस्त आज तुमच्या हातांत आहे खरा
भावी सृष्टिहि खास खास तुमच्या नाचेल शब्दावरी !

न्याय, प्रीति, समत्व, शांति जगतीं नांदावया सर्वदा
यत्नें आजच गाढ रोपण करा सर्वत्र सद्भावना
काळें वाढुनियां प्रचंड, भुवन व्यापून टाकोत त्या
त्यांच्या स्वादुफलप्रसूननिकरें आच्छन्न होओ धरा !

## रसिकाभिवादन

व्योमीं उज्ज्वल तारका पसरिल्या आहेत कैशातरी
त्यांचे चारु विलास पाहुनि कसा आनंद व्हावा मग ?

ही चेतोरम नूतनोदित सुधागर्भेंदुलेखा असे
त्या वक्रेस परी नकोच बघणें ! हे झांकिले लोचन !

आली वर्षित दावदग्ध विपिनीं शीतांबु कादंबिनी
तीचें श्यामल रूप देखुनि दुरी ती सारिली सत्वर !

गंगा वक्रपथें शिलाशकलवत्प्रांतांतुनी धावते
गेला प्राण तरी सुखें पुरवला बिंदूहि तीचा नको !

शोभे अंबरिं रम्य इंद्रधनु तें आहे परी निर्गुण
झाली तुच्छ अहो मनोज्ञ ललना या कर्णपूरांविणें !

पुष्यज्जातिलताप्रसून रसिकस्वांतास संकर्षितें
राहो दूरच—त्यांतुनी न पडती बाहेर संगीतिका !

आहे हीरकखंड सुंदर परी नाहीं तया सौरभ
हा वीणारव कर्णमोहन, नसे याला सुरम्याकृति !

बालाचा मृदु हास्यनाद, परि तो येतो न तालामधें
नाहीं भासत पंडितत्व दयितासंलापजालांतरीं !

आहे शब्दनियोजना सुरुचिरा, वाटे रसोत्कर्षही,
तैशी उज्ज्वल कल्पनाप्रचुरता येते मनःप्रत्यया,

लेखी तुच्छ तथापि काव्य यमकप्रासांविणें पाहतां
त्या विद्वान् रसिकाग्रणीस मम हें आतां असो वंदन !

## भावस्तोत्र.

जीच्या दिव्ययशःसुधारसकणीं संसिक्त झाली धरा
केल्या सद्गुणसौरभाकुल जिनें दाही दिशा लीलया !
पुष्पां मार्दव, तारकांस शुचिता, नैर्मल्य गंगाजला,
प्रेमाला रसवत्त्व, दग्ध हृदया आनंद जी देतसे !

केली रम्य उषा जिनें निजमनःपावित्र्यभूतीमुळें
व्योमीं इंदुकला यदीय विमल प्रेमप्रभावें हंसे !
मांगल्यायतन प्रभावलिंत जी विश्वैकसंमोहिनी
आहे कोण अशी जगांत ललिता ?—तूं एकली लाडके !

माझी जीवनचंद्रिका स्मितमयी, काव्यांतरात्मा मम,
वाणीचें मम एकमात्र भुवनीं तूं रम्य लीलास्थल !
अश्रूंच्या अमृतप्रवाहिसुमनःसंवर्षणें देवते !
विश्वा स्वर्गसमक्षता वितरिसी, धन्यत्व माझें किती !

आतां कंटक लोपले, विषमय प्रोद्वेगशल्यें तशीं
झाली सर्वहि मेदिनी सुरलताफुल्लप्रसूनावृता !
भासे पूर्ण इथें तिथें मधुरता प्रेमामृतोत्सेचनें
झालें नादित मंजुहास्य—रुचिरध्वानें नभोमंडल !

काव्यें मीं रचिलीं किती तवयशोमाहात्म्यसंकीर्तना
झालीं तीं अपुरी तशीच उरली माझीही इच्छा गडे !
कांहीं वर्णुनि पाहतों पुनरपि त्वत्कीर्तीविस्तार तों
गे पूर्वाधिक वाढलाच दिसतो शुक्लेंदुकांतीपरी !

जेथें वाङ्मन पोंचतें न कधिं, त्या ब्रह्मस्वरूपापरी
तूंही भाससि देवते ! निरुपमप्रेमातिभावें मला !
वर्णावें तरि तेधवा तुज कसें ? स्तोत्रें रचावीं कशीं ?
अश्रूंचा अभिषेक मात्र करितों तंद्रेमधें त्या तुला !

जेथें मानस शून्य होय, कुठली ती शब्दशक्ती तिथें
जी सूक्तावलि तेधवा प्रगटली नेत्रांबुधारेंतुनी
होता भाव तयांत काय ललिते ! ये सांगतां तो कसा ?
काव्याचाहि तिथें प्रवेश मग गे होईल केवींतरी ?

## माझें गाणें कुणासाठीं

तारांसंगें हांसत खेळत शुभ्रज्योत्स्नारसांत पोहत
कल्पलतासुमसुरभिदाम नव कंठीं घालुनि आनंदानें
निर्झरगायन मंद चालतां करिते नर्तन वनपुष्पांवर !
मृदुलधवलशशधरकरविरुचिर इंद्रचापरससेचितवसना

नेसुनि मुक्ताप्रभांगरागा समुद्रलहरींवर घे निद्रा !
जिच्या स्मितावर विश्व चाललें जिच्या अश्रुनें प्रलयचि होतो
कंटकतरुला फुटे पालवी वाहि शिलामय गिरिंतुनि निर्झर
पंकांतुनि येतात अंबुजें सर्व जिचा हा प्रभाव आहे !

त्या मन्मानसदेवीसाठीं गातों, कांहींतरि बडबडतों
काय तिथें संबंध जगाचा ? भलें बुरें म्हणणारे कोण ?
एकटिला हें तिला आवडो नाहीं पर्वा मग कोणाची !
माझें गाणें असे तिच्यास्तव कुणा न तिजविण हें कळणार !

## गंगेसाठीं

श्यामतिमिरमय रजनी गेली
कोमल अरुणप्रभा पसरली
विहगकलरवें रानें भरलीं
मंद मृदु वातें—नव जीवन ये स्वर्गीतें

दीप्तिसमुज्ज्वल सृष्टि विलोकुनि
हर्षभरानें शय्या त्यागुनि
उल्हासानें हांसहांसुनी
गंगास्नाना—चाललों गात मधु गाना

चालुनि चालुनि दमलों भारी
कंटकमय भू लागे सारी
वारे सुटले तीव्र विषारी
जाणों अंगार—भानुही वर्षि अनिवार !

विशाळ भेसुर उजाड रानें
क्रमिले गिरिकंदर यत्नानें
रंगविले पथ पदरुधिरानें
गंगेसाठीं—सारी ही आटाआटी !

निर्झर, सरिता, कूप, तडाग
किती पाहिले जागोजाग
लवहि न जडला पण अनुराग
एक ती गंगा—खेळे मनिं तुंगतरंगा !

प्रगूढ भेदक विरहगायनें
गेलीं व्यापुनि अनंत गगनें
दिशाहि भरल्या उत्कंठेनें
परी अजुनी ती—कां न दिसे मज शुचिमूता ?

गात्रें गळलीं, शक्ती सरली,
प्राणज्योती नेत्रीं ठेली
दैवा ! काय असे मम भालीं
गंगादेवी—भेटणार आतां केवीं ?

तटतरुमाला किसलयमंडित
दीर्घभूमिका हरिततृणावृत
एथुनि दिसती नयनां सांप्रत
लहरिनिर्घोष—दे श्रवणां अति संतोष !

शीतमधुरजलसीकरवाही
दे आल्हादा मंद वायुही
त्राण शरीरीं पण लव नाहीं !
येउनी एथ—तळमळे तप्त धूळींत !

गंगे ! तव जलपान न घडतां
लहरिविलास क्षणहि न दिसतां
तळमळतों तूं सन्निध असतां
गळाला धीर—चालले प्राण बाहेर !

## मंगलपंचक

स्वण हीरक शोभतो, जलद वा विद्युत्समालिंगनें
किंवा पुष्पितवल्लरीयुत तरू संमोहवी लोचनें
ज्योत्स्नाभूषित नील अंबर खुले, आचार नीतीमुळें,
हे शोभोत तसे वधूवर, शुची होओत दोन्ही कुळें

विश्वाचा जनिता दयामय तुम्हा मांगल्य देओ सदा
आनंदांबुधिवीचिवेष्टित असा, राहो दुरी आपदा
सौख्याची चिरवर्तिनी स्मितमयी नांदो उषा सन्निध
प्रेमाचा पथ आदरा, अनुदिनीं ज्या वर्णिताती बुध

ईशादिष्ट पंथ क्रमून जगतीं मोदोर्मिमाला भरा
विश्वांतील समस्त दुःखतिमिर स्वीयप्रभावें हरा
न स्वार्थार्थचि हा प्रपंच, सहजाचारासि द्या दिव्यता
भूमि स्वर्ग करा. जुन्याच दिवसा द्या रम्यता नव्यता !

पावे मुग्ध जगत्कली विकसना ज्या माधवर्तूमुळें
त्याला पाडुनि मोह सुस्थिर करा लोकीं गुणांच्या बळें
विश्वांतील विशाल कंटकवनें विध्वंसुनी सत्वरी
ठेवा संतत हास्यभूषित धरा ही पुष्पशय्येवरी !

मांगल्यैकनिधान, साधु म्हणती, आहे गृहस्थाश्रम
हा ! हा ! अज्ञ जनां परी अनुदिनीं होती अनंत श्रम
नित्य स्वादु सुधारसा पिउनिया सोत्कंठ हांसा रमा
सौख्याचीं अमृतप्रवाहि कुसुमें वाहील तुम्हां रमा !

## मृत्यूस

जाती तीव्र दवालनांत जळुनी बालद्रुमांच्या तति,
संशुष्क प्रखरांशुभैरवकरीं होते प्रसूनावलि
मेघाचे नवमौक्तिकाभ सुकती व्योमींच बिंदुव्रज
होतो शून्यविलीन तारकगण स्निग्ध, प्रभातीं क्षणें !

झाला जन्म न, तोंच तापवलिता संसारदावस्थला
सोडोनी सहसा विलीनच परंज्योतींत जो होतसे—
तो लोकीं बहु भाग्यवंत, मज कां तें भाग्य नाहीं प्रभो !—
या दीनास सदैव दुर्वह मनस्तापांत कां जाळिशी ?

वांछा अल्पहि पूर्ण होत न कदा, नैराश्य वाढे सदा
नाहीं सौख्यलव क्षणैकहि कधीं या दुर्भगा लाधला !
चिंताविव्हल तीव्रदुःखगरलव्यामूढ होऊन मी
मृत्यो ! शांतिनिकेतना ! करिं तुझें सोत्कंठ मार्गेक्षण !

## मांगल्याचा विजय

भेदुनी नभस्तल येती पुढती तारा
वर्षती अमित मृदु मुग्ध किरणरसधारा
गिरिगर्भ विदारुनि निर्झर धांवति रानीं
सुस्निग्ध भूमिका करिती जलबिंदूनीं
मृदु किसलयजालक कठोर तरुवरि झुलतें
अप्सरःश्वासमय कुसुम कंटकीं फुलतें !

दयिताधररंजित शालू—नेसुनी
ये उषा पुढें तिमिरातें—वारुनी
मृदु हंसुनि हास्य पसरीते—त्रिभुवनीं

घनवृंद फोडुनी ताडिल्लता ये खालीं
स्वर्गासहि आणी ओढुनि अवनी जवळी

लंघुनी दीर्घतर रुधिरार्णव भयकारी
अवतरे शांतता रम्य तीव्र संसारीं !
व्यसनांतुनि होतीं सत्तत्त्वें संभूत
पापासहि सहसा स्वबळें करिती पूत
दुःखांतुनि चढती विशाल सुखतरु गगनीं
फलपुष्पभरानें आच्छादिति हत अवनी !

तरु अधिक भरानें वाढे—तोडितां
आकुलतेमधुनी येई—सुकविता
हो ग्रीष्मापुढती वर्षा—स्निग्धता

खलनिंदागरलज्वाला होउनि शांत
उत्कर्ष होतसे सुजनांचा निभ्रांत !

## जॉर्जगीत

ललितगुणदाम भो जॉर्ज राजेश्वरा !
अवनितलिं करिं सदा शुभयशोविस्तरा !

भावसंगीतकें, तव जयस्तुतिरवें
व्यापिती गगन हे चारणांचे थवे !

शांतिसुखवैभवें विनटली मेदिनी
त्वत्कृपें स्वर्गशी भासते लोचनीं !

दिव्यवीणास्वनव्याप्त दिङ्मंडलीं
नामसंकीर्तनें तव पहा चाललीं !

भरतभूराजगणपुण्यनामावलि
भूतिनें तव विभो ! दिव्यतम जाहली !

ईश ठेवो कृपाछत्र तुजवरि सदा
राज्यलक्ष्मी तुला अनिश सेवो मुदा !

स्थनादेवी तुझें अवन भूपा ! करो
नियति तव सर्वदा व्यसनजाला हरो !

शत्रु होओत तव मित्रसे भूपते !
होइ कारण सदा हतजगत्पर्णते

कालकलिविकसना माधवर्तु स्वयें—
तूंच हो, तुजजवळिं काय वांछूं नये ?

रंगलें भुवन तव मधुयशःसेवनीं
दूर राहूं कसा मी कवी होउनी ?

विजय तव ! विजय तव ! जॉर्जराया सदा !
दिव्य निष्ठा तुझी मज असो शर्मदा !

## भरतभूमि

सुनील सागरजल भेदोनी उजळीत तमोग्रस्त मेदिनी
प्रकट झालीस भरतजननी तद्दिनवैभव काय वर्णूं ?

विश्वीं उद्भवे कोऽपि कलरव भक्तींचा उठे उद्रेक अभिनव
हर्ष पसरला उद्गमें तव सकल प्राणिवृंदांत

तुझ्या ज्योतीनें त्या कालीं गभीर रात्रीची प्रभात झाली
दीन धरा अवचित चढली उत्सवाच्या तुंग शिखरीं

स्थिरचर बोले "जगज्जनानि ! जगद्धात्रि ! जगत्तारिणि !
जयोऽस्तु तव मंगलरूपिणी ! जगत्पावनि ! भरतभू ! "

तुझ्या चरणकमलस्पर्शें धरणी डोले अमित हर्षें
गाई गीतें प्रेमोत्कर्षें जगन्मोहिनि ! तुजवरुनी!

सद्यःस्नानसिक्तवसना विमल हास्योर्मिदीप्तानना
विशालभाला तूं शोभना सिंधुशीकरीं लिप्त चिकुर

व्यापून गगन नृत्य करिती वरी सूर्येंदु तारकाततती
मुग्ध सागर चरणांवरती लोळे, गर्जे गभीरसा

शुभ्र तुषार किरीट शिरीं, आच्छादिति तनु सागरलहरि
रुळे मुक्ताहार वक्षावरी सिंधुगंगायमुनांचा

तप्त रुक्ष मरुप्रदेशीं भीषण दीप्त कुठें तूं दिससी
शामलशस्यस्थलीं हांससी विश्वहि करिसी हास्यरत

प्रबल स्वनें पवन उपरि शून्यीं अविश्रांत गर्जन करी
मधुर पिककलनादलहरि तव चरणांतें चुंबिती

हातीं घेऊन तीव्र अशनि सिद्ध पयोधर संलिल वर्षाणें
कुंजकानन तुझ्या चरणीं कुसुमगंध विस्तारी

हृदयीं तव स्थिरप्रेमशांति वदनीं वसे चिर अभयोक्ति
हस्तें करिसी अन्नपूर्ती चरणीं नांदे मुक्ति सदा
तुझें संतान मी माते ! मग कां नये भर हर्षातें
धन्य करिसी निखिल विश्वातें, धन्यतम मी कसा नव्हे ?

## भावगीत

दयाघन ज्याचा प्रभु झाला
चिरानंदमय जीवन त्याचें ! काय उणें त्याला !

दुर्जेपण कोठें त्या उरलें ?
निजात्मतेजोरसें सर्वही विश्ववलय भरलें !

भक्तिचा मधुर गंध सुटला
हटला त्याचा शोक, सुदुस्तर भवसागर अटला !

प्रभुस्तुतिसुधासेवनांत
धन्य धन्य तो ! कंठि काल जो प्रभुगीतें गात

तयाला पुण्यपाप कसलें ?
सदसद्द्वंद्वातीत होय तो, मूढ इतर फसले !

प्रभुमय सर्व विश्व त्याला
जातिनिबंधन, उच्चनीच हा भेद येइ कुठला ?

नटला तोच जगत् सारें
त्याला ' मी-तूं ' द्वैतविषाचें लागलें न वारें !

मंदिर अमर्याद त्याचें
तदात्मीयते क्षेत्र पुरेना सर्वहि विश्वाचें !

दिसता तोच नित्य त्याला
जणों मुकुरमय विश्वमंदिरीं एक असे वसला !

तेथें ज्ञान खरें ठसलें
कसलें समजे त्यां हें, जड जे भक्तिसुखा रुसले

बसले कामपंकिं रुतुनी
प्रभुनामांबुजमरंद सुलभहि त्यांस मिळे कुठुनी !

गा गा जगन्नायकाला
जय जय शब्दें व्यापुनि टाका या ब्रह्मांडाला !

## धर्मनिष्ठ

नोहे हिंदुहि, जैन मी न, अथवा बुद्धैकसेवी तसा
ख्रिस्ताचा चिरशिष्य मी न अथवा इस्लामधर्मानुग
त्या त्या धर्मपथास मानुनि परी मी सर्वदा वागतों
सारेही मम धर्म ते असति हे उच्चस्वरें सांगतों

ही विस्तीर्ण वसुंधरा, मधुजल स्रोतस्विनी, अंबुधि,
तेजोगोलक तारकादि नभिंचे, संशांत नीलांबर,
वायू जीवनवाहि, साधुहि तसे सद्धर्मसंस्थापक,
हीं नाहींत विनिर्मिलीं प्रभुवरें एकाच जातीस्तव !

विश्वांतील समस्त दुर्विषमता, सीमाहि हानिप्रद,
ध्वंसाया अवतार या हतजगीं ज्यांचा असे जाहला,
त्यांची शांतिसुधातुषारमधुरा विस्तीर्ण बोधापगा
घालोनी तट कोणता पुरुष तो ठेवील मर्यादित ?

' हा मद्धर्म ! म्हणूनियां मदभरें जे गर्जती दुर्मति
ते सारे प्रतिबिंबमुग्ध, न तयां मूलोपलब्धी घडे !
चंद्रानें रजतप्रभा विखरुनी आच्छादिलें भूतल,
बालातें परि वाटतें उतरला आहे घटीं मात्र तो !

नक्षत्रें भरलीं अनंत गगनीं–तेज:प्रभा एकचि
मेघव्रात असंख्य वर्षति–परी तत्तोय नाहीं दुजें,
आकाशीं किरणच्छटा उसळती–इंदू परी एकला,
नाना धर्म असोत, एकचि वसे सर्वत्र सद्भावना !

एकाची करणें स्तुती अनुदिनीं, निंदा दुज्याची तशी
सांगा हो विपरीत वर्तन असें मीं दाखवावें कसें ?
लोकां भिन्न कितीहि रंग दिसले देवेंद्रचापावरी
लाभोनी रविदृष्टि दिव्यतम का मींही म्हणावें तसें ?

बुद्धख्रिस्तमुहम्मदादि सगळे एकाच तत्वास्तव
झालेले अवतीर्ण, भेद कुठला त्या सद्विभूतींमधें
अज्ञानानुचरींच हाय, पुढती घालूनिया कुंपणें
धर्मांचे, नरजातिचेहि तुकडे केले खरें दुर्ग्रहें !

दारें लावुनिया पहात बसले मंदप्रदीपप्रभा
सूर्याचा प्रखर प्रकाश पडला बाहेर वार्ता नसे !
धर्माचा अभिमान तीव्र धरुनी धर्मप्रसारास्तव
धर्माच्या नरडीवरींच बसले हे मूढधी धार्मिक !

ऐशा या अनुयायिमंडलकृती पाहून लोकोत्तरा
नेणों काय असेल वाटत मनीं त्या धर्मसंस्थापका ?
कोठें भक्तजनींच धर्म अपुला निष्प्राण केला असे
कोठें प्रेत सडून हाय ! सुटली दुर्गंधि त्याची महा !

बाह्याचारच धर्म मानुनि उठे गंभीर वाक्पाटव,
कां हो त्या उपहासिती मग वृथा देहात्मवादी जनां ?
अज्ञानें असल्याच कष्टद किती सद्धर्म झाला असे
जाणों कोमल अंबु तीव्र बनलें होऊन शैत्यें हिम !

‘ वाटो उत्तम अन्यधर्म कितीही, तो होय भीतिप्रद
गेला सांगुनि अर्जुना उघड तो ज्ञानीजनांचा गुरु
तें चित्तीं धरुनी अहर्निश हटें धर्माभिमानी जन
आले निंदित अंध होउनि सदा हा ! अन्यधर्मांप्रति !

आतां काल परी असे बदलला, आत्मीयता वाढली,
सारें विश्व कुटुंब एक बनलें, माझें—तुझें लोपलें
तेथें हा ‘ परधर्म ’ ही मनिं कशी येईल दुर्भावना ?
ब्रह्मांडासह धर्मपंथ सगळे झाले अहा आपुले !

या विश्वावरि सर्वतः पसरतां दुर्भेद्य आत्मच्छटा,
कोणाचा अभिमान गाढ धरुनी गावी तयाची स्तुति ?
ही धर्मांबुजमालिका विकसली उद्दाम गंधोत्कटा,
कोणीही अलि होउनी सुखभरें स्वच्छंद सेवो मधु !

ऐकाया उपदेश पावन कुणा तद्धर्मदीक्षा नको,
तैसे अन्यहि धर्मपंथ अवघे आहेत त्या मोकळे
पुष्यत्पद्ममरंद सेवन करी तो पद्म कां होतसे
कीं त्याला अपरप्रसूनरस वा न प्राशितां येतसे ?

सारे धर्म सदंशभाक् उपजले त्या मूलधर्मांतुनी
तत्त्वाची घडली नसे परिणती एकाहिमध्यें दिसे
अंधाचार विवेकहीन नसती ज्याच्यामधें अल्पहि
नाहीं—नाहिंच एकही दिसतसे सद्धर्म ऐसा जगीं !

सांगा एकच धर्म सेवुनि कशी लाभेल शांती मग ?
चालावें परधर्म निंदुनि कसें सत्तत्त्वजिज्ञासुचें ?
स्वातंत्र्यप्रविदारि बंधन मनःक्षेत्रास ज्याच्या नसे
तो कां राहिल बद्ध होउनि बरें एकाच जागेमधें ?

## केशवसुतास–

कोठें सांप्रत सांग केशवसुता ! वास्तव्य आहे तुझें ?
गाणीं सांग कुठें बसून रचिशी अस्मानभेदी नवीं ?
सोडोनी जड देह काव्यरतिनें उच्छेदुनी बंधनें
ज्या तेजोवलयांत लीन असशी तें सांग आहे कसें ?

तूं येशील फिरून, या हतजगीं केव्हां कवींद्रा ! पुन्हां ?
व्योम व्यापुनि टाकशील अपुल्या केव्हां तुतारी–रवें ?
ब्रह्मांडाप्रति या नवा दम तुझा स्वर्गावरी नेइल
आम्हांला मिळतील तीं हरपलीं श्रेयें तुझ्या आगमें

तूं नाहींस इथें बघून डुलती अत्यल्पबुद्धी कवि,
दर्पें बोलुनि वल्गना चकविती सामान्य लोकांप्रति;
हें पाहून अतीव खेद सुकवे ! वाटे विचारी जनां
यावास पुन्हा म्हणून करिती नित्य प्रभुप्रार्थना !
गंगौघापरि भव्य केशवसुता ! सावेश वाणी तुझी
नव्योज्जीवनलाभ देत अमुच्या कर्णीं पडावी पुन:
वीराची धृति, वा शुचित्व शिशुचें स्त्रीजातिचें मार्दव,
यांचा पाठ तुझीच एक कविता देईल राष्ट्राप्रति !
झालेलें अतिशुद्ध पुण्यमयही गानध्वनीनें तुझ्या
केलें दूषित विश्वमंडल असे सूरिब्रुवांनीं पहा !
स्वार्थाचा अतिरेक होउनि जगीं विस्तारली दीनता
अव्यक्तांतुनि ये पुढें पसरुनी सर्वत्र दिव्यच्छटा !
तंद्रा सोडुनि एकदां उघडुनी डोळे पहा भोंवतीं
निद्रा दूर पळून जागृत किती होतील आत्मे जगीं !
गाण्याचा पहिलाच सूरहि न जों बाहेर तूं फेंकिला
तों जाईल समस्त विश्व बुडुनी पीयूषपूरामधें !

नक्षत्रापरि दिव्य शांत असुनी आत्मा तुझा सर्वदा
त्याला पार्थिवदोषलेशहि कधीं ठावा कवींद्रा ! नसे !
गंभीरार्णवगर्जनेसम तुझा गीतध्वनी चालुनी
देई फेकुनि रुक्ष सैकततटीं जीर्णाभिमानी जनां !

आहे त्वद्वचनामधें अभिनवा जादूच कांहीं तरी
स्वर्गातीलहि सार एकवटुनी वाटे तिथें नांदतें !
ती जादू कविनायका ! पुनरपी सोडून विश्वावरी
पापातेंहि करून पुण्यमय तूं स्वर्गासही लाजवी !

आहें साथ करावयास बसलों राहून मागें तुझ्या,
हर्षें देइन भीतभीतच कधीं त्वद्गायना सूरहि;
किंवा गानरव त्वदीय इतका साधा असे का कवे ?—
कीं तो ऐकुनी एकवार, मग मी राहीन शुद्धीवरी !

## माझी ताई

पडुनि कोवळें ऊन सकाळीं अंगण शोभे सोनेरी
अल्लड वेली लाजत डुलतां मौज दिसे कांहीं न्यारी !

माझ्या छबुड्या ताईसह मी किती खेळलों खेळ तिथें
ऐकुनि गाणीं तिचीं बोबडीं येई आनंदा भरतें

नव्हता कांहीं अर्थ तयांला, सूरहि होता साधाच,
परंतु गाणें गोड ऐकिलें जन्मामध्यें मीं तेंच

इंद्रधनुष्यापरि जे उठले मनांत नाना रंग तदा
अजून असती तसेच तेथें पुसून जातिल ते न कदा !

त्या नादाचें करीत चिंतन जातो माझा वेळ किती
निसटुनि गेला स्वर्ग पुन्हां तो येइल का परतुनि हातीं !

गोड हांसरीं फुलें तोडुनी ठेवुनि ताईच्या कानीं
' वनदेवी तूं ! ' म्हणुनी कुतुकें तिला पाहिलें हर्षोनी

रूप तिचें तें उभे अजूनी तसेंच डोळ्यापुढें दिसे
वाहे अश्रुप्रवाह झरझर तिचें चिंतुनी गोड हंसें !

घालुनि हातीं हात मजेनें माझ्या ताईसमवेत
किती वाटलें सौख्य मनाला हिंडत असतां बागेंत !

होउनि आतां स्पर्शसुखाची अठवण सुखमय कालाची
अतीच दारुण दग्ध मनाला स्थिती वाटते आतांची

सदा फुलांनीं भरलेले ते उषारसानें खुललेले
बालपणींचे सुवर्णदिन ते गेले कायमचे गेले !

तो हास्याचा उत्सव, सुखमय वसंत बालक्रीडेचा
कधीं पुन्हां या प्रौढ मनाला नाहीं काय दिसायाचा

बाळपणींची पवित्रता ती स्वप्नापरि आतां वाटे
हिमगिरि सुटतां निर्मल गंगाजलीं जसा कर्दम दाटे !

तेंच असे हें घर आतांचें, बागहि आहे तीच जुनी,
परंतु गेली जादू सगळी त्यांतिल पूर्वींची निघुनी

असें पूर्वींचा मोहि, परी हें हृदय सुकोनी गेलेलें
प्राण जाउनी जसें कलेवर आकारानें उरलेलें !

जशी जाइची कळी लाजरी हंसली नसतां गळुनि पडे,
माझी ताई गोड गुणांची अवचित गेली प्रभूकडे !

तिचा वियोगक्षण तो येतो प्रतिदिवशीं—छे प्रतिक्षणीं
कसें सुचावें मरण सदाचें माझ्या ताईचें बघुनी ?

क्षणांत होती लुप्त तारका, सुकून जाती दंवबिंदु
ताई माझी मरण पावते, देव म्हणे करुणासिंधु !

मींच ताइला दिधला घालुनि ओनामा आरंभींचा
ध्यास घेतला माझ्यासंगें शाळेमध्यें यायाचा

घेउनि पाटी एके दिवशीं काढुनि कांहीं रेघोट्या
नाचत नाचत येउनि मजला दावी डोलानें मोठ्या !

विचित्र लिहिणें विलोकुनी तें हंसुनी दुखलें पोट तदा !
चिडवुनि तिजला पुढें रडविलें आम्ही सर्वांनीं कितिदा !

परंतु आतां वाटे होता गूढ अर्थ त्या लिहिण्यांत
टेकावे जो उकलायाला पंडित लोकांनीं हात !

सारीं ज्ञानें जगांतलीं तीं शिरती अंतीं अज्ञानीं
ताईच्या मग त्या लेखाला कसें हंसावें सुज्ञांनीं ?

त्या रेघा वा ग्रंथ विशालहि दाविति एकच भावाला
कीं विश्वाचें रहस्य अजवरि नाहीं कळलें कोणाला !

ज्ञानाज्ञानहि एक जहालें अशा अभेद स्थितीमधें
ताईच्या त्या रेघोट्यांला कसें हंसावें बरें बुधें ?

आम्ही हंसलों तिला पाहुनी विचित्र रेघांचें जाळें,
केलें ज्ञान व्यक्त कुणीं पण करुनि पांढऱ्यावर काळें ?

जेथें भाषण आणि मौन हें एकच ठरतें अशी स्थिति–
ज्यांस लाभली, अशा साधुजनसमाजांतली ती होती !

पडुनि उषेचा प्रकाश नाजुक, दूर होउनी अंधार,
अव्यक्तांतिल सृष्टी येतां व्यक्तपणानें बाहेर,

तोडायाला फुलें चिमुकलीं अपुल्या चिमण्या हातांनीं
माझ्या ताईसह मा होतों हिंडत अमुच्या उद्यानीं;

फुलें हांसरीं भरून गेलीं नानारंगी सभोंवतीं,
परी लाजवी कळी तयांना माझ्या सन्निध जी होती !

चिमणीं बोटें लालपणावर, चिमणा तो गोंडस हात,
होतीं नाचत इकडुनि तिकडे साऱ्या त्या फुलझाडांत

कळी म्हणूनी तिची अंगुली चुकुनि एकदां मीं धरिली,
ओशाळा बहु झालों पाहुनि ताई मग भारिच हंसली ।

नुकत्या फुलल्या गुलाबकळिसम हंसरें मुख तें ताईचें
ठसलें आहे पूर्ण मनामधिं, पुसुनि कदापि न जायाचें !

आयुष्याचा फुलभाराचा वसंतऋतु तो आठवुनी
गतसुखचिंतनमग्न हृदय हें दुःखानें येतें भरुनी

तें हास्याचें, बालरवीच्या किरणरसानें बनलेलें
हंसणें रुसणें खेळ खेळणें स्वप्नापरि अवचित गेलें !

उषा पुन्हां ती पाहिली न मी, प्रकाशही सारा सरला,
विषमय काळाकभिन्न नुसता अंधकार जगतीं भरला !

भयाण सांप्रत झालें आहे स्मशानसें जग सारेंही,
पुढें येउनी नाचत झुंडी भूताखेतांची राही !

स्मरुनि पूर्वीचा काळ मिटूनी डोळे अश्रु ढाळावे,
मोजित घटका जगांतले दिन कसे तरी मीं कंठावे,

हेंच संप्रती उरलें हातीं; याहुनि पण दुसरें काय—
मिळावयाचें ? दुर्दैवाची ज्याच्यावर दृष्टी जाय !

खेळ ताइचे परोपरींचे गमतीचे ते आठवुनी
व्यक्त न करवे आतां मज तें कसें काय जें होय मनीं !

तिचा आपलेपणा पाहुनी लाजो एकादा ज्ञानी
'खुंटीवरच्या कावळ्यास' ही अहा ! 'मावळा' ती मानी !

घाली खांबासवेंहि झिम्मा, जडाजडाचें भान नसे,
जणों दृश्य हें विश्व समस्तहि चैतन्यात्मक तिला दिसे !

बसेल बोलत मनीबरोबर, मनिंचें हितगुज सांगेल,
गाऱ्हाणींही सर्व आमचीं जवळ तियेच्या ओकील !

उठुनि एकदां तर लगबगिनें भातुकलीच्या खेळांत
आमंत्रणही फुलवेलीला देउनि आली बागेंत !

हळूच सारित केस बाजुला अपुले भुरभुर उडणारे
फिरवित होती इकडुनि तिकडे चंचळ डोळे हंसणारे,

येउनि भुरकन समोर चिमणी भिंतीवरती एक बसे
तिला पाहुनी मुखिं ताईच्या आलें खुदकन गोड हंसें

" दादा तिमने ! निलोप मादा घेउनिया हा माहेर्ली–"
गाणें पडलें न हें मुखांतुनि तों चिमणी मीं उडवीली !

चिडून अगदीं, भरून डोळे, वदे बघुनि ताई मजशीं
"दादितल्या ? दा–तुदी गदी फू ! नको बोलुं तूं अमत्यासी !'

झालों फारच कष्टी, केली आईनेंही मध्यस्थी
परंतु नाहीं राग तियेचा मजवरचा झाला कमती

माझ्याशीं हा तिचा अबोला सबंध घटकाभर टिकला,
स्वतांच नंतर येउनि हांसत बोलावी खेळायाला !

भांडण अमुचें झालें ऐसें पहिलें आणिक शेवटलें
परंतु आतां स्मृती तयाची व्याकुळ हृदयीं किती सले !

शांतिमूर्तिला–देवांशाला–साक्षात् विमल प्रीतीला
दुखवुनि कैसा हाय ! जहालों पात्र तिच्या मी रागाला !

परात्पराच्या दयालवानें तिचा स्वर्गमय सहवास
लाभुनि हा ! हा ! मूढाचरणें अपात्रसा ठरलों त्यास !

जडही तिजला गमे सचेतन, वेल तर तिची मैत्रीण,
विसरुनि जाई भान आपलें पशुपक्षीही पाहून !

बसलों आम्ही रुतून सारे दुर्भेदाच्या चिखलांत
भांडत आहों मनुष्यांतही निराळीच करुनी जात !

हा हलका, हा उंच, नसे हा योग्य स्पर्श करायाही,
प्रौढपणाला अमुच्या काळें लांछन हें लागुनि राही,
वयें वाढलों परंतु अमुचीं मनें जहालीं हीन किती,
दुराग्रहानें केली साऱ्या अपुल्या ज्ञानाची माती !

सर्व माणसें म्हणजे असती थोर वयाचीं मुलेंचं हीं
म्हणती पंडित; याहि वचीं पण खरेपणा भासत नाहीं

उच्चनीचता, लोभ अनावार, दांभिक विद्येचा ताठा,
पूर्ण दुराग्रह, खुनशी वृत्ती, पूर द्वेषाचा मोठा,
या दोषांनीं प्रौढ मानसें भरून सारीं गेलेलीं
देवा ! हरुनी सांग आमुची कशास बाल्यास्थिति नेली ?

विश्वेशानें बाळपणीं जी दिधली होती गुणमाला
दर्पभरानें तोडुनियां ती प्रौढ असे मानव झाला !

बालरवीचें तेज दुपारीं शांत तसें राहत नाहीं,
कठोर होती कांहीं काळें वृक्षलतांचे पल्लवही;
प्रौढपणा मग कसा श्रेष्ठ मीं मानावा पाहून असें ?
वाटे बाल्यामधेंच कांहीं ईशांशाचें चिन्ह दिसे
खेळे ताई लटूपटीचे राजाराणी आणोनी
उत्सव मोठा करी कौतुकें लग्नें त्यांचीं लावोनी;

---

१ मनुष्याच्या दोषावर पांघरूण घालण्यासाठीं या वचनाचा उपयोग केला जातो.

सुखसोहाळे करून सारे मनिंच्या हौशी पुरवून
घडीभरानें टाकी नंतर खेळ सर्व तो मोडून

चराचरात्मक निर्मुनि सृष्टी ध्वंसुनिया मग ती टाकी
वाटे आहे खेळत एथें मूर्तिमती ही माया कीं !

होउनि आई मांडीवरि ती घेई चिंधीचें मूल,
जाणों अगदीं चिमण्या वेलिस आलें आहे कां फूल !

कुरवाळी त्या मातृप्रेमें, मुके मटामट घेइ किती,
निजवी त्याला थोपटुनीही घेउनिया खांद्यावरती !

" दो दो बाला, निदले, येइल बागुलबावा, ललूं नये, "
झोंके देई पाळण्यासही, वर्णाया तें दृश्य नये !

त्यांच्या कल्पित सुखदुःखानें सुख दुःखी आपण होई,
आजारीही त्यास मानुनी किती काळजी मग घेई !

न्हाऊं माखूं घालुनि, पाजवि घेउनि त्या पदराखालीं,
" उगि उगि बाला " म्हणून ताई हातांवरही त्या झेली !

प्रपंच लटका खरा मानुनी सारा करिती व्यवहार,
ईशविभूती जणों ज्ञानमय संपादी मनुजाचार !

हर्षखेदही मानी, अंतरिं समजे परि सारें खोटें,
ज्ञान असावें तदीय वाटे तत्त्वज्ञान्याहुनि मोठें !

तिची बाहुलीवरची प्रीती बघुनि एकदा कुतकानें,
गेली आई तिचा गोडसा पापा घ्याया प्रेमानें !

परंतु होउनि दूर बोलली, पोक्तपणाही आणून
" आई का मी लहान आहें मुका घ्यायलाही अडुन ! "

बोल तिचे ते ऐकुनि आम्हां तदा वाटली मौज किती
अजून आहे तशीच माझ्या पुढें उभीशी ती मूर्ती !

परी न आले बाळपणींचे खेळ तिचे प्रत्यक्षांत,
न पाहिली मीं तिज गढलेली खऱ्या खुऱ्या संसारांत!
मातृप्रीती तिची बाहुलीवरीच दिसली ती दिसली,
चतुर्थिची ती क्षीण विधुकला अपूर्णची अस्ता गेली !
सुटुनि नभांतुनि घनकणिका जी वरच्यावर आटुनि गेली,
तिजला अंबुजपत्रावरली मुक्तस्थिति लाभे कुठली ?
ग्रहण लागलें जणों सकाळिंच बालरवीच्या बिंबाला,
दवानलानें अवचित कोमल बीजांकुर जळुनी गेला,
प्रपंचचिंता नाशुनि टाकी किंवा कविच्या प्रतिभेला,
चमचमणारा प्रदोषतारक अकाल मेघानें गिळिला,
तशी बिचारी माझी ताई गेली अवचित कालमुखीं,
दुर्दैवानें हळुच टाकिला विषबिंदू मम बाल्यसुखीं !
निर्माल्यासम जीवित झालें, सुगंध सारा ओसरला,
अवसेचा हा अंधकार मजसभोंवतीं नंतर भरला !
वसंत सरुनी वर्षा आली भरीत अश्रूंचा पूर
शून्यामध्यें आहे सांप्रत वाहत जीवित हें दूर !
क्षणभर पडलें स्वप्न एक तें स्वर्गसुखानें भरलेलें,
विषादविषमय जागृतिनें या अग्निकणांवरि फेकियलें !
आला कानांवरी गोडसा वीणेचा मृदु झंकार,
लोपुनियां मग दृश्यजात हें त्यानें केलें निःसार !
दिव्य भावना मनीं उठूनी गेली नंतर मावळुनी,
जगिंचें जडसुख खरेंच सुखमय गणील नंतर कोण मनीं !
कोसळणारी गंगा खेळे हिमालयाच्या उत्संगीं,
व्योम सावरी तुटुनी पडलें इंद्रचाप नानारंगी,

चंद्रकांतिचा ओघ लोटला झेली त्याला वसुंधरा,
माझें जीवित कोण आवरिल नाहीं ताई जर मधुरा !

आश्रय होती तीच एक या संसारीं हत हृदयाला,
गळून जातां गुलाबकलिका स्थान कुठें मग गंधाला ?

त्या तारेवर ठेवुनि दृष्टी जीवितसिंधू मीं क्रमिला,
अस्त पावली अवचित ती मग आशा—बंध कुठें उरला ?

तुफान गिरिसरितेपरि आतां उद्देशाविण जीवन हें
कुणीकडे तरि कड्यावरुनि ही उड्या घेत धांवत आहे !

मेलें गेलें सर्व संपलें नांव नको त्याचें आतां
पिशाचापरी नवीन सौख्यीं नाचे स्वार्थी जड जनता !

माझा भलता मार्ग आपला, दिवसांरात्रीं तिजकारितां—
क्रूर कालमुखिं विलीन होइन गाळुनि लोचनजलसरिता !

नित्यं करावें चिंतन मनिं त्या चिमण्या प्रेमळ मूर्तीचें
तिच्याचकारितां अश्रु पडावे सार्थक हें मम जन्माचें !

नाद तिचा तो मधुर सुमंजुळ नाचत असतां कानांत
ऐकावें जें मीं, असलें तें काय असे हो जगतांत ?

शब्द बोबडे अर्थहीनही अजून चंचल मन करिती,
क्षणभर तरि मग मोहवितिल मज अशीं कोणतीं काव्यें तीं ?

हंसरें चिमणें मुख तें नाचत असतां संतत दृष्टिपुढें
कुतूहलानें पाहुं कोणत्या सांगा सुंदर वस्तुकडे ?

देवीहुनिही प्रिय जी झाली, प्रेम जिचें जीवनहेतु,
ती गेल्यावर सोडुनि मजला कुणास तिजविण मी चिंतूं ?

देवहि मजला तिच्याचसाठीं केवळ गमला आवडता
तद्गुणकीर्तनिं न तरी कोठें वाणी ही नाचवुं आतां ?

त्या देवीला–पवित्रतेला–माझ्या चिमण्या ताईला
पद्यहार हा अश्रुजलानें भिजवुनि मीं अर्पण केला !

## तारका

Ye stars ! which are the poetry of heaven !
—BYRON

तारका गमति या जणों स्वर्गिंची कविता
विलसते या स्थळीं नित्यरुचिर अभिनवता !

नैराश्यतमाचें पटल दूर सारोनी
मृदुतेजःसरिता देती या उसळोनी !

या दग्ध मनावर वर्षुनि अमृततुषार
वाहविति पापमय जगीं सुखाचा पूर !

जोडोनी तुटल्या हृदयतंत्रिच्या तारा !
तन्नादध्वनिनें प्रदेश भरिती सारा !

करजालीं पुसुनी दुःखिताश्रुजलधारा
उपजविति विषण्णांतरीं सुखाशा मधुरा !

या तारा–ईशस्तुतिची अक्षरमाला
शिकविती भावमय उदात्तता मनुजाला !

कीं स्वर्ग द्रवुनी तेजोबिंदू गळले,
हतवसुंधरेवरि येतिल केव्हां न कळे !

काढिलीं मंथुनी नभ हीं रत्नें कोणीं
तीं गंफणार तो सांपडला नच अजुनी !

विसरल्या कवीच्या कल्पनाच अथवा या
कोणीच नसे तत्काव्य काय काढाया ?

कीं प्रेमळ कविचे अश्रु काव्यरचनींचे
पसरुनी साधिती मंगल या विश्वाचें !

फेकितों रुक्ष हें मानस त्यांच्यापाशीं
काव्यता स्निग्धता लाभावी कांहींशी;

अविनाशि अल्पसा तेजोलाभहि व्हावा,
संसार तिमिरमय नव प्रकाशीं न्हावा !

विसरवुनि पापमय जगांतले व्यवहार
करिल ही स्वर्गींची कविता जगदुद्धार !

मोकळें नभ न हें तारांनीं कां भरलें ?
कां भूमिवरि पाषाणखंड विस्तरले ?

हें दृश्यजात वा शून्यहि तारक व्हावें,
मग मींहि कशाला तरी भिन्न राहावें ?

## निराशेंतील आशा*

‘ होतें सुंदर तें, मनोहर किती, तें आज गेलें परी ! ’
आहे गाढविषादपूर्ण, जगतीं, ही चालली वैखरी
ऐशी कोण न जी प्रदग्ध अजुनी झाली निराशानलीं
होओनी प्रियनाश अश्रुसरिता जीची नसे वाहिली ?

दुःखाची अनुभूति हीच मजला ये शैशवापासुनी
गेले पोषित हेतु आजवरिचे सारेहि विध्वंसुनी !
आलें ठेवित ज्या स्थळीं अहह ! मी प्रेमांश थोडातरी
स्थानें तीं करि काल नष्ट, बुडवी आशाहि शून्यांतरीं !

---

* प्रस्तुत कविता Moore च्या Disappointed Hopes नामक कवितेवरून लिहिली आहे.

एकादें धरिलें प्रसून हंसरें सानंद हातांत मी
जावें तें सुकुनी अहा ! क्षणभरें मातें करोनी श्रमी !
घालोनी जल नित्य एक लतिका संगोपिली एकदां
गेली वाळुनियां परंतु मजसि ती देत दुःखा सदा !

घालावी अपुल्यास साद म्हणुनी मैनाहि मीं पाळिली
चारा घालुनिया तिला निजकरीं नाहींच ती वाचली !
होता एक कुरंगशावकहि मीं प्रेमें घरीं रक्षिला
गेला अल्पदिनावधींतच अहा ! सोडूनिया तो मला !

केलें मोहित होउनी अजवरी मीं प्रेम ज्या ज्या वरी
गेले कालमुखांत ते प्रिय मला लोटून दुःखांतरीं !
हें जाणूनहि मी कुणावरि पुन्हां प्रीती करूं पापिणी ?
हत्त्यांचें अणखीहि पातक किती घेऊं शिरीं लादुनी ?

आतां या हतभागिनीस गमसी सर्वस्व तूं प्रीतिचें
प्राणेशा ! तव चिंतनाविण दुजें कांहीं न लोकीं रुचे !
पाहावें तुज सर्वदा मधुरवाक्पीयूष प्यावें सदा
‘ माझा तूं ! ’ म्हणुनी, गमे कितितरी तूतें वदावें मुदा !

नाहीं होत परंतु धैर्य असलें भीती भरे अंतरीं,
वाटे जाशिल तूंहि सोडुनि मला त्या काल गर्भांतरीं !
मानी ज्यास मनीं प्रियोत्तम, गणी मज्जीवनाधारहि
त्याला मारुनि कैंवि मग्न करुं मी ही दुःखशोकीं मही ?

या जन्मीं हृदयेश्वरा ! न तुजला मानीन जीवेश मी
त्वत्कंठांतरिं घालुनी विषलता नेणार नाहीं तमीं !
हो दीर्घायु, रहा सुखांत, विभवें भोगीत लोकांतलीं,
कोणीही परिसील न प्रणयवाक् मीं मन्मुखीं काढिली !

भेटूं आपण निश्चयें उभयतां स्वर्गांत एकस्थलीं
दिव्य प्रीतिलता इथील आमुची वांकेल पुष्पीं फलीं;
खारे सागर, रुक्ष पर्वत, तमोराशीहि भीतिप्रदा,
तेथें आडवितील मार्ग आपुला न प्राणनाथा ! कदा

जा तूं दूर कुठें तरी, परि सुखीं तेथें रहा वल्लभा,
होओ मंगल मार्ग, तूज वितरो विश्वेश आशीःप्रभा
कोठेंही वस, दुर्भगेस न घडो केव्हां तुझें दर्शन,
प्राणेशा ! चिरजीवि हो नच कदा माझें करीं चिंतन !

## कोकिलास—

गाच कोकिळा ! अपुलीं गाणीं शांतविणारीं दग्ध मना,
हलवुनि सोडीं भोंवतालच्या उदास या वातावरणा !

नादरसानें भिजवुनि टाकीं रुक्ष एथले फत्तरहि
रूप देउनी भव्य करीं ही स्वर्गाहुनिही श्रेष्ठ मही !

दिव्यादेशें निराश हृदया नवीन देई उत्साह
सुकल्या झाडा फुटे पालवी जैसा वळतां जलवाह

गानरूप तूं गमसि लकेऱ्या तुझ्या पसरतां रानांत,
कीं तव रूपें फिरतें आहे आशेचें मृदु संगीत !

नित्यनवीन ध्वनि तुझा हा वाटे येउनि तोच पुन्हा
असे रोजची तीच उषा पण शिळी वाटली काय कुणा ?

एकच गाणें, ध्वनीहि एकच मोहकता पण दुजी असे
वाटे स्वर्गामधील कांहीं दिव्य अंश त्यामाजिं वसे !

घनराजाच्या एकच सरिनें टवटवीत हो वनराई,
तुझी लकेरी एकच ऐकुनि जीव तसा गुंगुनि जाई!

सृष्टिसतीचा बहु आवडता पिढीजाद तूं गंधर्व,
फिक्के वाटती तुझ्यापुढें ते नाद जगामधले सर्व!

लहान मोठीं भरून गेलीं झाडें हीं झुपकेदार
झुलती आंबे वाऱ्यावरती फुटुनी ताजा मोहोर

तृणें लाजरीं वायुसंगमें खालीं वर माना करिती,
ऊर्मी उठती सौन्दर्याच्या काय तरुण सृष्टीवरती!

नानारंगी फुलें उमलुनी शोभे सारा वनभाग
काव्यतरूचे कोंबच आले उगवुनि कीं जागोजाग!

अशा प्रदेशीं संध्याकाळीं पडलों असतां वृक्षतलीं
भेदित गगना तुझी लकेरी माझ्या कर्णपुटीं भरली!

अमृतरसाचा पूर लोटला स्वर्गांतुनि का मजवरती,
भावजलीं कीं बुडून गेलों, झाली माझी अशी स्थिति!

रवप्रतिरवें शांत व्योमीं होउनि खळबळ किती तरी
मन्नेत्रांतुनि सुखाश्रु गळले झरझर गवती फुलांवरी!

सौंदर्याचा पूर लोटला त्या गाण्यांतुनि सभोंवतीं
आनंदानें फुलवेलींनीं तदा उधळिलीं फुलें किती!

नाद तुझा तो पसरत पसरत गेला माळापलीकडे,
नभीं कशाचा, शिरे अनंतीं लंघुनि गिरिचे उंच कडे!

या विश्वांतिल अणुरेणूही गुंफावा निज गानगुणीं
गड्या कोकिळा! काय सांग ही इच्छा आहे तुझ्या मनीं?

क्षणांत एथें क्षणांत तेथें नाचुनि चंचल नाद तुझा
एथें तेथें गुंफुनि एकस्थलीं, विश्वमय करीं रजा !

आम्रतरूशीं तुझी हितगुजें चालत आलीं अहर्निशीं
प्रभाव त्यांचा घडून येतो परी जगाच्या इतिहासीं !

स्वतांशींच तूं उगीच अपुला गुंगत बससी कांहिं तरी
ब्रम्हांडावर जादू त्याचीं चालविशी पण कवीपरी !

जगास उठवी तुझा गानरव भरुनि रवीच्या तेजांत
शिरुनि फुलांच्या गंधीं निर्मी उत्सुकता जनहृदयांत

हीं झाडें, हे चंचळ ओढे, फार काय जग सारेंही
तुझ्या गानमय सरित्तरंगीं पिका ! सदा नाचत राही !

गासी स्तोत्रं दिव्यभावमय नित्य उगवत्या सूर्याला
नुकत्या फुलल्या रानफुलाला वाहसि गानस्तुतिमाला

अल्लड वेली नाचति तुझिया गाण्याच्या तालावरती,
भ्रमरी झिम्मा खेळति पुष्पांसवें, वृक्ष शिर डोलविती

तो संगीतप्रवाह शिरतां कर्णीं, बंधन फोडोनी
माझा आत्मा गेला अवचित सर्वांहि विश्वीं पसरोनी !

उदित जाहल्या मधुर भावना कितीतरी जड हृदयांत,
अरुणागमनें जैशा रक्तच्छटा पसरती गगनांत !

एकच गाणें परी मनीं भरि भिन्न विकारांची श्रेणी,
शुभ्रच रविकर सुरेंद्रकार्मुक रंगविती जेवी गगनीं

आजवरीच्या आयुष्याचें गमे आज सार्थक झालें,
परवा नाहीं याच उत्सवीं आतां जरि जीवित सरलें !

क्षण हा नाहीं विसरणार मी केव्हांही या जन्मांत,
याच्या लाभासाठीं हांसत सांपडेन भवचक्रांत !

न घडे कां या सुखक्षणांनीं जीवित माझें–विश्वाचें
घुऊन टाकीं तूंच पिका ! तरि कठोरेपण हें ईशाचें
टाक कोंदुनी गानरवानें प्रत्यक्षाप्रत्यक्षाला,
जन्मापासुनि अंत होय तों बुडवीं गानीं जगताला

कसें करावें किती करावें स्वागत चिमण्या गड्या ! तुझें ?
वाणी अडते, मन गोंधळतें, होय काय तें नच समजे !
एक तुझी ती गोड लकेरी फेक वसंताच्या कालिज्या !
उधळुनि देतों तुजवरुनी मी अजवरिच्यां कविता माझ्या !
गाणारा तूं स्वर्गगायनें सृष्टीच्या दरबारींचा,
कसा टिकावा डौल तुजपुढें बाह्यभूषणप्रिय कविचा !
जड शब्दांनीं, गणवृत्तांनीं, निर्बल यमकप्रासांनीं
मृतप्राय ही झाली आहे जगांतली कवितारमणी !
अनंतबंधनजालीं हो का प्रतिभाबल कविचें व्यक्त ?
लहरिविलास स्वैर दिसावे कसे नळाच्या पाण्यांत ?
कसरतवाला चपल किती पण सेनानायक होय कसा ?
गारोडीही कदा विधाता नाहीं व्हायाचाच तसा !
शास्त्र ठेवुनी पुढें, विरचिती पद्यें त्याच्या नियमांनीं,
पीक कवींचें अशाच आम्हां आलें आहे या भुवनीं !
कवी खरा तूं एक कोकिळा ! गान भावमय गाणारा,
चराचरात्मक विश्वगोल हा झुलतो त्याच्यावर सारा !
गानरसीं तव साधीभोळी मही तरंगो फुलापरी,
स्वर्गीं जाओ त्या पूरानें चढतां हळुहळु वरीवरी !
प्रतिक्षणीं दे नवीन फेकुनि अवाङ्मनोगोचर नाद,
अमंगलाही मंगलांत ने घालुनिया भेदक साद

शंभुशिरांतुनि जशी उसळुनी धावे गंगा बाहेर
पाप जगांतिल टाकी ध्वंसुनि तसा तुझाही हा सूर !
याच सुरानें घडेल जगतीं काय तुला तें केवि कळे ?—
रवि न जाणतो अजून कीं निज आगमनें अंधार पळे !

बाळपणीं मीं हाच एकदां सूर मधुर तव आयकिला
पुन्हां आजवर माझ्या कानीं विहगा, तो नाहीं पडला !
गोड आठवण करीत त्याची गोड नाद तो चिंतीत
होतों वागत तसाच विषमय जगांतल्या व्यवहारांत
होउनि चुकल्यापरी कोकिळा ! तुला शोधिलें किती स्थळीं
परी लाभलें नाहीं कांहीं तीव्र निराशेवीण मुळीं !
ठाउक नसतां मार्ग आपुला सैरावैरा पळे नदी,
तसा भटकलों कुठें कुठें तव लागुनि नादाच्या नादीं !
एथें दिसशिल तेथें दिसशिल म्हणून मी सोडुनि भान
भणभण वणवण फिरफिरलों रे कितीतरी रानोरान
या झाडावर असाशिल, दिसशिल दूर तिकडच्या झुडपांत,
लावुनि बसलों दृष्टि सारखी कितीकदां आकाशांत !
काम सोडुनी, धाम सोडुनी, सोडुनि सारे व्यवहार,
त्वदेकचिंतनमयाचि कोकिला ! केला माझा संसार !
तुला शोधण्या पाय धावती, दृष्टी तुजला पाहाया,
अन्य ध्वनिला विमुख कर्ण हे तुझेंच गायन ऐकाया !
अशा रीतिनें महोग्र तप जें आजवरी मीं आचरिलें,
गंधर्वा ! हें आज तयाचें अपूर्व फल गोचर झालें !
किती हिंडलों झाडीमधुनी, किती तुडविलीं मीं रानें,
हिरवीं शेतें किती शोधिलीं रोज नव्या उत्साहानें !

बसतां उठतां सदासर्वदा एकच चाले ध्यान तुझें,
कवि कवितेला किंवा प्रणयी हृदयेश्वरिला जसा भजे
प्रयत्न माझे आजवरीचे सारे निष्फळ होऊन
त्वदीय दर्शनवांछा नाहीं कधीं दिली मीं सोडून
आज जहाली जरी निराशा, उद्यां तरी तूं दिसशील,
या आशेनें न सोडिली मीं उत्कंठा हृदयांतील !
गेला अस्ता भानु, पसरला सर्व स्थानीं अंधार,
विश्व कंठितें रात्र, जाणुनी प्रभात आहे येणार

जन्मांतरिंचीं या जन्मींचीं सुकृतें एक स्थलिं जमलीं,
म्हणुनी कर्णीं गानसुधा तव आज अशी अवचित पडली !
गाच कोकिला ! एकसारखा क्षणही दवडूं नको वृथा
नाशुनि टाकीं व्यथा वाढल्या आठवुनी संसारकथा
दीर्घ पसरली खालीं शय्या हिरव्या कोमल गवताची,
छटा विखुरली नयनमनोहर गगनीं संध्यारागाची,
मरकतमाणिमय मंदिरांत तूं बसुनी गासी संगीत,
अधिक सुखाचा क्षण याहुनि मम असेल कुठला दैवांत ?
चालूं दे तव गानमहोत्सव, विराम त्याला नको पिका,
या गवतावर पडुनि सेवितों किमपि आत्मसंवेद्यसुखा !
जाशिल उडुनी केव्हां न कळे करुनी मागें अंधार,
होइल तेव्हां दृश्यजात हें गायकराजा ! निस्सार
तुझ्या अभावीं स्थिती जगाची होय कशी तें मी जाणें,
जाउं कसा मग एथुनि मंजुळ चालत असतां तव गाणें !
गाच कोकिळा ! क्षणभरही मी एथुनि नाहीं हलणार,
असाच टाको भरुनि अंबरा तुझ्या गायनाचा पूर

या पूरांतिल एकच बिंदु येइल माझ्या कवितेंत
तरी सहज मी फेकुनि देइन दीन धरा ही स्वर्गांत !

स्वर्ग कोठला अथवा दुसरा ? तूंच स्वर्गाचा जनिता
नंदनवनिंच्या पुष्परसाची वाहविसी चंचल सरिता
गमे अप्सरःक्रीडोद्याना परी मनोहर भू आतां
सर्व स्थानीं मधुर स्वर्गप्रभा पसरली तूं गातां !
स्वर्गींचा तूं गायक, तुजला स्वर्गचि उचित रहायाला,
येसी केव्हां समुद्धराया पापपूर्ण या जगताला !
फेरी आहे गंधर्वा ! तव भाग्यादिनीं इकडे झाली,
सुकून गेल्या वनीं घनाची स्वारी वाटे कीं वळली !
वसंतमित्रा ! जयगीतें तुज किती वहावीं हर्षानें
प्रेम तुझें मीं व्यक्त करावें कैसें या जड वाणीनें ?
करीं गानमय विश्वगोल हा, जडाजडाचें गान करीं,
गाण्यांवाचुनि नुरवीं कांहीं गानपटो ! वार्ता दुसरी !
होतिल कंटक फुलांसारखे उच्चनीचता लोपेल,
बाभळिचींही झाडें स्पर्धा कल्पतरूंशीं करितील !
मूक भावमय काव्यरसानें होउनिया बेफाम अति,
दुबळीं हृदयें पिका ! हलवुनी सोडितील ही जड जगती !
विश्वरूप हा भगवान् गाणीं तुझीं गोड हीं ऐकोनी
तुजवरि तारकमिषें सुखाश्रू ढाळितसे बघ वर गगनीं !

## दिव्य मंदिर आणि लेख

कीर्ती मागें टिकावी म्हणुनि विराचिलीं मंदिरें भूपतींनीं
गेलीं कालोदधीच्या प्रबल लहरिंनीं नाशुनी तीं कधींच !

होतें आकाशचुंबी विलसताहि जिथें स्तंभ मोठे यशाचे
भूकंपें ते पडोनी दिसत न उरली खूणही आज त्यांची !

ज्यांच्या नामस्मृतीनें चळचळ हृदयीं कांपले शत्रु सारे,
गेले ते दुर्ग कोठें ? हरहर दिसती चूर्ण झाल्या शिलाहि !
खोदोनी नामकृत्यें उपलिं, चिरयशःकामना बाळगून,
केल्या ज्या ज्या समाधी, दिसत आजि जगीं धूळ त्यांची जहाली !

आहे केवळ विश्वमंदिरचि हें अद्यावधी निश्चळ,
व्योमाच्छादनही अजून अगदीं हें जीर्ण झालें नसे
आहे एक कुठें महापुरुष तो, तत्कीर्ति हें गातसे
नाहीं आजवरी परंतु कुणिंही त्याला कधीं पाहिलें

जागोजागीं किती हे अगणित भरले दिव्य भाषेंत लेख,
सारे ते एकभावें स्तविती अनिश त्या पूरुषाच्या गुणांला
विश्वाचा सूक्ष्म रेणु स्तुतिरवविभवें फेंकितो आसमंतात्
व्योमीं ताराक्षरांनीं स्तुतिच विरचिली दिव्यतेजःप्रपूर्णा !

संध्यारागांत अभ्रावरिल विशद तो जाणिला भाव कोणीं ?
किंवा देवेंद्रचापीं मधुर उमटलीं अक्षरें कोण पाही ?
नानाही लेख ऐसे प्रतिदिनिं दिसती सर्वतां विश्वभागीं,
सांगा वाची तयांची लिपि अजवरिही कोण दिव्याद्भुता ती ?

नानादेश फिरूनिया निरखिलीं सारीं महामंदिरें,
यत्नानें जरि वाचतांहि अथवा आले शिलालेखही,
सारे व्यर्थचि, विश्वमंदिर पहा हें एक, तत्त्वप्रिया!
यत्नें जाणुनि दिव्यपूरुषगुणां हो धन्य विश्वांतरीं !

## प्रेम आणि सत्कार

पत्रीं तूं लिहिलेंस कीं " उचितसा केला न सत्कार मी,
औदार्यें मजला तुवांतरि गड्या! याची करावी क्षमा "

नांदे प्रेम विशुद्ध तेथ असले हे बोल का शोभती ?
सत्कारास्तव जें अडून बसतें तें प्रेम नाहीं खरें !

प्रेमाच्या घरिं केधवा न निघते बाह्यादराची कथा
वाटे ढोंगच हें उठून म्हणणें " या, या, बसा या स्थळीं "
झालीं एक मनें तिथेंच परकी वृत्ती कशाला अशी ?
येतो आदर दृष्टिनेंच दिसुनी, पांडित्य तेथें वृथा !

यत्नानें मुख हांसरें करुनि हो आस्निग्ध सत्कार जो,
तो प्रापंचिकहेतुसिद्धिकरितां, मित्रत्व तेथें नसे
प्रेमानें मन पूर्ण होउनि दिसे सार्धेच जेथें स्मित
तेथें आदरभाषणें आमितही बोलून होती वृथा !

चित्तें दूर असून काय जवळी आलीं शरीरें तरी?
सत्यार्थाविण बोलुनीहि ठरते सत्कारवाणी वृथा!
येतां मित्र घरा उठून सहसा त्याचें करी गौरव—
जाणें तो व्यवहार पंडित, परी प्रीती न त्याची खरी

ये ओढ्यास गढूळ पूर, पसरे त्याची किती गर्जना,
गंगापात्र भरून संथ अगदीं चाले, करी न ध्वनि
आधीं प्रेम दिसे, दिसेल वचनीं मागूनिया आदर
अंतःप्रीति न केधवाहि कितिही बाह्यादरांनीं कळे !

## हास्य संगीत

मधुर हास्यनादीं सारें विश्व झुलनि राही
रितें स्थान हास्यावाचुनि एक जगीं नाहीं !

हंसति किती हिरवीं शेतें ( रानें ) नाचनाचतांना,
हंसाति गूढ चंचल ओढे घेत गोड ताना,

वायुलहरि खद्‌खद्‌ हसती गगनिं धांवतांना,
हास्यनाद घुमविति भंवतीं उंच टेंकड्याही !

हंसति हळुच डुलतीं कुरणें लाजुनिया गालीं,
गवति फुलें खुदकन हंसती रम्य विभवशाली,

रानपांखरांच्या हास्यें वनें भरुनि गेलीं,
हंसुनि दडुनि झुडपामध्यें विपिनदेवताही !

हंसुनि हंसुनि नानारंगी फुलपांखरांनीं
वाहाविली जिकडे तिकडे हास्यनदी रानीं,

बिंदु कांहिं त्यांतिल नेउनि गगनदेवतांनीं
दिसे आज केली स्वर्गापरी मेदिनी ही !

हास्य एथ तेथहि भरलें अणुहि हांसताहे,
हास्यनदी शून्यांतुनि ही आज वाहताहे;

उदासीन दुःखी मग का दूर कोण राहे ?
चला भरुनि नभ हें टाकूं हास्यगायनांहीं !

## कृष्णा

अंधाराची छटा झाडुनी वसुंधरेवरुनी
अरुणकरांनीं दिधलें उधळुनि सोन्याचें पाणी;

चमचमणारे लज्जित डोळे रजनीदेवीचे
बसले होते आंत दडूनी निळया अंबराचे;

प्रभातदूती शुक्रतारका गाउनि संगीत
होउनि गेली होती नुकती लीन अनंतांत;

पूर्वदिशेला दिव्यानिधीचा स्फोटच होऊन
दिव्यरसाचे ओघ जगावर गेले दाटून;

त्या ओघांच्या संगमविभवें बनली कृष्णा ही
महोत्सवाविण लोकीं नुरली दुसरी वार्ताहि !

करित हितगुजें तीरभूमिशीं, लाटा उघळीत
तटगत कोमळ तृणांस चाले ही कुरवाळीत !

दूर पसरलीं हिरवीं शेतें, तरु हिरवेगार,
काय उघाडिलें हरितवस्तुंचें एथें भांडार !

प्रदेश सारा मरकतमणिमय सृष्टीनें रचिला
भाग्यवतीला श्रीकृष्णेला जणों जावयाला

मंजुळ शब्दांमधून धांवे रसौघ काव्याचा,
हिरव्या वस्त्रांतून शोभतो देह सुंदरीचा,

पवित्रतेची सौंदर्याची भावगायनाची
मूर्तिच कृष्णा चाले तैशी सीमा दृश्याची !

लहरिकरांनीं तीरलतांना जातां आलिंगी,
त्याही तिजवरि फुलें उधळिती हीं नानारंगी

दूर शोभती उंच टेकड्या लहान मोठ्याहि,
तेथें दाटी होउनि झुलत्या झुडपांची राही;

त्या झुडपांतुनि ओघ लोटले मौक्तिककांतीचे—
ओढे धावत लंघुनि येती प्रदेश हिरवळिचे

श्रीकृष्णेच्या प्रवाहामधें वेगें ते शिरती
बाळें जननी—उत्संगावरि जेविं उड्या घेती !

तीरावरुनी चिमणीं गांवें दूर किती दिसती
जणों इयेच्या प्रवाहसूत्रीं असति गुंफिलीं तीं !

देखावा हा द्विगुणित हर्षे असता पाहियला —
माझी ताई असति इथें जर मम सान्निध्याला !

* * *

मुली हांसऱ्या भरभर फिरती तीरलतांमधुनी
नुकतीं फुललीं फुलें तोडुनी घेती हातांनीं

काळे डोळे त्यांचे चंचळ चहूंकडे फिरती
दिसती भृंगे जणों बैसले कमळदळावरती !

फुलें तोडितां कांहीं मंजुळ गाणीं गुणगुणती
सुरानेंच या होउनि वेड्या फुलवेली डुलती

शब्दहि नाहीं, अर्थहि नाहीं, केवळ गुणगुणणें
परंतु मोहक असलें गाणें आयकिलें कोणें ?

त्या गाण्यानें थरारुनी हे अणुरेणुहि गेले,
अहा ! जुन्या या वसुंधरेवर तेज नवें आलें !

दुःखनिराशा यांचा लेशहि विदित यांस नाहीं
केवळ कंटकहीन 'उद्यां'चें सौख्य भरुनि राही !

श्रीकृष्णेच्या तीरावरुनी—या स्वर्गामधुनी
चिमण्या नंदनदेवी फिरती चिमण्या पायांनीं

हास्य तयांचें गेलें पसरुनि सभोंवार गगनीं,
पूर तयाला मंजुळ हास्यें कृष्णाही आणी

स्वर्गानंदीं हास्यतरंगीं बुडुनी जायाला
एकच आहे उणीव मोठी भासतसे मजला—

ताई माझी याच शिळेवर बसुनी मजजवळीं
घालुनि हातीं हात पाहिजे होती या वेळीं !

* * *

पाजुनि पाणी वात्सल्यें तूं वेली वाढविल्या
त्या या आतां पुष्पभरानें बघ वांकुनि गेल्या

इकडे दिसशिल तिकडे दिसशिल म्हणुनी या गडणी
वरचेवर तुज बघति चहुंकडे साऱ्या फिरफिरुनी

फुलें हांसरीं यांचीं आतां तोडुनि मी ताई !
तुला धाडितों, देइल नेउनि ही कृष्णाबाई

जातिल सुकुनी, मलूल होतिल गंधहि हरपून,
परी फुलें तीं नकोच टाकूं तूं धिक्कारून !

नाचत कृष्णेपरी तुजकडे येतिल तीं हंसत
तारामंडळ जसें शोभतें नीलाकाशांत !

फारच माझीं आवडतीं हीं फुलें गडे असती
—कीं लीलेनें तुझ्या, जगावर जन्मा आलीं तीं—
हें जाणुनि तूं त्यांचें स्वागत सादर कर ताई !
उचलुनि त्यांना प्रेमळ मातेपरि हृदयीं घेई

त्यांस पाहुनी, तुझ्या वियोगें उदास झालेलें
मानस माझें समजुनि येइल तुजलागीं बाले !

होउनि पूर्वस्मृती प्रेमळे! हृदय कालवून
त्यांच्यावर तूं टाकशील गे अश्रुबिंदु दोन;
त्या अश्रूंनीं शुष्क फुलें तीं भिजून जातील,
याहुनि दुसरें वैभव त्यांना कसलें लाभेल ?
देवहि पुष्पें टाकुनि देतो एकच दिवसांत,
पूज्यपूजकां निर्माल्याची स्मृतीही न होत!
त्याहुनि ही स्थिति किती वंद्य त्या फुलांस लाभेल !
पाप असे का, अश्रुनदी जें धुउनि न टाकील ?
मींच धाडिलीं तुला फुलें हीं तुजला समजेल—
किती मग मला प्रेमें मूकादेश धाडिशील !

त्या आदेशां गुंफुनि गानीं उन्मन होऊन
सदासर्वदा कृष्णातीरीं बसुनी गाईन !

* * *

शिलाखंडमय या प्रांतांतुनि धांवे कृष्णा ही,
शुभ्र रजतमय फेनावलि ही जलीं भरुनि राही

प्रदेश सारा भरुनी गेला सौंदर्यें आधीं
त्यांत मोहिनी ओती कृष्णा निजमंजुलनादीं !

अहर्यामिनी इचें चाललें अविरत संगीत,
ऐकत वसतीं तारे रात्रीं जागत गगनांत !

घेत कितीतरि मोहक वळणें वरून ही आली
नाजुक वळसा घालुनि अवचित गुप्त पुढें झाली !

पर्णीं दडलें फूल, पळाली बाला लाजून,
तीही शोभा फिकी या स्थळीं गेली होऊन !

वृक्षलतांनीं गजबजलेला धन्यच हा प्रांत,
श्रीकृष्णा तर वाटे अगदीं अनुपप निभ्रांत !

प्रतिक्षणाला नवीन शोभा, नवेंच संगीत
कृष्णाबाई ! विभव तुझें गे हें काव्यातीत !

अगदीं अरसिक लोक बघुनि तुज भुलुनी जाईल,
उन्मन मग कां झाल्यावांचुनि राहिल कविशील ?

जीवित सारें याच ठिकाणीं बसुनी कंठावें
श्रीकृष्णेचें निस्तुल वैभव पाहत राहावें;

तरंगवलयांतून निघालीं मंजुळ जीं गाणीं
त्याच सुरासह अनंतामधें जावें विरघळुनी !

अत्यंत प्रिय सृष्टिस झाला, मलाहि आवडला,
असा एक हा प्रदेश साऱ्या भूवरि मज दिसला !

करिते सृष्टि स्वैरविलासां कृष्णेसह एथें,
उदास माझें मनहि या स्थळीं गुंगुनियां जातें

या नयनोत्सविं मजसंगें तूं ताई ! असतीस—
निरुपम शोभा येती तर या कृष्णातीरांस !

## वसंत

झडुनी पानें, फुलें गळोनी सुकलीं सारीं वनें,
झाडें वठलीं वाळुनि गेलीं, दिसे दिगंतर सुनें

हेमंतानें वृद्धा अगदीं होय सृष्टिसुंदरी
तुफान वारा आक्रोशानें अंबर सारें भरी

सृष्टीची मृतकळा वारुनी रूप नवें तिज दिलें
तिला खोडकर कुणीं मुलानें मरतांना हंसविलें !

हिंवाळ्यांतली तीच काय ही म्हातारी वसुमती
आतां तिजवर आहे अभिनव तेज फांकलें किती !

हा हास्याची—छे जादूची छटा गोड पसरली
सौंदर्याची नदी चराचरिं त्यानें ओथंबली !

या कांटेरी झुडपावरही मोहकता दाटली,
माळावरचीं चिमणीं झाडें आज किती शोभलीं !

तीच सृष्टि ही दीन पूर्वीची आतां दिसते कशी—
दुष्यंताची राणी होतां शकुंतला ती जशी !

वठल्या झाडा कुणीं आणिली सुंदर ही पालवी ?
मूढ जनांही मोहुनि ढाळवि अश्रू जैसा कवि !

कठोर पर्वतभागांतुनि ये झरा जसा धावुनी
तशीं निर्मिलीं कुणीं फुलें ही सुकल्या वृक्षांतुनि ?

जिकडे तिकडे कोमळ पानें आणि फुलें हांसरीं
यांविण नाहीं वार्ता दुसरी साऱ्या सृष्टीवरा !

झुलती वेलीवरी कळ्या किति चंचल वायूसवें
येति सुगंधी किती फुलांचे बहर रोजही नवे !

कुणीं फुंकिला मंत्र असा हा ? जादुगार तो कुठें ?
हर्षामध्यें कसें एकदम दुःखरूप पालटे ?

* * *

फुलांस हंसवित, तरूंस डुलवित, कुरवाळित वेलिंना
वायुलहरिंवर बसून आला वसंतऋतु आज ना ?

गड्या वसंता ! किती करावी तुझी निरुपमा ! स्तुति ?
प्रचंड वैभव तुझें पाहुनी कुंठित होते मति !

भालदार नव पिकराजा हा ललकारित चालला,
थरारवी निज गानरवानें या दुर्भंग सृष्टिला !

तव चरणांचा स्पर्शच नुसता होतो ज्या ज्या स्थलीं—
तेथें तेथें नानारंगी दिसति फुलें विकसलीं !

तव चरणांतिल गळुनि अमृतरसबिंदू साऱ्या वनीं—
सरसरुनी ये गोड पालवी वठल्या झाडांतुनी !

तूं हास्याचा आनंदाचा निधि अससी माधवा !
विषण्ण जगतीं पसरुनि देसी सुखलहरी अभिनवा !

आत्मसुखानें सुखावणारे नाहिंत थोडे भुवि
परसुखवर्धनकरा तुझ्यासम म्हणुनी स्तविती कवि !

धन्य वसंता ! आगमनें तव काय पहा जाहलें—
जिकडे तिकडे स्वर्गसुखाचे पूर भरुनि चालले !

* * *

पण न लाभला त्या पूरांतिल एकहि बिंदु मला
वसंतमित्रा! खरेंच याचें भूषण नाहीं तुला !

नाचति वेली, गाति पांखरें, आकाशीं धांवती,
त्या झुडपांतिल दगडहि दिसती आनंदी ते किती !

मींच कोणतें पातक केलें? कीं तव सुखकालिं या
सांग वसंता योग्य नसावें हांसानाचावया ?

माझीं झाडें जीं सुकलीं तीं कायमचीं वाळलीं,
फुलेंहि पडलीं गळुनि पुन्हां तीं नाहिं कधीं हांसलीं ?

वेली वाळुनि गेल्या माझ्या फुटे न त्यां पालवी,
हाय! वसंता स्वप्निंहि आलीं फुलें न त्यांना नवीं !

सर्व जगावर वसंत खेळे, फक्त न माझ्या घरीं,
जगांत भरला प्रकाश, वसतों पण मी तिमिरांतरीं !

माझे गेले दिवस सुखाचे, न पातले मागुतीं
ओसाडीचें राज्य पसरलें खालींवर संप्रति !

सुकल्या झाडा फुटतिल पानें, येतिल पुष्पें फुलें,
जळून गेल्या झुडपा अंकुर नवे कुणीं आणिले

वसंत आला, वसंत गेला, काय मला त्यासवें
जन्मांधाला कसलीं सांगा प्रभातरविवैभवें ?

ज्यांना आहे 'उद्या', अंतरीं क्षीणहि आशा वसे,
वसंत त्यांना सुखविल पण सुख लव मज होइल कसें ?

* * *

सर्व जगावर तुझा वसंता ! जयध्वनी चालला,
चराचरावर तुंहि सुखाचा पूर नवा ओतिला;
यावें घ्यावें  रीतच आहे, करो जग तुझी स्तुति
वाहिन मी तुज परंतु अदया ! अश्रुबिंदुची तति !
येसि परत तूं पण सुख माझें परत न कां आणिलें !
सुखस्मृतीचे विषमय हा हा ! पोत मना लाविले !
ते हास्याचे सत्य सुखाचे शैशवदिन चिंतुनी
काय वदावें तुला—वसंता! कसें होय जें मनीं ?
सुखप्रसंगीं कटुदुःखाची जाणिव दुःसह गमे
तेजोहीना दृष्टि निरंतर अश्रुवाहिनी वमे ?

*      *      *

गाति कोकिळा मंजुळ गाणीं झाडा झाडावरी,
रानफुलेंही हांसति खुदकन हिरव्या गवतावरी,
उन्हांत झगमग मधमाशीचे पंख किती चमकती
भृंगे गुं गुं करित जाइच्या वेलीवर नाचती
परंतु उठतो शूळ कपाळीं ऐकुनियां तो ध्वनि
भेसुर सारा देखावा हा दिसे खरा लोचनीं !
गायनांतली जादू गेली तशी सृष्टिरुचिरता—
नीरस होउनि तुच्छ जाहली जगांतली चारुता !

*      *      *

चारुत्वाची मूर्तिच पण मम ताई नसतां इथें—
काय वसंता ! हर्षविशिल तूं विषण्ण मम वृत्तितें
बसलों गाणें वसंतावरी रचावयाला गडे
परंतु सारा ओघ शेवटीं वळला हा तुजकडे

तवाचि स्तवनीं कविता माझी कसलीही धांवते,
कुणीकडेही सरिता चालो, सागरींच मिसळते !
वसंतदेवी आयुष्याची माझ्या तूं एकली ! |
तुझ्याचसाठीं ताई ! माझी कविता मी निर्मिली ?
तुला सोडुनी अन्य विषय तिज कसा रुचावा बरें ?
संधि पाहुनी तुझ्याकडे ती सहसा वळते त्वरें
वसंत वर्णन तुझ्या रूपगुणिं लीन जहालें असें—
कठोर टीकाकारगणीं मम यास्तव होतें हंसें

हंसोत कोणी, म्हणोत भलतें, परवा नाहीं मला,
तुझ्याच चरणीं असे वाहिलें सतत काव्यवाणिला !
जड मधुमासा वर्णुनि केवळ सुख लाभे मज कसें ?
ताई ! तुजविण दिव्य विभूती एकही जगतीं नसे !
विषण्ण माझ्या मनीं शांतिचा सुखबिंदू वर्षुनी
तूंच एकली टाकिसि मजला आनंदीं बुडवुनी !
भगिनी ! तुजविण कुणास वर्णूं सांग सांग देवते ?
कळेल कोणा तुज चिंतुनि जें काव्य मनीं उसळतें !
छटा त्यांतल्या कांहीं कांहीं ठेवित या गुंफुनी
कृतार्थ होइन कधीं तरी तव चरणीं त्या वाहुनी !

## निरोप

जाच एथुनी कविराया ! या सोडुनि दीनेला—
विषमय माझी स्मृती न व्हावी केव्हांही तुजला !
कृष्ण घनांनीं झाकुनि जावी चंद्राची कोर
सुंदर सृष्टी अदृश्य व्हावी पडुनी अंधार,

बुडुनि वालुकाकणांत अथवा नव मुक्ता जावी
अर्णवलहरीमधें तळाला रत्नें राहावीं,

तसें मदीय प्रेमनिराशादारुणतिमिरांत
काय रहावें तुझें कवींद्रा ! हृदय दिवसरात !

पापिणिला या सोडुन जा—जा—विसरुनि ही रजनी,
ऊठ सुवर्णप्रभातकालीं आनंदें हंसुनी !

मनोव्यथेवर विस्मरणाचा पडदा टाकून
दिव्यरवानें व्योम व्यापी गाउनि नवगान !

नसेन जवळी कविराया ! तरि सदा गोड हांस,
रहा प्रमोदें जरीहि नसला माझा सहवास;

बसलें इकडे ढाळित अश्रू नसेन ऐकाया,
तरि न विरत हो सुरुचिर अभिनव तव काव्यें गाया !

तुजला नित्य प्रकाशमय सुख लाभो प्राणेशा !
स्मरण न माझें करो कधीं तव मनःशांतिनाशा !

*　　*　　*

प्रकाशमय तूं दिननाथापरि, तिमिर न तुज ठावें
तव संसर्गे चिरप्रकाशित वस्तुजात व्हावें

निराशहृदयां आजवरी तूं दिलास आधार,
उदास दुबळ्या जनांस आला तुझ्यामुळें धीर;

दुःखाश्रूंचीं फुलेंच केलीं तुझिया कवितेनें,
मलूल चित्तें हांसत उठलीं तव मधुगानानें !

भव्यात्मा तो तूंच असा कां दुःखी झालास ?
वद जीवेशा ! तुझाच कैसा बोध विसरलास ?

कल्पित तिमिरीं आपुल्यास कां बुडवुनि घेतोस?
उदात्त हृदया भलते असले कां देसी क्लेश ?

पायधुळीच्या कणासारखी—मी ऐसी कोण !
कां या दुबळीसाठीं जासी उदास होऊनं ?

मजकरितां तूं कविकुलनाथा ! अश्रू ढाळावे—
अपुल्या जीवनसुखावरी जळ अगदीं सोडावें—

नाहीं माझी अशी योग्यता—होउं नको दीन—
खरेंच कथितें वाहुनि तुझिया पायांची आण !

तव काव्यें मृत जगीं होय नवजीवनसंचार
होउनि जातें आयु जडाचें केवळ सुखसार !

निधिच असासि तूं दैवि गुणांचा, तेजोत्रिभवाचा
खेद मानिसी या पापेच्या वृथा वियोगाचा ।

जन्मुनि तिमिरीं तिमिरांताचि जी मरून जाणारी
या 'तारे'स्तव दुःखी करिसी कां सृष्टी हंसरी !

दारुण तिमिरीं किति तारांचे व्यर्थ जन्म झाले,
जातें त्यांला विश्व विसरुनी पूर्ण अल्प कालें;

तुटली तारा पडुनि अवनिवर होवो चूर्णा ती
रहा तूं तरी चमकत दयिता ! नित्य नभःप्रांतीं !

तुझ्या प्रकाशें दिव्य रुचिरता विश्वाला आली,
तूं जातां तें बुडून जाइल गाढ तमःपटलीं !

पवित्र निर्मल तुझ्या संगमें दिव्याचे स्रोत
उसळुनि पार्थिव वस्तुजात हें दिव्यपूर्ण होत !

वसुंधरेला स्वर्गपदावर चढावियलें तूंच
कोसळेल ती कोठें न कळे कवि तूं जातांच !

तूं गेल्यावर नेत्र कर्णही निष्फळ होतील,
फार काय हें जीवितही मज ओझें वाटेल !

* * *

वाटो मजला कांहीं, होओ माझें कैसेंही
जाच एथुनी कविराया ! तूं, क्षण न इथें राहीं

व्हावें विद्युत्स्फुरण घनांनीं भरल्या आकाशीं,
स्वप्न पळावें किंवा लावुनि चटका हृदयासी,

तसा एकदम कुठें तरी जा बुडवुनि मज तिमिरीं,
अगदीं पाहूं नकोच माझी सुटली अश्रुझरी !

एथुनि जातां वळूनही तूं पाहुं नको मजला,
हाक न मारिन मीहि अश्रूंनीं पदर जरी भिजला !

विश्वांतिल ती अमर सदाशा आणिक सुंदरता,
रक्षायातें असोत तत्पर तुजला काव्यरता !

आनंदाचा निधी एथुनी जा तूं कोठेंही
अपुल्यासंगें ने विश्वांतिल सकलानंदाही

माझीं सारीं सुखें तुझ्यासह जातिल हृदयेशा !
सुकून जाइल तुजमागें मम अंधुकही आशा !

मजवरची तूं आशा प्रीती विश्वावर पसरीं,
सृष्टिसुंदरी होइल दयिता तुझी पुढें दुसरी

जाच वल्लभा ! म्हणतें वल्लभ तुजला शेवटची,
जगांत तरि या भेट आमुची पुन्हां न व्हायाची !

पुन्हां उगवतो रोज सकाळीं नियमित दिननाथ,
तद्विरहानें तरी किती करि सृष्टी आक्रांत,–

नाथा ! परतुनि पुन्हां कधीं तूं यायाचा नससी–
आनंदानें निरोप तरिही देतें हा तुजसी !

जा तूं आतां कुठेंहि होउनि दिव्याचा दूत
काव्यगायनें करीत संतत पापाही पूत !

बसेन एथें मी–पण माझी गोष्ट कशाला ही ?
थोडे अजवरि काय चिरडले दैवविलासांहीं ?

## कोकिलास

नभ श्यामलजलधरव्याप्त झालें,
इंदु, तारक नव सकल कुठें गेले;
मनःकंपन अति गाढ तमःस्रोतीं
बुडे स्थिरचर, न दिसेचि लव ज्योति

व्योमदेवी ढाळिती अश्रुधारा,
आर्द्र झाला हा भूमिभाग सारा;
चुरुनि काळे ढग चंडपदाघातीं
भुतें गीतें भेसूर पहा गाती !

दिव्यललनामंगलाभरणमाला
कुणीं करका फेंकिल्या भूतलाला;
अधमपापोच्छ्वसनोग्रवन्हितापें
विरति त्या, हें देखुनी हृदय कांपे !

मंद गंधाकुल सुखद अनिल नाहीं,
लता कुठल्या नत नवप्रसूनांहीं !

मृदु ज्योत्स्नेचें हास्य रुचिर गेलें
भ्रमरगुंजनही लुप्त आज झालें !

बाभळीची भूषवुनि एक फांदी
पिका ! अंबर भरिसि कां मंजु नादीं ?
स्थान, कालहि आणिला काय ध्यानीं ?
तुष्ट होइल कोण रे तुझ्या गानीं ?

प्रबळ झंझानिल कसा वाहताहे,
विषादाचें साम्राज्य भरुनि राहे;
दीन विधवेसम अवनि दिसे आजी
पहा कांपे सोन्माद वृक्षराजि !

दिशा निर्विण्णा, व्योम उदासीन,
ललित सृष्टीही दिसे मोदहीन;
शैलशिखरें नावीन्यशून्य सारीं,
विपिनकुसुमें तर लाजरीं बिचारीं !

सर्व ठायीं पसरुनी मलिन तोय
क्षुद्र निर्झर, गंगाहि एक होय;
तमःकालीं या अशा कासयाला—
पिका ! मित्रा ! लागसी गावयाला !

हृदयिं उठती बेसूर शोकगीतें,
तडिद्गर्जन शून्याहि हालवीतें;
शब्द कर्कश भालुका करी दूर,
चढे घूकानंदास आज पूर !

मंजु मधुर स्वरलहरि अशा कालीं
वृथ फेकिसि कां पिका अंतरालीं ?

स्वर्ग-नरकाची स्मृती करूनि ताजी
क्लेश देसी कां दग्ध मना आजी ?

पुरे आतां गायका ! तुझें गान,
पाहिं अथवा सत्वरी दुजें स्थान,
कटु क्रंदन, संगीत मधुर, यांचें
साहचर्य न मज तरी रुचायाचें !

तिमिरमग्ना तिमिरांत असूं यावें,
तडित्तेजीं व्यर्थ कां चाळवावें !
नीघ एथुनि, हा प्रांत न स्मिताचा—
विषादाचा, शोकाश्रुवर्षणाचा !

## खरी कविता

काव्य विश्वींचें । वाणींत केंवि उतरावें ?

खुदकन हंसली उषा लाजरी
लाली चढली दिग्वदनावरि
व्योमीं सुटली प्रकाशलहरी
वर्णाया हें । कोठले शब्द आणावे ?

चमचम करिती तारे गगनीं,
धावति ओढे झुळझुळ रानीं,
गाति पांखरें मंजुळवाणी
हें वर्णाया । कोणीही मूकच व्हावें ?

गोजिरवाणीं फुलें चिमुकलीं
झुलति कडेवर घेउनि वेली
त्यां वर्णाया वाणी सजली
सजो परती ती ! परि केंवि तिला यश यावें ?

मूकभावनातरंग उठती
जड वाणीला काय उमगती ?
'ट'ला'ट' जे जोडित बसती
देहवाद्यांना । निजरूप कसें लाभावें ?

कठोर कोमळ शब्द पहावे,
वृत्तांच्या सांच्यांत भरावे,
यमकप्रासीं बहु नटवावे
काढुनी छाती । कवि म्हणुनि जगीं मिरवावें !

इतुकी सोपी का कविपदवी !
असलीं काव्यें जळून जावीं ?
वटवट नुसती ऐकुनि घ्यावी
पाहती सारे । आपलीं टिकाया नांवें !

देवा ! असली अधम वासना
स्पर्शो केव्हांही न मन्मना !
कीर्तीसाठीं काव्यविरचना !
जळो वाणी ती ! दंभ हे कशाला व्हावे ?

शब्दांसाठीं, यमकांसाठीं
अथवा बाळ्या बुगड्यांसाठीं
किंवा कुजक्या रूढीसाठीं
कविताबाळे ! काय तं अडुनि बैसावें !

शब्द नको हा, चाल नको ही,
बंड उभविलें कविपुत्रांहीं;
दिसे न कविता पण कोणाही !
बिंब रवीचें । अंधांना कुठलें ठावें !

मनहि जियेच्या जवळ न जातें
ज्ञान तिचें का हो वाणीतें ?
गणवृत्तांचे संघ वृथा ते !
चित्र दीपाचें। देखुनि तम केंवि पळावें ?

शाब्दिक कविता जगांत भरली
जादू सरली विश्वावरली !
प्रासीं कोकिलगानें मेलीं !
शब्दनादानें। अर्थगीत न कुणा ठावें !

त्या अर्थास्तव, त्या भावास्तव,
जादु सृष्टिची जाणाया नव
अंतरिंचा फेंकीत मूक रव
मुके गाणारे। कवि नवेच आतां व्हावें!

काव्यगायनीं काव्यच व्हावें,
काव्यपारखी दूर बसावे ,
काव्यीं आत्मे मुरुनी जावे ,
दगड माळाचे। तारांपरि दिव्य दिसावे !

मुका काव्यरस जगांत भरला,
किती जणांना परि तो कळला !
बसले जुळवित जड शब्दांला !
चित्रबंधांनीं। छे, भरलें जग कांट्यांनीं

साधी भोळी कविता मेली,
बहुभूषाप्रिय वेश्या आली,
रुचि रसिकांची बिघडुनि गेली
आसुरी माया। सर्वत्र जगीं या धावे !

त्या मायेनें मनें व्यापिलीं
सच्चित्सुखमय मूर्ति लोपली,
शास्त्रबंधनीं कविता बसली,
रुक्ष विश्वांत । रसपूर कसे वाहावे ?

फोड बंधनें, तोड शृंखला,
देवा ! मुक्त करीं कवितेला,
वाढव वाढव शशिबिंबाला,
कीं बिंबें त्या । नीलांबर पूर्ण भरावें !

अपूर्ण सारें पूर्ण होउनी
पूर्णीं जावें विश्व विरूनी
देइन मग लेखणी फेंकुनी
पूर्णपणांत । बोलाया कुठलें फावे !

## ईशस्तवन

प्रेमभरानें गाऊं प्रभुच्या मंगलमय नामा,
ध्याऊं संतत हृदयनिकेतनिं त्या गुणगणधामा !

विश्व तरंगवुं शांतिरसाच्या मधुलहरींवरती,
उज्ज्वल बंधुप्रेमा आणूं चिरकालिक भरती,
अनाथ पतितां देऊं यत्नें समुन्नतिस्फूर्ति,
स्तवुनी सादर अनन्य गतिनें त्या विबुधारामा !

रविप्रभावें प्रकाशमयता येते तिमिरातें—
प्रभुचे सेवक आपण देऊं शुभता अशुभातें;
दिव्य सुमंगल पवित्र वितरूं रूप निसर्गातें
स्थिरभावानें सेवुनि अनुदिन त्या दीनप्रेमा !

पदक्षेप करुं आज काळच्यापुढतीं धीरानें,
दिवस उद्यांचा निर्मूं भरुनी नूतन विभवानें,
व्यापुनि टाकूं समभावानें नगरें वा विपिनें
राज्य प्रभूचें एथतेथ भरुं—या धरुनी कामा !

## पुरी निराशा

विसरुनी जगींचा व्याप बुडवुनी सृष्टि शून्यांत
दाबुनी मनोव्यापार जाहलों लीन नादांत,
जुळविल्या प्रयत्नें तारा फिरविला एकदां हात;
वीणेंतुनि कलरव उठला गजबजलें अंबर शांत;

आनंदें वरती बघतां
प्रेमळ तो न दिसे श्रोता !
जीसाठीं श्रमलों आतां—
ती कोठें जाउनि बसली ?

पसरल्या ढगांच्या गाद्या नीलांबर झाडुनि सारें;
सोत्कंठ धाडिले पुढती नवपुष्पसुगंधित वारे;
स्वागता कराया जागे चहुंकडे ठेविले तारे;
भिजविले मार्गही यत्नें स्वर्णदिच्या शीत तुषारें

अवसेची सारी रजनी
कंठिली अश्रु ढाळोनी
विधुकला न दिसतां नयनीं
अरुणश्री पुढती ठेली !

तुजसाठीं देवी ! कुतुकें गायिलें हास्यसंगीत;
तुजसाठीं जीवित दुःखें साहिलीं राहुनी शांत;

तुजसाठीं धरिले कांटे पुष्पापरि मी हृदयांत;
तुजसाठीं नांदत होतों विषमय या संसारांत;

हें केलें मीं जीकरितां
ती तूंच विसरसी आतां—
या दीना तव गुणविरता ?
मग आशा आतां कसली ?

## पांखरास—

बोल पांखरा ! बोल पुन्हां ते गोड तुझे बोल !
तट शोकाचा भेदुनि वीरा! खिन्न हृदय खोल !
बालतृणांला नाजुक हातें वारा कुरवाळी,
तींहि नवोढेपरी लाजुनी पाहतात खालीं !
घनमालेसह उंच कडे हे प्रेमकथा करिती
द्रवुनी हृदयें टपटप मधुनी अश्रुबिंदु गळती !
हिरवळींत चमकति बागडणारे झरे—रे गड्या !
किति अस्तोन्मुखरविकरिं दिसती गोजिरे—रे गड्या
हे सृष्टीचे का अंगभाग साजिरे—रे गड्या !
या सौंदर्या थरारवुनि कर मृदु नादें लोल !
डोलडोलवीं ब्रह्मांडाचा निजलेला गोल !

येइल संध्या लाजत लाजत गाणें ऐकाया,
खिळवुनि टाकीं एकच जागीं तिजला कविराया !
तिच्या स्मिताची प्रभा सारखी वाहूं दे जगतीं,
तुझ्या गायनें भरेल लोकीं उत्साहप्रीति !
तूं खिन्नमनीं नव आशा संचारिसी—रे गड्या !
तूं दग्ध लतांना नव किसलय आणिसी—रे गड्या !
तूं मृत जीवांनां नव जीवन अर्पिसी—रे गड्या !

मंजुरवानें टाक व्यापुनि शून्य अंतराल,
जीर्ण जगावर पसर गायका ! दिव्य सौख्यजाल !

## विश्वेशा !

स्वच्छंदें गगनांतुनी भटकती नानाकृती मेघ जे,
ओसाडींतहि मंजु नाद घुमवी जो मारुत स्वैरसा,
देती ज्या सरिता शिलामय गिरिप्रांतासहि स्निग्धता
त्या त्या दिव्य विभूति ईशमहिमा व्यक्तामध्यें आणिती

कांटेरी झुडपावरीहि झुलती नाना कळया कोवळ्या,
तैशीं जीर्ण फुलांमधें गवसती बीजें फुलांचीं नव्या,
ज्यानें गुंफुनि शोक–हास्य–रव हे एकस्थलीं यापरी
केलें जीवन नित्यनूतन, असो त्या ईश्वरा वंदन !

संपे रात्र न तोंच होय दिवसप्रारंभ चेतोरम,
दुःखांतूनच वाढती सुखतरू, लीला तयाचीच ही,
आहे चालतची अनंतहि युगें त्याचा लपंडाव हा,
वेडे अल्पविवेकशील परि या खेळास कंटाळती !

छायेवीण नसे प्रकाशमहिमा, अज्ञास हें नाकळे,
एकत्वीं सुखभावना न वसते, हें ईशलीला वदे
आहे रात्रदिनीं अपूर्ण जग हें पूर्णाकडे धांवत,
आहे त्यांतच सौख्यसार, न मिळे पूर्णामधें तें सुख !

अद्वैतास्तव जे उतावीळ तसे सायुज्यमुक्तीस्तव
विश्वेशा ! झटती झटोत नर ते, माझा नसे मार्ग तो
ठेवीं दूरच तूजपासुनि मला, मुक्ती न ती आवडे,
त्वत्प्राप्तीस्तव मी झटेन, तुजला पूजीन अश्रूदकीं !

## शांतीसाठीं

जिकडे तिकडे आज विहरते मधुरूपा शांती
आहे खळबळ मात्र चालली मम हृदयप्रांतीं !

हरिततृणावृत हीं गिरिशिखरें शांत कशीं दिसती,
शांत किती हीं वृक्षमालिका, पर्णेंहि न डुलती,

तडागांत त्या एकहि लहरी अहा ! मुळिं न उठती,
तरंगिणीचा प्रवाह चाले शांतवीत जगती !

शांत पांखरें कशीं सर्वही तरुकोटरिं बसलीं,
तारकांस या ठावी नाहीं अशांति ती कसली,

शांताकाशीं शांत चंद्रिका शांतरसीं रमली,
फार कशाला दगडहि इथले शांतिमूर्ति गमती !

अशी शांतता देवा ! केव्हां मिळेल का मजला !
ही अस्थिरता–चंचलता का जाइल विलयाला !

खळवळणारें मन मिळविल का अपुल्या ध्येयाला !
सांग केधवा व्यापताप हे दयाघना ! चुकतीं !

## स्थित्यंतर

होता डोलत एक रम्य तटिनीतीरीं रसालद्रुम,
वाटे मारकतप्रभोज्ज्वल वनश्रीचेंच लीलागृह;
स्वर्वामाधरचारुता किसलयीं त्याच्या सदा नाचली,
झाली तुष्ट नितांत मंजरिरसास्वादें मिलिंदावलि

हर्षें त्या वनवैभवास विहगीं मंजुस्वनीं वर्णिलें,
स्निग्ध स्वादु फळें प्रवासिजनही सेवून आनंदले;

वाहे तद्रसगंधगंधित वनीं स्वच्छंद मंदानिल,
त्याला वन्य तरूहि नम्र शिरसा सोत्कंठ सत्कारिती !

होता त्यावरि शीतपत्रवलयीं बैसून कोणी पिक,
लेखी नंदनकाननास्थित सुरव्रातासही तुच्छ तो !
घे आम्रासवपानमत्त खग तो आलाप जे स्वैरसे,
ते ऐकून वनस्थली सकलही हो मंत्रमुग्धापरी !

आला काल विचित्र, दैव फिरलें, झालें महाऽवर्षण,
गेली आटुनि ती नदी, न उरला बिंदू जलाचा कुठें;
झाला शीर्ण रसाल तो, न उरलीं पत्रेंहि त्याच्यावरी
कोठें तो मग रम्य मंजरिरस ? –स्वप्नापरी त्या कथा !

होऊनी निरुपाय, साश्रुनयनें सोडून कष्टें तया,
गेला कोकिलराज खिन्न हृदयें तेथून कोठें तरी;
जातांना परि सोडिले पिकवरें दुःखोष्ण निश्वास जे
तत्तापें द्रुत होय होरपळुनी काळेंनिळें व्योमहि !

झालें भग्न निराश जें हृदय त्या कोठून शांती मिळे ?
विश्वांतील सुखें समस्तहि तया होतीं किती बेचव !
टाळूनी नववृक्षराजि, फुलल्या वेलींहि देशांतरीं
गेला दूर उडून तो पिक पुढें जीर्णस्थलीं एकल्या !

हा ! हा ! त्या वनिं रम्य पादप, लता किंवा नदी एकली,
कोठें ही दिसली न सान झुडपें किंवा तृणें कोमल,
सारा प्रांत भयाण शून्य गमला तो मृत्युकेलिस्थल
होती एकच जीर्ण बाभुळ तिथें वाऱ्यासवें झुंजत

मार्गक्लांत विहंगराज तिचिया शाखेवरी बैसला
पाहीं भोंवतिं अश्रुपूर्ण नयनें पूर्वस्थिती चिंतुनी

काकांचा ध्वनि कर्णकर्कश उठे त्या शून्य भूमींमधें
होता ढाळित आंसवें पिक तदा बाजूस बैसूनिया

आम्रा ! आश्रयसाधनार्थ बसला जीर्णद्रुमीं या पिक,
आहे भोंवतिं काकमंडळ कटु ध्वानें नभा व्यापित
मित्रा ! मानसिं त्याचिया विहरते मूर्ती तुझी सर्वदा,
वा त्वन्मंगलकामना धरुनि तो नित्य प्रभूला स्तवी !

## पुढें पहा !

रडुं नको, शांत हो बाळे! आवरीं अश्रुधारा या !
घरकुलें बांधिलें चिमणें तें हळुच मोडिलें कोणीं;
बाहुली सजविली यत्नें ती दिली कुणीं फेकूनी;
लटुपटिची घागर भरली टाकिली तीहि ओतूनी;
पण दुःखें बाळपणींचीं
सर्वही शीघ्र जायाचीं;
उघडतां मूठ काळाची
लागशील तूं हांसाया !

पुस्तकें रम्य गोष्टींचीं टाकिलीं जाळुनी सारीं;
पाडिले घरे हृदयाला कटु शब्द बोलुनी भारी;
तुज कधींहि निष्ठुरतेनें धाडिलें नाहिं माहेरीं,
जातिल गे हेही क्लेश,
येतील चांगले दिवस;
यौवन, प्रेमपयूष,
लावील तुला नाचाया !

तव हृदय भंगिलें अधमें तारुण्यसुखाशा सरली;
कल्पिली इंद्रचापश्री प्रत्यक्षीं नाहीं उरली;
चिंतिलीं यौवनस्वप्नें तीं शून्यीं सारीं विरलीं;

दे धीर खिन्न हृदयाला
स्वर्गीं तरि अर्पिल तुजला
तो दयानिधी सुखमाला,
भज नित्य तयाच्या पाया !

## कवि

सोडुनि अर्थाला   कवि वेडा कुठला
ट ला ट जोडित बसला !

फुलली नव कुसुमें   टाकुनि अलिं त्यांतें
भुलला सुवर्णकमलातें !

सत्या अवगणुनी   असत्यांत रमला
चिरसुखलाभाला मुकला !

प्रियेच्या गालीं   लाजेची लाली
आली ती न तया दिसली,

परि अचिरस्थायी   संध्यारागाची
मोहिनी पडली त्या साची !

फुलें बागेंत   हसतांना बघुनी
जातें मन त्याचें भुलुनी;

परी घरिं हंसऱ्या   बालाच्या लीला
रमविती अल्पही न त्याला !

कलरव विहगांचा   टाकी गुंगवुनी
गणी तो स्वर्गासम धरणी;

चिमण्या छबड्यांचीं   गाणीं मंजुळ तीं
परि तया कदा न डोलविती !

पांढऱ्या टिकल्या बघतां आकाशीं
तुडविती कवि हे मणिराशी!

रमणिचे अश्रु यांस तुच्छ गमती,
दंवाच्या बिंदूस्तव रडती!

वसतिल चुंबित हे नवकिसलयजाला
देखति न शिशुच्या अधराला!

घडि संसाराची मोडली न बघती
वृत्तें यत्नें जुळवीती!

एकही मात्रा कमि अधिक न चाले
प्रपंचीं मात्र सर्व खपलें!

सुरधनु हारपतां करिती आक्रोश
मृताप्तां मिळे न निश्वास!

काव्यीं वाहविति ओघहि अमृताचे
घरिं न हो दर्शन ताकाचें!

ऋणहा काढूनी काव्यें छापीती,
उघडीं पोरें पण फिरतीं!

कल्पना निर्मी अगणित रत्नांला
दमडी नाहीं हाताला!

बाभळीखालीं बसुनी डौलानें
भोंवतीं रचिती सुरविपिनें!

वाटतें कवि हा स्वप्न मूर्तिमंत
स्वप्नें पसरी जगतांत

न कळे लाभेल जागृति कधिं त्याला
त्यासह साऱ्या विश्वाला?

## उजाड मैदान

दूर पसरलें एकसारखें उजाड मैदान,
औदास्याचें गमे खरोखर हें क्रीडास्थान

झुडुपहि चिमणें एकादें नच दिसत सभोंवार,
तिथें कोठले वृक्ष थोरले नभास भिडणार !

वायसगणही वसावयाला कंटाळति जेथें,
कोकिल शुक सारिका कोण नर धुंडिल हो तेथें !

नदी, सरोवर, अथवा ओढा– नांव नको त्यांचें
स्फोट मात्र ते होती ज्वालामुखी पर्वताचे !

सों सों करुनी भयाण वारा वाहे जोरानें,
दिशा सर्वही भरुनी टाकी संतत धूळीनें !

अर्धदग्ध तरुपरी कडे हे दिसती भेसूर,
स्मशानशोभा हाय ! पसरली येथें वा दूर !

सर्व सुखाशा, सर्व भावना, ह्रदयाच्या होशी
यांची होउनि होळी चढती दुःखांच्या रौशी !

कोण टाकतो पाउल जाणुनि या मैदानांत !
पुष्पिततरुगणशोभित विपिनें असतां जगतांत

परी कितीकां इथेंहि लागे जीवित कंठावें,
विधिप्रकोपें नसतें त्यांनां हंसणेंही ठावें !

त्यांची येउनि कींव मानसीं अश्रूंचे पूर
यती नयनीं, परि जीवींची न सरे हुरहूर !

ओसाडींतिल त्याच असूनी दीन हाहि देवा !
यास्तव जीव न काय कुणाचा हळहळुनी जावा !

कोणी राहो, मदार माझी कुणावरी नाहीं
तूंच एकला शमविणार बा दुःखाची लाही !

सरल्या साऱ्या आशा, हेतू जळूनियां गेले
तुझ्या दयाश्रूंसाठीं जीवित कंठीं हें उरलें !

## पूर्वस्मृती कां ?

तारका झाकुनी जाती घनकृष्णमेघपटलांत,
मधुरोर्मिलास्य सुखकारी हो विलुप्त शैवालांत,
नव मक्ताजालक हा हा! जातसे बुडुनि चिखलांत,

परि दग्ध मनीं मम कां ही—
पूर्वस्मृति लोपत नाहीं !
ती सदाहि नाचत राही
विश्वाला लावी आग !

जे गेले दिन ते गेले फिरुनी न कधीं येणार,
तो पुष्पांनीं भरलेला सुखवसंत नच दिसणार,
जाणतो आयु हें पुढलें तिमिरांत सदा जाणार !

आवरतों किति हृदयाला,
स्थिरता परि लवहि न त्याला
चिंतित प्रियामूर्तीला
बसत ते अश्रु ढाळीत !

देवीचें तें मृदु हास्य, मंजुळ ती मोहक वाणी,
तीं मोहक संध्यागीतें गुणगुणती अजुनी कानीं,
ती मुग्ध लाजरी दृष्टी राहिली मना व्यापूनी;

तो अमृतरसानें भरला
सहवासकाल गेलेला,

वाटे तो आतां घडला !
भडकवी शोकवन्हीतें !

सुखसार लोपलें जगिंचें जड नीरस जीवित झालें !
लोपुनी इंद्रधनुशोभा आकाश मोकळें ठेलें !
एकदां हांसलें सुम तें धूळींत मिसळुनी गेलें
गेलें तें ठावें आहे
स्मृति विषमय का पण राहे ?
ही अश्रुवाहिनी वाहे
ती मिळेल न कळे कोणा !

## हृदयमार्दव

कठोर हिमवर्षणें गळत रम्य पत्रावलि,
निदाघरविदीप्तिनें विरुनि जाय हास्यच्छटा;
परागकण लीलया विखरि वायु धूळीमधें
तरीहि सुम राहतें सुमाचि मंगलाचा निधी !

असो अनल सर्वतः, सतत अंबुधारा गळो,
करो प्रळय भूवरी प्रबळ नित्य झंझानिल;
परि स्थिर वसे अहा ! उपलखंड वीरासम,
तरीहि सुम राहतें सुमाचि, हो न पाषाण तें !

प्रभो ! हृदयमार्दवें अमित हानि निंदा घडे,
नव व्रण विदारिती अदय आप्त काकावलि;
कठोर बचनीं सदा विकलवृत्ति होते किती,
तरी हृदय हें असो मम दयाघना ! कोमल !

सुखावह कठोरता, घडति यंत्रणा मार्दवें,
नकोच सुख तें शिरीं असह आपदा कोसळो !

अनंत विषकंटकें हृदय छिन्न होवो सुखें
नसो बधिरता तया लवहि, हीच वांछा असे

बिपत्तिकरसंकुल प्रथित गूढ संसार हा,
व्यथाविकल मानसीं हळुहळू नुरे मार्दव,
प्रहारशतही घडो, परि नवप्रहारव्यथा
नवीनच गमो मला, विकल अंतरा ती करो!

## तारा

अरुणरागें रंगल्या दिशा दाही,
हास्य त्यांचें सर्वत्र भरुनि राही;
मधुर-मंजुल-खगनादरसस्नात
तरुण लतिका सुमभार वर्षितात

भास्करोदय आसन्न पाहुनीया
पळुनि गेल्या तारका लाजुनीया;
तात येतांच प्रौढ जशा बाला
गृहीं शिरती आवरुनि मुग्ध लीला!

प्रभातानिल मृदु मंद शीत वाहे
तशी कानतरुराजि डोलताहे
विपिनदेवीचे ललितकंठहार
बालनिर्झरही करिति हे विहार!

स्वर्णरसवर्षण करित अंशुमाली
प्रगट झाला हळुहळू उदयशैलीं
दिव्य तेजीं मेदिनी वृक्षवेली
तुंगगिरिमाला पूर्ण बुडुनि गेली!

स्निग्ध गंभीर ध्वान सभोंवार
भरित गंगा चालली शुभाकार;
रत्नमंडित घेउनी उत्तरीय
जणों प्रमदा पतिनिकेतनीं जाय !

मंजु गान प्रगटलें अप्सरांचें
ओघ वळले सुरविपिनसमीराचे
शरज्ज्योत्स्नारस एथ मूर्त होय
मधुर तारावालि जणों द्रवुनि जाय !

हास्य सखिचें माझिया काय वाहे
रुचिर दिसती मोदाश्रु तिचे वा हे !
काव्यशुचिता मम जणों प्रगट झाली
मोहिनीची मोहिनी द्रवुनि गेली !

विमलतेला विमलता द्यावयाला,
पवित्राला सुपवित्र करायाला,
व्योमधरणीसंयोगसाधना हें
धवल गंगेचें पुण्य सलिल वाहे !

तीरवर्ती नवलताकुंजभागीं
मुग्ध बाला एकली शोभनांगी
मृदु स्वकरें विकसित प्रसूनांतें
तेथ होती तोडीत शांत चित्तें

चारुवदना ती मूर्तिमती गंगा
आसमंतात् पसरिते स्मिततरंगा
तिच्या हास्योत्सवमोदतुषारांहीं
नव्य शोभा पातली स्थिरचरांही !

विकच कुसुमांचा मृदुल रुचिर राशि
दिसे तनु तैसी तिची लोचनांसी
दिव्य मार्दव, चारुता, मधुर हास्य
तिच्या देहीं सर्वत्र करित लास्य!

कल्पलतिका ही मनुजरूपधारी,
काय पुष्पश्री मूर्त मनोहारी?
उषा किंवा जाहली प्रगट येथें,
खचित आली तारका भतलातें!

हृदयलोभन ही काय असे आशा,
भावना वा ये भरित सुखविकाशा;
मनस्तिमिरध्वांसिनी इंदुकांति
काय अथवा प्रगटली ही प्रभातीं?

हास्य जेथें पावलें हास्यतेला
जाय सौंदर्यहि तसें स्वाभिधेला
ललितललनालंकरण बालिका ती
होति विहरत तट–कुंजवन–प्रांतीं!

दिव्य तेजोरस बालभास्कराचा
मंदगानध्वनि गांगतरंगांचा
मंजु कूजित पसरिती विहगवृंद
विकच सुमनांचा सुटे मधु सुगंध

केलिकेतन तें दिव्य वैभवाचें
स्थान सुरुचिर आनंदविलासांचें
जननभूमी मृदु मधुर भावनांची
प्रेमशांतीची हृदयविकासाची!

तेथ घनपटलीं इंद्रचापलेखा
नील गगनीं रमणीय इंदुलेखा
प्रिया अथवा मम हृदंतरीं जैशी
अहा विलसे ती रूपमती तैशी !

तिच्या स्पर्शें सुमभार वल्लरींना
तिच्या श्वासें सौरभ प्रसूनांना
किसलयांना मृदुलत्व सन्निधानें
नव्यता ये सर्वांस तात्स्मितानें !

रम्य विलसे तो हैमगिरी दूर,
पुढें वाहे गंगौघ—शुभ्रनीर,
लताकुंजीं विहरते एथ बाला,
गूढ ईशाची अतुल विभवमाला !

होय सम्मेलन रुचिर चारुतेचें
परी विलसे साम्राज्य भिन्नतेचें
भिन्न दृष्टीनें भिन्न भावनेनें
दृष्टि इकडे धांवते कौतुकानें !

हैमगिरिला चारुत्व आज आलें
आणि अवचित तें लुप्त अहा ! झालें !
दिव्यगंगा भासली लोचनांस
गमे हीन क्षणभरें तद्विलास !

पुष्पविकसनही मनोलोभनाला
मंद गंधानिल अबल आज झाला !
निसर्गा हे सौंदर्य अतुल बाला
स्वसौंदर्यें करि हीनकांति त्याला !

हिच्या योगें सुरधुनी रम्य भासे,
तुच्छ झाली तल्लालितगतिविलासें !
हिचा हास्योत्सव मधुर विलोकून
फुलें पर्णांतरिं बैसती लपून !

श्यामलांबरिं चमकतां तारकांतें
उषादेवी वेचून जशी घेते
तशी अरुणप्रभ मृदुल करीं बाला
घेइ तोडुनि उत्फुल्ल कुसुमजाला !

## तीर आणि गान

सोडुनी मीं दिला व्योमभागीं शर
तो पडे जाउनी दूर पृथ्वीवर;
मानवी दृष्टिला वेग तो नाकळे
स्थान त्याचें तदा मन्मना ना कळे

फेकिला एक मी दिव्य गानस्वन
जाय सारें तयें व्योम संव्यापुन;
तो कुठें पोंचला ? वास कोठें असे ? —
मानवी बुद्धिला हें कळावें कसें ?

दीर्घ कालांतरें आम्रवृक्षावर
बाण हो माझिया दृष्टिला गोचर;
आणि साद्यंत तें गान तैशापरी
आढळे कीं मला मित्रहृन्मंदिरीं

## ताराप्रकाश

विश्ववलया तमःस्रोतसीं झाकुनी
कृष्णरूपा करी तांडवा यामिनी;

होउनीयां अती भीतिवश मानसीं
लुप्त झाला कुठें तो बिजेचा शशी !

मेघखंडें किती पसरलीं अंबरीं
ये प्रकाशच्छटा कोठुनी भूवरी
चमकते परि अहा ! तारका एक ही
शीततेजोरसीं स्नात करिते मही

प्रीतिची दीपका असासि तूं तारके !
विखरसी स्वप्नमय भावनांचीं सुखें !
व्यसनहत गुणिजना धीर देशी स्वयें
तिमिर तेजा हरी—किमपि बोलूं नये !

अबल—बलवर्धनें ! हास्य कर फेकुनी
ममनोयंत्रणा देइं विध्वंसुनी !
मृदुल तेजें तुझ्या नूतनोत्सव भरे,
श्रांत देहांतही अतुल बल संचरे

हृदय मम हें असें गाढतिमिराकुल
देइं देवी ! तुझ्या कांतिचें त्या बल !
विश्व सारें तुझ्या स्फूर्तिकर गायनें
करिन तेजोरसस्नात हें शोभने !

पसरले हे इथें दगड माळावरी
कासया ते ? वृथा ! त्यां न तूझी सरी !
बैसलीं भूदरीं राजकोषान्तरीं
कासया तीहि गे रम्य रत्नें तरी ?

विकसलीं जीं न तों शीघ्र कोमेजलीं
आचिरजीवी करूं काय पुष्पावलि ?

पद्मपत्रस्थिता भानुकरशोभिता
सलिलमुक्तातती विफल ती सर्वथा !

धुंडितों कां परी तुजसि तुलना वृथा ?
शून्यसंशोधनीं लाभ तो कोणता ?
स्वर्ग हतभूवरी काय मिळवीन मी ?
मधुर मधु कीं कधीं संभवे कर्दमीं ?

दुःखपटलें सदा मानसें व्यापिलीं
जेविं मधु विमल जल झांकलें शैवलीं;
द्यावया शांतिसुख खिन्न हृदयांप्रती
तुजविणें देवता तारके ! कोणती ?

सोडुनी दिव्य या व्योम–लीलागृहा
ये इथें, हीं पहा दीन सर्वसहा !
फेकुनी ज्योतिचे झोत सर्व स्थलीं
ध्वंसुनी टाक हीं घनतमें एथलीं !

कल्पलतिका जिथें कसुमिता डोलती
तेंवि चिंतामणी पदतलीं लोळती
अमृतकणशीतला वायुलहरी जिथें
नाचते ! उसळते ! मानसा सुखविते !

प्रेम आनंदही विहरती ज्या स्थळीं
स्वप्न दुःखेंहि गे त्या स्थलीं कोठलीं ?
निर्मिलें कां तिथें विश्वजनकें तुला ?—
देवते ! सत्वरी ये इथें भूतला !

अद्रिभागावरी कोठल्या जन्मली
एथ धांवून ही वाहिनी पातली !

भूदरीं जन्मला, पसरला परि अहा
कुसुमफलशोभि तरु हा कसा गे पहा !

जेथ नाहीं तुझें कार्यही कोणतें
दवडिसी काल कां तेथ तूं देवते ?
चंद्र सूर्यापरी दिव्य तेजें किती
व्योमदेशीं गडे सर्वदा नांदती !

सोड गगनस्थला, हांसवी मेदिनी,
यत्न आतां पुरें स्वर्गसुखवर्धनीं !
पूर्ण विधुमंडला आणखी कोठली
सांग देवी कुणीं सत्कला अर्पिली ?

अमृतसरिता जिथें गर्जती उसळती
एक बिंदूविणें काय त्या आटती ?
ये इथें तारके, त्याच बिंदूमुळें
पाहशिल सौख्यरत विश्व हें जाहलें !

## नामलेखन

गेलेली लहरी दुरी जलधिची देखून कौतूहलें
आर्ये ! नाम तुझें हंसून सहजीं मीं सैकतीं लेखिलें;
आली गर्जत तों जलोर्मि पुढती, तें नष्टलें तत्क्षणीं
केलें तूं स्मित जें तदा अजुनिही तें नांदतें मन्मनीं

त्वन्नामाक्षरसंघ मीं ग्रथियला काव्यप्रसूनीं अतां,
तद्भंगक्षम सांग सिंधु जगतीं आहे असा कोणता ?
साधें हें तव नाम राहिल सखे ! कालोर्मिवेलेपरी
आतां लोकमना विमोहिल तसें गे भाविकालान्तरीं !

# धन्य तूं कोकिला !

धन्य तूं कोकिला ! धन्य तव गानहि !
हर्षुनी स्वागता करित तरुराजि ही !
माधवाचा सखा असिसि तूं एकला,
तुजमुळें चारुता लाभते भूतला !

मृदुल पल्लवतती तरुशिरीं पसरुनी
मधुनि नव पुष्पगण कौशलें गुंफुनी
सुरभि गंधें दिशा व्यापुनीया अहा !
विपिनदेवी तुझें स्थान रचिती पहा !

गात आलास तूं जों न मित्रा इथें
पातलें तों नवें रूप वनराजितें !
भानु आला न जों उदयशैलावरी
विश्विंचं तिमिर घन लोपतें ज्यापरी

होउनी गुंग तूं अमृतमय गायनीं
गायका ! धांवसी स्वैर ज्या ज्या वनीं
गानरससेचिता तेथल्या तरुतती
जीर्णही, होउनी पल्लवित, डोलती !

चक्र ऋतुचें फिरे सारखें भूवरी
ज्ञात होतें कसें सांग तुज तें तरी ?
किसलयोद्गम न जों जाहला तरुशिरीं
येसि बुडवीत वनभूमि मंजुस्वरीं !

जाणसी हें कसें ? कळत नाहीं मला,
कालगर्भस्थही गूढ समजे तुला !
काय कथिलें तुला, भुलनि मधुरस्वरें,
सृष्टिचें गूढ वा, सांग विश्वेश्वरें ?

रम्य पुष्पावली, मृदुल नव पल्लवें,
मधुर सौरभ्य, हीं सुचिर तव वैभवें !
पुष्पशय्येवरी लोळण्याला तुला
निर्मिलें प्रभुवरें लाडक्या कोकिला !

धूळ ठावी तुला ग्रीष्मिंची ना कधीं
नाहिं वा प्रावृषीं गांजिलें अंबुदीं
तेंवि हेमंतगत तुहिनकण तुजवरी
कधिं न पडले, सदा वससि कुसुमाकरीं !

रुचिर पुष्पस्मितें, मधुर परिमल तसे,
मंजुल स्वन तुझा—स्वर्ग करिती रसे !
ही त्रिवेणी अहा ! भूवरी चालली
तुच्छ ईच्यापुढें त्रिपथगा जाहली !

चालतां माधवी अन्य देशांतरीं
तूंहि तिकडे पिका ! धावसी सत्वरी !
भिन्न पुष्पें, तसें भिन्न सौरभ्य तें
नित्य तुजला गड्या तेथही लाभतें !

भोंवतीं सर्वदा पत्रपुष्पावलि,
विमल नीलच्छटा अंबरीं पसरली,
सौख्यसंगीतकें चाललीं सारखीं,
तूंच विश्रांत या एक अससी सुखी !

शक्ति नाहीं मला तुजसवें यावया
सुचिर मधुमाससुख कुठुनि लाभावया ?
अससि जोंवरि इथें गात मधुगायनें
तोंवरी तरि उभा राहतों उन्मनें !

## कृष्णातीरावर

काळे भेसुर मेघ पसरले भयाण आकाशीं
सों सों वारा भिवविंत सुटला दुबळ्या जीवांसी;
एकहि नव्हता तारा चमकत अंबरभागांत
कडकड करुनी नाचे चपला हृदय कांपवीत;

त्या तालावर कृष्णसर्पिणीपरि कृष्णाबाई
नाचवित भ्रू खळखळ करुनी कोठेंशी जाई !

कृष्ण तिमिरपट, कृष्ण घनावलि, कृष्णा तर कृष्णा
उसळुनि जाइल का न कुणाची सुप्त मरणतृष्णा ?

होतें अंबर देत हुंदके, अश्रू ढाळीत
त्या दुःखानें कांपाति रानें—सारा दिक्प्रांत !

सृष्टि जाहली शोकमग्न—ही तिचीच का मूर्ति
बसली आहे शोकाविव्हला सैकत भूवरती ?

*    *    *

" तीर तुझें हें असे विहारस्थान प्रीतीचें
हें सैकतही गमलें मंगल निधान शांतीचें

तप्त मानसा शमवायाला गे कृष्णाबाई
तुझ्या जलाचा स्पर्श पुरेसा आजवरी होई !
खळखळणाऱ्या तटतरुलतिका पाहुनिया कोण
सांग एकदां गेला नाहीं मोहित होऊन ?
हें सैकत तर होतें अगदीं निरुपम ठरलेलें,
नक्षत्रांकित नभहि यापुढें हीन किती गमलें !
नीलमण्यांनीं रचिलेला जणुं मार्ग स्वर्गाचा
प्रवाह हा तव—मोह न पडला कोणाला याचा ?

श्रीविष्णूच्या अंगकांतिचा ओघच सुटलेला
आणूं कुठलें त्या या तोया बल वर्णायाला ?

एकवारही जो न सेवि हा मंद तुझा वायू
होतें वाटत वृथाच दवडी तो अपुलें आयू !

बदलुनि गेलें पूर्विल सारें तें एकाएकीं
क्रूर राक्षसी ! कृत्या दुसरी तुझ्यापरि न लोकीं !

सैकततीरावरी तुझ्या या लाटा आदळतां
अव्यक्त ध्वनि उठुनि सर्वदा तो पसरे भंवता !

फुलवेलीवर बैसुनि गाती आलि संध्यागीतें
त्या नादावर उन्मत्तापरि वनराजी झुलते !

मंद सुगंधित शीतल वायू झुळझुळ वाहून
चराचराला करी पहा गे आनंदीं लीन !

अर्थ मलाही कळला होता त्या आनंदाचा
मनांतुनि न तो कदापि रम्य प्रसंग जायाचा !

तेव्हांची स्मृति होतां जागी काय कसें होतें
कृष्णाबाई येतच नाहीं वें सांगायातें !

जीर्ण जगावर नवीन तेजें पसरुनि गेलेलीं
तुझ्या प्रतापें आज सर्व तीं नाहींशीं झालीं !

* * *

नाचुनि चंचल तुझ्या लहरिंवर मोत्यांचे हार
तव कंठीं रावि बांधुनि अस्ता नुकता जाणार—

प्राणेशासह बसलें होतें तेव्हां या तीरीं;
लावुनि दृष्टी एकसारखी तव चंचल नीरीं;

होता फेंकित दिव्य गानरव अंबरीं मम नाथ
आठवतें का—तूंहि थबकलिस होउनियां भ्रांत ?

त्या गानानें तुझ्याहि हृदयीं खळबळ होऊन
प्रेमपरवशा कृष्णे ! तेव्हां गेलिस धावून !

नवल काय गे, सांग जरी मग मी झालें वेडी ?
प्रेमिजनांसच समजायाचीं प्रेमाचीं कोडीं !

धन्या मजला गणीत लोकीं तेव्हां गेलीस,
तूंच पुढें मम सौभाग्यावर कैशी उठलीस ?

विश्वप्रेमी असति देवता भूतहितीं निरता,
त्या ब्रीदाला कलंक परि तूं लाविलास पुरता !

* * *

वाटत होता प्रेमौघापरि रम्य तुझा ओघ
दर्शनही तव आतां गमतें ओढवला भोग !

पसरुनि अरुणप्रभा हांसली बालकली नुकती
तुहिनकणांची वृष्टि निर्दये ! केली तिजवरती !

नभीं बिजेची चंद्रकला गे, जों दिसली नाहीं
तों घनपटलीं तिला झांकणें योग्य रीत का ही ?

तुझ्याच कृतिनें तुझें स्मरणही नकोसेंच झालें,
विश्वस्तांच्या सौख्यरसीं विष तूंच कालवीलें !

आग भडकली मम हृदयीं किति खळबळ ही चाले
निश्वासांनीं वातावरणहि होरपळुनि गेलें !

तव लहरींचा नाच पुरे हा, लाजहि तुज नाहीं,
दीनाश्रूंनीं हर्ष पावणें रीत बरी का ही ?

तोंड आपलें काळें घेउनि जा जा कोठेंही!
मम दुःखावर डाग देत तूं क्षण न इथें राहीं!

घेउनि बुरखा अंधाराचा हंससि उलट काय ?
नाथा ! तुजविण दशा काय मम होय, हाय हाय !

* * *

पुष्पभरानें लवलेल्या या वेली डोलोत,
वनदेवींचीं कुंजीं गुंजागानें चालोत;
झिम्मा घाली तूंहि सारखा तटासवें बाई,
खुशाल उधळो परागधूली आणुनि वाराही;
नानारंगी फुलें लाजरीं हंसोत गालांत
गंधभरानें भरोत सारा तव तीरप्रांत;

परंतु रजनी चंद्रावांचुनि दिसते भेसूर
तशी सर्व ही शोभा, उलटी वाढवि हुरहूर !

हृदयपुष्प मम करपुनि गेलें परिमल हरपून
जलवन्हीनें तुझ्या मधुर मधु गेला आटून !

भुंगे, वेली, पराग, वायू, पुष्पांच्या राशी
तुझें तुला लखलाभ असो हें, कशास तें मजसी ?

आनंदानें दूर ढकलिली, शांतीनें त्यागिली,
जगली मेली एकसारखी अभागिनी असली !

कर कुसुमोत्सव, जलसे झडवीं कुंजाकुंजांत,
झालें होइल जें जें माझ्या असेल दैवांत !

* * *

तुझ्या लतांचीं फुलें गुंफुनी अपुल्या हातानें
माझी कबरी भूषित केली कालच गे त्यानें !

तो गेला हें एकुनि झालीं तींहि शुष्क सारीं,
कसें रहावें कृष्णाबाई ! मीं मग संसारीं ?

घेउनि तेजोलव रविपासुनि जी हसली खुलली
तोच नष्टतां सांग कुणाला चंद्रकला दिसली ?

प्रेमभाषणें त्याचीं कानीं घुमती—तो नाहीं
अस्ताचलिं रवि जाउनि संधिप्रकाश जणुं राही !

कसेंसेंच मन होउनि त्यानें विवशा धांवत मी
तव तीरावर आलें कृष्णे ! असल्या गाढ तमीं

निर्दय तूं पण, शब्द एकही बोलतां न मजशीं
तोंड लपवुनी धांवत कोठें सांग अशी जाशी ?

हाय ! हाय ! हें काय तुला मी वेडीपरि पुसतें
नष्टे ! कारण तूंच असोनी माझ्या दुःखातें !

* * *

रचिलीं त्यानें हर्षभरानें गाणीं मजवरती,
शोकरसाचीं क्रीडास्थानें आज तींच दिसती !

जगांतले कवि कितीक मजला कालच आवडले
आज वाटतें व्यर्थ काय ते बडबडुनी गेले !

घेउनि बसलें 'मेघदूत' मी आज परी बाई,
खरेंच काथितें एकहि अक्षर दिसलें मज नाहीं !

कोरीं पानें देउनि लोकां कवि म्हणवायाचें
योग्य काय हें भलतें धाडस त्या कविरायाचें ?

गंधावांचुनि फुलें, प्रकाशावांचुनि या तारा,
काव्यावांचुनि कवी, वाटतो चमत्कार सारा !

चमत्कार पण कसला नाथावांचुनि मी अजुनीं
धडधडीत ही कृष्णे ! असतां जीवमान भुवनीं ?

*    *    *

कालच त्याचीं प्रेमभाषणें तीं तीं ऐकून
गणीत होतें मला खरोखर जगामधें धन्य !

त्या प्रेमाची त्या हास्याची, त्या सौंदर्याची
चिरस्वामिनी मीच एकली या लोकीं साची !—

सौख्यभावना हींच सारखी वाढवीत असतां
ओढवला हा प्रसंग अवचित मजवरती भलता !

प्रेमाश्रूंनीं दृष्टि रोधितां पहावया त्याला
उत्कंठेनें जीव खरोखर उतावीळ झाला !

अल्पकालही दृष्टिआड ज्या करवलें न मजला
ती मी हा ! हा ! मुकून बसलें कायमची त्याला !

ऐकत असतां बोल तयाचे कल्पनाहि नव्हती
कीं यायाचा ध्वनी नसे हा केव्हांही पुढती !

तें सुंदर मुख, दृष्टि रम्य ती, तो मोहक हास
दिसावयाची कधींहि नाहिंत या हतभाग्येस !

कृष्णे ! माझी सुखें करोनी स्वप्नापरि सारीं
काय लाभलें तुला निर्दये ! सांगें यांत तरी ?

*    *    *

क्रंदन माझें ऐकुनियां तव हृदय फुटुनि गेलें
या दीनेवर घना ! अश्रूंचें वर्षण तूं केलें !

आली नटुनी चपला, पण मम रोदन ऐकून
नर्तनवांछा सोडुनि बसली कोठें जाऊन !

स्वैरवृत्ति हा वातहि पाहुनि खिन्न अशी मजला
पितृवात्सल्यें अभागिनीला कुरवाळुनि गेला !

—आणि लाविली आग माझिया सुखसदना जीनें
ती ही कृष्णा बघतांहि न मज चाले डोळानें !

क्षणभर थांबुनि ' बाई, कां तूं शोक असा करसी ? '
म्हणुनिहि हीनें पुसलें नाहीं एकवार मजसी !

भलेपणाची रीत काय ही ? पण या नीतिकथा
काय सांगुनी जनांस भलत्या पापकर्मनिरतां ?

*　　　*　　　*

नाथा ! करुनी कठोर मन मज सोडुनि गेलास
माझी प्रीती कसा एकदम सांग विसरलास ?

विसर मला पण वंदनीय ही वृद्ध तुझी माता
तुझ्यावांचुनी हिनें करावें काय सांग आतां ?

गळलीं सारीं पत्रें पुष्पें, जीर्ण अशी वेल
तुझी वृद्ध ही माता नाथा ! कोणा बघवेल ?

ढाळित अश्रू लावुनि डोळे तुझ्याकडे बसली
मातृप्रेमा उपमा द्यावी जगामधें कसली ?

अजाण भगिनी तुझी लाडकी जाय बावरून
शोधशोधुनी तुजला दमली भिरभिर धांवून !

घरीं शोधिते, मार्गीं बघते, जाते शेजारीं
तूं न भेटतां तुला वाहते अश्रूंच्या हारी !

मुग्ध मनींचे तिच्या पुसाया दुःखाचे डाग
तूंच एकला समर्थ अससी जगीं महाभाग !

बालस्वर्गासाठीं त्या तरि परतुनि तूं यावें
विश्वावरलें गाढनिराशातिमिर विनाशावें !

* * *

या तिमिरानें कोंदुनि गेल्या पूर्ण दिशा दाही,
दृष्टी असुनी व्यर्थ जाहली—दर्शन तव नाहीं !

जेथें जेथें आशा होती तूं भेटायाची
त्या त्या स्थानीं फेरी झाली तुझिया भगिनीची !

बसावयाच्या तुझ्या टेकड्या, आवडतीं झाडें,
कुंज लतांचे सर्व शोधिले, चंचळ ते ओढे !

सारी सृष्टी होती पूर्वीपरि जिथल्या तेथें
तूंच एकला दिसला नाहिंस कोठेंही तीतें !

तुफान कृष्णा अति वेगानें फोफावत चाले
मेघ गर्जती नभीं तयानें ब्रह्मगोल हाले !

परंतु नाहीं तुझी दचकली प्रेमळ भगिनी ती
प्राणेशा ! तुजसाठीं धांवत पिशीपरी होती !

तिच्या बोबड्या हांकेला तरि देउनियां मान
नाथा ! जेथें असाशिल तेथुनि ये ये परतून !

ध्रुवबाळाच्या शब्दासरसा श्रीविष्णू आला
कोण असा तो वश होईना भोळ्या भावाला

* * *

नको सारखी अश्रू ढाळूं गे प्रेमळ माते !
कठोर हृदयें सुत तव गेला सोडुनि सर्वांतें

वणवण धांवूं नको चिमुकल्या प्रेमाच्या मूर्ति
बंधू नाहीं दिसावयाचा तुजला भूवरती !

प्रश्नानें तव, उत्कंठेनें, भिर भिर फिरण्यानें
माता राहो, शेजारीही झुरती शोकानें !

भेटशील तूं पुन्हां कधीं तरि—असे तिला आशा
पूर्ण निराशानलीं पोळते अनुदिन मी विवशा !

उत्कंठेचें सुखही नाहीं मम दैवीं लिहिलें
नाथा ! मजवरि अंबर सारें कोसळून पडलें !

अखंड सरिता अश्रुजळाची नयनीं वाहे ही
खंड इयेला पडावयाचा नाहीं केव्हांही !

परंतु गाळुनि अश्रु सारखे जरि झरला देह
तरि जीवेशा ! न दिसायाचा तूं निःसंदेह !

* * *

कृष्णे ! आहे जनक तुझा गिरि कठिन शिलाराशी
पाषाणांचें हृदय जाहलें प्राप्त सहज तुजसी !

दया कोठली ? औचित्याचा विचारही नाहीं,
तूं क्रीडावें, रडत बसावें दैवविहीनांहीं !

लहरिकरांनीं माझ्या नाथा मिठी मारिलीस,
फेकुनि त्यावरि तुषार अजवरि खेळत होतीस,

अवचित अपुल्या उदरीं त्याला लपविलेंस बाई !
भूतदयेची साधुत्वाची रीत असे कां ही ?

गंध सेविला मधु प्राशिला त्या कमलीं बसतां
सायंकाळीं कोंडुनि जावा अलि बघतां बघतां !

त्या भ्रमराला मुक्त कराया अथवा भेटाया
फेकुनि देतें तुझ्या जलावर मी अपुली काया !

मृदु लहरींच्या शय्येवर या निजला मम नाथ
सोडुनि त्याला दूर कशी गे राहूं मी शांत ?

पदराखालीं तुझिया लपला प्राणविसांवा तो
चोरुनि पाहुनि हळुच मजकडे पहा कसा हंसतो !

धरल्यावांचुनि रहावयाची नाहीं मी त्याला
दे दे कृष्णे ! मार्ग शीघ्र मज आंत जावयाला !

थांब जिवलगा ! थांब जरासा, पळूं नको ऐसा !
आली आली पहा तुझी ही दासी—"

* * *

मधेंच पडला खंड अल्पसा लहरिविलासांत
कृष्णाबाई पुन्हां चालली पूर्वीपरि शांत !

वीज चमकुनी, घनरायाच्या मात्र अश्रुपूरीं
झांकुनि गेली कृष्णा, रानें, पृथ्वीही सारी !

## अनुतप्त मनोवृत्तीला

कारुण्याची मूर्ति दिससि तूं, पाहुनियां तुजला
सांग नाहिं गे, सुटावयाचा पाझर कोणाला ?

खंड न ठेवीं सोड सारख्या अश्रूंच्या धारा
पापें आशिवें वाहुनि सारीं जातिल परभारा !

जळो हृदय तव अनुतापाच्या अनलज्वालांत
होइल मंगल पवित्रता मग तुजला संप्राप्त

एक एक हा बिंदु अश्रुचा खचित भाविकाल
परमेशाच्या कृपाप्रसादें भरून देईल !

## शैशवस्मृति

होतों शैशवकाल तो विसरलों संसारचिंतामुळें
तेव्हांचें रमणीय नूतन जग स्वप्नापरी जाहलें,
किंवा भोंवतिं ज्याचिया पसरली रक्षा फुलांची असे
त्याला मुग्धकलिस्मितस्मरण हो होईल सांगा कसें ?

ज्यानें देखियली न अन्य अवसेवांचून केव्हां तिथि
यावी तन्मुखिं हर्षगद्गद कशी इंदुप्रभेची स्तुति ?
जो झाला विधिकोपदग्ध सुचिरस्थायीच अस्ताचलीं
त्यानें रम्य उषःस्मितें, सुखद त्या, होतील का चिंतिलीं ?

गेलें शैशव, त्यासवें हरपल्या साऱ्या सुखाच्या स्मृति
कोणा सिंधुगता नदींत मधुरें तोयें कशीं लाभतीं ?
आतां माळ उजाड, सूर्यकिरणीं संतप्त हें सैकत
आहे दीर्घ पुढें पुढें पसरलें तें चालतों सांप्रत !

हा ! हा ! पूर्वस्मृतीच्या विषमय ठिणग्या वर्षती भोंवतालीं,
पेटोनी विश्व सारें अवचित भरला धूमही अंतरालीं;
मेलेल्या वासनाही अति करुणरवें क्रंदती जागजागीं
तेथें पाषाणचित्तें अनुदिन वसतों, मी कसा हा अभागी !

पुष्पांचा काल गेला, स्मरण करुनियां फायदा काय आतां ?
शय्या ही कंटकांची, इजवरि पडतों ठेवुनी आज माथा—
पाहीं मागें हटानें पुनरपि न मना, व्यर्थ कां खिन्न होसी ?
आलें तें भोग आतां, अदय विधिसही कासया दोष देसी ?

## धर्महानीचें भय

ज्यानें शौर्यप्रभावें चळचळ असुरां संगरीं कांपवीलें,
शंभूचें चंड चाप स्वकरिं धरुनियां लीलया भग्न केलें;

ताताज्ञा मानुनी तो रघुपति विपिनीं क्लेश भोगीत राहे,
अंगीं सामर्थ्य मोठें असुनिहि सुजना धर्महानी न साहे

ते नाभागादि राजे, समरचतुरता पाहुनी दिव्य ज्यांची
घेती पाऊल मागें सुरपति, यमही; धन्य सत्कीर्ति त्यांची !
केली सत्यावलंबें स्ववश वसुमती त्या नृपालोत्तमांनीं,
अंगीं सामर्थ्य मोठें असुनि बुध कधीं साहिना धर्महानी

ज्यांचा आकार मोठा बघुनि हिमगिरी शीघ्र लाजून जावा,
ज्यांना पाहून मात्र प्रबलहि रिपुचा गर्व सारा हरावा;
कर्तव्यीं आपुल्या ते वसति किति युगें दिक्करी शांत सारे,
शक्ती मोठी असोनी करिल सुजन तो धर्महानी कसा रे !

सप्तर्षि व्योमदेशीं वसति किति तरी काळ होऊन गेला,
ही सूर्येंदुग्रहांची नियमित उदया प्रत्यहीं येत माला;
पृथ्वीचा भार माथां धरुनि युगयुगें शेषही राहिलाहे,
अंगीं सामर्थ्य मोठें असुनिहि सुजना धर्महानी न साही

मर्यादाभंग नाहीं अजवरि घडला थोर रत्नाकराचा,
आहे अद्यापि तैसा पडुनिच जडसा विन्ध्यशैलेश साचा;
श्रीगंगेनें कदाही चुकुनिहि अपुलें सोडिलें पात्र नाहीं,
अंगीं सामर्थ्य मोठें असुनिहि सुमती धर्महानी न साहे !

## शोकरजनी

चालत असतां वसुंधरेवर दृष्टी लावून
अस्तगिरीच्या दरींत पडला रवी अडखळून

पहावया ते जमले अवचित किती नभीं तारे,
थोर जनांचा पात पाहुनी कोण न हंसणारे ?

परी पांखरें मात्र बिचारीं कष्टी होऊन
घरट्यांमध्यें बसलीं अगदीं किलबिल सोडून

मित्रवियोगें फिका होउनी कसातरी आला—
नभीं चंद्र, परि घनपटलांतरिं झाकी वदनाला

असो किती तो दुःखी, परवा सृष्टिला न त्याची,
गाढ तमींही तिच्या मुखिं कळा खुलली हास्याची

हिरवीं शेतें, झुडपें, वेली, वृक्षहि मोठाले
डुलूं लागले, जणों महासुखिं बुडून ते गेले!

मुख न दावितां होते हिंडत खिन्न देवदूत,
वनिं खद्योतप्रभामिषें तत्पद होते दिसत

स्तब्ध चराचर, सरांत मिटल्या कमलवनावरती
मृत मोदाची रचिली शय्या शेवटली होती!

त्या मोदास्तव नभोदेवता सोडिति निःश्वास
त्यानें आली फार मलिनता साऱ्या विश्वास

शोकाग्नीचा धूम पसरुनी दिशा भरुनि जाती
दिसत असूनी प्रलय कशी मज निद्रा यावी ती ?

त्याच जागृतीमधें विषानें भरलेलीं गाणीं
किती कवीनें म्हटलीं, सारीं आयकिलीं कोणीं ?

## सुखनिवास

गवत कोवळें हिरवें वाऱ्यासवें झुलत राहे,
हें आंब्याचें झाड एकलें मधेंच डुलताहे

ओढाही हा वाहे झुळ झुळ अगदीं जवळून
त्याचें मंजुळ गाणें ऐकुनि तृप्त होति कान

दिसे पुढें हा बराच मोठा पहाड, त्यावरुनी
ओघ जळाचे किती सारखे पडती कोसळुनी

तुषार त्यांचे दूर एथवर वायूनें येती,
त्या वृष्टीनें सदाच हिरवीं गवतें हीं असती

किती धनुष्यें घेउनि हातीं इंद्र इथें बसला,
कसली पीडा व्हायाची मग इथें रहात्याला ?

पहाड हा किति रम्य असे तें ये न कथायातें
प्रतिदिनिं एक क्षण तरि रवि घे विश्रांती तेथें;

त्याच्यासन्निध सगळें जीवित मग ज्याचें जातें
तत्सौख्याचा गमेल हेवा स्वर्गीं देवांतें

शंका अथवा कशास ही मज ? इथल्या विहगांनीं
कधींच आहे स्पष्ट कथियलें तें अपुल्या गानीं

फारच रुचकर फळें लटकलीं या झाडावरतीं
ओढ्याचें हें निर्मळ पाणी, तुला न या जगतीं

हीं असल्यावर सिद्ध सदाची, पोटाची चिंता
करील सांगा अल्पहि विव्हल कोणाच्या चित्ता ?

प्रिय भगिनींनो, प्रिय बंधूंनों ! या तर या एथें
मिळून गाऊं एकत्वाचीं मंगल संगीतें,

त्या गीतांच्या लहरीलहरीवरी दिव्यभाव
स्थापुनि टाकूं पुसुनि विश्वचें खेदाचें नांव !

## एकामागून एक

एकामागुनि एक वाळुचा कण खालीं पडतो,
एकामागुनि एक क्षणही तसा तसा सरतो

कांहीं येती कांहीं जाती–हें चालायाचें,
तुझ्या मानसिं न पटल पडावें विषादहर्षांचें

एकामागुनि एक तुजपुढें कर्तव्यें येती,
बलसर्वस्वा योजीं निरलस साधायातें तीं

नको भविष्यस्वप्नामाजीं जाऊं गुंगून,
काय शिकविती तीं हें आधीं घे बा, जाणून

एकामागुनि कितिक देणग्या स्वर्गींच्या येती,
आनंदाच्या पूरीं तुजला निमग्न त्या करिती,

प्रसन्नचित्तें आनंदाचा करिं त्या स्वीकार,
तसाच सोडीं त्यां, निघतां ते जायाला दूर

एकामागुनि एक येतिलहि दुःखें तुजवरती,
निर्भयचित्तें स्वीकाराया त्यांना हो पुढती

सौख्य एकदां दुःख एकदां–स्थितीच ही आहे,
प्रकाश असतां त्यासच चिकटुनि छायाही राहे

चिरदुःखाची निवासभूमी जीवित हें नाहीं,
प्रतिक्षणाला थोर दुःखही अत्यल्पच राही

सहाय होइल उद्या दयामय विश्वनाथ तुजला,
उदयकाल नव असे मनोहर बा, प्रति दिवसाला !

## दीनात्मे

गेहीं आपुलिया सुखासनिं तसे बैसून मित्रांसवें
कोणी दीनजनार्थ सांग न बरें ढाळीयलीं आंसवें ?

न्यायोद्धार करावया कुमतिच्या दुर्वर्तना लक्षुनी
अंगारासम वाक्प्रहार अथवा केला नसे का कुणीं ?

थोरांची अतिगर्ह्य गूढचरितें सांगून कानामधें
नाहीं तीव्र निषेध धीर धरुनी कोणी घरीं दाविला ?

विश्वांतील बघून दुर्विषमता गंभीरभावें महा
त्या विश्वाधिपतीसही अजवरी आहे जनीं दूषिलें !

नीत्युद्धारकमंडलीं असति या कांहीं खरे लांडगे
कांहीं नीच समाजकटक महा उन्मत्त जे दांडगे

त्यांना दूरुनि वंदुनी निरखितां या वावदूकामधें
कांहीं सत्यदयालु थोर हृदयें येती दिसूनी बरें

यांची ही करुणा क्षणीं उपजते जाते क्षणीं नष्टुनी,
न स्वर्गीय ताडित्प्रभा नियमुनी त्यांना इथें ठेववे,

दीनात्मे बलशालि होतिल जरी हे त्वत्कृपें ईश्वरा !
बा, ही शस्यसमन्विता लव तरी होईल रुक्षा धरा !

## अमर

पहिली प्रेमळ दृष्टी पतिची रमणीवर पडली,
तेव्हां लाजुनि लाली तिचिया गालांवर चढली;

सर्व सृष्टिला सुंदरतेच्या बुडवियलें पूरीं
हास्य खेळलें असें एकदां तिचिया मृदु अधरीं;

सारीं काव्यें फिकींच अगदीं ज्या पुढती ठरलीं
अशीं अस्फुटच गद्य भाषणें तेव्हां जीं झालीं;

साधे क्षुद्र प्रसंग सारे ज्यांनीं प्रीतिरसा
वर्धित करुनी स्वर्गसुखांतरिं केली मग्न रसा;

स्पर्शहि पहिला रोम थरारुनि देणारा सारे
विस्मृतिगर्तेमधें फेकुनी खेदाचे भारे;

उत्कंठेनें स्वयंस्फूर्तिनें ये हातीं हात
प्रणयियुग्मका करीत हर्षित साऱ्या विश्वांत;

परस्परांच्या मुखावरी स्थिर दृष्टी लागून
अंतःप्रेरणवशें टेकलें वदनावरि वदन;

ओंठ चिकटुनी त्या धुंदींतच मंदध्वनि उठला,
अमर सर्व हे प्रकार ठावे प्रेमी हृदयाला!

## स्वप्न

" प्राणविसांव्या! हो जागा, कां रडसी झोंपेंत?
बघ बसलें मी हात सारखी तुजवरि फिरवीत

स्वप्नामध्यें कुठल्या भलत्या कांटेरी रानीं
शिणसी अथवा माळावर कीं उन्हांत हिंडोनी?

कीं ओढ्याच्या कांठीं भरभर सोनुकलें फिरलें?
पहाड चढुनी का एकादा बाळ दमुनि गेलें?

घाम किती हा दरदरुनी तुज आला वेल्हाळा!
कां ग झालें फूल कोंवळें हें चोळामोळा?

कुणि मेल्यानें असें भिवविलें माझ्या छबड्याला?
हंसतां हंसतां रडें कोसळे कां वद हें तुजला?"

डोळे पुसुनी देत हुंदके बाळ वदे, "आई!
आत्तां दिसली त्या फुलझाडाखालीं मज ताई!

फुलें घेउनी ताजीं हांसत पहात मजला ती
मंजुळ गाणीं गात आइ ग, माळ करित होती

तिच्या मांडिवर बसावया मी गेलों धांवून
गडबडींत त्या फुलें खालती पडलीं निसटून

रागावुनि बहु मग ताईनें गट्टी फू केली
त्या वेलीच्या मागें जाउनि लपून ती बसली

शोधशोधिली तिला धुंडिली मीं सारी बाग,
माझी ताई परंतु आई ! नाहिंच दिसली ग !

हांक कशाला सांग मारिलिस ! काय काम होतें !
माझ्या ताईकडे लवकरी जाऊं दे मातें ! ”

मृतकन्येची मूर्ति आइच्या हृदयिं सदा बसली
अनंत काळानेंही नाहीं जायाची पुसली !

तिला कशाला स्मृती द्यावया दुसऱ्याचे बोल ?
परि या वचनें तन्मनिं झाला नुसता कल्लोल !

छटा पालटुनि तोंडावरची, कंठ भरुनि आला ,
उसळुनि अश्रू अवचित, पदरहि चिंब भिजुनी गेला

तशीच बोले त्या कुरवाळुनि उसनें हांसून,
“सोनुकल्या ! कां कष्टी होसी भलतें चिंतून !

ताई गेली देवघरीं, ती कशी परत येते ?
भ्रम झाला तुज; खरें कोण का मानी स्वप्नातें ?
ती सुटली, तिज दुःखें नाहिंत आतां व्हायाचीं,
बाळा ! तिजला गती मिळाली रे पुण्यात्म्यांची
खेळ कल्पना करिते सारे, दिसेल ती कुठली ?
देवाजवळी असेल आतां शांतपणें बसली
नव्हतों आम्ही पात्र खरोखर तिच्चिया सहवासा ,
म्हणून नेली तिला दयाळू देवानें सहसा ,
भाग्य कोठलें अमुचें इतुकें तिला पहायाचें ?
आहे अजुनी दुःख कळेना किति भोगायाचें !

असतें माझ्या हातीं तर का तिज जाऊं देतें !
उपाय नाहीं म्हणून बसलें सोडुनि आशेतें
भाग्य कळेना तुझेंच कुठलें–तुजला ती दिसली !
कां पण येतां न घरीं ऐशी परभारें गेली ?
गेलिस बाळे ! तशीच निघुनी, थांबुनिया थोडी
कां ही नेली नाहिंस संगें म्हातारी वेडी ?"
देत हुंदके बसली आई, पाहुनिया तिजला
चमकुनि थोडा बालक हळुहळु बोले या बोला:—
"आई ! कां मग सांग राहसी या दुःखी जगतीं ?
चल मजसंगें, नेतों तुजसी ताइ जिथें होती
निळ्या अंबरीं गेल्या अगदीं गजबजुनी तारा,
झाडें झालीं स्तब्धाचि सारीं, वाहेना वारा
तेव्हां येउनि माझ्याजवळी झोंप बरें आई !
क्षणांत तुजला स्वप्नामधली दाखवितों ताई !
रोजच येते ताई माझ्या स्वप्नीं त्या वेळीं,
गाणीं गाते किती मजेचीं बसुनी मजजवळी !
तिला धरूनी ठेव घट्ट तूं, सोडूं नको अगदीं
राहुनि दारीं उभाच करितों मीहि कडक बंदी !
गेलिच हट्टें तरि तिजमागें जाऊं धावून
स्वप्नीं स्वप्नें रचूं सारखीं, जागी होऊं न !"

## विधीचा फेरा !

भीतिव्याकुल होय बालशशका पाहून जी काननीं,
क्रीडा सोडुनि कांतबाहुलतिकापाशीं शिरे धावुनी,

ती ही सांप्रत जानकी निवसते लंकापुरीं एकली
ढाळी अश्रु सदा अशोकविपिनीं रक्षोगणीं वेढिली !

ज्यानें स्वीय अमोघबाणनिकरें त्रैलोक्यही जिंकिलें,
निस्तेजस्क तपोनिधी प्रबलही ज्याच्यापुढें जाहले,
घे निद्रा सुरनाथ विश्वक्षुनि यद्दोर्दंडलीलेवरी
हा ! हा ! शांभव भालवन्हि सहसा दग्ध स्मरा त्या करी !

आली झोंप कितीकदा न रुपुनी, शय्या फुलांची जिला
जीचें दर्शन हा अनुग्रह भला सूर्येंदुनीं मानिला
होती चालत रत्नभूमिवरती जी किंकरीवेष्टिता
एकाकी द्रुपदात्मजा वनपथीं ती होय ही निद्रिता !

गदाघातें ज्यानें समरिं वधिले भूप अमित,
विलोकोनी ज्याला सुरगणहि होते थरकत,
अहा ! पोळया मांडे पवनसुत तो लाटित बसे
विराटप्रासादीं, नयनिं जल धूमें गळतसे !

करस्पर्शें ज्याच्या सुरपतिहि हो धन्य भुवनीं
धनुर्धारीला ज्या कवण पुढती येइल रणीं ?
हरिश्चंद्र श्रीमान् गुणगणनिधी तो नरमणी
दळायाला जात्यावरि बसत चांडालसदनीं !

ऐसा फेरा विधीचा वरुनि गवसला संकटीं कोण नाहीं ?
जाणोनी हें प्रपंचीं अविचल हृदयें राहणें सज्जनाहीं
नीतीची कास हातें बळकट धरुनी आक्रमावें पथाला,
ईशश्रद्धा असावी, भिवविल मग त्या कोण लोकीं बुधाला ?

## कागदी नाव

मला अजुनि आठवे दिवस एक बाल्यांतला,
जळीं हळुच सोडिली करुनि कागदी नाव मीं;

सुदूर दिसले नभीं विरळ कृष्ण वर्षाघन,
सुखें हंसत जाहलों निरत मी मम क्रीडनीं
क्षणांत भरले नभीं अमित वादळी मेघ ते,
तुफान सुटला किती अनिल धूलिका फेकित,
अहा, वरुनि कोसळे मुसळधार पाऊसही
प्रवाह खवळून ती बुडुनि नाव गेली तळीं !
तदा मजसि वाटलें सुख मदीय नाशावया
मलाच दुखवावया अदय मेघ हे पातले;
विचार बघुनी असे मम मला दुजे हांसले
परंतु चुकलों कुठें न कळलें मला तेधवा !
पुढें अजवरी किती विषम पातले दुर्दिन,
भितां न परि त्यामुळें रमविलें मना मी सदा
बघून नव संकटें न विधिला अतां दूषितों
क्षणांत जलमग्न ती स्मरुनि नाव होतों स्थिर

## अचल प्रेम

होतीं मावळतीं दिनेशकिरणें नीलांबरीं राहिलीं
वाटे शीतल मंद वायु सुटुनी आराम सर्वांसही
एका सुंदर टेकडीजवळुनी वाहातसे निर्झर
होत्या शोभत त्या तटीय लहरी सायंप्रभेनें किती !
मी मित्रासह शून्य दृष्टि अपुली लावून त्यांच्यावरी
होतों शान्तपणें उगाच बसलों पाषाणखंडीं तदा
माझा मित्र पुसे हळूच "अजुनी होते तिची का स्मृति ?
नाहीं काय कधींच संसृतिसुखें सेवावयाचीं तुला ?"
या प्रश्नें सुखपूर्ण ती मजपुढें पूर्वस्थिती राहिली
आला सांप्रतकाल दारुण महा दृष्टीपुढें सत्वरी

त्यायोगें जखमेवरील पडदा बाजूस व्हावा तसें
ताजें होउनि दुःखदृष्टि भरली उष्णाश्रुधारांमुळें

" मित्रा ! काय मदीय चित्त म्हणजे निजावसें मानिसी ?
कीं येतील नवीन अंकुर सदा त्यामाजिं भूमीपरी ?
आहे एकच मूर्ति येथ बसली व्योमीं जशी चंद्रिका ?
प्रेमस्पर्शन केधवाहि मजला होणार नाहीं दुजें !

आला जों न वसंत जों खदखदा सृष्टी हंसूं लागते,
डोले नूतन–मेघवर्षणिं मुदें ग्रीष्मांत वृक्षावलि,
जी माझी फुलवील चित्तकलिका–जी दग्ध झाली पुरा—
ऐशी माधविका, घनालि अथवा विश्वीं नसे एकही !

होतें प्रेम कसें तिचें मजवरी तें विस्मरूं मी कसें ?
झाली दग्ध मदर्थ दुःखदहनीं तें विस्मरूं मी कसें ?
तन्मुग्धस्मित लाजवील अगदीं संध्येस या निश्चित,
तेंही विस्मरुनी मदीय हृदयीं रे सांठवूं काय मी ?

आहे तद्गुणसंघ हा मजपुढें याला जरी विस्मरूं ?
ही होईल वसुंधरा सकलही सैतानराज्यापरी !
तीचें पावननामचिंतन गमे सोपान हा मुक्तिचा
हें सोडून अधःपथानुगमनस्वीकार कैसा करूं !

नेमें बैसुनि एथ निर्झरतटीं, मूर्ती तिची चिंतुनी
देतों अश्रु मदीय मी मिसळुनी या दिव्य तोयासवें ;
केव्हां जाउनि टेकडीवरहि या उन्मुक्त वायूसह
आकाशीं भरितों तिला अठवुनी दुःखोष्णनिश्वासही

काहीं क्षुद्रच कारणावरुनि मी रागावुनी तेधवा
गेलों निर्दय दूर, गेहिं तिजला टाकूनिया एकली

हा ! हा ! माद्विरहें बदा गवसली जी मृत्युपाशामधें
होतों मानित त्याच सुंदरिस मी निष्प्रेम गर्वाकुल !
जे जे तीव्र कठोर शब्द तिजला मी तेधवा बोललों
ते ते सर्वहि आज रे परतुनी माझ्याकडे पातले
तूं माझ्या हृदयास दग्ध करिशी कां आपुल्या दुष्कृतें
तें माझें वच वज्र दारुण मना आतां कसें जाळितें !
कर्णीं मृत्युकथा तदीय पडतां गेलों स्मशानांतरीं
उन्मत्तापरि लोळलों गडबडा त्या दग्ध भूमीवरी
देवी ! मी अधम प्रभाव न तझा जाणून लोकोत्तर
दुःशब्दीं छळिलें तुला बहु ? असें कांहीं तरी बोललों
मित्रा, मागितली न अंतसमयीं हा ! हा ! क्षमाही तिची,
गेली ती सहसा परेशसदनीं अस्वस्थ दुःखाकुल
ती आहे पुढती उदश्रुमलिना तीची मुखश्री सदा
माझी मानसवृत्तिही अनुदिनीं तल्लीन झाली असे !
येओ प्रीति जगांत, दूर अथवा जाओ निघोनी कुठें,
सोडोनी तरु एक अन्य तरुला सेवो विहंगापरी;
या जन्मीं न कुणावरी करिन मी प्रेमांशही केधवा,
केव्हां का सुखवल्लिकुंजगत ती भेटेल ना मत्प्रिया !
ही केव्हांहि मदीय अश्रुसरिता आटावयाची नसे,
हे निश्वासहि चालणार अगदीं प्राणावधी सारखे;
झाली मूर्ति पवित्र नष्ट जरिही त्या देवतेची असे,
आहे हें मम मानसालय तरी मित्रा ! तिचें सर्वदा !

## माझें कोणीच नाहीं

आकाशीं दिव्य तारे चमकति, पसरे कोमला कांति त्यांची,
आनंदें लोक सारे भरुनि मनिं अहा ! भोगिती शांति साची,

झालें सौख्यांत दंग त्रिभुवन रमले देव पीयूषिं जेवीं
माझें कोणीच नाहीं ! तळमळ मनिंची नष्ट होईल केवीं ?

शोकानें कंठ आला भरुनिहि, विलया मन्मनःशांति गेली
वाहोनी अश्रुधारा खळखळ नयनीं दृष्टिही शून्य झाली
औदास्यें व्याप्त झालें हृदय, विषय तो कोणताही सुचेना,
बोधोनी हाय ! ऐशा खडतर समयीं शांत कोणी करीना !

वाहे हा मन्द वायू परिमल भरुनी आपल्या तोहि नादीं,
बैसोनी हा रसालीं खल पिक विपिनप्रान्त व्यापी निनादीं;
डोलें हा चंद्र डोले गगनिं, न गणितो मत्स्थिती दीन ऐशी,
माझें कोणींच नाहीं, तळमळ मनिंचि नष्ट होईल कैशी ?

हा रे ! दैवा ! कसा रे बिकट मजवरी कोसळे हा प्रसंग ?
दुःखानें हाय गेलें करपुनि अनलें पद्मसें अंतरंग !
कांतेच्या बाहुपाशीं सरसिजमृदुलीं झोंपला मित्र तोही
शोकातें शांतवाया खडतर समयीं काय कोणींच नाहीं ?

सारी ही सृष्टि निद्रासुख अनुभविते सोडुनी भीति चिंता !
केलें मी काय देवा ! पळभरि न घडे शांतताला भ चित्ता !
शोकेंही रंजवावें अखिल सहृदया होय बाणा कवीचा,
तो मी आनंदकालीं घळ घळ रडतों, धन्य फेरा विधीचा !
दुर्दैवी मी, कशाचें सुख मज मिळतें ! जन्म गेला रडोनी !
हा हा ! दुर्भाग्य माझें अजि विफल कुणा दोष लावूं कढोनी ?
माझें तें दूर जातें, प्रियजन मम तो संशयव्याप्त होतो,
माझें कोणीच नाहीं ! अहह, विधिवशें मी मला दोष देतों !

[२]

घालोनी मान खालीं घळघळ नयनीं सोडिल्या अश्रुधारा,
वाढोनी शोकसिंधू, खळबळ उठुनी लोपला मोद सारा;

नैराश्यें अंतरंगीं बळकट दिधलें ठाण, कांहीं सुचेना,
तों आली रम्य वाणी अमृतसुमधुरा तर्पिलें पूर्ण कर्णा:-

" छे छे! मित्रा, अशीं हीं अनुचित वचनें बोलणें योग्य नाहीं,
मोहव्यामूढता ही बहुपरि भुवनीं निंदिली सज्जनांहीं;
सोडोनी शोक सारा, उघडुनि नयनें एकदा पाहिं मातें,
नोहे का रे तुझा मी? करिसि मग वृथा दुःख हें कासयातें?

" नेणोनी कारणातें, कविहि म्हणवुनी विष्णुला दोष देसी,
त्यानें कैसें करावें! उघड न मनिंचा सांगसी भाव त्यासी
आहा! मित्रापराध स्वमनिं न धरितां सत्वरी सोड खेद,
दुःखाचें मूळ आहे, बुधजन म्हणती, या जगीं चित्तभेद!

"तोडोनी पाश सारे, सकळहि मनिंची सोडुनी कामना ती,
फेंकोनी दूर तीं तीं बळकट जडलीं सर्व निष्काम नातीं,
झालों आहा, तुझा मी, तुजविण न रमे चित्त हें अन्य ठायां,
पाहीं या दीन मित्रा, वळवि मुख, करीं दुःख आतां न वायां!"

आनंदें नेत्र आले भरुनि सुखभरें दाटलें अंतरंग,
गेलें औदास्य लोपा, मधुर उसळला मानसीं प्रेमरंग;
वेढोनी वामनाला बळकट वदलों कंपिता बाहुपाशीं
"मित्रा! तूं एक माझा! अवचित करिं हा गावला सौख्यराशी!"

## समापन

प्रभातीं अस्तातें जरि विधुकला जाय सहसा
तरी तज्ज्योत्स्नेची स्मृतिहि हृदयातें सुखविते;
असो रम्य क्रीडा जलधिलहरींची किति दुरी
तरी होते नेत्रांपुढुनि नच नष्ट क्षणभरीं;

किती झाला काल श्रवण करुनी गानरव तो
तरी त्याचा नाद श्रुतिपुटिं अजूनी घुमतसे;
दिसोनी आकाशीं क्षणभरच गेलें सुरधनु
तरी त्याचे चित्तावरि उमटती रंग अजुनी;

सुकोनीया गेलें नव कुसुम रानांत फुलुनी
तरी चित्ता व्यापी अजुनिहि तयाचा परिमल;
तशी गेली माझी मधुर कविता दृष्टिपुढुनी
रसोद्रेकें राहो तरिहि रसिकस्वांतनिलयीं !

## पुढें चाल

कर्तव्यें भरलीं किती, दिवस हा आहे किती थोडका,
कार्यें पूर्ण न जाहलीं बहु, परी तन्मार्ग ठावा नसे;
भूमी कंटकपूर्ण, न स्थल कुठें पाऊल ठेवावया,
होतें धैर्य विनष्ट दुर्धर महा पाहूनियां संकटें

सोडीं धैर्य न लेशही, धरुनियां आज्ञा प्रभूची शिरीं
सारा त्यावरि भार घालुनि पुढें निःशंक टाकीं पद;
सत्याचा मृदु गालिचा पसरतां मार्गावरी सर्वतः
कोठें कंटक, पुष्पपूर्ण सगळी होईल ही मेदिनी !

तूं जाशील जिथें जिथें, हरुनियां तेथील सारें तम,
वेगें होइल तो प्रदेश मनुजा, दिव्यप्रकाशान्वित
दीनांचीं असुखें करून दलित स्वीयप्रभावें त्वरें
आशीर्वादशतांहिं मंडित जगीं होशील तूं निश्चित !

कर्मक्लांत करीं तुझ्या नवबला स्थापील विश्वंभर,
वज्रातेंहि विदारिती मृदु सुमं त्याच्या कृपालोकनें;

त्याचा हात धरून चाल पुढती, मागें न घेई पदा,
या विश्वीं मग कार्य दुष्कर असें आहे तुला कोणतें ?

## आज काय ?

असतीं कार्यें करावयाचीं उद्यां अम्हांला किती,
केलीं आज परी कोणतीं ?
उद्यां इच्छितों ढीग धनाचे कोणाला द्यावया,
परि किती केलें आजी व्यया ?
उष्णाश्रुनदी टाकावी सुकवुनी,
सुखवावें अबलां भीती वारुनी
त्या रमवावें प्रीतीच्या भाषणीं
बेत चालले सुखासनावर बसून नाना मनीं
दाविलें आज काय वर्तनीं ?

कृपाकटाक्षें दीन जनातें उद्यां हर्षवूं अति,
जाहली आज कोणती कृति ?
दुःखदरींतुनि उद्यां अनाथां निश्चित आणूं वरी,
केलें आजि का कांहीं तरी ?
अन्याय उद्यांस न राखूं भूवरी,
फडकवूं ध्वजा सत्याची अंबरीं,
क्षुद्व्यथा हरूं गरिबांची सत्वरी,
उद्यां हें करूं उद्यां तें करूं, बेत चालले किती,
कार्यें आज सांग कोणतीं ?

निर्मूं आपण उद्यां प्रयत्नें सौख्याचीं मंदिरें,
काय परि घडलें आजी करें ?
यशःस्तंभही बांधूं व्योमा भिडणारे भव्यसे,
तयांचा आज फायदा नसे

स्वप्नांत रंगणें वाटे गोडसें,
पण महत्व त्याचें आतां कायसें ?
फल वाग्जालानें हातीं ये कसें ?
प्रश्न सर्वदा करा, उद्यांचा मोह दूर सारुनी
'घडलें आज काय हातुनी ?'

## कवि लेंभे यांच्या पत्रास उत्तर

झालों विस्मित कौतुकस्तिमित मी, शंकाहि आली मनीं
प्रेमप्रेषित आपली कविवरा! ही पत्रिका वाचुनी;
आहे हा उपहास काय अथवा ही सत्य आहे स्तुति
याची भ्रांति पडे, क्षणैक मम ही मूढा जहाली मति !

आहे काय असा स्तवोचित कवी मी ? छे ! न वाटे खरें,
एथें केवळ आपुली रसिकता आली दिसूनी बरें !
किंवा हा परिणाम येत घडुनी मन्नूतनत्वामुळें
इंदू सोडुनि धूमकेतु बघण्या दृष्टी जनांची वळे !

नाहीं पात्र अशा स्तुतीस जन हा सामान्य, वाग्भूषणा!
या लेखें भ्रम होय वेढिति जरी मोदोर्मिमाला मना
कैसें होइल दीन मानव फिरे जो राजरथ्येवरी
माला भूपसुता तदीय सहसा घालील कंठीं तरी !

ही माझी लघुमंजरी परिमलें मोहील तुम्हां अशी
यापूर्वी रसिकेंद्र! सत्य नव्हती आशाच मन्मानसीं !
आकाशीं अमृतद्युती विहरतां तारा पुढें ये जसा
स्वेच्छ, श्रेष्ठ कवी कितीक असुनी, मी पातलों हा तसा !

कीर्तीची लवमात्र आस नव्हती, व्हावी तरी ती कशी ?
आहा ! त्याच मला अतर्क्य सहसा आली सुवेला अशी !

हें वाटे सुयश प्रचंड, लिहिल्या ज्या चार ओळी करें
त्यातें मानुनि काव्य, गाति रसिक स्वांगें प्रमोदादरें

होतां पूर्ण निशीथकाल, असतां संस्तब्ध सृष्टिप्रिया,
वीणा घेउनि शारदा मधुरवें लागे तदा गावया;
ती स्वर्गीय पिऊन गायनसुधा तल्लीन होऊन मी
सत्तेजोलहरींत जाय बुडुनी, सामान्य जाती तमीं !

तें गाणें भरतां मनीं मग सवें मी लागतों गावया,
तेव्हां ऐहिक ते विचार सुकवे ! जातात सारे लया !
वेड्याची कृति कोठुनी बुधजना होईल मान्या तरी ?—
होतों भीत, परंतु आज सगळा संदेह गेला दुरी !

आभारी तुमचा असे बहु कवे ! हा एक वेडा जन;
ठेवा लोभ, असो कृपा, विनवितों जाणून युष्मन्मन—
वन्या पुष्पलतेपरी सुकतसे ही दिव्य काव्यांगना,
भोक्ता मार्मिक भेटतो न, करितों ही यास्तव प्रार्थना !

## चिंतन

काय सांग तुज जन्मभूमि ती अपुली आठवते ?
सभोंवतालीं कशीं पसरलीं तीं झुलतीं गवतें !

दिवस तदाचे किती सुखाचे गमले आम्हांस,
जिकडे तिकडे भरुनी गेला होता उल्हास !

घालुनि हातीं हात मजेनें त्या झाडीमधुनी
होतों विहरत, आठवतां तें कसेंच होय मनीं !

खेळ खेळलों परोपरीचे त्या वेलींखालीं
नाहिं जाणिलें त्या नादांतच रात्र जरी झाली !

खडकावरुनी आदळणारा ओढा हंसरा तो
ताई ! तुजला खरेंच अजुनी काय न आठवतो ?

बसुनि शिळेवर पाय सोडुनी त्याच्या ओघांत
संध्याघटिका किती लोटिल्या आम्हीं हर्षांत !

स्वर्गधरेचें ऐक्य कराया चढणारा गगनीं
शैलराज तो दृष्टिपुढें मज दिसताहे अजुनी !

जाउनि त्याच्या समीप गाणीं आवडतीं गात
किती डोंगरीं फुलें तोडिलीं नादानादांत !

वाटेवरचा तलाव सुंदर का स्मरतो तुजला ?
किती हर्षलों प्राशन करुनी त्यांतिल शीत जला !

मंद वायुनें उठणाऱ्या त्या लाटांवर सारीं-
फुलें फेकिलीं आपण, तीं तर मौज गमे भारी !

मावळत्या रविकिरणांसह त्या लाटा हंसतांना
आपण होतों स्वैरच उधाळित गाण्याच्या ताना !

अहा ! अहा ! ते काय सुखाचे दिवस निघुनि गेले !
हे चिंतेचे विषण्णतेचे आज पुढें ठेले !

काळ रम्य तो, स्थान रुचिर तें मिळतिल का फिरुनी ?
हीं आतांचीं दुःखें सारीं जातिल का निघुनी ?

कीर्ति नको ही, मानहि नलगे, ज्ञान असो दूर,
वाटे जाउनि त्या झाडींतुनि हिंडावें स्वैर !

---

# का व्य गुं फा

## शूर्पणखा–पत्रिका

[ श्रीरामचंद्र पंचवटीस असतां रावणाची बहीण शूर्पणखा ही लक्ष्मणाचें मनोहर स्वरूप पाहून मोहित झाली, आणि तिनें त्याला खालील प्रेमपत्रिका पाठविली. कविगुरु वाल्मीकि यानें राजराजेश्वर रावणाच्या सर्वही परिवाराचें बीभत्स वर्णन केलें आहे; पण या ठिकाणीं त्या भावनेचा मुळींच संपर्क नाहीं. म्हणून, वाचकांनीं ती वाल्मीकिवर्णित भयंकर शूर्पणखा मनांतून दूर करावी. प्रस्तुत कविता वंगकविसम्राट् माइकेल मधुसूदन दत्त यांच्या 'वीरांगना' नामक नितांतरमणीय काव्याच्या आधारें लिहिली आहे. ]

कोण सांग तूं भ्रमसि एकला या निर्जन काननीं ?
झालें वेडी विभूतिभूषित तनु तव ही पाहुनी !

अग्नि असावा दडून भस्मामधें सुंदरा ! जसा,
किंवा अंबुदपटलिं चंद्रमा तूंही गमसी तसा !

जटाजूट हा तुझ्या शिरावर मनोहरा ! देखुनी
होय कसें तें न ये सांगतां, जाय हृदय फाटुनी !

कळलें—रजनी नित्य कंठिसी शयन करुनि भूतलीं,
तेव्हांपासुनि सुवर्णशय्या मींहि असे त्यागिली !

फलमूलावर जीवन आहे तुझें इथें चाललें,
स्मरुनी हें मज नीरस सारे राजभोग जाहले !

दारुण विपिनीं वससि सुंदरा ! आठवुनी हें मनीं
सुवर्णमंदिर माझें कारागृहापरी मी गणी !

सांग एकदां मला—भवसुखें सोडुनि नवयौवनीं
काय कारणें विरक्त होउनि वससी तूं या वनीं ?

भयें कुणाच्या मैनाकापरि लपसी वनसागरीं ?
तुझ्या मनींचें हितगुज सारें सांग मला सत्वरी !

कुणा रिपूनें अतुल विक्रमें काय तुला जिंकिलें ?
सहाय न कुणी म्हणुनी खेदें का वन हें सेविलें ?

एक शब्दही बोल—विजयिनी सेना मी धाडितें
क्षणांत नेइल विलया सखया ! प्रबळहि तव शत्रुतें !

आज्ञा होइल तुझी तरी मम सेवक समरांगणीं
आणितील तुजपुढें निश्चयें इंद्रासहि बांधुनी !

कुठेंहि बसला लपुनि तुझा रिपु दयिता ! तुज दुखवुनी
जिवंत नच तो रहावयाचा माझ्या दृष्टींतुनी !

निर्धनतेचें दुःख मानुनी काय राहसी वनीं ?
सांग एकदां—पायदळींही विखरिन नाना मणि !

अलकेमधलीं धनभांडारें फोडुनिया सत्वरी
अमूल्य रत्नें शिलाशकलशीं फेंकिन अवनीवरी !

शोषुनि रत्नाकरहि त्यांतली मुक्तावलि सुंदरा !
विखरुनि तारकभूषित गगनासम सजविन ही धरा !

आवडतें तुज रूप कोणतें ? सद्गुण कसले बरें ?
सांग, तशी मी कामरूपिणी होइन सखया ! त्वरें !

इंद्रवनांतिल नुकती फुलली सुरतरुकुसुमावलि
आणुनि शय्या तुझी कोमला ! रचीन अंबुजदलीं !

इंद्राणीच्या किंकरीपरी दासी मम कितितरी
रमवितील तुज वीणासंगत मंजुगायनस्वरीं !

सुवर्णमणिमय मंदिर माझें, मुक्तामय अंगणें,
मरकतशोभित सोपानावलि मोहविती लोचनें;
स्तंभ मनोहर असति निर्मिले पद्मरागहीरकीं,
अतुलविक्रमें मेळविले जे समरिं असुरनायकीं;
गाति सारिका मंजुळ गाणीं हळुहळु एकीकडे
दिव्य गायनें नव तरुणींचीं चालति दुसरीकडे;
व्यापित परिसर निजकलनादें तरंगिणी वाहते
लहरिक्रीडा तिची पाहुनी श्रांतहि मन मोहतें!
वनांत फुलती असंख्य कुसुमें त्यांच्या मधुपरिमलें
असे तर्पिलें अनुदिन सकलां शीतल मंदानिलें
परी व्यर्थ हें वैभव सारें तुजवांचुनि राजसा!
इंदुवांचुनी प्रकाश लाभे रजनीला वद कसा?
वैभव माझें, देहहि दयिता! आज तुला वाहिला,
काननवासक्लेश भोगिसी कां आतां प्रेमला?
ये माझ्या—छे! अपुल्या सदनीं भीड सर्व सोडुनी
मृदुसुमशयनीं पहुड, नको ही कंटकिता मेदिनी!
नसेल तुज हें रुचत तरी मज सांग तसें एकदां
सोडुनि विभवें येतें तुजसह रहावयाला मुदा!
दिव्य दुकूलें, रुचिर भूषणें तनुवरि हीं कासया?
तापसवेषहि होइल सुखकर तुजसह मजला सया!
नसे रुचत तुज तरि मणिमाला मीहि गणिन तुच्छ ती!
दुकूल टाकुनि रुक्ष वल्कलें वेढिन तनुभोंवतीं!
कुंतलरचना सोडुनि बांधिन जटाजूटही शिरीं,
नकोत रत्नें, रानफुलें मी रचिन तयाच्या वरी!

चंदनलेपन राहो, भस्में टाकिन तनु चर्चुनी,
रुद्राक्षावलि घालिन कंठीं मुक्तावलि फेंकुनी !
प्रेममंत्र मज सांग सुंदरा ! कर्णपुटीं एकदां,
समाधि चढवीं, भानावरही नको यावया कदा !
गुरो ! दक्षिणारूपें तुज हें यौवनधन वाहतें,
हृदयहि चरणीं तुझ्या ठेवितें जें प्रेमें नाहतें !
लाभ तुझा मज होइल तरि मग काय उणें भूवरी ?
वंशकीर्तिही तुच्छच आहे, सत्य जाण वैखरी !

* * *

या तरुतलिं मी शब्द दोन हे लिहुनि इथें ठेवितें—
कीं तूं येशिल नेहमींपरी, पडतिल तव दृष्टितें
आवडतें हें स्थान तुझें बहु, हें ठावें मज असे,
इथेंच तुजला प्रथम पाहिलें तें विसरिन मी कसें ?
हा पिंपळ पसरला अंबरीं, शमीहि इकडे झुले,
मंदवायुनें पुष्पितलतिकासमूह हर्षें डुले;
लाज वाटुनी फारच तुझिया पुढें यायची मला,
या तरुआडुनि पहात तुजला काळ किती दवडिला !
दृष्टि सारखी लावी भानूवरी जशी कमलिनी
उत्कंठेनें तशा तुला मी पाहतसें मोहुनी
बसुनि शिलेवर असती या तूं जोंवर या तरुतलीं
निगडबद्धशी दासी तव ही उभी इथें राहिली
तूं गेल्यावर बैसुनियां मी शून्य तुझ्या आसनीं
किती सोडिले लोट अश्रुचे हा ! हा ! नयनांतुनी !
तुझ्या पदींची धूळ तेथली घालुनि केशांतरीं
असहविषादें तदा लोळलें गडबड मी भूवरी !

* * *

काय सांगुनी पूर्वकथा त्या तुला ? लिहावें किती ?
भाव मनींचे व्यक्त कराया शब्द पुढें खुंटती !

अभागिनीची जरी पातली दया तुला क्षणभरी
सायंकालीं आज बैस तूं गोदातीरावरी;

येइल माझी एक सहचरी घेउनि नौका तिथें
तींत बैसुनी परतीरावर येशिल तूं शुभमते !

विपिन निबिडतम, निर्जन आहे जीवेशा ! त्या स्थलीं,
पाहूं प्रेमस्वप्नें तेथें जीं न कुणीं देखिलीं !

* * *

लंकापुरिचा ख्यात भूपती राक्षसकुलभूषण,
महाविक्रमी, समरधुरंधर तैसे खरदूषण

या वीरांची भगिनी मी ही शूर्पणखा स्मरहता
प्रेमपत्रिका लिहीत आहें दासी तवगुणरता

रूप कसें मम असे मनोहर पहा तरी एकदां,
नरलोकीं का रूपमती वद मजसम दिसली कदा ?

मलयसमीरा ! एकवार ये, कुसुम पहा हें तरी,
गंधहीन तें गमलें, पथ तव असे मोकळा तरी;

मधुपा ! गुंगत ये या कुसुमीं, मधु न तुला लाभला,
तरी उडुनि जा कुठेंहि, याहुनि काय वदावें तुला ?

नसेल सौरभ, सुंदरताही, कोरांटीचीं फुलें
हांसविलीं नच जरी वसंतें, काय त्यास शोभलें ?
हीन दीन मी फार थोर तूं, पण हें प्रेमीं वृथा !
पंकसंभवा कैरविणीला हांसवि विधु तत्वतां !

* * *

कळलें नुकतें, दाशरथी तूं, बंधुप्रीतीमुळें
राजवैभवें सोडुनि दुर्धर कानन हें सेविलें

तूं प्रेमाचा निधीच असशी, किती स्तवावें तुला !
राजसुता ! तव पदधूलीची नसे योग्यता मला !

नसेल माझी तशी योग्यता, योग्य असिसि तूं तरी !
प्रेमकणांचें अल्पहि वर्षण दासीवर या करीं !

राजतनय तूं, हीन असें मी, मज न दूरवीं परी,
दासीभावें तरी वल्लभा ! आदर हीचा करीं !

* * *

असो लिहावें किती, लौकरी ये संकेतस्थलीं,
करीन हृदयग्रंथी सारी तुझ्यापुढें मोकळी

कल्पित संगम तुझा कल्पुनी सुखाश्रु हे वाहती,
भालीं लिहिली परी विधीनें न कळे लिपि कोणती !

## प्रतीक्षा

वसंतवाता ! कोठें असशी ? तुझ्या वियोगामुळें
कसें हें विश्व पहा जाहलें !

एकसारखी वाट पाहुनी तुझी, दीन मेदिनी
गेली शीर्ण किती होउनी !

हिमबिंदूंनीं नेत्र सदाचे गेले भरुनी तिचे,
भूषणावली न कांहीं रुचे !

वेषहि साधा दिसे कसा तरि, गंध न देहावरी,
वाटत उदासशी अंतरीं

कुंजवनेंही तेजोहीनच गमती कुसुमांविणें,
मिळावीं कशीं केशभूषणें ?

शुष्क, पल्लवांवांचुनि असती उभ्या वृक्षवल्लरी,
लोटिती रसिकां खेदांतरीं !

उजाड सारें रान पसरलें, शोभा न कुठें दिसे,
मग पिक गातिल गाणीं कसे ?

तूं वससी वाता ! सांप्रत कवण्या स्थलीं ?
कीं या स्थानाची विस्मृति तुज जाहली ?
कीं तिकडे कोणीं वृत्ति तुझी मोहिली ?

विलंब न करीं, फीर मागुता, सृष्टिस या वांचवीं,
किसलयीं वनराजी भूषवीं !

करीं कंटकां पुष्परूप तूं, फुलविं शुष्क वल्लरी,
वाहवीं सौख्यपूर भूवरी !

## ईशप्रार्थना

सत्ता होय असीम, आदि न तव ज्ञानास विश्वेश्वरा!
वात्सल्यैकविलासमंदिर महा तूं एक होसी खरा
उच्छ्वासेंच तुझ्या गुणप्रसविनी विश्वीं भरे चेतना,
होती काव्यवधू विमोहित कशी त्यावीण याही जना ?

नक्षत्रां गति तूंच ही दिधलिसे, तीं चालती तीपरी,
आज्ञेनें तव सारखा फिरत हा वायूहि विश्वावरी;
सौंदर्य, प्रतिभा, प्रसाद जगतीं येती तुझ्यापासुनी,
पापाचार विवेकमूढ न परी हें तत्त्व घेती मनीं !

कोठें मानव अल्पबुद्धि, अथवा तें ज्ञान त्याचें किती,
गाढाज्ञानतमीं कुठें तरिहि ते अंधापरी चालती
ज्ञानांचा निधि तूं, त्वदीय माहिमा त्यांना कळावा कसा ?
सुज्ञां स्पष्ट दिसे दयागुणिं तुझ्या संपन्न झाली रसा !

न्याय, प्रेम, परोपकारानिरता बुद्धी, महाविज्ञता ,
यांचा एकनिवास अन्य तुझियावीणें असे कोणता ?
ओजोवैभव केवढें तव ! असे सौजन्यही निस्तुल ,
चातुर्या उपमा न, हें कथितसे रेणूहि विश्वांतिल !

त्या सर्वेश्वरनायकेंच मज तूं निर्माण केलें असे,
अंतःप्रेरणिं दाविलें जगतिंचें कर्तव्यही स्पष्टसें
काव्योच्छ्वासवती मती वितरिली सन्मानसाल्हादिनी,
हे व्योमीं ध्वनि सारखे उसळती मास्तिष्कजालांतुनी !

येतां तो मधुमास सुंदर फुलें वेलीवरी शोभती ,
वर्षाकालिं घनोदरांतुनि जलें पृथ्वीवरी लोटती ;
देवा ! मीहि नसें स्वतंत्र, तुझिया सान्निध्यलाभामुळें
काव्यें हीं रचितों, रसज्ञ कुतुकें वाचून होती खुळे !

विश्वव्यापार सारे घडविसि अतुल स्वीय इच्छाबलानें ,
हें मीं केलें म्हणोनी बडबड करिती मूढ गर्वांध लोक ;
डोळ्याची पापणीही क्षण न उघडवे तूजवांचून कोणा ,
सूत्रें तूं चाळवीता, परवश सगळीं नाचती बाहुलीं तीं !

येतें पंकामधूनी कमळ चहुंकडे सौरभा विस्तरीत ,
मातीचा देह केला रुचिरतर, असे काय आश्चर्य थोडें ?
कोठें तूं शक्तिशाली ? अबलतम कुठें जीव अल्पप्रभावी ?
स्पर्धा तूझ्या कृतीशीं करिति परि किती, काय त्यांना ह्मणावें ?

वीणा हातीं तुझ्या ही, फिरविसि कुतुकें अंगुली तीवरून,
जातो नादध्वनींनें झणिं गजबजुनी शून्यही प्रांत सारा ;
होते जैशी त्वदाज्ञा, मम मुखिं सहसा शब्द येती तसेच,
त्यांचा स्वामी परी तूं गुणगणानिलया ! मी असें शुष्क वारा !

शाती बालेंदुकांतीपरी जनिं वितरो नित्य मत्कर्मजाल,
किंवा विश्वा दवाग्नीपरि चहुंकडुनी आग लावो खुशाल ,
मी तों नामानिराळा, अशुभ शुभ यशें वाहिलीं त्वत्पदीं तीं
गेलों आत्मत्व सारें विसरुनि तुझिया नामसंकीर्तनांत !

## प्रबोधन

अजुनि किती निजसी !
सुंदरा !
अजुनि किती निजसी !
ही प्रभात झाली तरी पुरेशी होय न झोंप कशी !

मधुरजनी सरली,
गडे ही
मधुरजनी सरली,
दशदिशा फाकल्या, प्रकाशलहरी विश्वांगणिं भरली !

नक्षत्रें लपलीं,
अंबरीं
नक्षत्रें लपलीं,
हे गुलाब हंसले उपवनिं, कमलें सरोवरीं फुलली !

हा प्रभातवायू मंद सुशीतल वाहे !
चहुंकडे उषेचें हास्य भरुनियां राहे !

ऊठ नेत्र उघडी,
सुंदरा !
ऊठ नेत्र उघडी,
शुभशांतिरसाची चिरमंगलमय आहे हीच घडी !

वाट तुझी बघती,
सर्वही
वाट तुझी बघती,
तुज उठवायाला तिकडे रानीं ओढे खळखळती !

प्रकाश हा गगनीं,
पातला
प्रकाश हा गगनीं,
तुजसाठीं आहे अरुण थांबला पहा तरी अजुनी !

तुजसाठीं भरलीं
नभीं ही
तुजसाठीं भरलीं
खगगीतें मंजुळ मधुर स्वर्गामधुनी पाझरलीं !

हा ओघ तुंबला मम हृदयीं प्रेमाचा,
हा हार सांचला नयनिं अश्रुमुक्तांचा,

वाहिन तव चरणीं,
आदरें
वाहिन तव चरणीं,
तव दृष्टिसंगमें होइल पावन नाथा ! ही धरणी !

व्योमास्तव रवि हा,
निर्मिला
व्योमास्तव रवि हा,
रविसाठीं आहे व्योमहि उत्सुक अनंत काल पहा !

कमल असे सृजिलें,
सरास्तव
कमल असे सृजिलें,
हें सरही कमलासाठीं दिसतें उतावीळ कसलें !

तरुसाठीं वेल,
उगवली
तरुसाठीं वेल,
हा पसरुनि बाहू प्रेमें तरुही तिज आलिंगील !

सौंदर्य तसें तव माझ्या दृष्टीसाठीं !
ही प्रीतिवाहिनी माझीही तुजसाठीं !

अजुनि न कां उठसी ?
सांग मग
अजुनि न कां उठसी ?
ही प्रभात झाली तरी पुरेशी होय न झोंप कशी !

## भारतमाता

धन्य धन्य भारतमाते ! तुझ्या यशोगानीं
असो एकभावें माझी निरत सदा वाणी !

तुझ्या दिव्य तेजें सारे देश फिके झाले,
तुझ्या गौरवानें नाहीं चकित कुणा केलें ?
तुझ्या कीर्तिनादें सगळें विश्व भरुनि गेलें,
रिपुहि नम्र होती येतां नाम तुझे कानीं !

द्वारपाल हिमनग दारीं सदा तिष्ठताहे,
स्तवनगीत सागर तिकडे तुझें गात आहे,
ध्वजा तुझी उभवुनि गगनीं विंध्य उभा राहे,
कंठहार तव गंगा ही, कोण तिला वानी ?

राम, भरत, धर्मऐसे भूप जिथें झाले,
व्यास, वसिष्ठांनीं जीचें सुयश वाढवीलें,

सुकविनायकीं वाङ्‌निधिला जिच्या भूषवीलें.
आर्यजननि, ती तूं अससी एक सुगुणखाणी !

भव्य शैलराजी, विपिनें दीर्घ पसरलेलीं,
शस्यमंडिता, तरुजालीं सुचिर व्यापिलेली,
यथाकाल घनराजानें नित्य सेचिलेली ,
कृपा निसर्गाची तुजवर दिसत विभवदानीं !

सलिलभार घेउनि सरिता अमित धांवती या,
मंद वायु जनतापातें वाहतो हराया ,
इंदु सदा तत्पर आहे निशा प्रकाशाया,
व्यापितात कुसुमें परिसर मधुर सौरभानीं !

नसे कधीं उत्पातांचें नांव तुला ठावें ,
स्वर्गभूहि नीरस तुझिया जाहली प्रभावें,
इच्छितात सुरही जन्मा तुझ्यावरी यावें,
किती वर्णिलें प्रेमानें तुला महात्म्यांनीं !

कर्मभूमि ! देसी न कधीं ठाव आळशांना
जवळ करिसि तूं प्रेमानें कार्यतत्परांना ,
हृष्ट होसि कोणी पुढतीं पाय टाकतांना ,
वाटतेस आम्हां जननी ! एक तूं शिराणी !

तुझें नाम गावें, भावें स्तोत्र तुज वहावें ,
तुझ्या कीर्तनीं भक्तीनें अश्रुंनीं नहावें ,
नित्य तुझ्या सेवेसाठीं देह हे झिजावे ,
तुझ्या विभववर्धनकामें झटूं प्रयत्नांनीं !

कीर्तिपहटनादें तुझिया व्याप्त गगन होओ,
तुझ्यावरिल अज्ञानाचें तिमिर दूर जाओ ,

पुन्हां तुझा उदयातें तो ज्ञानसूर्य येओ ,
द्वैत नाशुनी जन सुखवीं ऐक्यबंधनांनीं !

आत्ममय स्थिरचर ठरतां भेद कुठें राही ?
कशी सांग तेव्हां वसणें शत्रुभावनाही ?
उच्चनीचपणही कोणा गांजणार नाहीं ,
विश्व सर्व जाइल भरुनी शांतिगायनांनीं !

तीस कोटि जनता उठतां शांतिपाठ गात ,
बंधुभाव पसरायाला सर्वही जगांत ,
दिव्य गीत अद्वैताचें भरित अंबरांत ,
रुक्ष मनें द्रवुनी जातिल अमृततुषारांनीं !

कलह, रुधिरवांछा यांची रात्र ओसरूनी
दुष्ट भावनांचें तामस शीघ्र हारपोनी
साधुकामनांचीं किरणें धवल विस्तरोनी
उजाडेल विश्वा तुझिया कृपाकटाक्षांनीं !

## वनवासस्पृहा

जेथें भेदित अंबरास शिखरें जाती गिरीचीं वरी,
ओढे गर्जत धांवती झरझरा पाषाणखंडांतरीं;
जेथें मंजुळ किल्बिलाट करिती तीं डोंगरी पांखरें,
जेथें बागडती गरीब हरणें स्वच्छंद लीलाभरें;
जेथें उंच कड्यांवरून झुलती झाडें विशाळाकृति,
जाणों तें हरिताभ्रमंडळ करी व्योमीं विहाराप्रती !
जेथें धीर गभीर वाहति नद्या शीतांशुलेखेपरी
पाहोनी प्रतिबिंब त्यांत करिती नृत्यें मुदा वल्लरी !
जेथें रानफुलें फुलून भरिती गंधें दिशा सर्वही,
व्यापोनी हिरव्या तृणें दिसतसे जेथें मनोज्ञा मही,

जेथें गर्द वनांतुनीं फिरतसे ताजी हवा मोकळी,
जीयोगें हरपून खेद पसरे उत्साह दिङ्मंडलीं

भव्य स्थान असें कुणास न जगीं पाडील हो मोहिनी ?
गेले होउनि धन्य पूर्वमुनि ते येथेंच कीं राहुनी !
देवा ! काय अशा स्थळीं निवसणें भाग्यांत माझ्या असे ?
वांछा केवल एक ही, जग परी सोडील मातें कसें ?

## सत्कवीची आंतरिक इच्छा

सूर्याचीं किरणें जिथें पसरती, आकाश जेथें दिसे,
वायूचा प्रतिबंधहीन अथवा संचार चालू असे,
सारासारविचारणारत जिथें आहे मती निर्मल,
ती ती मंगल भूमि नित्य विलसो मद्वाक्प्रसूनाकुल !

## व्याधास

थांब ! थांब रे ! बाण आपुला आवर आधीं व्याधा !
दीनां व्हावी कदा न तुझिया क्रूरपणाची बाधा

नाश नको हा वृथा, न सोडी प्रवाह तूं रुधिराचा,
अखिल विश्व हें असे जाण बा आश्रम संतजनांचा !
फुलें, पांखरें, झाडें, वेली, ओढे झुळझुळणारे,
क्रूर दृष्टि त्यांवरी केधवां शोभत नाहीं बा रे !
सौंदर्याचें कमल विश्व हें प्रेमरसें भरलेलें,
पायदळीं तें सांग आजवर मर्दित कोणीं केलें ?
तीरें पक्षी म्हणासि मिळावा, कैसें होय परी तें ?
पक्षी न कधीं मिळे अशानें, स्थूलच हातीं येतें !

असेल पक्षी हवा तुला तर गा गा कांहीं गाणें,
पक्षी त्याच्या प्रभुसह होइल तुझाच आनंदानें !

सौंदर्याशीं विरोध करुनी कधिं न मिळायाचें तें ,
त्यास्तव आधीं व्हावें लागे सौन्दर्यच अपुल्यातें !

सौन्दर्याशीं विहार करणें हा त्याचा उपयोग ,
त्या पोषावें वा पूजावें हा त्याचा उपभोग !

थांब थांब रे ! बाण आपला घे घे काढुनि मागें ,
करिसि काय हें अश्रु गळावे ज्या ठायीं अनुरागें !

## मृत कन्या

बाळपणाचे दिवस तियेचे कधींच गेले होते,
परंतु होती वाटत अगदीं बालच ती आम्हांतें

सौंदर्यानें भरलें जग हें अंतरंग परि तीचें
वाटत होतें अम्हां खरोखर निधान सौंदर्याचें !

प्रीतिलतेला अल्पावधिंतचि बहार नव येईल,
अम्हांस गमलें, गंधें स्थिरचर कोंदुनियां जाईल !

उषासंगमें लाट उसळते विश्वावर तेजाची,
शोभा येत्या तारुण्यानें चढे तिच्या देहाची !

परंतु होता हेतु विधीचा अन्यच, एकाएकीं
कालमुखीं ती पडली ढकलुनि आम्हां दुस्तर शोकीं !

गातां गातां जसा भरारुनि जावा नभिं चंडोल
गेली ती हो तशी तोडुनी क्षणीं प्रीतिचा सोल !

विकसली न जों तोंच कालमुखिं पडे कशी कलिका ती ?
किंवा राहू ग्रासुनि टाकी नूतन विधुची कांती ?

विहंगमध्वनि निबिड काननीं जाय कुठें हरपून,
कीं अधरावर मृदु मंद स्मित जावें क्षण विहरून,

गेली त्यापरि ती विलयास, न मागें ठेवुनि कांहीं,
अमुच्या हृदयीं स्मृतीच विषमय केवळ नांदतसे ही !

## जीवितसरिता

हर्षें जी उगमस्थलीं खदखदां हांसोनिया धांवली,
घेओनी सहसा उड्याहि पुढती वेगें महा चालली;
झाली प्रौढपणीं गभीर, सरलें चांचल्य बाल्यांतलें,
गानोत्साहहि लोपला, सुखदसें तें हास्यही संपलें !

आतां ती सरिता तटांसह करी आलाप अस्पष्टसे,
जाणों ती भयविव्हलाच अगदीं चित्तांत झाली असे;
हा झाला गुरु देहभार न परी चैतन्य तें भासतें,
सिन्धूला मिळतांच खारट तिचें झालें जल स्वादु तें !

माझी जीवनवाहिनीहि गमली क्रीडापरा शैशवीं,
तेव्हां संतत नाचली सुखतती नेत्रांपुढोनी नवी,
गानावांचुनि अन्य कार्य नव्हतें ठाऊक तीतें तदा,
तारुण्यांतहि रंगली नवसुखस्वप्नामधें ती सदा !

गेलें यौवन संपुनी, पसरतां संसारचिन्तानल
देवा ! तीव्रविषादमग्न मग ती झाली महा व्याकुल !
नष्टोत्साह, गतप्रहर्ष मग ती ये कालसिन्धूपुढें,
आशा ध्वंसुनि सर्व दीनहृदयें हा दास आतां रडे !

## स्वागतगीत

[ प्रसिद्ध वंगकवि द्विजेंद्रलाल राय यांनीं बादशहांच्या अभि-
षेकप्रसंगीं रचिलेल्या एका चुटक्याच्या आधारें. ]

यावा कीं वाडवाग्नी सळसळुनि वरी सिन्धुवक्षामधून
टाकावें विश्व त्यानें अखिलहि सहसा स्वीय तेजें भरून

मंथोनी सागरातें, हलवुनि अवनी, लंघुनी शैलराजी,
जें झालें राष्ट्र लोकीं प्रथित, नरपती तेथला येत आजी !

मुक्त ग्रकांस केलें असिबलविभवें छेदुनी बन्धपाश,
ज्यानें उद्घोषिलें कीं मनुज भुवनिं हो केधवांही न दास !
स्वातन्त्र्याचा नगारा झडझडुनि जगीं वाजवीला जयानें,
त्या राष्ट्राचा इथें हा नृपतितिलक ये, युक्त हो तो जयानें !

हें सारें न्यूटनानें भुवन नियमिलें आपुल्या सूत्रपाशीं,
तैसा गुंफीयला हा स्वनियमिं सगळा डार्विनें जीवराशी,
छन्दीं सम्बद्ध केले नव हृदयमणी सर्व शेक्स्पीयरानें !
त्या जातीचा नरेश प्रथम दिसत; हीं आर्पितों त्यास गानें !

आर्यानार्यांहिं ज्याचीं निजशिरिं धरिलीं शासनें गौरवानें,
आर्यावर्तांत केली अभिनवसमतापूत शान्ती जयानें !
धर्माचीं पारतन्त्र्यें परिहरुनि करी जो मनोबन्ध दूर
साम्राज्याधीश तो हा विलसत, हृदयीं लोटला हर्षपूर !

नांदे तें दूर कोठें ब्रिटन, भरतभू ही किती दूर आहे,
येथें आलोक नांदे, तिमिर पसरुनी तेधवां तेथ राहे !
मध्यें गम्भीर सिन्धू सळसळ करुनी गर्जतो सर्वदाही
आला येथें तरी तो नृपवर म्हणुनी वाक्सुमें त्यास वाहीं !

## काव्यदेवीला

( प्रस्तुत कवितेला मुग्ध आधार वंग–कवीन्द्र माइकेल मधुसूदन दत्त यांचा एक चुटका आहे. )

निसर्गमृदु पाद हे रुचिर काव्यदेवी ! तुझे,
कशास मग सांग या यमकशृंखला घातल्या ?
तुझीं ललित नर्तनें कुठनि चालतीं स्वैरशीं ?
स्वभावमधुरे ! किमर्थ तुज भूषणांची स्पृहा ?

न भावधन का तुझ्याजवळ ? –विश्व जें मोहवी–
तुझें हृदय शोभलें गुणगणोदयें मंगले !
कसा तुजसि मोह हा मग पडे जडाभूषणीं ?
कुणीं रचुनि शिंपले मणिमये ! तुला मण्डिलें ?

भरील नव रंग का रुचिर इन्द्रचापीं कुणीं ?
नको मृदु करावया मृदुल पद्मपत्रा कदा !
सुधांशुकलिकेस का धवलता कुणीं अर्पिली ?
किमर्थ नव मन्त्र ते शुचि करावया जान्हवी ?

सुगन्ध वितरावया झटत पारिजातास जो
झटो सतत तो सुखें; करिं न मी तया वारण !
निसर्गकविता असे मधुनिसर्गलीला खरी,
न हीन रमणीपरी तिजसि आवडे शृंखला !

## सत्कवि माधवानुज यांचा मृत्यु

झालीं सत्पुत्ररत्नें चिरडुनि शतधा तीव्र कालाभिघातें
प्रेमार्द्र स्वान्त जीचें म्हणवुनि बुडलें दुःखपूरांत होतें;
नेत्रींचे अश्रु तीच्या अजुनि न सुकले, तोंच घोर प्रसंग
त्या देवी शारदेला व्यथित करि तिचें भेदुनी अन्तरंग !

अश्रूंशीं अश्रु तीच्या मिळवुनि रडला फोडुनी दीर्घ टाहो,
अन्याचेही, तयाचें रुदन परिसुनी, लागती नेत्र वाहों !
मेले ते लोक, केले अमर परि जयें आपुल्या वाक्प्रभावें
तो जावा मोगरे का हर ! हर ! निघुनी ! दुःख कैसें सहावें !

त्याचा ऐकून शोकध्वनि विरघळली शारदा शोकभारें,
गेली मोहूनी तैशी; सुजनहि बुडले हर्षशोकांत सारे !
दुःखाश्रूंमाजि ज्यानें कुशलकृतिबलें रोपिलें हर्षबीज,
ऐसा तो एकलाच प्रचुररसनिधी शोभला सूरिराज !

जातां तो कालदंष्ट्रान्तरिं रगडुनियां शोकमूढाच झाली,
ठेली ती शारदाम्बा स्तिमितच, नयनीं आंसवेंही न आलीं,
दुःखाश्रूंचा जयानें जलनिधि अथवा निर्मिला थोर आहे
गुंफाया शोकगीतें तदुपरि भलती धृष्टता कोण वाहे ?

वाग्देवी स्तब्ध शोकें, इतर जन भयें मूक तेव्हां जहाले,
सर्वांचें त्या प्रसंगीं बधिरच अगदीं चित्त होऊन गेलें !
देवीच्या कण्ठमालेंतुनि मणि दुसरा तों अकस्मात गळाला,
देवा ! दुर्दैवयोगें हर ! हर ! कसला घोर उत्पात झाला !

गेला श्रीशारदेचा रुदनरव तदा फोडुनी अन्तराला,
"झाला हो माधवाचा अनुज कविमणी भक्ष्य दुर्दान्त काला !"
हा तीचा आर्तनाद श्रुतिपुटिं पडतां अश्रु नेत्रीं वहाती,
हातीं कांहींच नाहीं—समजुनिहि तमीं व्यापुनी वृत्ति जाती !

ध्वनि गिरिसरितेचा कोंदतां गव्हरांत
प्रतिरव उसळोनी नादवी तो वनान्त;
दिनमणिकरमाला वर्षतां भूप्रदेशीं
परिसर भरि वेगें काचखण्ड प्रकाशीं;
अनिल मधुर गीतें काननीं गात चाले
प्रगटति अनुगीतें भोंवतीं वेणुजालें;
थडकुनि मग तैसा शारदार्तध्वनी तो
ममहि हृदयिं त्याचा हा प्रतिध्वान होतोः—

"मित्रा ! तूं असतां जिवंत न तुला मीं केधवां पाहिलें,
नाहीं भाषणही तुझ्यासह तसें माझें कधीं जाहलें;
जाणें मी तुजला परन्तु तुझिया आप्तांहुनी स्पष्टसा,
संबोधूं न गड्या ! तुजप्रति बरें 'मित्रा !' म्हणूनी कसा ?

जेव्हां संसृतिदावतीव्रकणिका वर्षोनियां भावतीं,
गेली दारुण संकटांत अगदीं माझी भ्रमूनी मती,
तेव्हां देउनि धीर तूं रिझविलें मातें स्ववाणीबलें,
मित्राचें पद सत्कवे ! तुज तरी मीं पाहिजे अर्पिलें !

तूं कालोदरिं लोपलास, पण हीं काव्यें तुझीं प्रेमल
त्वन्मूर्ती सुयशोमयी मिरविती नेत्रांपुढें निर्मल;
त्यांचा मंजु निनाद वाङ्मधुरता दावी तुझी सत्कवे !
मातें शब्दनियोजनाबल तुझें कैसें बरें वर्णवे ?

ज्यांचे वाचुनियां प्रबन्ध घडली मातें कवित्वस्पृहा
झालें त्या कविमालिकेंतिल तुझें आतां रितें स्थान हा !
तें राहील रितें तसेंच, नमुनी अत्यादरें त्याजला
मार्ग स्वीय हवा पुढील कविंनीं निःशंक चोखाळिला !

मानी केशवपुत्र फुंकित पुढें चाले ' तुतारी ' जवें,
घाली मोहच मानसा टिळकही तो प्रेमगीतारवें,
तैसा तो वश चन्द्रशेखर करी मंजुस्वनें अन्तरें,
अश्रू ढाळवि आपुल्या विलपनें वाग्दूत तो मोगरे

फोडी हांक विनायक त्वरित कीं राष्ट्रीयतावर्धना,
गोविंदाग्रज वाग्वधूवरि सदा घाली नव्या कल्पना,
तूं होतास तिच्या मनोविकसना मित्रा ! सदाचा उभा
ही पाहीं तुजवीण साम्प्रत कशी झाली कवींची सभा !

तुम्ही सात कवी नितान्त झटलां वाग्वर्धना संतत,
जैसें शोभवि इन्द्रकार्मुक नभा तें सप्तवर्णांकित !
आतां तूं नसतां तुझें स्थळ कसें यावें भरोनी बरें ?
चन्द्राची न उणीव ये भरुनियां सामान्यशा नक्षरें !

कोणी विश्रम सोडुनी अनुदिन द्रव्यार्जनीं गुंगले,
कोणी स्वोदरपोषणांतच सदा मोहान्धसे राहिले,
कोणी क्षुद्र नटांसवें विहरुनी कालव्यया साधिती,
"द्या ! द्या आधुनिकांस मान ! " म्हणुनी उच्चस्वरें भांडती !

मी त्यांना न म्हणे कवी, रति नसे स्वीयोद्यमीं ज्या जनां,
काव्यश्री न कधीं तयां वरि अशा दावोनियां चाळणा;
ज्यांना अल्पहि मोह दूर करितो श्रीशारदासेवनीं
त्यांना केविं म्हणूं कवी ? उघड तीं धिक् धिक् ! पिशाचें जनीं !

भिन्नेच्छा धरुनी कधीं विरत तूं झालास न स्वोद्यमीं ,
वाक्पुष्पें म्हणुनीच हीं तुजवरी वर्षीतसें आज मी !
नाना दुर्धर रोग सिद्ध असतां तूतें छळाया कदा,
नाहीं लेशहि शारदारति तुझी झाली उणीशी कदा !

मित्रा ! साम्प्रत जन्मलास म्हणुनी कीर्ती न लाभे तशी,
भावी काल परन्तु खास कथितों घेईल माथां तुशी !
' आतां'चें न कुणा गमे प्रिय , परी तें 'भूत,' होतां रुचे !
हा सामान्य जनस्वभावचि, नवें त्याला न केव्हां पचे !

स्वच्छन्दें बसुनी खुशाल सुकवे ! गा तूं अनन्तोदरीं,
लीलेनें निजगायनीं अनुदिनीं शून्यावकाशा भरीं !
एकादीहि लकेर त्यांतिल कुणा लाभेल भाग्योदयें
तो स्वर्गत्वच खास अर्पिल जगा !- मानूं असें कां नये ?

## शुक्राची चांदणी

होओनी दिनकर लुप्त अस्तशैलीं
झांकोनी घनतिमिरांत सृष्टि गेली ;
येओनी हळुहळु एक एक तारे
गेलें हें नभ भरुनी विशाल सारें

जाओनी हळुहळु रात्रही लयाला
हा आतां जवळ उषःप्रसंग आला ;
गेले ते निजगृहिं एक एक तारे
पाहोनी वन भरलें प्रसूनभारें

गेले ते ग्रह, विधुंही कधींच गेला,
थोडाही अवधि न गे प्रभातकाला ;
कां आतां समुदित जाहलीस देवी !
कां ये हा कठिण तुझ्या प्रवास दैवीं ?

सोडोनी मणिमय मन्दिर स्वकीय,
पुष्पांचें शयन तसें सुशोभनीय,
कां होसी समुदित तूं निशावसानीं !
न्हाणीत स्थिरचरही करामृतांनीं

नक्षत्रग्रहविधुतारकादिकांहीं
यत्नांनीं घनतमिं रक्षिली मही ही ;
आशंका परि मनिं पातली म्हणून
पाहाया भगवति ! येसि का फिरून ?

गेले जे गगनिं चढून तुंग शैल,
वृक्षांनीं गजबजलीं वनें विशाल,
पुष्पें तीं नव, सरिताहि ऊर्मिला या
पाहें हीं तव करिं लागलीं दिसाया !

रत्नांचा निधि जलधी तसाच आहे,
आवेशें बघ रणधीर गर्जताहे,
चौर्याचा विषयच तो कुणास नोहे,
घे तो गे परि तव बिम्ब मात्र पाहें !

आहे हें सकलहि जेथल्या तिथेंची,
भीतीही नच उरली मुळीं तमाची,
होईल द्युमणि उदीयमान आतां
विश्वाला अतुल–चिर–प्रकाश–दाता !

*　　*　　*

तेजाळे ! परि मम अन्तरांत काय—
हें झालें तरि विपरीत हाय ! हाय !
गेला गे, सकलहि तेथला प्रकाश ,
तेथें हा अविरत हो तमोविलास !

तारा ती मम हरली कुणीं तिथील ,
कैसे गे, मग दिन हे प्रकाशतील ?
नाशाया घन तम हें मदन्तरींचें
आहे गे, बल अपुरें दिनेश्वराचें !

देवी ! तूं किरणसुधाकणांस कांहीं
वर्षोनी हरिं मनिंची अशान्तता ही ;
आर्ये ! तूं करिशिल जें स्मितेक्षणानें
तें नाहीं सुकर कुणा महाश्रमानें !

यावें तूं प्रतिदिनही असें प्रभातीं,
द्याया या जड हृदयास नित्य शान्ति ;
होओनी प्रमुदित मीहि गौरवानें
त्वत्पादीं वितरिन मुग्ध भावगानें !

## मांगलिक

शंभूचें स्मित देखुनी प्रथम जी प्रेमाकुला जाहली
धूमाचें करुनी निमित्त मग जी लाजून संकोचली

झाली चंचल फार दृष्टि भिडतां जी कांतदृष्टीसवें
दृष्टी पार्वतिची विवाहमधुरा देवो अम्हां ती शिवें !

## आर्ताची विनवणी

विशुद्ध जगिं एक तूं, विसरुनी तुला मी परी
प्रभो ! अनिश जाहलों रत जड प्रपंचांतरीं;
विमूढ मन हें करी दृढ तुझ्या पदाब्जावरी
त्रितापदव संहरी झडकरी कृपासीकरीं !

किती अधम तारिले हरुनि घोर पापें पुरा,
प्रभो ! मग किमर्थ या अजुनि ठेविलें किंकरा ?
दयांबुकणपूरिता वळविं दृष्टि दासाकडे,
कणोद्वहनिं वाटतें वसुमतीस का सांकडें ?

अभद्र भवबंधनें करुनि छिन्न मी केधवा
क्रमीन दिन मानसीं दृढ धरून लक्ष्मीधवा ?
कधीं परम शांति ती मज मिळेल विश्वेश्वरा ?
तुझ्याविण जगीं दुजा भरंवसा न या पामरा !

अनंत भुवनें क्षणीं विरचिसी, शुभेच्छा करीं
मदीय मनिं वर्धिता, अघततीहि किंवा हरीं;
क्षमानिलय ! पात्र वा करिं तुझ्या कृपालोकना,
परी त्वरित उद्धरीं भवनिधींतुनी या जना !

## उत्तिष्ठत जाग्रत !

गंधर्वांनीं गगन सगळें कोंदलें मंजुगीतीं,
गेलें सारें जग धवळुनी दिव्य सत्यप्रकाशें;
जीवा ! होसी परि अजुनि तूं मग्न निद्रेंत केवीं ?
जाते आहे झरुनि सगळी रम्यता ही उषेची !

हो हो जागा नयन उघडीं, ऊठ सोडून निद्रा,
मुक्त द्वारें करिं झडकरी आपल्या अंतराचीं;
तेजोधाराशतिं तरणिच्या व्याप्त तें पूर्ण होवो,
तैसें जावो त्वरित भरुनी दिव्य गीतस्वरांनीं !

## स्फुट श्लोक

'हा गेला क्षण आळसांत परवा याची कितीशी मला ? '
हा उन्मत्त विचार बा, अजवरी नाहीं कुणा शोभला !
वाळूचा कण एक एक मिळुनी या सिंधुतीरावरी
आहे सैकत दीर्घ हें पसरलें, ध्यानीं जरा हें धरीं !

## —ला

तीं गाच एकदां फिरुनी अपुलीं गाणीं,
जड हृदय टाक हें अश्रुरसें न्हाणोनी !
तीं साधीं गीतें, प्रेमळ सूरहि साधे,
ऐकवुनि विश्व हें थरारवीं मृदु नादें !
त्या मधुर कल्पना एक एक पाहून
हा विरक्त जनही जाई क्षण गुंगून !
तव सहवासीं जे गेले दिन तदा
आठवुनि धन्यता वाटे कितिकदा !
भेटशील फिरुनी मातें वद कदा ?
निर्दंभ मनोहर भाषण तव ऐकून
जाईन केधवा खेद सर्व विसरून !

बदलती तेरड्यापरी रंग विश्वाचे,
जे मघां पाहिले—क्षणांत ते जायाचे !
किंति मऊ गोडही असें आम्रफळ वरुनी,
परि आंत—कशाला भिववूं तुज तें वदुनी ?

ध्वनिजाल मधुर ही वीणा विस्तरी,
होईल कोमलांगी का ती परी ?
ती वृथा वचनिंची सारी माधुरी !
पांडित्य कशाला ? वटवट काय करावी ?
मूकही हृदयींची व्यक्त भावना व्हावी !

सरलता पाहुनी तुझी, मुग्ध मन झालें,
शुचि वृत्ति विलोकुनि तुजठायीं तें रमलें !
कळवितांहि न तुला वृत्ति तुझ्यावर जडली,
वद उषेस पुसिलें कधीं स्मितोन्मुख कमलीं ?
तूं काव्यें अपुलीं गातां तेथुनी
मी डुलेन येथें तूतें चिंतुनी !
येईल माझिही स्फूर्ती उसळुनी !
मग संयुक्त स्वर अपुला या विश्वाला
लावील अंबरीं हर्षे नाचायाला !

## मेघास

कशाला हा आतां विमल जलवर्षाव करिसी ?
कशाला गंभीर स्तनितिं दशदिक्प्रांत भरिसी ?
कशाला डौलानें विहरसि नभीं तूं जलधरा ?
वृथा आतां गेली बुडुनि जलपूरीं जरि धरा !

नद्या आनंदान भरुनि दुथडी धांवति जवें,
गिरिप्रांतीं तैसे विहरति किती निर्झर नवे,
मही झाली व्याप्ता हरिततृणसस्यें उगवुनी,
तळीं गेलीं सारीं तव सलिलिं आकंठ भरुनी !

तुझ्या दृक्पातानें किंतिक वठलेल्या तरुलता
भरोनी पर्णांनीं दिसत अवनी आज ललिता ;

अहा ! मेघा ! सार्धें झुडुपहि तवालोकनवशें
पहा आहे आतां दिसत नयनां सुंदर कसें !

तुझी कीर्ती मोठी, अतुल तव आहे विभवही,
तुझ्या औदार्यानें करित चिरहास्योत्सव मही !
फडाडे त्वत्कीर्तिध्वज हरित हा वृक्षशिखरीं,
किती भावस्तोत्रें रचित विहगाली तुजवरी !

परी मेघा ! ग्रीष्मीं तव सुयशिं जो डाग पडला
न जायाचा केव्हां खचित सुजनीं तो विसरला !
इथें—याच स्थानीं झुरुनि झुरुनी बाललतिका
मरोनी गेली, तूं परि न दिधलें अल्प उदका !

प्रसंगीं जें कामीं विभव न पडे, निष्फळचि तें !
कशाला तीं हातीं कनकवलयें रत्नखचितें !
असे त्या वेलींचें स्मरण मम चित्तांत जंवरी
झरी उष्णाश्रूंची क्षणभरि न थांबेल तंवरी !

## अन्योक्ति

होवो व्योमांतुनी हा च्युत रवि, अथवा लुप्त घोरास्तशैलीं,
जावो लोपोनि किंवा क्षुभित जलधिच्या चंड त्या ऊर्मिजालीं
तेजानें लोकनेत्रें दिपवित, तिमिर ध्वंसुनी दृष्टिपातें
तो येणार प्रभातीं तुडवित चरणीं दृप्त या भूभृतांतें !

वक्षावरी धरितसे हरि कौस्तुभातें,
वाटे दिनेशचि परी स्तवनीय मातें;
कीं जीं सरीं फुलति तत्पदसंगमानें
तीं अंबुजें धरित तो शिरिं आदरानें !

गेला अंबरभाग सर्व रविच्या तेजोभरें कोंदुनी,
नाहीं नावहि राहिलेंच अगदीं कोठें तमाचें जनीं,
तेव्हां सांगत पूर्णिमाविधु जनां ढाळीत बाष्पोदकें –
'रात्रींची स्मृति वागवा–' अधिक तो कांहीं न बोलूं शके!

रवी अस्ता जातां सकलहि कला एकवटुनी
तम ध्वंसूं पाहे विधु, न यश ये त्यास अजुनी;
तिथें धूमें सारें भरित गृह हा दीप डुलतो
स्थितीचा या हा ! हा! आतितर मना खेद गमतो !

ज्याचे पाद महीभृतीं निजशिरीं अत्यादरें वाहिले
त्या लोकत्रयलोचनास न अहा ! जों राहुनें ग्रासिलें,
तों खद्योत फुरारले, चमकल्या तारा तमःप्रांगणीं,
आले घूक पुढें सहर्ष, तमही गेलें पहा कोंदुनी !

गेला अस्ताचलातें दिनमणि न गमे दुःख याचें मनाला,
कालाचा घाव नाहीं अजवरि चुकला तीन लोकीं कुणाला !
होतें पाहूनिया हें व्यथित मन किती काय आतां कथावें—
कीं त्याच व्योमभागीं निबिड तिमिर हें पूर्ण कोंदून जावें !

## इच्छेविरुद्ध

स्वातंत्र्याचा बाणा मिरवुनि होतों चालत दुरी,
पातलों संनिध तुझिया परी !

त्यजुनि वनश्री, गिरिप्रांतही हेटाळुनि नाचला,
झरा तो गंगेला भेटला !

करुनि जलाचा भेद मदानें अंबुज आलें वरी
सेवि तें उषाचरणमाधुरी !

नभा विदारित गिरिवर चढला आवेशें सत्वरी
सांपडे इंद्रधनुःश्री-करीं !

मी, मालक व्हांया प्रयत्न केले परी
जाहलों अकस्मात् 'दास' कसा सुंदरी !
वळचणिचें पाणी चढलें उलटें वरी !

'माझा' 'माझा' म्हणतां म्हणतां 'तुझाच' मी जाहलों,
तयाच स्थितींतही रंगलों !

बसतां तिमिरीं दडुनि हटानें भ्रमणरता मेदिनी
प्रकाशीं आणि मला ओढुनी !

## शृंगार

"शृंगाराचा सडा पुरे हा, विटलों त्याला अती !
कवी हा हळवा झाला किती !"

निंदा ऐशी किती ऐकिली, वाचिलीहि अजवरी,
पडिलों दारुण दुर्वाक्शरीं !

देवी स्तोत्रें रचुनि तुजवरी तव चरणीं वाहिलीं
काय तीं विषयविषें व्यापिलीं ?

मी प्रेमें तुझिया मातेसहि विसरलों,
ईश्वरीपरी तव हास्यरसीं गुंगलों,
गंगेपरि तुझिया अश्रुकणीं मज्जलों,

पावनतेची गडे परा तूं सीमा, तव दर्शनें
लोपती दुर्वांछा शोभने !

सप्त रंगही भानुकरान्तरिं गूढ जसे नांदती,
जलीं बहु रुचि किंवा राहती,

दिसति तशीं तुजजवळीं प्रेमोत्कट नातीं सर्वही,
विमोहित झालों, का चूक ही ?

सागरलक्ष्मी समोर दिसतां क्षुद्रतीर्थसेवनीं
राहिल मग्न कोण तो जनीं ?

ईश्वरी गुणांची प्रेमाची एक तूं !
निर्दोष अशीही या विश्वीं एक तूं !
आदर्श अमानव शुचितेचा एक तूं !

सर्व गुणांची माती झाली काय तुझ्या स्त्रीपणें ?
माजलीं कां हीं भलतीं रणें ?

रम्याद्भुत जें दिव्य, ललित, तें भोग्यच सारें असे,
म्हणावें साधुजनांनीं कसें ?

सर्वहि पुष्पें काय बैसती कुन्तलपाशान्तरीं ?
विहरतें एकादें प्रभुशिरीं !

विषयलालसेविण दुसरे का पवित्र नातें नसे ?
करिति कां दूषक अपुलें हंसें ?

हीन विकारां पाठ फिरवुनी शुचिप्रीतिवर्धनें
कुणाचीं तरी हांसतिल मनें !

कां उन्नत अवनी नरकीं मग खेचिती ?
कां कल्पित–दुःखें नक्राश्रू ढाळिती ?
निज विकृत मनींचे दोष जगीं लादिती !

करीं खराटे घेउनि सजलां धावयास लोटुनी
इंद्रधनु तें हें समजा मनीं !

## हास्याचा पडदा

कशास करिसी वृथा वदन आपुलें हांसरें,
नकोच लपवूं, तुझें हृदय जाणतों मी खरें
उचंबळुनि पातली नयनिं अश्रुकल्लोलिनी,
नको तिजसि आडवूं विमल ती करो मेदिनी !

न खेद लवही शिवो विकल मानसा माझिया,
नको तव गतव्यथा असह मन्मनीं यावया;
म्हणून झटुनी किती करिसि हास्य हें कोरडें,
परी उसळुनी गडे मजसि ये तयानें रडें !

नसे मम सुखापुढें तुजसि आत्मदुःखस्मृति;
स्फुलिंगकणही तुला जणुं फुलांपरी वाटती;
दिसो क्षणभरीं तरी ममसुखीं स्मिताची छटा
म्हणून झटसी, जगीं खचित धन्य मी एकटा !

विशुष्क परि हास्य हें गुणवती ! अतां आवरीं,
खुशाल करि मोकळ्या प्रबळ अश्रुच्या त्या झरी;
करून उघडें गडे, हृदय सत्वरीं आपुलें
धुकें निवटुनी नभ प्रचुरदीप्त ठेवी खुलें !

## व्यर्थ

लक्ष्मी मूर्तिमती विहार करिते गेहीं तुझ्या सर्वदा
नाना उत्सव चालती, उसळती गीतध्वनीही मुदा;
दीनांच्या विपदा न दूर करिसी, आर्ताश्रु ना पाहसी,
सारें वैभव तें वृथा ! तव मना लज्जा न वाटे कशी ?

गेलें हें तव सयश:परिमलें सारें जगत् व्यापुनी,
गाती लोक तुझा सहर्ष महिमा—तूं एक धीमान् गुणी !

नाहीं दुर्गतिमग्न जातिकारितां तूं यत्न केला कधीं,
व्यर्थ ज्ञान तुझें ! कशास महिमा जो निंद्य झाला बुधीं !
सामर्थ्यें तव लाजला मृगपती, धाकें पळे व्याघ्रही,
कोठें त्वत्सम शस्त्रधारणिं नसे धुंडाळितां ही मही !
केल्या बंधुजनापदा नच दुरी शौर्यप्रभावें कदा,
तें सामर्थ्य वृथा, पराक्रमहि तो बा गर्ह्य भासे सदा !

## बिजेची चंद्रकोर

ठाकले गगनांगणिं तारे,
माळिण ढगांचे तुकडे दिधले फेंकुनि परभारें !

रविकर रुधिरीं भरलेले
शीतलसंध्यासमिरणानें लोटुनियां दिधले !

काळया मखमलिची गादी
घालुनि सजली स्वागतार्थ उडुदेवींची मांदी !

तोंच ये ठुमकत गगनांत
अहा, बिजेची चंद्रकला ही नाचत थाटांत !

स्थिरचर हर्षमग्न झालें
चंद्रकलेला पहावया जन उतावीळ ठेले !

दिसली नच दिसली तों ती
विलीन झाली तेजोललिता क्षणांत गगनांतीं

जा तूं खुशाल जा निघुनी,
धन्य जाहलें विश्व क्षणही दर्शन तव घडुनी !

पावले श्रम सार्थकतेला
श्रांत जिवांचा सारा विलया शीण खरा गेला !

* * *

माझ्या हृदयाचे देवी !
गूढ विनंति माझी तुझिया श्रवणांवर जावी

स्वागत योग्य तुझें व्हावें
म्हणुनी केले आजवरी श्रम मीं जीवेंभावें

सेवा तुज ही मानवली
तरी झडावी तुझी एकदां येथें पदधूली !

जन हा बुडलेला तिमिरीं
एक तरी त्यावरी पडावी मधुर स्मितलहरी !

पुण्यकर दर्शन तव नुसतें
खटाटोप हा संसाराचा नेइल सार्थकते !

जुळविल्या वीणेच्या तारा
छेडुनियां त्या टाक नादवुनि विश्वगोल सारा !

पावन तुझिया स्मितपूरीं
जीवित जावो हरपुनि, वांछा नाहीं मज दुसरी !

## प्रार्थनाष्टक

कसा न अजुनी प्रभो ! दिससि दीन या किंकरा ?
उताविळ किती असें तुज पहावया सुंदरा !
न रात्र म्हटली, न वा दिवस, सारखा धांवलों,
न दर्शनसुखा परी अजुनि माधवा ! पावलों !

प्रभातसमयीं नभीं अरुणरागकांती दिसे,
तुझीं चरणसारसें म्हणुनि येत चित्तीं हंसें;
बघून रमणीय हा नव दिनेश अर्धोदित
पदांगुलिनखप्रभा म्हणुनि दास हो हर्षित !

विहंगकलकूजित श्रुतिपुटीं पडोनी मला
तुझाच वरदायक स्वर कितीकदां वाटला !
प्रफुल्लसुमसौरभा हरुनि वायु येतां अहा !
तुझा श्वसनगंध तो गणुनि मुग्ध हो दास हा !

वरून गळतां प्रभो ! मृदुल तीं जुईचीं फुलें
दयाश्रु गळती–तुझे–कितिकदां असें भासलें !
कृपांबुकण मेघ दे मजसि आणुनीया तुझे
परी विनवुनी किती तव न दावि पादांबुजें !

त्वदीयगुणकीर्तनीं निरत जाहल्या तारका,
परी स्थल तुझें मला कथिति त्या न कीं तारका !
निरोप तव घेउनी पवन धांवतो सारखा;
परी न कथितो कुठें वसतसें जगाचा सखा !

वनीं घुमवि निर्झर प्रभु ! तुझाच नामध्वनी,
करीत जयघोष हा अलिसमूह मंजुस्वनीं;
लता पिटुनियां दलें डुलति दिव्यभावोत्सवीं,
सुगंध तुझियावरी उधळितीं फुलें हीं नवीं !

तुझ्या चरणसेवनीं सकल विश्व हें गुंगलें,
निवास न तुझा जिथें स्थळ कुठें असें नाढळे;
परंतु नच दाविसी मजसि गोजिरें रूपडें,
रडे म्हणुनि दास हा, हृदय दुःखपातें कढे !

अनन्य गतिनें तुला भजत जो अहर्यामिनी
तयास दुरि लोटिसी उचित काय वाटे मनीं !
स्वदासदुरितां जरी भिउनि बैससी तूं दुरी
टिकेल जगदंतरीं तव सुकीर्ति कैशी तरी ?

## वसंतदेवी

झुलत्या वेली वाळुनि गेल्या, गळुनी पर्णावली,
मृतापरी झाडें हीं ताठलीं;

कालसर्पिणी फूं फूं करितां जाईची ही लता,
जाहली दग्ध डोलडोलतां !

तळीं आटलीं, कृमी भरोनी शेष तोय नासलें,
गावया काकराज लागले !

वसंतदेवी ! तोंच उधाळित स्मितरस विश्वावरी,
पातलिस आज उपवनांतरीं !

हे शीतल वायू वहावया लागले,
उमलत्या फुलांचे ढीगच तूं घातले,
प्रेमाश्रुतरंगीं दृश्यजात न्हाणिलें,

होतों फिरवुनि पाठ तुजकडे, राग न धरितां परी,
कवळिलें गाढ करीं सुंदरी !

खुपति शरीरीं कंटक तरिही कोरांटीच्या फुला
अर्पिला बाहुपाश आपला !

## उषा-संगीत

प्रचुर तिमिरीं गेली सारी बुडून वसुंधरा,
नव मधुवनश्रीही झाली विलुप्तच सुंदरा;
तरु न दिसती, वेली गेल्या, फुलें मग कोठलीं ?
कठिण समयीं उष्णाश्रूंची नदीच वहावली !

विभव सरलें, सौख्याशा ती कशास धरूं मनीं ?
म्हणुनि गणिली तेव्हां दुःखात्मिका बहु मेदिनी !

उदित तंव तूं होसी देवी उषे ! तम नाशुनी
भुवन दिधलें मातें, केलें समार्द्र सुखाश्रुंनीं !

## काल–आज–पण उद्यां ?

ओढा काल गढूळ जो फुगुनियां वर्षांबुपूरें पळे,
त्याचा शारदचांद्रिकेपरि अजी वाहे पहा ओघ हा,
पूर्वींचे विसरून जीव सगळे संतोषले त्यावरी,
तेथें काय विशुष्क सैकतकणांवांचून राहे उद्यां !

जेथें एकहि रोपडें न दिसलें ओसाड तें रान हें
झालें रानफुलें विकासुनि अजी सौंदर्यकेलिस्थल,
वेली डोलति, नाचती नव तृणें, गाती मुदें पांखरें,
उद्यां काय दिसेल यांतिल परी येथें न मातें कळे !

होता हा अवसेस इंदु न कळे कोठें, परी आज तो
व्योमीं शोभत रम्यषोडशकलांयोगें तम ध्वंसुनी,
सृष्टीला ललितत्व सांप्रत किती आहे पहा लाधलें,
उद्यां घोर तमांत काय न कळे येईल येथें स्थिति !

आर्ये ! प्रेमल संगतीस्तव तुझ्या वेडावलों तेधवां,
आतां हास्यरसीं बुडून तुझियां गातों नवीं गायनें;
उद्यां काय घडून येइल कशी लाभेल मातें स्थिति,
हा डोकावुनि दुर्विचार मनिं मी होतों किती घाबरा !

## अपूर्णता

तिमिर सरलें, झाल्या तेजें प्रसन्न दिशा अति,
अरुणकिरणीं झाडें वेली किती तरि शोभती,
सुखमय घडी आनंदाची कधीं नच ही सरो,
दिनमणि न तो तेजोधाराशतीं गगना भरो !

लपुनि बसली पर्णामागें गुलाबकली नवी,
अलि विकसनस्तोत्रें गाती प्रमुग्ध जसे कवि;
उसळतिल कीं सौंदर्याचे तरंग सभोंवतीं,
पण न विकसो ती, राहावी अशी मुकुलस्थिति !

घडिघडिस जो होतो आहे नवीनकलान्वित,
रुचिर विधु तो शुक्लारंभीं प्रियोत्तम भासत;
अनिश चढत्या तेजें व्योमांगणीं विहरो अशी
दृढ वसतसे आकांक्षा ही अहर्निश मानसीं !

भगिनि ! अपुली प्रीती राहो सदा प्रतिबंधनीं
सुखहि न मिळो पूर्णास्वादें, न खेद करी मनीं;
प्रबळ परि या उत्कंठेनें मनःस्थिति जी घडे
सुख वद तसें लोकीं कोणी तरी वरिलें गडे !

## प्रीतीची जादू

काळीं ठिक्कर नक्षत्रें तीं दिसलीं मातें, परी
होतीं हंसतच नीलांबरीं;

अश्रुपूर्ण मम दृष्टिस तेव्हां चंद्र फिका वाटला,
होता धवलित परि भूतला,

फुलें वाटलीं मलूल झालीं, परि तीं हास्योत्सवीं
निर्मित होतीं विश्वें नवीं !

रडगाणीं गमलीं सरितेचीं गायनें !
वाटलीं स्मशानापरी रम्य उपवनें !
भासलें दोषमय सर्वच जग शोभने !

परी ठाकतां गडे ! पुढें तव चारुमूर्ति उज्ज्वला
स्वर्गच नरकाचा जाहला !

जादु फुंकतां प्रीतिरवाची कर्णीं मंजु स्वनीं
नाचलें मानस वेडावुनी !

## संक्रांत

सरुनि आतां हिमकाल कष्टकारी
वसंताची येणार पुढें स्वारी !
नव्या पल्लविं डुलणार वृक्षवेली,
हंसायाची विश्वास वेळ आली !

तीव्र थंडीनें गारठलें सारें
चराचर तें सानंद नाचणारें !
विगतदुःखस्मरणही नको आतां—
काल सांगे आजचा सौख्यदाता !

आजपासुनि अवतार नवीनाचा !
सृष्टि गाते—सानंद हंसा ! नाचा !
जुनें गेलें तें मरुनि—नव्हे झालें
तेंच नूतन जीवनीं भारलेलें !

काल झाला संक्रांत ! हर्षभारें—
होय उत्सवरत आज विश्व सारें !
प्रबळ उसळे प्रीतिचा नवतरंग
लीन झालें त्यामाजि अंतरंग !

भगिनी ! असल्या प्रेमोर्मिलीन कालीं,
नवल कसलें—स्मृति तुझी जरी झाली ?
काव्यदेवी तूं, प्राण या जनाचा,
विसर कैसा मग तुझा पडायाचा !

तुला उद्देशुन इथें चार ओळी
लिहित आहें या प्रणयपूर्ण काळीं;
कशा हातीं पडणार तुझ्या बाळे ?—
म्हणुनि येती आसवीं भरुनि डोळे !

पुष्प फेकिति वरि लक्षुनी रवीला,
पडो कोठें तें, मिळे परी त्याला;
तशीं पद्यें गुणवती ! तुझ्या नांवें
अर्पितों, तीं स्वीकरुनि तुष्ट व्हावें !

## रुक्मिणी–पत्रिका

माधवा ! शरण ही आली तव पादसरोजीं दासी !

ऋषिमुखें ऐकिली वार्ता भूभार हरायासाठीं
समरांत खलां दंडाया अवतरला हा जगजेठी,
तैंपासुनि दर्शनिं तुझिया उत्कंठा जडली मोठी;

आधार दीन–दुबळ्यांचा,
आसरा स्वीय भक्तांचा,
तूं एकच अससी साचा
त्रिभुवनीं सकलगुणराशी !

वैदर्भराजतनया ही सांपडली संकटजाळीं,
तुजवीण कोण बळिवंत रक्षाया तिज या काळीं ?
तव चरणदर्शनासाठीं भारीच उताविळ झाली;

पण सांगुं कसें गुज तुजला !
मी विनयवती कुलबाला,
निर्लज्ज दांडगी मजला
म्हणशील तूंच ऋषिकेशी !

साहसें धडा जीवाचा परि करुनी, सोडुनि लाज,
लेखणी आज ही हातीं धरिली मीं केशवराज !
थरथर तनुलतिका कांपे, अनुचित हें वाटे काज;

पण कुणास तुजविण देवा !
हा ताप सांग सांगावा ?
म्हणुनी तव करितें धांवा
तूं येशिल रक्षायासी !

तूं दयासिंधु जगदीश आधार एक संसारीं,
चिंतितें संकटीं म्हणुनी भक्तांची मांदी सारी;
नासती पातकें, येतां तव नाम मुखीं शुभकारी;

तूं आदिपुरुष परमेष्ठी,
गांजिता मही ही दुष्टीं
होऊन मनीं बहु कष्टी
नररूपें अवतरलासी !

नाथा ! तुज म्हणतें नाथ आश्चर्य न याचें मानीं;
तव चरण मनानें वरिले सुरवृंद साक्ष ठेवूनी;
आर्पिला देह हा तुजला मज कळे तदापासूनी;

भीष्मककुलविपिनीं फुलली
ही पुष्पकली वनमाली
विहराया तव पदकमलीं,
अव्हेरीं नच दीनेसी !

तव नाम विश्वकर्णास अमृताची लहरी वाटे;
मग नवल काय दासीच्या जरि हर्ष मानसीं दाटे;
तव चरितश्रवणें देहीं रोमांचविभवही थाटे !

तव गुणकुसुमांची माला
वाहतां तुलाच दयाला !
किति हर्ष अंतरीं झाला
तो नच ये वर्णायासी !

वसुदेवदेवकी कंस कारागृहिं ठेवी द्वेषें;
घेतला तिथें अवतार त्वां यादववंशवतंसें;
तव जन्ममहोत्सविं शोभे तें स्थान स्वर्गाऐसें !

खाणींत रत्न ये हातीं,
मुक्ताफल देते शुक्ति,
तिमिरांत तारका दिसती,
आलास तसा जन्मासी !

त्या रम्य निशीथीं देवा ! वसुमती प्रमोदें हांसे;
शतशारदशशिकांतीनें कोंदली यामिनी, भासे !
गंधानिल मंजुल गीतें चालला गात उल्हासें !

कलनिनाद सरिता करिती,
संवाद सिंधुला देती,
आनंदुनि तोही चित्तीं
गर्जनें भरी व्योमासी !

अप्सरा लागल्या नाचूं नंदनवनकुंजगृहांत !
नरनारी भूमीवरती डोलती महानंदांत !
संगीततरंगीं गेले कोंदुनी सकल दिक्प्रांत

दुंदुभी अंबरीं झडती,
सुमवृष्टि अमरगण करिती,
गोपाला ! भरुनी जाती
जयजयध्वनी आकाशीं !

सागरें घाडिला इंदु गगनांत जसा डोलाया,
वा द्यावें पुष्प लतेनें देवेंद्रशिरीं विहराया,
कीं अर्पी रत्ना खाण राजेशकंठ भूषाया,

वसुदेव तसा तो देवा !
आपुल्या जिवींचा ठेवा
स्वच्छंद सुखें वाढावा
म्हणुनी तुज दे नंदासी !

गोपालकुलाची राणी पाळी तुज माय यशोदा;
पाहुनि तव शैशवलीला अत्यंत पावली मोदा;
तुलना न तिच्या प्रेमाला जरि झाली कुपित कितीदां !

शिरिं मयूरपिच्छें झुलतीं,
वनमाळा कंठीं रुळती,
अधरावर मुरली घुमती,
भुलवि न हें ध्यान कुणासी ?

शिशु सानच असुनी वधिली पूतना तुवां मायावी;
कालिया मर्दिला चरणीं शुभ कीर्ति किती तव गावी ?
गोवर्धन धरिला हातीं करणी ही सकळां ठावी;

गोवत्सवृंद सुखवावा
वाजविसी म्हणुनी पांवा
तो मुकुंद पुनरपि गावा
वाटतें असें भजकांसी !

यमुनेच्या तीरीं, बसुनी तूं तमालतरुच्या मूळीं
बासरी घुमवुनी, विपिनें गोकुळिंचीं नादित केलीं;
जमवुनी गोपवनिता तूं श्रीहरी ! करिसि सुखकेली !

मोक्षास आड येणारे
जड विकार नाशुनि सारे
शुचिभावरसीं कंसारे
खेळलास तेव्हां त्यांशीं !

अक्रूरासंगें नाथा ! मथुरेस पुढें गेलास,
अति नीच कंस तो हातें बलसिंहा ! तूं वधिलास,
सोडवुनि तातजननींतें जगतांत धन्य झालास !

किति चरित तुझें वानावें ?
तें अनंत, सकलां ठावें !
परि वाटे गावें गावें—
अंतरीं द्वारकावासी !

घन गभीर गर्जत येतो जेधवां मुकुंदा ! व्योमीं,
मस्तकीं इंद्रचापाचा खोवुनी तुरा तो नामी,
चमकतां वीज गोविंदा ! तनुकांति तुझी गणितें मी !

तो तूंच कल्पुनी भावें
साष्टांग त्यास वंदावें,
मीं भक्तिभरें पूजावें,
मग ढाळीं अश्रुजळासी !

चातकिनी उडतां दिसली तरि दोष किती तिज द्यावे,
नाचतां मयूरी तिजला रागानें मीं हुसकावें,
मग मधेंच घनरव होतां झांकुनी नेत्र बैसावें,

गोपिका कल्पुनी मजला
मीं निरोप धाडीं तुजला;
पदरही अश्रुनें भिजला !
परि दया न ये कोणासी !

किति कथूं दुःख जीवाचें कालिंदीतीरविहारा !
सांगेन तुला मी पुढती केव्हांतरि जगदाधारा !
सांप्रत मी बसलें आहें ढाळीत अश्रुच्या धारा !

जो चंद्र मनीं म्यां भाजिला
त्या झांकुनी टाकायाला
शिशुपाल राहु मधिं आला,
आतां गत करुं मी कैसी !

जो लेख ललाटीं लिहिला तो तूंच एक पुसणारा,
संकटें नाशुनी सारीं दासीला उद्धरणारा,
म्हणुनीच शरण मी आलें तुज आतां यादववीरा !

हा देह अर्पिला तुजला,
तो देउं कसा दुसऱ्याला
मी मान्यनराधिपबाला,
लाज ही सांग कोणासी ?

गरुडध्वज नभिं फडकवुनी नाचवित गदा हस्तांत
भरीं पांचजन्यनादानें कुंडिनपुरसीमाप्रांत !
दीन मी, दीनबंधू तूं, सोडवीं मला यदुनाथ !

विनतासुत सुरपुरिं गेला
हरि सत्वरि जेविं सुधेला,
श्रीकृष्णा ! या अबलेला
ने हरुनि तसा स्वपुरासी !

तें अमृत कुठें गुणधाम, गुणहीन कुठें ही दासी !
गोकुलवनकुंजविहारी तूं सकल गुणांचा राशी !
परि कठोरता न स्पर्शो केव्हांहि तुझ्या हृदयासी !

तूं भक्तकाजकैवारी,
दासांच्या वसली दारीं;
दीनेला मुरलीधारी !
ने सत्वर चरणांपाशी !

निर्दय हा रुक्मीदादा मम सुखाकडे नच पाही;
अभिमानें ताठुनि गेला जननीस पुसेना कांहीं;
तारुण्यमदाचा पुतळा तो विचारी न ताताही !

नियमोनी वर शिशुपाला
देत तो बळी भगिनीला !
असहाय एकली बाला
सांपडली संकटपाशीं !

थरकांप उडुनि हृदयाचा रडरडुनी सुजले डोळे;
यदुवंशविलासा ! चित्तीं सांवळी मूर्ति तव घोळे;
सोडुनी झोंप मज गेली— सांगतें सर्व लडिवाळें !

चल सत्वर यादवराया !
घेउनि जा अपुली जाया,
अरि मर्दुनि लावी गाया
गुणमहिमा भक्तजनांसी !

उपवनीं नदी ही वाहे यमुना मी म्हणतें तीतें;
तटभूमीवरती तिचिया लाविलें तमालतरूतें
शुक, मयूर, गोजिरवाण्या पाळियल्या गाई तेथें;

फुलतां तरु, अलिकुल गातां,
येशिल तूं सत्वर नाथा !
मुरलीरविं परिसर भरतां
दिसशील कधीं नयनांसी !

गुंफुनी वन्य सुमनांची ठेविली माळ तुजसाठीं;
हें दूध गोड कपिलेचें निवताहे बघ जगजेठी !
हीं मोरपिसें बघ येथें तव खोवायास किरीटीं !

—पण वेडी तर मी नाहीं ?
हें काय बरळतें बाई !—
ये धांवुनिया लवलाही
कळवितांहि नच कोणासी !

वधिलास कंस लीलेनें मधुकैटभ दैत्यरथीही;
शिशुपाल कीट हा देवा ! चिरडणें कठिण तुज नाहीं,
तव बळास नाहीं तुलना देतात भक्त ही ग्वाही,

ही अश्रुरसानें लिहिली
अंतरिंच्या रुधिरें भिजली
पत्रिका असे पाठविली
रुक्मिणिनें श्रीकृष्णासी !

## मुद्रिका

मुद्रिके गडे ! मज सांगें रघुनाथ सुखी आहे कां ?

मम दैव असें हें फुटकें असती हे खेळ तयाचे;
विधिलिखित होय कीं लटकें न चुकें जें भोगायाचें !
राघव मम विपिनीं भटके लोपुनी राज्यसुख साचें

सुख सेवियलें मज संगें
वद तेंहि कसें गे भंगे ?
मी मोहुनि कनककुरंगें
बसलें कीं धरुनी हेका !

दुष्टांच्या कपटें फसलें लक्ष्मणासि छाळिलें भारीं;
वच कठोर वदलें कसलें ! सोडियली प्रीती सारी.
त्याचें फळ आलें असलें दुर्भगा खरी मी भारी !

परि उपाय नाहीं आतां
भेटेन कशी प्रियनाथा ?
गे करिल कोण दुःखांता ?
वद गडे सोडुनी शंका !

मी एक करंटी झालें तूं होतिस त्याच्यापाशीं,
परि कशी तुलाही कालें दुःस्थिती पातली ऐशी ?
वद मनोविनोदनशीले ! त्यजिलेंस कुठें रामासी ?

विसरला काय मजला तो ?
कीं स्मरुनी दुःखित होतो !
भेटेल मला केव्हां तो ?
सांगुनि मम वारीं शोका !

तुज अशी एकली बघुनी सखये, बहु भीती वाटे;
किति शंका हृदयीं भरुनी मनिं शोकसिंधु हा दाटे;
सोडुनी काय गे, अवनी प्रिय माझा गेला दुष्टे ?

स्मरुनी मज असेल रडला,
कीं असुरकरीं बाळि पडला ?
हा दुष्टे, राघव गेला!
गेला गे तो परलोका !

विलाप करुनी असा जनकनंदिनी तेधवां
स्मरून हृदयांतरीं नवघनप्रभ श्रीधवा
निजाश्रुजलकर्दमाकुलअशोकपादस्थलीं
अहा कुसुमवल्लरीपरि विमूर्छिता जाहली !

## सीतेचा निरोप

[ लोकापवादाच्या भीतीनें श्रीरामचंद्रांनीं सीतादेवीला लक्ष्मणाकरवीं अरण्यांत टाकून दिली. त्यावेळीं गर्भवती सीता अत्यंत खेदानें लक्ष्मणास निरोप देत आहेः– ]

करुनिया शांत मन आतां भावोजी ! नगरा जावें !
हा दैवभोग कोणाला आजवरी चुकला नाहीं;
पूर्वार्जित कर्मे माझीं, नच यांत दोष कोणाही;
सुखदुःखचक्रिं हा प्राणी परवशसा भ्रमताचि राही;
कांहींच न अपुल्या हातीं,
मग मानावी कां खंती ?
नयनिं कां आसवें येती ?

काय मी तुम्हां बोधावें ? भावोजी ! नगरा जावें !
जन्माची मी हतभागी सुख कुठलें मग मिळणार ?
ही अश्रुपंक्ति नयनींची कोठुनी बरें सरणार ?
सुखकाल कसा ये, जीतें झाला विधि दावेदार ?
ही अशीच झुरुनी झुरुनी
रात्रंदिन रडुनी रडुनी
जाणार एकदां मरुनी !

—कां आपण दुःखित व्हावें ? भावोजी ! नगरा जावें !
संपलें बाल्य अज्ञानीं, सुखदुःखभावना कसली ?
स्वप्नापरि दिन ते गेले, स्मृतिही न तयांची उरली !
आहलें जाणती थोडी तों विवाहाचिंता ठेली !
संकटें सर्व निवटोनी
दशमुखभुजबलमद हरुनी
मज वरिलें श्रीरामांनीं,

आहे हें अपणां ठावें, भावोजी ! नगरा जावें !
नच हळद लग्नकाळींची काढिली तोंच विधि रुसला !
कैकेयीमनिं त्या काळीं कलि दुष्ट हाय संचरला !
वर निमित्त करुनी आम्हां वनवासमार्ग दाखविला !

शोकानें विव्हळ झाले !
मामंजी स्वर्गी गेले !
प्रभु दारुण विपिनीं वसले,

हें कशास मीं सांगावें ? भावोजी ! नगरा जावें !
अतिभीषण विपिनामध्यें कंठिल्या किती तरि रात्री;
पहुडलें तृणासनिं तेव्हां मी नृपजा कोमलगात्री;
मंदिरशी वनभू गणिली कंटकिता बहु भयदात्री !

भक्षुनी कंदमूळेंही
मी रुसलें फुगलें नाहीं !
पतिसेवानिरत सदाही

मी आनंदांत वसावें; भावोजी ! नगरा जावें !
कंटकमय लतिका गणिल्या मैत्रिणी जिवाच्या तेथें;
खडकाळ भूमि भावोजी ! गालिचाच मानुनि होतें;
कलकलाट वनविहगांचा मीं गणिलीं सुरसंगीतें !

मणिखचित मंदिराऐसे
गणिले पथतरु उल्हासें;
एकदांहि अल्प त्रासें

मीं तिकडे नच देखावें; भावोजी ! नगरा जावें !
वत्सरें अशीं तीं चौदा परि चौदा क्षणशीं नेलीं !
तुमचीच शपथ, पुरसौख्यें क्षणभराहि मनीं नाठविली;
भ्रमरीपरि वृत्ती होती रत सदा नाथपदकमलीं !

लंकेशें हरुनि तशांत
दीनेचा केला घात!
किति चालविला आकांत!

पण नशिब कसें बदलावें ? भावोजी! नगरा जावें!
घनपटलीं विधुची लेखा निस्तेज जशी ती राहे
मी अशोकविपिनीं तैशी जड जीवितभारा वाहें;
राक्षसी गांजितां भारी तरुतळीं पडावें मोहें;

चिंतीत रामचरणातें
ढाळीत उष्ण अश्रूंतें
मी जिवंत काशितरि होतें!

—तें स्मरणहि न अतां व्हावें! भावोजी! नगरा जावें!
तेथुनी पूर्वपुण्यानें तेधवां एकदां सुटलें;
पतिपाददर्शनासाठीं सोत्कंठ लगबगां आलें;
तों शंका घेउनि भलती गंभीर प्रभुजी बसले!

अग्नींत तदा मी शिरुनी
अति घोर दिव्य आचरुनी
सुपवित्र जाहलें भुवनीं;

तें व्यर्थ सर्व कां व्हावें ? भावोजी! नगरा जावें!
नगरांत परतलों, मजला दिवसही लोटले कांहीं;
उत्सवांत गढुनी नुकती विसरलें दुःख सारेंही;
तों कठोर दैवाची हो, जाहली एकदम लाही!

अपवाद विचित्राचि उठले!
भ्रांतापरि नाथहि झाले!
मज भलतें शासन केलें!

हें उचित काय सांगावें ? भावोजी ! नगरा जावें !
सद्धर्मरक्षणा राजा, हें वर्तन हो मग कसलें ?
सुविचारी असुनी गणिले संशय हे सत्यच असले !
मी गर्भवती दिवसांत, परि कठोर कैसे झाले !

ही इच्छा लोकहिताची ?
कीं आवड सत्यपथाची ?
कीं वृत्ती भ्याडपणाची ?

कर्म हें काय समजावें ? भावोजी ! नगरा जावें !
वनवास भोगिला मोठा परि दुःख न गणिलें कांहीं;
कीं चाप धरुनि हातांत प्राणेश्वर संनिध राही !
तुम्हींही कधिं भावोजी पाडिलें उणें मज नाहीं

वांकड्या दृष्टिनें कोणी
पाहतां, शस्त्र उपसोनी
भरिलें वन खलरुधिरांनीं;
मग दुःख कसें मज व्हावें ? भावोजी ! नगरा जावें !
मी अवघडलेली ऐशी आसरा कुणाचा नाहीं;
मग मुखाकडे कोणाच्या मी पाहूं सांगा बाई !
येईल कोण धांवोनी संकटामध्यें लवलाही ?

पण काय बोलुनी आतां ?
मरणाविण नाहीं त्राता ?
सांगावें आपण नाथा—

कीं दासीला विसरावें ! भावोजी ! नगरा जावें !
मज सोडवील एकादा वनराज भुकेला इथला !
अहि अथवा घोर विषारी होईल बंधु दीनेला !
नातरी जान्हवी देवी आहेच मार्ग शेवटला !

पण गर्भ आडवा येतो,
बहु खेद तयास्तव होतो
परि उपाय न दुजा सुचतो;

विधिलेख कुणीं फिरवावे ? भावोजी ! नगरा जावें !
त्रिभुवनांत झाली आहे शुचितेची जीच्या कीर्ति,
स्तावि जिचें शील निर्दोष प्रगटुनिया पावकमूर्ति,
यन्नामश्रवणें अमरां गायाची होते स्फूर्ती,

जी आदिकवीनें स्ताविली,
वनिं वैदेही ती त्याजिली,
ही विचाररीती कसली !

—पण भूपा काय म्हणावें ? भावोजी ! नगरा जावें !
दुर्बल स्त्रीच मी आहे संकटीं काय करणार ?
त्याची स्त्री हरिली दनुजें त्रिभुवनिं जो ठरला वीर !
हें लांछन मज कीं त्याला ? हें कोण परी वदणार ?

कोदंड धरुनिया हातीं
निर्लज्ज कशाला फिरती ?
हंसतां जग पत्नी त्याजिती !

हें वर्तन काय म्हणावें ? भावोजी ! नगरा जावें !
मी भ्रांतिवंटापरि काय बडबडतें भलतें सलतें ?
प्रभुहृदय कसें आहे तें भावोजी ! मजला कळतें;
ते देवपुरुष बहु थोर मम दुःख तन्मनीं सलतें !

हा कठोर मम संदेश
पाडील घरे हृदयास !
हा शब्द नसे कोणास ?

मग केवी मी बोलावें ? भावोजी ! नगरा जावें !
स्वसुखावर सोडुनि पाणी जनतेस सौख्य द्यायाला
मज ठावें आहे प्रभुचा अवतार सुमंगल झाला;
पण दुःखाकुल होऊनी दूषिलें व्यर्थ नाथाला !

मम दुःखवचन विसरावें
प्रभुजींस तें न सांगावें,
मन शांत तयांचें व्हावें—

ऐसेंच त्यांस बोलावें; भावोजी ? नगरा जावें !
जननीच वसुमती माझी ती येथें मज रक्षिल;
कुलदेवी जन्हुसुता ही विश्रांतिस्थल होईल;
आज्ञेनें तुमच्या मजला वनदेवी सांभाळील;

चंद्रिका मजशिं खेळेल,
गंधानिल कुरवाळील,
खग मंजुरवें गातील,

मज अगदीं विसरुनि जावें, भावोजी ! नगरा जावें !
सोडिलें जगानें मजला तरि बाळ असे उदरांत;
शौर्यानें त्याच्या दुसरें स्थापीन राज्य विपिनांत;
रघुवंश तेज का झांके ? जरि पडे असें कोनांत;

सुखकाल असा येईल,
सुतशौर्य तुम्हां दिपवील,
यश तदीय विस्तारेल—

कीं त्यास जगानें गावें ! भावोजी ! नगरा जावें !

## बाभळीचें फूल

उदास मन जाहलें, नच सुखांश कोठें दिसे,
जिणेंहि गमलें नको गिळुनि तीव्र निंदाविषें;
सुके प्रणयवल्लरी न फुटतां फुलें वा फळें,
निराशहृदया कुठें क्षणहि शांति ती नाढळे !

पुसून मग आसवें त्यजुनि संसृतिव्याप हा
विशाल वनिं पातलों सहज एकदां मी पहा;
सभोंवतिं विलोकितां स्थिति दिसूनियां तेथली
विषण्ण मन होउनी नयनिं आसवें लोटलीं !

गुलाबकुसुमें कुणीं हरिलिं ईशपादार्चना,
सुगंधि दुसरीं फुलें सरलिं नासिकातर्पणा;
प्रियालकविभूषणा हरित जातिपुष्पें कुणी,
तसेंच परि राहिलें कुसुम बाभळीचें वनीं !

न भक्त शिवती तया, रसिक पाहिना त्याकडे,
न गीत म्हणती तयावरुनि भृंगही बापुडे !
न रूप, गुणसंपदा, प्रचुरगंधसौभाग्यही
असो इतर, पाहिना वळुनि केतकीचा अही !

उदास नच हो परी क्षणहि बाभळीच्या फुला !
सखा तुजसि आज हा समज एकला लाधला ;
खुशाल जग हें करों सतत आपली हेळणा
झटूं सतत आपण स्वपरसौख्यसंवर्धना !

नसे जगतिं एकही मजसि आपलेंसें असें
मनास रमवील जें प्रणयरम्यलीलारसें !

हंसेल मज पाहुनी करिल सादर स्वागता !
असेंहि नच जें भरी श्रवणिं मंजुशब्दामृता !
'जगीं असति एकला मजसि तूं जिवाचा सखा '
असा ध्वनि जयांचिया श्रुतिपुटीं पडे सारखा
जगांत दिसती असे मनुज भाग्यशाली किती,
मिळेल असली परी कुठुनि दैवहीनां स्थिती !
असो अदय ईश तो, विधि कठोर किंवा असो,
स्वसौख्यरत विश्व हें अपुलियावरी वा रुसो ;
गड्या ! करुनि आपण त्वरित पाठ सर्वांकडे
उजाड वनिं राहुनी गिरवुं ये सुखाचे धडे !

## खरें सांग

सांग मनीं काय तुझ्या तूंच खरें आतां !
व्यर्थचि का हास्य रुदन करिसि मज पहातां ?

गाळिसि नव अश्रुपूर,
सरसि परी दूर दूर,
वाढविसी का हुरहुर
जवळ तुझ्या येतां ?
सांग मनीं काय तुझ्या तूंच खरें आतां !,

नृत्य करी स्मित अधरीं,
शब्दहि वदसी न परी;
पुससि न मम कुशलहि जरि–
नमविलाही माथा !
सांग मनीं काय तुझ्या तूंच खरें आतां !

शोकभरें हृदय उडत
अधरहि थरथर कांपत

दृष्टि न परि वराहि होत
श्रवुनि विरहगीतां !
सांग मनीं काय तुझ्या तूंच खरें आतां !

प्रेमाचे गोड बोल
ऐकाया दिससि लोल
लपविसि कां भाव खोल—
सांग उघड होतां ?
सांग मनीं काय तुझ्या तूंच खरें आतां !

येथें स्थिर बैसवे न,
बाहेरहि पद निघे न,
अधरिं स्मित, साश्रु नयन,
समजुं काय आतां ?
सांग मनीं काय तुझ्या तूंच खरें आतां !

हा प्रेमोत्कर्ष काय ?
कीं—कंपित होय काय !
पुसत सांग हृदयिं काय—
धरुनि तुझ्या हातां !
सांग मनीं काय तुझ्या तूंच खरें आतां !

## उत्कंठित

असुनि सकल ठायिं कसा दिससि न मज देवा !
मिळत न मज कां, असुनी जवळिंच सुखठेवा ?
तापत्रयविकल मनीं
धीर भरिसि मंजुवचनिं,

टाकिसि नयनाश्रु पुसुनि
करितां मी धांवा !
असुनि सकल ठायिं कसा दिससि न मज देवा !
दिसति तुझ्या रूपलहरि
येथ–तेथ विश्वभरी,
स्मितयुत मुखविधु अजवरि
प्रगट का न व्हावा ?
असुनि सकल ठायिं कसा दिससि न मज देवा !
वसुनी मम अंतरांत
असासि मधुर गीत गात,
ये पुढतीं हंसत हंसत
त्वारित वासुदेवा !
असुनि सकल ठायिं कसा दिससि न मज देवा !
प्रेमवीचि तव उसळति
या अनुदिन मजभंवती,
दर्शनलाभेंच कृती
दास कां नसावा ?
असुनि सकल ठायिं कसा दिससि न मज देवा !
आतां हा खेळ पुरे
हो शीघ्र प्रगट हरे !
जन हा प्रेमाश्रुभरें
विरुनि पदीं जावा !
असुनि सकल ठायिं कसा दिससि न मज देवा !

## शुष्क गुलाब

आहे ही करुणास्पदा स्थिति तुझी झाली गुलाबा ! किती,
नाहीं सौरभ चारुताहि अथवा अंगीं तुझ्या संप्रती,

हीं संशुष्क विवर्ण पाहुनि दलें प्रत्यक्ष, आतां कसें—
द्यावें सांग गुलाब नामहि तुला ? होईल लोकीं हंसें !

झोके देउनि मंद वात तुज जो प्रेमातिरेकें पुरा
होता वाहुनि गंधवैभव तुझें मोहीत लोकांतरा,
आतांचें तव रूप भेसुर तया आलें दिसोनी जरी
हा ! हा ! भीतिभरें पळून सहसा जाईल मागें तरी !

ज्यानें रंग मनोज्ञ अर्पुनि तुला श्रेष्ठत्व लोकीं दिलें,
प्रेषोनी निजरश्मि जीवनरसीं हांसावया लाविलें,
व्योमीं येत दिनेश नित्य उदया, मित्रा ! न आतां परी
तो संजीवनबिंदु वर्षिल तुझ्या या शुष्क देहावरी !

बैसोनी तव कोमलारुण दलीं रम्य प्रभातक्षणीं
केली कांतिबलें हिमांबुकणिं ज्या रत्नप्रभाही उणी,
आतां पुष्पवरा ! तुझ्यासह जरी होतील ते संयुत
काळे ठिक्कर होउनी झडकरी जातील नाशाप्रत !

उद्यानीं फुलपांखरूं भटकुनी जातां शिणोनी बरें
विश्रांतीस्तव तें तुझ्याजवळ ये बैसावया आदरें,
आतां तूज न ढुंकुनीहि बघतां जाईल तें स्वैरसें,
आपत्तींतहि राहती चिकटुनी थोडीं अशीं मानसें !

नेलासे सगळा तुझा रस जिनें शोषोनिया एकदां
बंधो ! तेविं तुझा पराग हरुनी बांधी स्वगेहें मुदा,
देहाचें विसरून भान तुजला गाणीं जिनें गायिलीं
रे, ती ही मधुमाक्षिका बघ तुला हेटाळुनी चालली !

जें जाणील तुला, गणीलहि तसें सौंदर्यसारस्थळ,
ऐसें अंतर एक गंधविभवा ! आहे जगीं केवळ,

त्याला तूं दिसशील सुंदर, निधी नाना गुणांचा तसा,
तूं झालास किती विपन्न तरि त्या त्वद्दर्शनीं लालसा !

बा आश्चर्य न यांत अल्प, असशी तूं प्रीतिची देणगी,
नाहीं मूल्य तुझें खरेंच कथितों चामीकराच्या नगीं,
प्रेमानें दिधलें तसेंच सखया ! जें घेतलें प्रीतिनें
त्याच्या गौरववर्णनीं विफळशीं होतात वाग्जल्पनें !

## राम अरण्यांत जातांना

आतां काय म्हणूं तुज सुकुमारी !
हट्ट तुझा भारी !
राहिल अभिनवपुष्पमृदुल तव तनुलतिका ही कां कांतारीं ?

कोमल चरण तुझे सखये कोठें ?
कंटक–भू कोठें ?
पाहुनि पर्वतपथ दुर्गम मोठे
भय मानसिं दाटे;
सुखें सुंदरी ! राजमंदिरीं रहा, हाव ही त्यजिं अविचारी !

तापुनि तीव्र रवी अंगाराची
वृष्टी व्हायाची !
बधिर स्थिति होइल तव देहाची
हिमवातें साची !
जाण मनीं वन नोहे उपवन कीं सुखविल जें अंबुतुषारीं !

लंघुनि गुरुसरिता, तुडवुनि चरणीं—
महोच्च गिरि रमणी !
आहे जाणें मज दंडकविपिनीं
आण जरा ध्यानीं
सुखोत्सवाचा विभवभुक्तिचा प्रसंग नच हा जनककुमारी !

फिरती असुर महादारुणकर्मे
ध्वंसित मुनिशर्में,
छळिती साधुजनां ते अभिरामे !
नाशिति सुखधामें,
चाले दुर्धर नित्यच संगर, तेथ नसावी तुजसम नारी !

झाले दानव भूवरि अनिवार,
छळिति सुरां फार;
जातों करावया तत्संहार—
हरण्या भूमार,
निरोप दे सखि ! सत्वर शुभमुखि ! भलता हेका दूरच सारीं !

आहे सज्ज धनू असलें हातीं—
बघ याची ज्योती !
राक्षस जे जे मजपुढतीं येती
मारिन ते सुदती !
भय न हृदयिं धरिं, सस्मित मुख करिं, नयनसलिल करिं
सत्वरि वारीं !

## आनंदी हो

मित्रा ! हांस सुखें, तुझ्यासह जगत् लागेल हांसावया,
ढाळीं अश्रु, न एकही तुजसवें आणील नेत्रीं जल ;
ज्याचें त्यास पुरून दुःख उरलें, जो तो असे गांजला,
द्यावें लक्ष कुणीं तुझ्या विलपना ? कां व्यर्थ आक्रंदसी ?

कांहीं गा श्रवणप्रसन्नकर तूं, गातील या टेंकड्या,
सोडीं निःश्वसनें, विरून सगळीं जातील वाऱ्यावरी;
आनंदध्वनिच प्रतिध्वनित बा होतो, धरीं हें मनीं,
चिंतेचे रव सर्वदा हरपुनी जातात शून्यांतरीं !

हो आनंदनिमग्न, लोक तुजला येतील भेटावया,
हो दुःखाकुल, सोडुनी झडकरी जातील आप्तादिही
आनंदाजवळीच मित्र जमती, नातीं तिथें जन्मती,
सारी सर्व जनांस दूर—असली आहे उदासीनता !

हो तूं उत्सवमग्न, गेह भरुनी जाईल नानाजनीं,
बैसें खिन्न, न एकही तुजसवें राहील बोलावया;
हर्षाच्या व्यवहारसाधनिं तुला सारे पुढें होतिल,
कोणीही मरणास साह्य तुजला देणार नाहीं बरें !

हर्षाचें रमणीय मंदिर असे विस्तीर्ण, त्या सुस्थलीं—
साऱ्या जीवगणासवें तुज सदा येईल राहावया;
दुःखाचा पथ सान, तेथ इतरां जागाच नाहीं, तरी
एकांतीं करिं अश्रुसेक, न कळो निःश्वास कोणा तुझ्या !

## हताश

नक्षत्रें व्योमभागीं अमित पसरलीं कुंदपुष्पांसमान,
तेजोधारा समंतात् उधळुनि वसुधा शांतवी चंद्रमाही
त्यांतें मी दर्पभारें परि अवगणुनी बैसलों वृक्षमूलीं,
शुक्राच्या चांदणीचें वदन निरखुनी धन्य होणार होतों !

गेला व्यापूनियां तो परिसर सगळा पुष्पगंधें निशीथीं,
वाहे निश्वासवायू हळु हळु भंवतीं झोंपल्या तारकांचा;
झालें आकाशगंगालहरिजलकणीं शीतल व्योम सारें,
गेलों झोंपून हा ! हा ! अवचित तसल्या मोहकालीं कसा मी !

जागा झालों भयानें विहगकलरवीं, पाहिलें भोंवतालीं—
सूर्याच्या रश्मिजालीं स्थिरचर सगळें जाहलें मग्न आहे !
पाहावें हास्य जीचें म्हणुनि अजवरी रान केलें जिवाचें
ती आली आणि गेली तरि हरहर ! मी मग्न निद्रेंत होतों !

## बाळे नीज सुखें

बाळे नीज सुखें ! तुझी निरखुनी ही गाढ निद्रा अशी
माझेंही गतबाल्य आठवुनि तें खेदोर्मि ये मानसीं ;
नाहीं ज्ञात विवंचनाच कसली, चिंता कशाची नसे,
व्हायाची तुज दृष्ट–ये वद कसें झोंपेमधेंही हंसें !

तो वासंतिक काल संपुनि भरे आतां प्रपंचव्यथा !
डोकें जाय भणाणुनी, क्षणभरी शांती नसे सर्वथा !
येते स्वस्थ न झोंप अल्प–चुकुनी आलीच केव्हां तरी
स्वप्नें नाचुनि घोर थोर धडकी बाळे ! बसे अंतरीं !

आशेचीं विणिलीं गडे, सहज मीं जाळीं, परी आज तीं
झाले पाशच, रोधिली सकलही माझी तयांनीं गती !
जो सौगंधिक पुष्पहार म्हणुनी कंठामधें घातला
अंगारापरि तोच सांप्रत असे जाळावया लागला !

आतां तूं दिससी सुखी, पण करी संसार घेतां उद्यां
नेणों क्लेशभरें वहातिल सदा नेत्रोदकाच्या नद्या !
हा येतां क्षणही विचार भलता या पोळलेल्या मनीं
जातें अंग थरारुनी, न सुचतें शोकोर्मि हेलावुनी !

देवा ! राहुमुखीं असेल पडणें या चंद्रिकेला पुढें—
किंवा खाउनि टाकणार कलि ही ते दुष्ट नाना किडे–
ने हीतें तव पादसंनिध तरी आतांच विश्वंभरा !
बा उष्णाश्रुतरंगलीन न करीं ही हास्यमग्ना धरा !

## कलिका

हांसली लतिकेवरी कलिका नवी मधुशालिनी,
मोहुनी मधुपावली स्थल तें भरी मधुर स्वनीं,

जाहले कर घ्यावया पुढती त्वरें खुडुनी तिला
मार्दवा बघुनी तिच्या परि धीर ना मज जाहला !

सृष्टिचें रमणीय हें नव भूषण स्वकरीं कसें
तोडुनी भरलें स्मितीं जग हें करूं गतमोदसें ?
यापरी तिज तोडुनी स्वगृहा तदा वळलों परी
सारखें शुचि हास्य तें करि नर्तना विकलांतरीं !

पातलों फिरुनी दुज्या दिनिं त्या स्थलीं कलिकेक्षणा
पाहुनी तिथली स्थिती परि जाहल्या किति वेदना !
भक्षुनी खलकीटकें निशिं ती कळी अवनींतली—
शुष्कशीं दिसलीं दळें मृदु धूलिकाकणिं सांडलीं !

## भरतभूमि

गेले जेथिल शैल उंच चढुनी स्वर्गास भेटावया,
नाना दिव्य वनस्पती पसरुनी ज्यांचीं शिरें शोभलीं,
जेथें धांवति निम्नगा मधुजला पावित्र्यसंवाहिका
प्रेमें भारतकीर्तिगान भरिती ज्या दिग्दिगंतांतरीं,

जी भू कांचनरत्नधाम गणिली, देखून यद्वैभव
स्वर्गीं देवगणासही क्षणभरी हेवा जिचा वाटला,
जीच्या संगरधीर शूर तनयीं जिंकोनि सारी मही
कीर्तीचा ध्वज रोपिला रिपुशिरीं पूर्वीं त्रिलोकामधें,

शास्त्रें सर्वहि एकदां विलसलीं उत्कर्षुनी ज्या स्थलीं,
विद्याही सगळ्या जिथें मुदभरें दासीपरी राबल्या,
जेथें उज्ज्वल काव्यगायनकला गेल्या पराकोटिला
तत्त्वज्ञान जिचें अजून सगळ्या विश्वास संमोहितें,

ती ही भारतभूमि सांप्रत किती हीन स्थिती पावली ?
सारेंही जग हांसतें बघुनियां तीतें अवज्ञाभरें !

उत्कर्षस्थिति केधवां पुनरपी लाभेल देवा ! तिला ?
केव्हां सांग वळेल मंगलमयी दृष्टी कृपेची तुझी ?

## चंडोलास—

चंडोला ! थांब थोडा, उचित तुजसि बा ही उतावीळ नाहीं
सेवावा बुद्धिमंतें निजपथ बरवा वंद्य जो सज्जनांहीं,
दर्पानें मेदिनी ही अवगणुनि नभीं तूं कुठें चाललास ?
भ्रांता ! वाटे तुला का पसरुनि पुढती ठेविले स्वार्विलास ?

केव्हां येते दिसूनी अरुणरविकरीं रंगली अभ्रमाला,
केव्हां देवेंद्रचाप पगटुनि सहसा मोहवी लोचनांला;
नक्षत्रें दूर कोठें चमकत असती तेविं पूर्णांधिकारीं,
त्या मोहानें खगेंद्रा ! गमत मज तुझी चालली ही भरारी !

काव्याची मोहदृष्टी क्षणभर करुनी दूर पाहीं सभोंतीं,
आत्मध्वंसीच आहे समज चहुंकडे नाचते जी प्रभा ती !
नाहीं व्योमांत कोठें कुसुमफलभरीं मंडिता वृक्षमाला
कीं आनंदें जिथें तूं बसुनि घाडिभरी पावसी विश्रमाला !

नेत्रांतें हर्षवीती हरित तृणलता, अद्रिशृंगें प्रचंड,
किंवा स्रोतस्विनींचे प्रबळ धबधबे चालले जे अखंड,
शून्य व्योमांत केव्हां दिसतिल न तुला हीं विहंगावतंसा !
ये खालीं शीघ्र, होवो महिवरिच तुझी पूर्ण सारी रिरंसा !

घेवोनी पुष्परेणू हळुहळु विचरे वात हा भोंवतालीं,
गंधाढ्या मंजरी या अमित बहरल्या देख मित्रा ! रसालीं,
संगीतें निर्झरांच्या परिसर घुमुनी डोलतें जीवजात,
घेसी व्योमीं भराऱ्या परि मग सखया ! कोणत्या तूं भ्रमांत ?

## पारिजातकाचीं फुलें

अजून करि नर्तना गगनमंडपीं ही उषा,
अजून उघडी न ही कमललोचनांतें रसा,
अजूनहि सुशीतता वसत यामिनीची तशी
परी सुमतती तुझी गळत पारिजाता ! कशी ?

न भानुकिरणें महीवरि अजून विस्तारलीं,
अजून लतिकादलीं चमकते तुषारावली,
किमर्थ कुसुमावली गळासि तूंच गे भूतलीं ?
रहा क्षणभरी, करीं रुचिर रम्य रुक्ष स्थली !

अजून न सरे तुझें मधुर पारिजाता ! हंसें
तुवां अहह ! धूलिकाकणगणीं पडावें कसें ?
न गंध तव वाहिला अजुनि या समीरें दुरी
स्वजीवितसमापना तुजासि कोण घाई करी ?

न वस्तु, गवसे न जें कधिंहि कालपाशांतरीं
प्रसूनकुलभूषणा ! वदति सूज्ञ ही वैखरी;
विचार परि बा करीं, उचित काय हा काल रे ?
विकाससमयींच का सकलही तवायू सरे ?

तुला जनन दीधलें, स्तवुं म्हणून वृक्षास या ?
तयास गणुं निंद्य वा, मजसि हें कळेना सया !
क्षणार्ध मिरवूनियां तुज शिरीं, अवज्ञाभरें
धुळींत तुज लोटिलें, उचित त्यास हें काय रे ?

जें मोहवी हृदय दिव्यगुणप्रभावें
तें वस्तु का अचिरजीवि असेंच व्हावें ?
कारुण्यसिंधु म्हणतात तुला परेशा !
कां या विचित्र करणी करतोस ऐशा ?

## विसरावें म्हणून !

वारंवार विलोकिलें नव उषःसौंदर्य मित्रांसवें,
ज्योत्स्ना रम्य पहावया निशिं कधीं केला न मीं आळस
पुष्पांचीं हंसरीं मुखें निरखिलीं देवेंद्रचापप्रभा,
पाहाया तटिनीप्रपात फिरलों दूर प्रदेशांतरीं,

लास्यें तीं उडुदेविंचीं, बघितला तो दिव्य तारापथ,
केला दृग्विषय प्रचण्ड हिमवान्–सारेंहि गेलें वृथा !
देवी विस्मरण क्षणैकहि तुझें नाहीं कधीं जाहलें,
आहे मद्हृदयासनीं स्थित सदा मूर्ती तुझी मंगला !

आलें सद्गुणगौरवें तव खरें विश्वासही गौरव,
सांनिध्यें तुझियाच ही जगिं दिसे थोडीतरी रम्यता,
सोडोनी तुज चित्तलोभन असें लाभेल केवीं जगीं ?
रात्रीं तारकसंघ सागरिं दिसे–कोणास तो लाभला ?

## जन्मभूमीची आठवण

सोडुनी मम जन्मभू, अवहेळुनी तिज मानसीं,
पातलों सुखकामना धरूनी दुरी नगरांत या,
वैभवीं इथल्या सुखें सरतीलसे दिन वाटलें,
प्रेम जें मनिं दाटलें तिजकारणें, नच जाणिलें!

जन्मभू ! नजरेपुढें दिसतेस तूं मज सारखी
चारुता स्मरुनी तुझी तव चिंतनीं मन गुंगतें,
टेंकड्या रमणीय त्या, पळते झरे खडकांतुनी
सारखे दिसती तळ्याभवंतालचे झुलते तरू ।

वाटलें रमते खगस्वनिं शारदापरिवादिनी,
भासलें गिरिवात तो भरला प्रभुश्वसनामृतें,

देखिल्या दिनयामिनी परि सर्वदा मधुरा उषा–
लास्यमंथर खेळली मज भोंवतीं अनुरागिणी !

प्रीतिचीं मधु गायनें अनुरात्रही नव जन्मलीं,
भावनारससंगमीं द्रवलें सदा मम मानस,
लोटती अठवून ते दिन लोचनांतुनि आंसवें,
रुक्ष भूवरि वर्षुनी सुकती क्षणांतरिं सांप्रत !

## एक इच्छा

जयाच्या आकांक्षा जगभर न सैराट भरल्या
जयाच्या चिंतेचे विषय असती अल्पाचि तसे,
स्वजन्मप्रांतीं जो वसुनि अपुल्या मंदिरिं सुखें–
करी आयुष्याचें अपनयन तो धन्य पुरुष !

सदा ज्याचीं शेतें अमितविध धान्यांहिं भरलीं,
घरीं गाई ज्याच्या सुमधुर पयोवृष्टि करिती,
निरासोनी तापा सुखविति जया अंगणतरू,
तयाच्या सौख्याचा सुरगणहि हेवाच करिती !

शरीरा आरोग्यस्थिति, अढळ शांती मनिं वसे,
अशा सौख्यानंदीं दिन सरति ज्याचे शुचिपणें,
नसे स्पर्धा ठावी विदित कुठला क्षुद्र कलह ?
जगत्संपर्का जो गिरिकुसुमसा दूर वसला–

नसे कांहीं चिंता, वरित सुखनिद्रा निशिं जया,
न पाश व्यापाचा, परि सतत अभ्यासिं निरते,
जगाच्या व्यापारा फिरवुनिच जो पाठ बसला,
नरश्रेष्ठाच्या त्या भंवति सुखसंभार जमतो

असें जावें आयू ममहि जगताला अविदित,
अहो ! यावें मातें सुखमरण कोणा न कळतां,
तयाचें हें वासस्थल, चरित त्याचें अमुक हें,
नसो याचें ज्ञान क्षणहि लव कोणास जगतीं !

## भलती इच्छा

ज्यांचा भव्य यशोध्वनी पसरला होता दिगंतावधि,
होतें कांपत वीरमंडळ भयें ज्यांच्यापुढें एकदां,
झाले कालविलीन ते सकलही भूपालचूडामणि,
त्यांचें नांवहि येतसे न अमुच्या कर्णावरी सांप्रत !

आहे कालपयोधि हा खवळुनि रात्रंदिनीं गर्जत,
विश्वग्रास करावया उसळती कल्लोल त्याचे वरी,
नौका आजवरी तदीय उदरीं संलुप्त झाल्या किती,
नाहीं क्षुद्रहि चिन्ह त्याजवरती आलें दिसूनी कुणा !

कोठें क्षुब्ध गभीर तोयनिधि तो, तूं क्षुद्र जीवा कुठें ?
कीर्तीची भलतीच चाड धरिसी मूढा ! वृथा मानसीं !
तारामंडळ, इंदु, भास्करहि या कोणी न जेथें पुसे
रथ्याधूलिकणें कशास भलती वांछा करावी बरें ?

## वंदन

चित्ताकर्षी सुमधुर उषा निर्मिली सांग कोणी ?
नानारंगी घन नभिं दिले हे कुणीं विस्तरोनी ?
कोणीं केला दिनमणि महाकांतिसंपन्न हा रे ?
तैशा आल्या कुठुनि लतिका मंडिता पुष्पभारें ?

ओढे चंचल, निम्नगा मधुजला, उच्चंड हे भूधर,
नक्षत्र ग्रह तारका विधु तसा हा भव्य रत्नाकर,

कोणाची कृति ही असेल, न कळे आह्मां कुठें तो वसे,
त्याचा चिंतुनियां अतर्क्य महिमा होतें मन भ्रांतसें !

तो कोण हें नाहिं अह्मांस ठावें,
तन्नामरूपादि कसें वदावें ?
चिंतूनियां त्यास अनन्यभावें
कल्याणकामांहिं विनम्र व्हावें

जेथें दुर्बल भानुरश्मि ठरले, तेथें प्रकाशे शशी,
टाकी ध्वंसुनि अंधकार, विभुची ही रीत आहे अशी
बुद्धाखिस्तमुहम्मदप्रभृति ते श्रीरामकृष्णादिक
विश्वोद्धार करावयास झटले, त्याचेच ते सेवक !

न रूप ठावें, गुणही न ठावे,
शुभेच्छुंनीं त्या तरिही नमावें,
अंधें जरी द्राक्ष मुखांत घातलें
तरी तया स्वादु न काय लागलें ?

## मधमाशी

मधमाशी—येथ कशाला वद येशी ?

जा तेथ—जेथ लता तरु डुलतात;
पुष्पतती—हंसती, परिमळ दरवळती;

त्या ठायां—जा मधु ताजा प्राशाया;
त्या स्थानीं—गा अपुलीं मोहक गाणीं

हें नाहीं—योग्य तुला मंदिर बाई !
देवाची—इथें प्रार्थना व्हायाची

मागाया—क्षमा पातका प्रभुराया—
जन जमती—तुज कुठली पातकभीति ?

असती तूं–पुण्यमूर्ति यांत न किंतु
जा बाई–झुलते जेथें वनराई ।

**सीतेस अरण्यांत टाकतेवेळीं लक्ष्मण म्हणतो:—**

देवी ! या कालीं केवल दैव तुला वाली !

दिनकरकुलभूषण रामाला
न कळे कसला भ्रम हा झाला !
संशयतिमिरीं वृथा बुडाला !
कठिण दशा आली ! देवी ! पडसि व्यसनजालीं !

काय म्हणावें मूढ जनांला ?
मुखें निंदिती पावित्र्याला !
अविचाराचा कळसचि झाला !
काय तुझ्या भालीं कळेना ! दीन मती झाली !

क्रूर पशु फिरती क्षुद्व्याकुल
त्यांहीं कानन आहे संकुल
रक्षिल तुजला कोण महाबल !
माय मला व्याली कशाला ? कर्मदशा आली !

गर्भभरालसतनुलतिका ही
सहन करील न तापहि कांहीं
व्यसनवारणीं उपाय नाहीं !
धृति विलया गेली ! निराशापंकीं मति ठेली !

रघुकुलभूती आज लोपली !
भावि सुखाशा सर्व संपली !
सीता–गृहदेवीच–कोपली !
वृथा मोहजालीं प्रबद्धा राममती झाली !

प्रसन्नसलिले ! अयि मंदाकिनी !
सुताप्रेमले ! वसुमति ! जननी !
भर्तृत्यक्ता दीना विपिनीं
एकलि ही पडली ! इच्यावरि दया असे अपुली !

भीषणरजनीसमयीं एकलि
वनभूवरि ही असतां झोपलि
वेढी निजमृदुतेजःपटलीं;
राम जवळि–म्याली–असोनी ! ज्योत्स्ने ! सांभाळी !

देवि ! मिळो तुज सुख या काननिं,
विहंगगण रमवी मंजु स्वनिं,
लतिका तर्पण करोत सुमनीं !–
अश्रुजळें आलीं ! शोकें वृत्ति शून्य झाली !

## एकत्वासाठीं

नाचे तारा गगनांत,
गातें फूलहि रानांत;
नाहीं भाषा एकाला,
ठावें नृत्य न दुसऱ्याला

होय कशी ही गुणमिळणी ?–
हीच चिंतना एक मनीं !
एक इथें, दुसरें तिकडे,
तिसरें तर भलतीचकडे !

विसकटल्या तारा गगनीं
दिले गुण तसे उधळोनि

विचित्र करणी कोणाची ?
दैवाची ! शुभवैऱ्याची !

चंद्राची म्हणुनीच कळा
जाते येते जणुं चपळा !
हें का नियमित विश्वाचें
लक्षण वद मानायाचें ?

अनवस्था स्वैराचार
यांचें जग हें आगार !
न तरी कां तें आवडतें
माझें मजजवळुनि जातें !

तें तिकडे, हा मी इकडे,
हंसतों वरवर, आंत रडे !
मी त्याविण, तें मजवीण,
दोघांचा अर्धा प्राण !

पण येथें करणार कसें ?
दैवाचा हा खेळ असे !

## रानफूल

तूं तर रानीं वसणारें
न तुला नगराचें वारें !
रंग लाधले मग कुठुनी ?
नेती जे मानस हरुनी !

हा मोहक अभिनव नाच,
जोड कुठेंहि न या साच !

हास्याच्या लहरी लहरी
या तर रे नुसत्या जहरी
गंधाचा हा लोट तसा
रसा गमे हा करि सरसा!
वैभव हें तव पाहोनी
माझी मज ये लाज मनीं
झालों कवि विद्याधीर,
कीर्तीचा वाहे पूर !
आंतर वृत्तिस भिडणारें
न असे कांहीं परि बा रे !
सुखकाला आळविणारे
आम्ही स्वार्थी झटणारे !
रसिक श्रोता लाभाया
आम्ही सांडूं ही काया !
वाचक मिळावयास तर
हिंडूंही दारोदार !
ही अमुची काव्यप्रीति
भलती निष्ठेची रीती !
दगडालाही काळया या
तूं झटसी कीं रमवाया !
हीच खरी निःस्वार्थाची
निष्ठा सत्कर्तव्याची !

## सरितेस—

दिधलें जनन तुला असलें
सरिते ! जरि गे या अचलें,

तुजला कुतकें खेळविलें
मांडीवरिही लडिवाळें,
कडेवर घेउनियां तूंतें
भूवरी पोंचविलें ललिते !
तरी न त्यांस्तव थांबे, क्षणही वळुनि न बघ मागें,
शीघ्र चल पुढतिं महाभागे !

डोंगरी वेली आनंदें
खेळल्या तुजशीं स्वच्छंदें,
तुझ्यावर फुलेंहि उधळोनी
हांसल्या जरीहि खदखदुनी;
स्नेह न खोटा गे, त्यांचा
असा जगिं विरळ दिसायाचा !
तरी न त्यांस्तव थांबे, क्षणही वळुनि न बघ मागें,
शीघ्र चल पुढतिं महाभागे !

टेंकड्या, या भलत्या दरडी
तशी ही कांटेरी झाडी,
बाळपणिं खेळलीस येथें,
काय पण आतां त्यांचें तें ?
जगदुद्धारकार्य देवी !
तुझ्यावर विश्वपती ठेवी
म्हणून त्यांस्तव थांबे, क्षणही वळुनि न बघ मागें,
शीघ्र चल पुढतिं महाभागे !

उठलीं चिखलांतुनि कमळें
वर्णिती ज्यांना भृंगकुळें,
तीं का चिखलांतच रमती ?
बेडकांसवेंच ओरडती ?

बसती जाउनि देवशिरीं !
तुझीही तशीच कामगिरी !
नकोच पाहूं मागें, चल गे धांव पुढें घेई !
होशिल विश्वाची माई !

## बाभळीचें फूल आणि गुलाबाचें फूल

घेतलें हातीं—बाभळिचें फूल,
हुंगिलें तें वेळोवेळ !

रंग तो साधा—गमतीचा गणिला,
जनांनीं कुतुकानें स्तविला !

विरचिलीं त्याच्या—गंधावर गाणीं
वानिलीं तीं रसवेत्त्यांनीं !

'धन्य तें फूल—धन्य भक्त हाही !'
पसरली अशी जगीं ग्वाही !

परि मम दुर्दैवें—फूल गुलाबाचें
दिसलें स्थल सौंदर्याचें !

गंध तो त्याचा—अपूर्व मृदुता ती
मनोहर कोमल दलपंक्ति,

पाहुनी भुललें—मन वेडें झालें,
उताविळ होय मोहजालें !

फेकिलें खालीं—बाभळिचें फूल,
पसरली जेथ रुक्ष धूळ !

धावलों पुढती—गुलाब तो घ्याया,
हृदयस्थलिं संस्थापाया !

परी तो कुठला—मज लाभायाला ?
अभागी जो मुळचा ठरला !

बघायाचीही—होय कडक बंदी,
जाहलों त्यामुळेंच फंदी !

लाडकें पहिलें—नावडतें झालें
दुसरें तें न करीं आलें !

तुटलेला तारा—गती तशी झाली,
न कळे काय पुढें भालीं !

मरावें वाटे—यमुनेच्या डोहीं
उरला मार्ग दुजा नाहीं !

## दोन मनोवृत्ति

फुला, असें कां हंससी कळेना,
देंठावरी कीट कसा दिसेना !
हा दंश घेतां तुजला क्षणांत
बुडून तूं जाशिल धूलिकेंत !

नदी, अशी कां हंससी कळेना,
हा सिंधु कैसा पुढती दिसेना ?
कालस्वरूपांत झणीं विलीन
होशील, कोठें मग हें सुगान ?

मुली, अशी कां हंससी कळेना,
सपाश हा काल पुढें दिसेना ?
हरील केव्हां तव सौख्यसार
हें कोण गे भूतलिं जाणणार ?

केव्हांही श्रवणावरी उतरतां आनंदहास्यध्वनि
शोकक्रंदन भावि चिंतुनि अहा ! कल्लोळ होतो मनीं,
ठावा शोकरवाविणें न दुसरा आलाप केव्हां जया
शंका मंगलदर्शनींहि भलती व्यामोहवी कीं तया !

हिमाश्रु कां गाळिसि सांग बा; फुला ?
दिसे न आला क्षितिजीं रवी तुला ?
सुवर्णरश्मी भरतां सभोंवतीं
हंसून होईल पुरे तुजप्रती !

नदी, वृथा हा तव रोदनस्वर,
पहा पुढें सिंधु विशाल सुंदर !
देऊन आश्लेष तयास, काल हा
हंसावयाचा तुज पातला पहा !

मुली, अशी कां रडसी ? वृथा हें
नेत्रांत उष्णाश्रुजल प्रवाहे,
आहे पुढें वल्लभ सानुराग
निःश्वास हे कां निघतात सांग ?

रात्रींचें भरलें तमिस्र तरिही मागून येतो दिन
जातो त्यापरि शोककाल म्हणुनी न भ्रांत व्हावें मन;
आशा सोडुनि होय ज्यांस न दुरी धीरस्वभावी असे
दुःशंका पसरूनियां हृदयिं ते व्यामूढ होती कसे ?

## वृद्ध कोण ?

उद्दालकाची कन्या सुजाता हिच्या उदरीं कहोडापासून अष्टावक्र नामक महाविद्वान् ऋषि जन्मला. जनकाच्या दरबारांत बंदी नांवाचा एक पंडित होता, त्यानें कहोडाला वादांत पराजित करून समुद्रांत बुडविलें.

ही हकीकत कळल्यावरून अष्टावक्र क्रुद्ध होऊन जनकाकडे निघाला. त्यावेळीं त्याचें वय अवघें बारा वर्षाचें होतें. अर्थात् पोर म्हणून द्वारपाल त्याला आंत सोडीना. त्याला अष्टावक्रानें खालील उत्तर दिलें आहेः— शेवटीं सभेंत जाऊन त्यानें आपल्या विलक्षण पांडित्यानें बंदीचा पराभव केला.

आचरी सुव्रत नियमानें
वेदाध्ययनें ज्ञान अंतरीं सांठविलें ज्यानें,

इंद्रियें अवघीं संयमुनी
सोडुनि ऐहिक पाश अहर्निश रतला जो ज्ञानीं,

म्हणावें वृद्ध खरा त्याला,
बाल असो वा तरुण, करावें काय वयस्काला ?

वन्हिची क्षुद्र असो कणिका
प्रचंड पर्वत शुष्क तृणाचा जाळिल ती नच का ?

वाढला देह महाकार
ज्ञान त्यावरी अवलंबुनि नच केव्हां असणार !

आयुची घडतां सार्थकता
बालत्वींही नर तो पावे सद्गति साधुमता !

पिकले केंस, दांत पडले,
मूढात्मे ते वृद्धपणींही बालसेच गणिले !

## धिक्कार त्यांना असो !

नाहीं पायधुळींत दीनसम मी त्यांच्या कधीं लोळलों,
जे उन्मत्त म्हणून मानिति मला—गर्वान्ध हा जाहला !
केली न स्तुति केधवा भलतिशी सत्यार्थ संगोपुनी,
माझे सद्गुण हेळिती म्हणुनि जे—धिक्कार त्यांना असो !

येते शीघ्र नदी परन्तु ढकली लाटांहिं सिंधु तिला,
तैसें काव्य मदीय तुच्छ गणुनी ज्यांनीं पदीं मर्दिलें,
गाऊं काय अशा जनास्तव ? वनीं पाषाण नाहींत कां ?
जे निंदा करितात निष्ठुर मनें—धिक्कार त्यांना असो !

ओलावा गवसेल अल्पहि तयां जेथें धनाचा तिथें
हे जातील झटून, जेविं जमती अन्नावरी मक्षिका !
थोडाही गुण तेथला मग गमे तो डोंगरासारखा,
होती निव्वळ तोंडपूजकच जे—धिक्कार त्यांना असो !

आहे तो अमका धनाढ्य, तमका द्रव्याधिकारी असे,
कांहीं त्यांजकडून काय अपुलें होणार आहे सुखें,
ऐसें पाहुनि धावतात तिकडे थोरांतले थोरही
सारे मानव देहवंत पशु ते—धिक्कार त्यांना असो !

मोठे सुन्दर बंगले, झळक ते पोषाख आकर्षक,
रत्नस्वर्णविभूषणें तळपुनी दृष्टीस आल्हादिती,
तीं स्थानें बघतां भयाकुलमनें मी दूर होतों त्वरें !
कांहीं घोरच येत तेथ दिसुनी—धिक्कार त्यांना असो !

त्यांचें दर्शनही नको, त्यजुनियां सम्बन्ध त्यांचा त्वरें,
मी जाईन सुखें लतातरुगणीं व्यापून गेल्या वनीं !
एका सुन्दर टेकडीवर तिथें बांधूनियां झोपडी
ईशध्याननिमग्न होउनि मुदें कंठीन सारे दिन !

खोटें हास्य न तेथ पुष्पवदनीं मोहील तेव्हां मला,
व्हायाचीं गवतेंहि कोमळ कधीं कांट्यांपरी तीव्र न
गानाशीं मम सूर देतिल अहा, तीं डोंगरी पांखरें,
तेथें ईशगुणानुवाद करित स्वच्छंद राहीन मी !

नाहीं भ्रष्ट कधीं विचारशुचिता होणार त्या सुस्थलीं,
कोणी दुष्ट न दाखवील अपुलें केव्हांच काळें मुख !
स्वर्गींचा सुखलाभ तेथ मजला होईल पुण्योदयें,
स्वार्थी विश्व करावया व्यथित हें येणार नाहीं कधीं !

तेथें मी गवतावरी पहुडतां सन्ध्याप्रसंगीं सुखें
पुष्पाचा मृदुगन्ध अर्पुनि मला सेवील मन्दानिल
व्योमीं तारकसंघही मजपुढें लागेल नाचावया,
विश्वाचा न कधींहि येइल तिथें द्वेषाग्निफूत्कार तो !

## टेकडीवरील तारा

सहज दृष्टी वळवून मीं पहावें,
हर्षरोमांचीं अंग भरुनि जावें;
टेकडीवर त्या रोजच्याच जागीं
दिसुनि यावी ती तारका शुभांगी !

हास्यकिरणें सर्वत्र विस्तरीत
सौख्यपुरीं दशदिशा नाचवीत
खिन्न हृदया आनंद अर्पिणारी
दिसे तारा अंबरीं डोलणारी !

डोल तारे ! तूं सदा हंसत राहें
सुखीं बुडवीं चिर दुखःमय धरा हे;
खिन्न माझ्या हृदयास शांतवून
निराशेचें तम टाक निस्तरून !

दिवा क्षुद्रहि मम गृहामधें नाहीं,
भरुनि सर्व स्थलिं अंधकार राही,

किरण एकहि मजकडे तुझा फेक
सुखी मजसम मग मीच जगीं एक !

—गडे ! किंवा खालतीं कां न येसी ?
सिद्ध आहें मी तुझ्या स्वागतासी !
नभीं लक्षावधि चमकतात तारा,
व्यर्थ जातो तव कांतिपूर सारा !

तुझ्या प्रतिकिरणा मस्तकीं धरीन,
तुझ्यावरुनी नव गायनें रचीन !
धन्य होइन करुनियां तुझी सेवा,
न मी स्वप्निंहि चिंतीन दुज्या देवा !

मेघ न इथें तव कांति मळवितील,
न तुज झंझानिल कधीं स्पर्शतील,
गेहिं मम तूं स्वच्छंद दिवसरात्रीं
करी विहरण सानंद चारुगात्री !

नको अथवा हा गडे ! स्वार्थहेतु,
रहा चमकत गगनींच या सुखें तूं !
विश्वसुखवर्धन करावया झाला
तझा संभव हें ज्ञात मन्मनाला !

जरी नाहीं मी सुखी, तिमिरिं राहे,
तरी तुजला बाहणें उचित नोहे
किती जीवा तुजमुळें मिळे धीर
कोण तुज मी स्वगृहींच ठेवणार ?

रहा गगनीं नक्षत्रमंडळांत,
उचित नाहीं तुज अधम महीप्रांत !

दुष्ट पापी हा कर्दमीं बुडाला,
कुठुनि व्हायाचा तुझा लाभ त्याला ?

त्याच भूमीवर असें जन्मलों मी,
कशी मिळशिल जी वससि सदा व्योमीं !
सौख्यदुःखाच्या नित्य भोवऱ्यांत
फिरत आम्ही असणार दिवसरात !

क्लेश अथवा हे कथूं कासयाला ?
खिन्न तुझिया कां करूं मानसाला ?
आम्ही आहों गे, सुखी निके जाण,
तूंहि आतां करिं सहर्ष प्रयाण !

## व्यर्थ प्रेम

हें नशीब ठरलें आतां कीं तुजला मीं सोडावें !

तुजवरची माझी प्रीती ही झाली वेडेचार !
तुज विसरावें मीं यत्नें हें शहाणपण साचार !
ओढावें झटुनी मागें त्वन्निरतहृदय अनिवार !
पण तसें कराया जातां
वाटतें काय जें चित्ता
तें कसें कथावें आतां ?
भडकुनी आग भंवतालीं नच सुचतें काय करावें ?

अगदींच राहिला नाहीं माझा तुजवरि अधिकार !
तव हृदय नव्हे तें माझें ह्मेतें जें 'मम' होणार !
हा खेळच झाला नुसता घडले जे प्रेमाचार !
गंधर्व नगर उभवावें

वाऱ्यानें विदळुनि जावें,
मम दैवींहि तेंच असावें ?
हृदयाचें घेउनि जाळें पांखरूं उडुनि कां जावें ?

केली तुजवरती प्रीती तैशीच अजुनि करितोंही,
तुजकरितां जग अवगणिलें स्वर्गही मानिला नाहीं !
कीर्तिवर मारुनि लाथ मी तुझ्याच वसलों मोहीं !
तूं अशा मला त्यजिलेंस,
त्यज, देइन न तुला दोष !
कीं पूर्वस्मृतिचा लेश
सुखनिर्भर करितों अजुनी ! उपकार कसे विसरावे ?

तूं विसर मला अवमान, मी न कदा तुज विसरेन !
प्रेमच तव जीवित माझें तुजवरि कां रागावेन ?
तूं खुशाल तुडवीं पायीं मी हंसतच तुज पाहीन !
तव चिंतन अनुदिन करितां
तुज गीतें गातां गातां
सोडीन जाण या जगता
इच्छा ही—हृदय तुझें हें तेव्हां तरि द्रवुनी जावें !

## आकाशांत टक लावून पहाणाऱ्या मुलीस

तूं काय पाहसि अशी निरखून बाळे ?
कोणीं तुझें मन असें हिरवून नेलें ?
हाले न दृष्टि पळही जणुं बद्ध झाली
ती निश्चयें गमत दुस्तर मोहजालीं !

हे रंग जे नभिं नवे दिसतात आतां
त्यांचाच लोभ पडला तव लोल चित्ता !

कीं तारका चमकते मृदु एकली ही
वृत्ती जडून तिचियावर काय राही ?

कीं गात गात विहरे खग अंतरालीं
त्याच्यावरीच तव दृष्टि जडून गेली ?
कीं जो तुझ्या मनिं अहर्निश नांदताहे
त्याचें इथें सुखद साम्य उठून राहे ?

पाहोनियां तुजचि मानस मुग्ध व्हावें,
तूतें हि जें भुलवि काय असें असावें ?
पापी जनांस चुकवून बसे दडून
झाला गमे प्रभुच तो तुज दृश्यमान !
कीं या जगा त्यजुनि धांवत दूर आहे
तें या स्थळीं प्रकट कल्पित सौख्य राहे ?
बाळे ! अम्ही अधम, तें न दिसे आह्मांला
तूं पुण्य दृष्टिबल योजुनि ओढ त्याला !

वा एकही न तुजसें शुचि वस्तु लोकीं
आलें दिसून तुज तें वद या स्थलीं कीं ?
जावें तिथें मिळुनि त्यासह एक व्हावें
तूं इच्छिशील—पण काय अह्मीं करावें ?

दृश्यें जगांत भरलीं असतीं कितीक,
त्यांतील दृश्य सुमनोहर तूंहि एक ?
लावून दृष्टि गगनांत अशीच राहीं
हें रम्य चित्र निरखून डुलेन मीही !

## तूं उदास कां ?

या प्रसन्नकालीं ऐशी
कां उदास दिससी बाळे ?

या अनंत तारा गगनीं
चमकती मधुर तेजानें
तम अंतरिंचें तव का त्या
निवटिती न एकहि किरणें ?
नच चंद्रिकाहि ही काय
तुज रिझवी स्वीय रसानें ?
विकसलीं किती सुमनें हीं
दरवळलें जग सारेंही
गंधांशहि उतरत नाहीं
निर्गंध तुझ्या हृदयांत,
कां होय असें वेल्हाळे ?
हा गात चालला वायू
तुजजवळि न फिरके सूर !
हा नाच नाचतो ओढा
तुजपासुनि परि हो दूर !
या डोलडोलती वेली
तूं दिससी पण गंभीर !
जग सारें आनंदांत
तूं एकलीच खेदांत !
विहरती सुखाचे दूत
कां दूर लोटसी त्यांना
अश्रू कां नयनीं आले ?
तव मनास असले कसले
आहेत तरी गे क्लेश ?
कीं विश्वानंदाचाही
परिणाम न घडतो लेश ?

मज कळूं दे तरी त्यांना
मी झटेन वारायास !
आयुष्य सौख्य मम सारें
मी वेंचिन सुगुणाधारे !
करिन स्मित तेजोभारें–
मुख तुझें विभूषित यत्नें
दे फेकुनि चिंताजाल !

## संक्रांत

" घे बंधो, तिळगूळ गोड वद तूं !" हें बोल ऐकोनिया
मी माझ्या भगिनीकडे बघितलें तैं खिन्न हांसोनिया
" ताई ! हें व्यवहारि विश्व वदतें जीं कोरडीं बोलणीं
कां मातें करिशी विरक्त वदनीं तीं तूंहि गे काढुनी ?

द्यावा लाचहि, कार्य साधुनि परी द्यावें, जगीं रीत ही;
नाहीं प्रेम कुठें, बघून भरते मद्दृष्टि दुःखाश्रुंहीं !
प्राणी हा मुखपूरणें ध्वनि मृदू काढी मृदंगापरी
प्रेमाचा लवलेश सांग तरि का त्यामाजि नांदे तरी ?

तूंही मूढजनानुकार करिसी आश्चर्य याचें गमे
माझें प्रेम असेंच काय कळलें ? हें खिन्न चित्त भ्रमे !
व्हावे का तिळगूळ गोड तुजशीं बोलावया कारणें ?
गोडी वाणिंत काय गूळ भरि हा सांगे तरी शोभने ?

आलों बोलत गोड काय तुजशीं मी आजवेरी नसें ?
त्याचा मोबदला असाच दिधला तूं काय ? येते हंसें !
आहे दिव्यतम त्वदीय भगिनी ! जें प्रेम माझ्यावरी
त्याच्यासाठिं सदैव गोड तुजशीं बोलेन संर्डीभरी

त्याला हा तिळगूळ मूठभर तो व्हावा कशाला बरें ?
बाह्याचार नकोत, पूर्ण जडलीं प्रेमें जिथें अंतरें !
पाळावे व्यवहार सर्वहि सुखें स्वार्थी जगानें असे,
नांदे प्रेम खरें, तिथें गुणवती त्यांची जरूरी नसे !

हे वेडे व्यवहार आपण इथें पाहून हांसूं मनीं,
संक्रांतीच कशास, जाउं गढुनी प्रेमांत साऱ्या दिनीं.

## डॉ. जगदीशचंद्र बोस

जीच्या ज्ञानप्रकाशापुढति दिपुनियां सर्वही विश्व गेलें,
जीचा सत्कीर्तिगानध्वनि पसरुनि हें नादित व्योम झालें,
लाभावा जन्म जेथें म्हणवुनि सुरही नित्य सोत्कंठ होते,
आतां आली कशी ही अति कठिण दशा त्याच या आर्यभूतें !

गेलें वैभव सर्वही, अवचितां रत्नें कुठें लोपलीं,
लाभे पोटभरी न अन्नहि कुणा, दारिद्र्यदावानलीं
सारे होरपळून दीन बनले, निस्तेज झाले अति,
येती शब्द मुखीं, कळे न पुढतीं होणार कैशी गति ?

जावो वैभव तें सुखें, भरतभू रत्नप्रसू ही असे,
होता डौल असा, परी निघति हे आतां कसे कोळसे !
सारे पौरुषहीन लोक भरले, हें भार झाले तुला,
आतां आर्यमही ! फिरून तुज तो सत्काल ये कोठला ?

ऐसें बोलुनि वाहिलीं नयनिं मीं खेदें किती आसवें
झालों दुःखित फारच स्मरुनि ती गेलीं तुझीं वैभवें;
अंधारांत तुझा भविष्य बुडला, वाढे निराशा अति,
तों झाली अरुणप्रभा सुमधुरा पूर्वेकडे व्यक्त ती !

गेला खेद लया क्षणांत, भरला उत्साह चित्तांतरीं,
गेले रोम थराऊनी सुखभरें साऱ्या शरीरावरी !
गेली दुःस्थिति सर्वही, समजलों, ती वैभवार्कद्युति
विस्तारून पुनश्च होतिल इथें सारीं सुखें क्रीडतीं !

आले भूवर या उषःकिरण जे आल्हाददायी नवे
त्यांची दुर्बलवाग्बलांहिं महती कैशी तरी वर्णवे ?
वंदावेंच अम्ही तयां, न वदतां श्रद्धा धरूनी मनीं,
जाणें हें जगदीशचंद्र ! परि ही ऐके न मल्लेखनी !

हा आर्यभूविभवकाल समीप आला,
यांतील थोर यश येत असे तुम्हांला;
हें जीर्ण राष्ट्र नवजीवनसंप्रदानें
केलें सजीवित तुम्हींच, न कोण जाणे ?

बंधो ! हिंदमही यशःप्रसविनी अद्याप मेली नसे,
ज्ञानोत्कर्ष अजून तत्सुतगणीं पूर्वींप्रमाणें वसे;
नाहीं ती मरणार ! जीवन नवें संपादुनी सत्वरि
केलें व्यक्त तुम्हीं, पुन्हां प्रमुख ती होणार राष्ट्रांतरीं !

ईशें विश्वगुरुत्व आर्यमहिला पूर्वी असे अर्पिलें
होतें वाटत या जना अजवरी कीं व्यर्थ तें जाहलें !
बंधो, पाहुनियां प्रभाव तुमचा विज्ञाननैपुण्य तें
आशापूर्ण मनांत या अभिनवा सौख्योर्मि हेलावते !

गेला तो सुखकाल, देश अमुचा होता पुढारी तदा,
त्याची सांप्रत हाय ! आठवणही होते अम्हां क्लेशदा !
या कालांत तुम्हांकडेच गमतें आहे पुढारीपण,
धन्या वंगमही ! असो तिजसि हें सप्रेम मद्वंदन !

गेलें कोंदुनि यद्यशें जग, कवी येथेंच तो जन्मला,
आहे संभव आपलाहि सुमते ! त्याच स्थलीं जाहला;
आहे बंगमही पुढें; परि अम्हां ना खेद याचा असे,
सारे भारतपुत्र, मग्न मन हो मात्सर्यदोषीं कसे ?

व्हा कोणीहि पुढें, परी भरतभूसौख्यार्थ सारे झटा,
गेले व्यर्थ तरी श्रमांस भिउनी केव्हां न मागें हटा;
आहे मागुनि येत धीर गतिनें जाणा महाराष्ट्रही
योजा कांहिं उपाय, उन्नतिपथीं आणा झणीं ही मही !

सेनानी जगदीशचंद्र ! अमुचे आहांत तुम्ही भले,
सर्वांचें तुमच्यावरी मन असे अत्यंत विश्वासलें !
दावा विक्रम बुद्धिचा अपुलिया, कीं अल्पकालांतरीं
व्हावी गीत जगांत हिंदजननी सानंद तारस्वरीं !

## माझें दिव्य !

किती केला उपहास बांधवांनीं,
आडनिंदा ऐकिली किती कानीं;
किती अप्रार्थित बोधवृष्टि झाली,
बसुनि परभारें कींव कुणीं केली !

दिला फेकुनि संसारपाश दूर,
म्हणुनि नाकें मुरडिलीं कुणीं फार,
कुणीं हेळुनि मजकडे बोट केलें,
म्हणति याला व्यवहार तुच्छ झाले !

बघुनि तारा हा दिवा दूर ठेवी
म्हणुनि सर्वत्रहि हेळणाच व्हावी !
होय चर्चा–हा फूल गुलाबाचें
बघुनि फेकी दूर हो बाभळीचें !

'क्षुद्र मानव, ठेविलें जसें देवें
तसें त्यानें हर्षांत कीं रहावें;
ईशनियमा हा जुमानीत नाहीं !'
म्हणुनि कोणीं पसरिली जगीं द्वाही !

म्हणो कांहीं जग, किती करो निंदा,
असे दिव्या ! मी तुझा दासबंदा.
तुझी प्राप्ती होणार जों न मातें
वेड माझें कोठून जावया तें !

मिळो कोंडा भाकरी खाउनी ती
जीविता जन सामान्य घालवीती;
रुचे न मला तें, सुधास्वादनाला
जीव वेडा होऊन असे गेला !

मिळो मेघाचें विमल रुचिर तोय,
नको पंकिल ! त्याहुनी पडो काय !
चातकाचा प्रख्यात असा बाणा,
वंद्य मजला तो, गमो कसा कोणा !

सुखें हलकीं फेकीन दुरि भिकार
त्यजुनि तुज मी मागें न परतणार !
तुझा दिव्या जरि लाभ नाहीं झाला
न तरि भुलणार क्षुद्र सौख्यजाला !

## कशास हंससी वृथा !

कशास हंससी वृथा ! हंसुनि लाभ तो कोणता ?
कधीं फिरुनि मन्मुखीं नच दिसेल तूतें हंसें !
कशास रडसी वृथा ! रडुनि काय होणार तें ?
समार्द्र न मदीय हें हृदय व्हावयाचें कधीं !

विचार हृदयांत या असति कोणते सांप्रत
कितीहि झटलीस तूं तरि न होतिल ज्ञात ते !
नसे प्रणय त्या स्थलीं, नच तिरस्कृतीही मुळीं,
उदास नच जाहलों वरुनि तीव्र वैराग्यही !

मला सकल वस्तु या दिसति संप्रती नीरस,
कुठेंहि लव चारुता न वसते असें वाटतें !
कशास बघसी अशी निरखुनी पुन्हांही मला !
नसे दिसत रम्यता तव सुलोचनीं लेशही !

असे ठरुनि राहिलें तृणहि येथ माझें नसे,
असेंच जगिं एकलें वसुनि कंठणें जीवित.
समुत्सुक बघूनियां तुजासि सांग होऊं कसा ?
उगाच भलता मनीं धरुनि हेतु का फायदा ?

## प्रार्थना

जय जय गुणनिलय सदय सकलभुवन नाथा !
दासी ही तव पदयुगिं करित विनत माथा !

स्मरुनि तुझे अमल चरण
रिघती जे तुजासि शरण
त्वरित करिसि तदुद्धरण
तूं मंगलदाता !

मरणभीति हरण करुनि पुससि अशुभ वार्ता !

संसारीं सुगति चरम
साधनही तूंच परम
मन घे तव पदिं उपरम
तूंच एक पाता !

बघुनि पापरत न परत मोकली न आर्ता !

मंगलनिधि तूंच एक !
गुणनिधान तूंच एक !
करिं मजवरि शांतिसेक,
विनति हीच आतां !
तव पदास आपदा न शिवति कदा दांता !

## माझ्या भगिनीला

असे सिंधूदरिं रम्य रत्नराजी,
दिव्य तारा चमकती नभामाजी,
आणि माझ्या हृदयांत अहोरात्र
विलसताहे निर्मल प्रीति मात्र !

असे विस्तृत बहु सिंधु, गगनही हें
हृदय विस्तृत मम तयांहुनी आहे !
आणि रत्नें वा तारकांहिहून
प्रेम माझें तेजस्वि असे जाण !

अशा प्रेमानें पूर्ण हृदय माझें
तुझ्यासाठीं ठेविलें मोकळें जें
तेथ ये ये धांवून शीघ्र ताई
मला सुखवुनि जगिं तूंहि धन्य होई !

## वर्षादिन

गेलें मेघीं गगन भरुनी वाहतो गार वारा,
झालें सारें जलमय जगत् वर्षती तीव्र गारा,
झाडें वेली थरथर किती कांपती दीन वाणी
आनंदाचा लवहि न दिसे कोठल्याही ठिकाणीं !

आहे आयू तिमिरपटलीं झांकलें आपलेंही
उष्णाश्रूंच्या प्रबल सरिता, धांवती, खंड नाहीं !

जाती आशा चिरडुनि, किती बोचती तीव्र कांटे,
फाटे त्यानें हृदय, जडसा प्राणही हाय ! वाटे !
हो हो ताई ! स्थिर परि दुरी खेद टाकून सारा
मेघांमागें तपन विलसे वर्षि जो कांतिधारा !
जाणें चित्तीं नियति अपुली होय सर्वांसमान,
पर्जन्याचा समय सकलां एकदां येत जाण !

## सदाफुला !

सदाफुली ही सदाफुली !
केव्हांही ही फुललेली !
भाग्यवती ही, फुलें हिचीं
सोडुनि न कधीं जायाचीं !
असो हिंवाळा
असो उन्हाळा
सर्वहि काळां
नव्या फुलांनीं नटलेली
न कधीं ही भलती दिसली !

कविता ! कसची तूं कपिता !
मूर्तिमंत वा निर्दयता !
स्थिरता नाहीं, क्षणक्षणीं
पालट दिसतो तुझ्या मनीं !
आतां हंसाशिल
पळांत रुसाशिल
दडून बसाशिल
धावुनिही रानोरानीं
न दिसायाची तूं नयनीं !

वसंत आहे तोंवरि या
कोकिलांस येतें गाया !
नंतर त्या ज्या जातात
न मुख पुन्हां दाखवितात !
'शितें तंवर तीं
भुतें भोंवतीं !'
खरीच म्हण ती !
कविते ! असाशिल तूंहि तशी
कल्पना हि नव्हती मजसी !

खोटेपण तव निर्झर हा
दाखवीतसे स्पष्ट पहा !
वर्षाकाळीं वाहे तो
उन्हाळ्यांत आटुनि जातो !
सुखमय काळीं
होतिस आली;
आतां झुकली
अससी कोठें तूं चपले
शोधुनि तुज मानस दमलें !

## तारका

पातली यामिनी, चंद्रही लोपला;
अंधकारें महीप्रांतही व्यापिला;
शोभते कोमला तारकांची द्युति
धीर ती देतसे खिन्न चित्ताप्रती !

प्रीतिच्या ज्योति या काय तेजाळल्या ?
स्वप्नदेवीच की मूर्त या पातल्या !

छे नव्हे ! अश्रु हे ताइचे माझिया
व्यक्त होती मला शांतिते द्यावया !

तारकांनो ! तुम्हीं धन्य आहां जगीं
पाहुनी हो तुम्हां स्तब्ध अल्पज्ञ-गी
हर्षपूरांतरीं मग्न होतें मन
अश्रुबिंदूंहिं हे दाटती लोचन !

खिन्न मी माझिया दुःखभारें बसे
अल्प उत्साहही मानसांतीं नसे
तारकांनो ! तदा या जना पाहुनी
नाचतां डोलतां सारख्या हांसुनी !

स्पर्शुनी स्वाकरीं यास गोंजारितां,
देविंनो ! आपला भावही दावितां,
त्यामुळें खिन्नता होउनीयां दुरी
जातसे कोंदुनी शांतता अंतरीं !

धीर देतां, नवी आसही निर्मितां
तुच्छ लेखावया संकटें बोधितां
दिव्य सौख्यच्छटा भोंवती फेंकितां
भासतां त्यामुळें या जना देवता !

अंतरीं माझिया अल्प कांती नसे,
कांति वर्षा तिथें स्वीय लीलारसें !
तीव्र निंदाविषें नीच विश्वांतलीं
आजवेरी किती या जनें साहिलीं !

शक्ति नाहीं पुन्हां ताप सोसावया
काकदृष्टी जनीं लेश नाहीं दया;

शुद्ध ते काळिमा फासुनी हांसती
निंद्य होते इथें जानकी हा ! सती !

त्यामुळें फार या खेद होतो मना,
यापुढें सोसवे न व्यथा दारुणा !
देवतांनो ! तुम्हां वंदितों आदरें
स्वच्छ आधीं करा पातकी अंतरें !

दर्पभारें सभामंडपीं गर्जती,
लेश नाहीं परी नीतितत्त्वीं रती !
कोळसे हे दुज्या काळिमा आणिती,
शुभ्र त्यांना करा प्रेरुनी स्वद्युती !

शून्य या अंबरीं तेज जें सांडतें
त्यास कांहींच का कार्य ना कोणतें ?
सौख्य यावें अम्हां, धन्य व्हावें तुम्हीं,
व्हावयाते झटा दीन-दुःखें कमी !

देवता नाम हें सार्थ होईलसें
कार्य कांहीं करा, अन्य यात्रा नसे;
व्याकुळ प्राण हा दुःखतापांतला,
विश्वसूनी तुम्हां कंटकीं झोंपला

## जर्मनीचा केसर

स्फोट ज्वालामुखीचा अवचित सगळा कांपवी भूमिभाग,
किंवा विद्युल्लता ही कडकड पडुनी भेदिते शैलतुंग;
तैशी क्रूरा ! कृती ही तव मज गमते, काय तूतें म्हणावें
रक्ताचे पूर साऱ्या महिवर भरले, केंवि ते विस्मरावे ?
झालीं उध्वस्त राष्ट्रें, अनलमुखिं किती लोपला द्रव्यराशी
जीवाचा नाश झाला अपरिमित नसे, स्वस्थताही कुणासी

बाळें, वृद्ध, स्त्रियाही कितितरी वधुनीं दुर्यशा जोडिलेंस,
नाहीं या घोर पापा खचितच समजें भूतलीं जोडि लेश !

हे ठाकले परि खला ! तुज आंग्ल दंडू,
ते निश्चयें शमवितीलचि युद्धकंडू;
आम्हीहि वीरजन भारतखंडवासी
होऊं सहाय तव दर्प हरावयासी !

शांती सर्व जगास जाण अधमा आम्हीच देऊं खरे,
दुष्टांना दिपवूं, दिसेल तुजला, या आर्य तेजोभरें !
बंधुप्रेम जगामधें पसरण्या आहोंत हिंदी जन,
होतां जागृत ते, कुठें नच कळे जाशील तूं लोपुन !

## काल चंचल आहे !

तळपे तेजें रवि गगनीं, पवनहि वितरी सौख्य जनीं
निरभ्र हें नीलाकाश आनंदवि किति नयनांस !
झाडा झाडावर गाणीं चालविलीं खगरायांनीं !
आम्रपल्लवीं दडलेला सांगे पिक-‘ माधव आला ! ’
नीलगगन हें पाझरलें दिसति तशीं सरितासलिलें !
फुलें ! फुलें इकडे तिकडे हास्यच भरले चहूंकडे !
पेहराव हिरवा छान घालुनि नटलें कीं रान
पुष्पांच्या मोहक माला दिल्या वसंतें वेलीला;
त्यानें त्या अल्लड पोरी डुलति नाचती परोपरी !
जुनें न दिसतें कोठेंही नटलें जग नव भूषांहीं !
कोमल पानें झुडपाला आंब्याला मोहर आला !
उत्सवांत गढलें सारें वाहे हर्षाचें वारें !

परंतु भगिनी खेदाची,- गोष्ट एक सांगायाची
कीं गेल्या वर्षीचें हें येथ दिसत घरटें आहे

मोकळेंच तें ! त्यामाजी एकहि खग नाहीं आजी !
प्रेमाचा आनंदाचा काल असे हा गे अमुचा !

रुसुनी बससी कां दूरी ? उत्सुकता तुडविसि सारी !
प्रेमाचा भर आलेला ढकलिसि कां वेडे त्याला ?
सुखकालीं सुख भोगावें हेंही का तुज शिकवावें ?
प्रेमाच्या वेळीं भलती रुसण्याची ही तव वृत्ति
प्रेमपर्व पाहुनि आलें सांग कुणी का दुरि बसलें ?
बघुनि रम्य रजनीकाळ हंसति उडु प्रेमें लोल !
पुरे पुरे हे तव रुसण नाहीं काळ स्थिर सुगुणे !
ठेवी दृढ हें ध्यानांत प्रेमाचा पाहिं न अंत

ताई हा सुखकर काल अवचित निघुनी जाईल !
कां कीं राज्य वसंताचें नाहीं स्थिर राहायाचें !
प्रेमाचा हा मधुमास असे लाभला अपुल्यास !
प्रेममधू मधुर प्राशूं हर्षभरें भगिनी हांसूं !

ऊठ, पुरे रुसणें आतां त्रासविसी कां मम चित्ता
कां न अदय काळें कथिलें कीं जें गेलें तें गेलें ?
सुखघटिका साधुनि घेई काय कथूं यात्रिण ताई !

## उत्कंठा

तूं येणार म्हणून यत्न करुनी बागेंतलीं सर्वही
पुष्पें सौरभशालि मीं जमवुनी हा हार कीं गुंफिला;
तो वाहून तुझ्या पदांवर, तुला गाऊन गीतावलि
प्राणांची—मनिं हेतु हा—तुजपुढें लावीन पंचारति !

हातीं हार तसाच, कोमुनि दळें त्याचीं गळूं लागलीं
आले पाय भरून, न क्षणभरीं आतां उभें राहवे

हा गेला दिन, अंबरीं हळुहळू आली तमाची छटा
यायाचा तरि तूं कधीं ? श्रमभरें दृष्टीस ये झांपडी !

## निराशा

होती भास तुझे, तुझेच दिसते सौंदर्य सर्व स्थलीं
होतो भ्रांत म्हणून मी अनुदिनीं चोहोंकडे धांवतो
कांट्यांना मृदु पुष्प मानुनि तया सानंद आलिंगितों,
देवा ! कोसळती म्हणून कितिदां आपत्तिराशी शिरीं !

नाना क्लेशभरें मदीय मन हें संत्रस्त होवोनिया
तूं आहेस कुठें असे तुजसि मी आर्तस्वरें बाहतों;
अंतीं कंठ सुकून विश्वजनका ! 'नाहीं'स तूं या जगीं.
ऐसा निश्चय मी करून बसतों ढाळीत दुःखाश्रुतें !

## एकदां हांस !

गांभीर्याचें बंड कशाला तुझ्याच वदनावरी ?
भगिनी ! हांस एकदां तरी !

विश्व नाचतें ! हांसहांसतें अल्लड बालापरी,
तूंच कां स्तब्ध बैससी परी ?

वळखळ धांवे ओढा तिकडे अफाट माळावरी,
पांखरें भिरभिरतीं अंबरीं;

पुष्पबालकां धरुनि कडेवर लता उपवनांतरीं
करिती क्रीडा नानापरी !

हे तारे व्योमीं रत झाले नर्तनीं,
नच शिणले वारे रात्रंदिन धांवुनि
वनदेवी बसल्या हांसत बघ सुमगणीं,

स्वैरसुखीं जग मग्न, तूंच मग किमर्थ वद सत्वरीं
धरिलें व्रत हें भलतें तरी ?

जायाचे हे आटुनि निर्झर सुकावयाचीं फुलें,
नर्तन स्मित तेव्हां कोठलें ?

वसंत नसती अनेक जीवनिं कोणाला लाधले,
पुढें दिन दुःखाचे पसरले !

पूर्णचंद्रिकाप्रकाश विरळा, कां त्यावर मंगले !
निबिड तम अवसेचें पसरलें ?

दे फेकुनि सत्वर भलती गंभीरता,
हो विश्वासह या सुखोत्सवीं तूं रता;
तो प्रसन्न होइल जाण जगाचा पिता !

विश्व गायनोत्सव चाले हा, किमर्थ मग तेथले
आपलें स्थान रिक्त ठेविलें ?

## वसंतास

होवोनी हिमसेक वृक्षलतिका निष्पर्ण झाल्या वनीं,
गेली ध्वंसुनि पुष्पसृष्टि सगळी, कोठें न गीत ध्वनि;
ऐसें ऐकुनि वृत्त, माधव मनीं भारीच खेदावला,
सोडोनी गति आपली सुललिता कोणांतरीं बैसला !

ये ये शीघ्र वसंतराज ! भलती शंका न ऐशी धरीं,
तूं नाहींस इथें म्हणूनच दिसे औदास्य दारीं घरीं,
तूं येतां चरणप्रभा पसरतां मित्रा ! तुझी भूवरी
सारी सृष्टि दिसेल रम्य मधुरा नव्यांगनेच्या परी !

पर्णी कोमल रुक्ष वृक्ष सगळे जातील आच्छादुनी,
गंधाचे उडतील झोत विपिनीं उत्फुल्ल पुष्पांतुनी;

भृंगांचे झडतील गोड जलसे, आनंद सर्व स्थलीं,
ही हास्योत्सवमग्न होइल तदा माझीहि चेतःकली !

## विकास

प्रसन्न उदयाचलीं अरुणराग विस्तारला,
विहंग कलकूजितें गगनभागही कोंदला;
तुझ्या चरणपूजना उचित काल हा जाणुनी
सुगंध कुसुमावली विपिनिं राहिली हांसुनी !

न रम्य दलभार वा मधुर गंधही, हें खरें;
मनांत झुरलें किती विपिनपुष्प तें लाजरें !
परंतु चरणीं तुझ्या पडुनि शोषुनी जावया,
हंसून तुज तें स्तवी त्यजुनि लोकनिंदाभया !

'न बाह्य गुण संपदा भुलवि तूझिया मानसा,'
तुझें बिरुद थोर हें खचित आज लागे कसा
विलंब न करी, करीं खुडुनि घे तया सत्वरी
गळेल न कळे क्षणीं सुकुनि रुक्ष धूलीवरी !

## मधमाशी

रत्नें ज्यांवर झगमगती
पंख असे हलवीत
नाचत डोलत मधमाशी
तरंगते गगनांत
मधमाशी गे थांब जरा
सांग मला हळुवार,
पंख असे जडले रत्नीं
मला कधीं मिळणार ?

भिऊं नको, त्यीं फुलबागां
तुझ्या तुला लखलाभ !
नकोत मंजिली आवडतीं
कमळें तेवि नीलाभ !
पंख असे हे मज मिळतां
सांग कुठें जाईन ?–
भरभर उडुनी तुझ्यापरी
रत कोठें होईन ?
गुलाब पुष्पें असोत ती
नको जुई गुलजार
धिक्कार असल्या जड सौख्या
नाहीं मी भुलणार !
फुलराणी मम हृदयाची
जाइन धांवत तेथ,
अधर दलावर गुंजावें
हाच जिवाचा हेत !

## मूर्तिकार आणि प्रीतिदेवता

वर्षें, मास, असे कितीक सरले कंटाळवाणे दिन,
होता यत्न करीत मूर्तिकर तो पाषाणखंडावरी;
टाकी लावुनि सारखी रचियला बाजूस त्यानें चुरा,
ये आकार न लेशही, दिसत तो पाषाण होता तसा.
आली हांसत मंद एक रमणी लीलावती त्याकडे
" थोडा यत्न करून मीहि बघतें मूर्तीवरी या, " वदे;
झाला बाजुस मूर्तिकार कुतुकें टाकी धरी ती करीं
तों आश्चर्य ! पळांत मूर्ति बनली सौंदर्यसोराज्वला !

तेजाचा रमणीय झोत उसळे नेत्रांतुनी भोंवती,
गेली सर्व मुखावरी पसरुनी रम्य स्मिताची छटा;
झाले व्यक्त सुगोल बाहु, दिसल्या पादांगुलीं कोमला,
अज्ञातामधुनी जणों प्रगटली प्रत्यक्ष ही देवता !

टाकी ठेवुनि सुंदरी वळुनियां ती मूर्तिकारा वदे,
" पाही मूर्तिकडे क्षणैक, दिसतें कांहीं उणें का तुला ?
जाते मी, पण जाण अंतरिं बरें मी प्रीतिदेवी असे,
माते चिंतुनि मूर्तिकार, सुकवी संपादिती सद्यश ! "

## एका अज्ञात पाखरास

गेलेला रवि कालचा क्षणभरें येईल पूर्वाचलीं
जागा होउनिया विहंगगणही गाईल गीतावली
झाडें डोंगर आणि कुंज सगळे जातील नादावुनी
रानें होतिल थक्क, चंचल तळीं होतील कंपाकुल !

पंखांचा ध्वनि ऐकुनी प्रतिदिनीं मी झोंपही सोडुनी
पाहें व्योमतलीं प्रभातसमयीं आशाळभूतापरी;
पाकोळ्या, वडवाघुळें भटकतां पाहून चोहोंकडे
होतों खिन्न, विहंगराज मम तो भेटेल केव्हां मला ?

गावोनी पिक पंचमांत भरतो, रानें वसंतामधें,
जाते आम्र मनीं भरून पडतां तन्नाद कानावरी !
देवोनी मजला तुझी स्मृति अहा तो आपल्या गायनें !
माझे नेत्र खरेंच रे खगवरा ! उष्णाश्रुपूरें भरी !

गोडी कांयें मला तुझ्याविण बरें वाटेल गीतामधें !
तीं वासंतिक वैभवेंहि मजला होतील कैशीं प्रिय
सौख्याची किरणच्छटा पसरुनी अल्पावधी सुंदरा !
दुःखाच क्षण हे मदीय मजला होतात भेसूरसे

ये मित्रा, झणिं ये, अपार्थिव असा संदेश घेऊनिय,
नाहीं का तुज ईश्वरेंच गणिलें स्वर्गीय दूतांमधें ?
लाभावा जड या जगांत सखया दिव्यांश थोडा तरी
आहें मी बसलों धरून दृढ हा हेतू न ठावें तुला ?

## निजूं दे स्वस्थपणें आतां !

लागले मिटाया डोळे निजूं दे स्वस्थपणें आतां !
किति शीण पहा मज आला, सर्वही पांगुळलीं गात्रें !
संपला दिवस जाइल हा दिवाकर अस्ता क्षणमात्रें !
अंकावर तुझिया पडतों अश्रु पण आवर हे आई !
या तुझिया सुसकाऱ्यांनीं झोंप मज येत गडे नाहीं !
वाजते बघ किती थंडी पसरला अंधकार भंवतीं;
पण मिटतां डोळे, दिसते एक मज तेजस्वी मूर्ती !
हें ऐक ! ऐक संगीत चहुंकडे घुमती स्वरलहरी !
फुलमाळ गळ्यांतिल त्याच्या कसा बघ मधुरगंध पसरी !
पण किती होय जड माथा, निजूं दे स्वस्थपणें आतां !

किति गोड ! गोड हें गाणें कां न ये ऐकूं तें तुजला ?
मिळतात अशीं स्वर्गांत गायनें ऐकाया सकलां !
हा देवदूत फुलमाळा घेउनी आला बघ आई !
खुणवितो मला, तो इच्छी मजसवें बोलाया कांहीं !
हांसतो हळुच कुजबुजतो, कुणाही पाहि न मजवीण,
किति तेज बघ तरी त्याचें ! असे हा सांग तरी कोण ?
झगमगे मुगुट किति त्याचा ! मलाही मिळेल का असला ?
तो म्हणतो ‘ आपण देतों ’ जाउं का आई घ्यायाला ?
पण किती होय तनु गलिता ! निजूं दे स्वस्थपणें आतां !

हें काय गडे! मज ऐशी मारिसी घट्ट मिठी सांग?
कां सुसकारे? कां अश्रू? कां तुझें कांपतसे अंग?
लागती गार किति गाल, क्षणभरें भारिच धगधगती!
मज बघसि अशी निरखून घेउनी काय बरें चित्तीं?
तूं माझी—माझिच आई! रडुं नको, पूस बघूं डोळे!
बघ तिकडे, झाली सारी घाबरीं तीं चिमणीं बाळें!
अगदीं न बोलवे मजला, जीभ कां न कळे उचलेना;
पण नको काळजी; निजवी घेउनी देवदूत ताना!
फिरविं तूंहि तनुवरि हाता, निजूं दे स्वस्थपणें आतां!

## फूल आणि थडगें

थडगें—

ढाळी तुजवरी प्रशांत समयीं जे अश्रु ज्योतिष्मती
त्याचें तूं करितेंस काय कुसुमा? सांगे मला सत्वरी

फूल—

मित्रा सांग! तुझ्याहि कुक्षिकुहरीं जे जीव संवेशती
त्यांचें तूं करितेंस काय न कळे अद्याप मातें तरी!
अश्रूंचें रमणीय अत्तर नवें मी निर्मितें कौशलें
त्यानें नादवतो प्रभातसमयीं सर्वत्र गुंजाध्वनि!

थडगें—

माझ्याही उदरामधें अजवरी जे जीव बा पातले
त्यांचे मी करि देवदूत, सकलां ही गोष्ट आहे जुनी!

## जादूगारीण

वद जादुगारिणी तेव्हां मारिलीस फुंकर कसली?

ओसाड माळ हा सारा    पुष्पांनीं भरुनी गेला !
या रुक्ष टेकड्यांवरतीं    सर्वत्र दिव्यरस भरला !
हे साधे फत्तर परि या    गीतांचा पाझर फुटला !
जळलेल्या आशावेली
त्यांवर नव पुष्पें फुललीं !
सुकलेलीं झाडें हंसलीं !
चिंतांचा सरुनी काळ    भरलें स्मित रानोमाळ !

लाजरीं वन्य कुसुमें जीं    खबदडींत फुलुनी सुकलीं,
शब्दही मुखांतुनि ज्यांना    काढाया छाति न झाली,
त्यांनींच गाउनी वसुधा    फेकिली जणों आंदोलीं !
जड नीरस माझीं गानें
भरुनियां नवोत्साहानें
कोंदिलीं तयांनीं गगनें !
हा प्रभाव गे कोणाचा    तुजवांचुनि वद इतरांचा !

प्रत्येक दगड काव्यानें    या माळावरला भरला !
अणुरेणु मुके बसलेले    लागले पहा गायाला !
संगीततरंगीं त्यांच्या    विसरलों बाह्य जगताला !
रविकरस्पर्श होतांच
रत्नापरि चमके काच
तव दृष्टि तेवि पडतांच—
स्वर्गच जड जग हें झालें ! हीं त्वदीय मोहन जालें !

पण हाय ! लपुनि बसलीस    रुसवा कीं राग धरून,
स्थिति सर्व एकदम गेली    बदलुनियां तैंपासून !
अस्तास दिनश्री जातां    किति दिसतें विश्व भयाण !
गानोत्सव सरला आतां,

प्रेमाच्या नुरल्या वार्ता,
जाहली सृष्टि शोकार्ता !
गीत हें ! गीत पण कसलें ? हें शोकक्रंदन उसळे !

## नुकत्याच फुललेल्या फुलास—

झाला पूर्ण विकास, गंध अगदीं धांवोनिया चालला
ये वाहून मरंद, पुष्प अपुली पूर्ण स्थिती पावलें;
आले धांवत गात भृंग फिरते ताज्या फुलाभोंवते,
दैवीं काय तुझ्या परंतु कुसुमा ! आहे, मला ना कळे !

पुष्पा ! नेइल वात गंध तव हा वाहून कोठें तरी,
भृंगे प्राशुनि टाकितील मधुही वाखाणुनी कौतुकें !
हें सौंदर्य विलोपुनी रविकरस्पर्शें क्षणाभीतरी
अंतीं धलिंत लोळशील सखया हें नीट ठेवी मनीं !

कांहीं बैसति अंगनालकिं सुखें पुष्पें विलासप्रिय,
कांहीं चंचल कीर्तिलोलुप फुलें जाती कवींच्या करीं,
सारोनी पण मोह अन्य सगळे बाजूस, कीं भक्तिनें
एकादें सुम ईशपादिं रतुनी निर्माल्य होतें जगीं !

## मधुमालती.

नसे सुंदरता अल्प तुझ्या ठायीं,
भडक रंगहि कसलाच जवळ नाहीं;
काय मार्दव हें ! दळें सुकायाचीं
श्वासवायुहि सहज त्यां लागतांची

तरी मधुमालति ! तुझ्यावरी गेलें
चित्त जडनी तेथेंच बद्ध झालें !

तुझा परिमळ हा मधुर मधुर भारी
वेड लावुनि हरि रसिक मनें सारीं !

दुजीं थोडीं नाहींत फुलें येथें,
परी तिकडे क्षणक्षरहि मन न जातें;
येथ कांहीं त्या तिथें दिसे कांहीं
मनाऐसें आढळत कुठें नाहीं !

गुलाबाला कांटेच कां असावे ?
सर्प भरुनी केतकीवरी जावें ?
नको चांफा तो उग्र गंध त्याचा
डामडौलच तो वरुनि बघायाचा !

गर्व नाहीं तुज, दुष्टसंग नाहीं,
स्वभावांतहि कांहीं न दोष राही;
जशी सत्कुलबालिका नम्र वागे,
तशी दिससी तूं विनयशालिनी गे !

नसे कांहीं गुण परी दंभ मोठा,
क्षुद्र विभवेंही भरे अम्हां ताठा !
करुनि शेणाचीं पांखरें सुरेख
विकायाला बैसतों अम्ही देख

गंध तव हा भुलवील सुरेंद्राला,
परी नाहीं तुज गर्व कधीं झाला !
मृदुलताही अपुली न सोडिलीस,
व्यक्त मनिंची थोरवी दाविलीस !

गर्व सारा सोडून नम्रभावें
काव्यगानीं मी तुला संस्तवावें

गुणोच्चारण तव करुनि पुष्पदेवी
आज वाणी मी शुद्धही करावी !
तुझ्या गंधाचा अंश जरी आला
रुक्ष माझ्या शब्दांत एक वेळां
तरी सारेंही विश्व मोहवून
करिन निःसंशय तुझ्यापुढें लीन !

## नाहींच कधीं गाणार.

नाहीं कधीं गाणार ! हा आतां निश्चय केला !
नक्षत्रें मग हीं गगनीं व्यर्थ कां अशीं चमचमती ?
कां दडुनी पानाआड लाजुनी फुलें ही हंसती ?
कां फेकित मंजुळ सूर पांखरें नभीं भिराभिरती !
भ्रूभंग करिति कां यमुना
थबकली विसरुनी गमना ?
जाहलें काय सर्वांना ?
मोडवा निश्चय माझा दिसतें हा बेतच झाला !
उसळल्या ऊर्मि गानाच्या ! त्या दाबुनि टाकिन आंत !
मुरवीन जेथल्या तेथें काव्याचे ताजे झोत !
न मुखांतुनि शब्दहि यावा हा उत्कट आहे हेत !
कां कीं अजवरचीं गाणीं
अवहेलनिं गेलीं जळुनी !
ही राख पसरली अजुनी !
टाकिली फोडुनी वीणा घे मुजरा हा शेवटला !

## निराश राधा

विसरावें म्हणतें तुजला पण अजुनी तें साधेना !
या संसाराच्या ज्वाला त्या मलयवातशा गणिल्या !

किति आशा जळुनी गेल्या, धैर्यानें त्या अवगणिल्या !
नर्मोक्ति भेदितां हृदया गीतापरि त्या आदरिल्या !
पण दिसतां यमुनातीर
सर्वही सुटोनी धीर
बेफाम हृदय हो स्वैर,
निरुपाय जाहला देवा ! स्थिर कुठेंहि तें होईना !

ते दिवस सुखाचे नुसते एकांतिं बसुनि चिंतावे;
दिसतां न कुणा, बाजूला जाऊन अश्रु ढाळावे;
हृदयींची खळबळ सारी दाबुनी वरुनि हांसावें;
तूं कलिजा माझा असुनी
तुज बघतांहि न ये दुरुनी !
दुर्विधीची दारुण करणी !
मी तुझीच असुनी कृष्णा ! जाहलें आज परकी ना ?

गेलास निघुनि मथुरेला ठेविलीस मजला मागें;
सांग कां खरें मानूं मी जें बोललास अनुरागें ?
तटतटा तुटोनी गेले प्रेमाचे नाजुक धागे !
वाटतें लाज कां माझी ?
कीं होय तरी इतराजी ?
कीं गढुनी दुसऱ्या काजीं—
विसरलास बाळसखीला ? हें तुला बरें दिसलें ना ?

कीं कार्य घेतलें मोठें, होईल अडथळा राधा
ही असली भलती देवा ! झाली कां शंकाबाधा ?
ही नुसती कावेबाजी होतास पूर्वं तर साधा !
मन माझें अजुनि तुलाही
समजलेंच कृष्णा नाहीं !

दुःशंका भलती कां ही ?

तव राजविलासासाठीं तळमळे काय ही दीना ?

म्हणतील काय जन सारे वाटते अशी कां भीति ?
पण आजवरी ही वृत्ति कोठेंशी लपली होती ?
कां साग तुझ्या प्रेमाचा लाविलास चटका चित्तीं ?
संसारावरुनी गेलें
मन उडुनी भरकटलेलें,
अनुदिन तव चरणीं रतलें !
बेपरवा कां ही आतां ! हें सांग तुला शोभे ना ?

कर्तव्यें तुजसिच असती, मी झुरते विभवासाठीं !
कुलगौरव तुजला आहे, दुर्यशच मला आवडतें !
तूं नीतीचा आधार, मजला ती कसली रुचते ?
तूं वागणार थोरांत,
मी वनचर गोपाळांत
किति अंतर हें दोघांत
धिक्कार तुला कीं मजला तें तूंचें हरी सांगे नां ?

## अकाल वीणावादन

कशाला वेडे, वाजविशी आतां वीणां ?

अकाल वादळ सुटुनि भोंवती
पिसाटापरी वारे घुमती
लोट धुळीचे गगनीं चढती,
नाचुनी स्वैर कडकडे वरी बिजली ना ?

बापुडवाणीं झाडें वेली
चकित होउनी तटस्थ ठेली

क्षणांत पण भूवरि कोसळली !
स्मशानीं चाले, भूतांचा बघ धिंगाणा !

विहरावीं जीं देवशिरावर
फुलें पसरलीं तीं धरणीवर,
टपटप ढाळी अश्रू अंबर
नुरे लव वांछा तव गानसुधारसपाना !

थांब, जगीं हा प्रळय माजला,
प्रेमकथा कां उचित आजला ?
जगासवें चल ढाळुं दृग्जला,
भक्तिभावानें प्रार्थूं त्या राधारमणा !

## राजापुरची गंगा.

होते फत्तर भोंवती पसरले, निष्पर्ण वृक्षावली,
साधीं हीं गवतें कुठें न उरलीं तेथें फुलें कोठलीं ?
मेघाचा ठिपकाहि अंबरपटीं ना लोचना मोहवी,
गेली होरपळून सृष्टि सगळी जैशीं अरण्यें दवीं !

संपोना जलसैकतांहि भरलीं पात्रें नद्यांचीं किती
तेथें निर्झरिणी किती हरपल्या नाहीं तयांना मिती
झालें विश्व निराश, जीवकुल हो संदग्ध चिंतानलीं
तों गंगे ! सलिलें तुझीं उसळुनि सर्व स्थळीं धांवलीं !

जेव्हां अंबुद वर्षतील अथवा होतील अद्रि द्रुत
तेव्हां लौकिक निम्नगा चहुंकडे जातील फोफावत;
देवी ! ओघ तुझा विसंबुनि कधीं राहे न अन्यावरी
त्याचा होय कसा समुद्भव, कळे कोणा न हें भूवरीं
व्हावी स्फूर्ति अशी ! मला कधिं तरी ती सांग लाभेल ना ?
काव्यानंदरसांत मग्न चपले ! हा जीव होईल ना ?

याला पाहुनि हांस, तीजवरुनी गा गायनें लोभुनी
ही वृत्ती हरपून पार्थिव, कधीं लाभेल ती उन्मनी ?

श्याम व्योम परंतु त्यांत भरती तेजस्विनी तारका
कांटेऱ्या झुडपी फुलें उमलतीं जी निर्मिती कौतुका;
तैशी जी स्वयमेव संभवित हो, लेखी न बाह्य स्थिति
काव्योद्घोषकरी खरी कविमती प्रज्ञान्विता एक ती !

माझी होइल काय पूर्ण अमकी आशा, जिच्या संभवें
काव्याचे रमणीय निर्मिन यशःस्तंभ प्रयत्नें नवे;
ऐसें आजवरी म्हणून कितिदां सोन्माद वेड्यापरी
हा ! हा ! पावनि ! घातला अनुदिनीं हा जीव कांट्यांवरी !

मातीचे कर लावुनी नच कुणा समशेर ये पेलितां
गेलें हें ठसुनी हृदंतरीं, तुझा तोयौघ हा पाहतां
आत्मस्फूर्त अशी सदा उसळती प्रज्ञा मिळावी मला
जीचा प्रेरक सर्वमंगलनिधी विश्वेश तो एकला !

## काय बरें झालें ?

वनराणीपरि असावयाची हिंडत शेतांतुनि,
अशी कां खिन्न आज साजणी ?

हलुनि गव्हाच्या पिवळया लोंब्या हळूच वाऱ्यावरी
मजा ती कशी दिसे बघ तरी !

नदीकांठच्या शेतामधुनी 'राया' चाले कसा
मानकरि काय कोठला जसा !

बघ तिकडे ' पवळी ' रवथ करित राहिली,
बघ तिकडे करडें कशीं नाचनाचलीं !
तूं मात्र इथें आहेस उगी बैसली !

पण हा मोत्या पहा तर खरा गेला भांबावुनी
ऊठ ना खिन्नपणा सोडुनी !
हा डोंगर ठाकला, वाहतो ओढा दुसरीकडे
शेत हें तुझेंच हो ना गडे ?
तुझ्या हातचा चारा खाया उतावीळ पाडसें
मुलें हीं तुझीं न का राजसे ?
या शेतामधलीं झाडें, पानें, फुलें,
हें असो, प्राणही तुजला मीं वाहिले !
तूं राणी, कांहीं उणें न तुज ठेविलें !
कां ग मंजुळे ! मग मज बघतां खुदकन् ना हांससी,
चूक तरि काय जाहली अशी ?

## दवाच आवडतें फूल !

" झालें दर्शन पूर्वपुण्य फळुनी कृष्णा, तुझें ज्या दिनीं
त्याची संतत गोड आठवण ती माझ्या रहावी मनीं—
या कामें प्रिय जीं तुला जमवुनी तीं तीं प्रयत्नें फुलें
पूजावें प्रतिवत्सरीं तव पदा चित्तीं असें कल्पिलें !

ऐसें बोलुनि राधिका लगबगा सारीं वनें हिंडुनी
नाना चित्रविचित्र गंधित अशीं आली फुलें घेउनी;
क्षाळोनी यमुनाजलें निज करीं वंदोनि अत्यादरीं
वाही नंतर एकएक सुमती श्रीकृष्णपादांवरी

झाली जाइ, जुई, गुलाब, दवणा, शेवंतिका मोगरी,
जास्वंदी, मधुमालती, न उरलीं पानेंहि पात्रांतरीं;
झाला कृष्ण परी प्रसन्न न, बसे गंभीर, हांसेच ना,
" राधे, चोरुनि ठेविलीस कुसुमें, देणार तीं ग कुणा ? "

पाहे भोंवति भाबडी, हरिकडे पाही पुन्हां कातरा,
झाली व्याकुळ बापुडी ! थरथरा कांपे कुशंकातुरा !
अंतीं होउनिया हताश अगदीं दुःखाकुला गोमटी
अश्रू वर्षित सारखी हरिपदीं धांवोनि घाली मिठी !
बोले श्रीहरि राधिकेस हंसुनी " हीं-हींच तीं गे फुलें
यांची सुंदरता बघून सखये ! हें चित्त वेडावलें !
तीं कोणास फुलें हवींत-भरती जीं नित्य रानीं वनीं
हीं पुष्पें मज वाटती पिय, न हें ठावें तुला साजणी ?

## प्रेमभंग !

आवडली ना तुला सुंदरी ! ही असली रीती ?
आजवरींची लटकी झाली ना सगळी प्रीती ?
खोटें हंसणें, खोटें रुसणें, खोट्या प्रेमकथा !
खोटे अश्रू ! तरिहि वाटसी तूं अजुनी ललिता !
अगाराची वृष्टी केलिस माझ्या सुखसदनीं,
कल्याणाचि तरि तुझें चिंतितों सखये ! रात्रंदिनीं.
तूं वाग म्हाला रुचेल तुझिया जसें-सुंदरी !
होवोत माझिया सौख्याचे कोळसे-सुंदरी !
कांहींच तयाचा दोष तुजवरी नसे-सुंदरी !
हे दैवाचे खेळ ! बुद्धि तव याचमुळें चळली !
धरीं शिरीं हर तरी जान्हवी नाहीं का ढळली ?
स्त्रीजाती ही प्रीतिरसाची मदतेची खाण !
अनुभवुनी हें, गीतें गाउनि तोषविला प्राण !
कल्पनाहि मज नव्हती कीं तूं होशिल बेमान !
विसरुनि गालस मला निष्ठुरे ! वाहुनिही आण !
आधींच कशाला प्रमबीज रोपिलें ? चंचले !
तरु झाला प्राशुनि उत्साहाचीं जलें-चंचलें !
यायाचीं त्याला आतां पुष्पें फलें -चंचले !

तोंच घातली कुऱ्हाड, उमलुनि पाडिलास खालीं,
झाली तिकडे प्रीति शरमुनी बघ अर्धीमेली !

## अजुनि चालतोंचि वाट

अजुनि चालतोंचि वाट ! माळ हा सरेना !
विश्रान्तिस्थल केव्हां यायचें कळेना !

त्राण न देहांत लेश, पाय टाकवेना,
गरगर शिर फिरत अजी होय पुरी दैना !
सुखकर संदेश अमित पोंचविले कोणा,
भार वाहुनी परार्थ जाहलों दिवाणा !
कांट्यांवरि घातलाचि जीव तयासाठीं,
हंसवाया ग्या केली किति आटाआटी !
हेंच खास माझें घर म्हणुनि शीण केला,
उमगुनि मग चूक किती अश्रुसेक झाला;
दिन गेले, मास तसे वत्सरोंहि गेलीं,
निकट वाटतें जीवनसंध्या ही आली !
कुठुनि निघालों, कोठें जायचें न ठावें,
मार्गांतच काय सकळ आयु सरुनि जावें !
काय निरुद्देश सर्व जीवन मम होतें
मरुसरितेपरि अवचित झरुनि जायचें तें ?
पुरे ! पुरे ही असली मुशाफरी आतां,
या धूळिंत दगडावर टेकलाच माथा ?

## द्रौपदी.

होता भीम बलाढ्य मूक बसला झाली गदा निष्फला !
होता अर्जुनही निमूट, हरली शस्त्रास्त्रविद्याकला !

ज्ञानाचा निधि आणि सागर दुजा जो विक्रमाचा महा
तोही कौरववंशभूषण वदे कांहीं न कैसें अहा ?

केलें क्रंदन दीर्घ तूं फुकट तें गेलें जरी द्रौपदी
भीष्माचीहि गिरा जरी न तुज ये रक्षावया संसदी,
धर्मानें जरि तूं गुलाम ठरली होतीस, देवी तरी
त्या धर्मा जमिनींत गाडुनि सुटे उद्दाम मद्वैखरीः—

जी नीती तुजला विवस्त्र करण्या थोडी न संकोचते
पण्यस्त्रीगणिं तूज शुद्धचरिते ! निःशंक जी लोटते
धिक्! धिक्! नीतिस त्या कशास असलीं शास्त्रें तरी जन्मलीं ?
कीं जीं शील अनाथ पुण्यसतिचें रक्षावया लाजलीं.

ओढावें तव मुक्तकेश धरुनी दुःशासनानें तुला,
नाहीं राजसभेंत हाय ! पण गे कोणी तया बोलला !
त्या नीचास परंतु बोल कसला ? ज्या भ्रांत धर्मामुळें
होती दुष्ट असे प्रमत्त, सुगुणे ! त्या पाहिजे निंदिलें !

ईशें धर्म दिला अम्हांस म्हणती निःश्रेयसाकारणें,
बाई ! त्याचमुळेंच लागतिल कीं आतां किती लांछनें !
बा भीष्मा ! तव जागरूक सुमती सांगे तुला हेंच कां ?
कीं होऊन सभेंत ही विवसना व्हावीं सुखें निंदकां ?

लक्षोनी परमार्थ मंगल, सती पत्नीपदा स्वीकरी
तें कर्तव्य सदैव, थोर म्हणती, आहे पतीच्या वरी;
तें सोडून जिला नृशंस—शुनकीं जो द्यूतकाराग्रणी
देई सोडुनि त्या नराप्रति पती कैसें म्हणावें जनीं ?

जावो वैभव सर्व, कंटकवनीं लागो सुखें जावया,
जागा आप्तजनांत मान वरती नाहींच काढावया,

तें सारेंहि खपेल, वस्त्र धरलें दुःशासनानें यदा
धर्माची पतिची खरेंच सरली संभावना गे तदा !

धर्मन्यायसुनीतिची जगभरी भेसूर भूतें किती
तेव्हांपासुनि नाचतात अजुनी नाहीं तयांना मिती !
त्यांचें होउनिया निपातन कधीं स्वातंत्र्य लोकां मिळे
आत्मा खिन्न मदीय रात्रदिवशीं ऐशा विचारीं जळे !

## राजगीतिका

होता हेतु मनांत फार दिवसांपासून संगोपिला
व्हावा दर्शनलाभ पुण्यकर कीं केव्हां तरी आपला;
गेला सिद्धिस आज तो, प्रभुकृपा ही थोर वाटे मना
त्या हर्षीं न करील काव्यललना कां सारखी नर्तना ?

राजे आपण थोर सद्गुणनिधी, सामान्य मी पामर
व्हावें धृष्ट न, अंगिकारुनि सदा मौना वसावें दुर
हें कोणास गमो बरें, पण मला तो हीन वाटे पथ,
उच्चत्वींच सदैव वृत्ति नृपते ! होते कवींची रत.

पाहोनी रविराजया खगकुलें आलाप घेती नवे,
भेटाया जलधीस निर्झरजलें धांवोनि जाती जवें,
साधें अंबुज हास्य लास्य करितें देखोनि तारापती
प्रेमीं उत्कट भेदभाव सगळे राया, त्वरें लोपती !

शुद्ध प्रेम, उदात्त नीति अथवा सृष्टींतली चारुता
यांमाजीच पुरा मदीय कविता जी जाहलीसे रता
ती आजी गुणकीर्तनीं अपुलिया आकृष्ट झाली असे
ही सारी भवदीय कीर्तिमहती चित्तास वाटे असें.

आले सांगत थोर आजवर कीं ‘ राजा प्रजेचा पिता ’
वाटे सत्यच तें इथें, स्वसुतसें लोकांस संगोपितां.
व्हावे क्लेश कुणा न यास्तव सदा जी काळजी वाहतां
ती पाहून म्हणेल ‘ धन्य ’ न मुखें दुर्भाग्य तो कोणता ?

निष्ठा श्रीभगवंतकीर्तिकथनीं पाहोनिया आपली
भक्तिज्योति जनांतरीं, नवल का आहे, जरी चेतली ?
ईशाचा पटवावयास महिमा आबालवृद्धांप्रती
घेतां जे श्रम निश्चयें बघुनि ते तोषेल तो श्रीपती !

आहे ख्यात दृढ स्वधर्मनिरती लोकांतरीं आपली
तैशी ती अकलंक नीतिहि नसे कोणीं कधीं शंकिली;
भीतीनें नच भक्तिनेंच अपणां होतीं पथीं वंदनें
झालीं सद्गुणजालकीं अपुलिया आकृष्ट सारीं मनें !

नाहीं मी अपुली प्रजा तरि मला गावेंच वाटे असें
लाभे ज्यां अपुलें कृपामृत सदा होईल त्यांना कसें ?
जेथें दुर्मदमत्त यत्न करिती राजे प्रजाशोषणा
तेथें आज विशाल सैकतिं मणी आहांत तैसे जनां !

आहे ही विनती तुझ्या पदिं, करीं विश्वेश्वरा ! पूर्ण ती,
रक्षीं हा नृपती सदा तुजमुळें सारीं भयें लोपती;
किंवा सज्जनरक्षणीं रत सदा आहेस पद्मेक्षणा,
नेसी दूर, सुलक्षणा ! स्वकृपया वेगें महापत् क्षणां !

श्रीगंगाधर भूपाला ! आदरें आपली कृती
एकनाथ कवी अर्पी करावी तरि स्वीकृती !

## कै. कविवर्य केशवसुत व त्यांची म्हातारी कविता.

काव्य देवीचे 'नव्या दमाचे शिपाई' सुविख्यात 'केशवसुत' यांची "म्हातारी" नांवाची कविता अतिशय प्रसिद्ध आणि लोकप्रिय आहे. कित्येकांच्या मतें कविकुलचक्रवर्तींच्या या कवितेंत दिसून येणारे कल्पनाप्रभुत्व कोणासही मोहवील. पण मी तिकडे भावनेच्या दृष्टीनें पाहात असल्यामुळें, उत्तरोत्तर विकास पावणाऱ्या त्या कल्पनांपासून अंतःकरणास गुदगुल्या न होतां कशाघात झाल्याप्रमाणें तीव्र तीव्रतर वेदनाच होतात. ज्यांनीं केशवसुतांची मूळ कविता वाचिली असेल त्यांनाच माझ्या कवितेंतील सौरस्य समजून येणार आहे.

गणमात्रा जुळिल्या निर्मिलें काव्य नवें कविनें,
झालें ख्यात जनीं डोलली हर्षुनिया सु-मनें !
काय कल्पना या ! काय हा प्रतिभेचा पूर !
साध्या शब्दांचा केवढा आहे मगदूर !

लोकमुखांतूनी चालला ऐसा जयघोष
कविराया, तुजला न व्हावा कां मग संतोष !
पण हा कोणांत खिन्न जन एक बैसलेला
त्याच्या हृदयांत कोंदुनी शोकपूर गेला !

येतें गायाला कवीशा, खुशाल तूं गावें
पण औचित्याचें विस्मरण न कदा तुज व्हावें
प्रेतदहनकालीं गायनालाप कासया हे ?
अनुचित नर्तन हें ज्या स्थळीं अश्रुपूर वाहे.

अल्लड तव बाला करुनि वर हात धरूं पाही
म्हातारी उडतां सारखी खिदळत ती राही
प्रसंग हा बघुनी पडावें दडपण संप्रतिचें
कां मग कविराजा. निघालें तर चित्तांतरचें ?

दीर्घवयोमानें शुभ्र जी होउनिया गेली
नाहीं घरदार अशी जी भटकत दिन ढकली
कांटेऱ्या झुडपीं पडुनि वा रथ्याधूलींत
नाशुनि जायाची तिच्यावर हें कसलें गीत ?

खिन्न खिन्न हृदयें अश्रुजडनयनिं जिला बघणें
तिजवर कविराया, विरचिसी कसलीं हीं कवनें
ही स्फूर्ती अथवा सांग त्या दीनेची थट्टा !
कविपदवीला हा खरोखर मज वाटे बट्टा !

दारुण संसृतिचें भयानक रूप जिथें दिसलें
तेथ निघायाचें दडपण संसृतिचें कसलें ?
विसरूं वयहि नको उतरसी कुठला बाल्यांत
भयाण जेथ दिसे आमुचा बा चरमप्रांत.

" ते दिन पुष्पांचे कोवळ्या किरणीं खेळाचें
हे दिन चिंतांचे परंतू लटिके हंसण्याचें "
वृद्धांची थट्टा करावी अज्ञ बालकांनीं
वृद्ध तूंहि असुनी शब्द कां येति असें कानीं ?

म्हणावया अपुलें न उरलें म्हणुनी भटके जी
तिला कवे, कां रे ढकलिशी यक्षिणिच्या कुंजीं ?
गंधर्वाचें हें वाटलें विमान कां तुजला ?
अरसिकराजा तूं अधिप वा अदय जनां मधला

खपुष्प तिज गणुनी रंगही लागसि शोधाया
हा मुग्धत्वाचा जाहला कळसाचि कविराया !
जी तव बाळेला बघुनि ये वात्सल्यें जवळी
तिच्या हासण्यानें दूर जी खिन्न मनें गेली

ती तव हे बोल ऐकुनी शरमुनिया भारी
घेणार न कां बा, घालुनी झुडपीं काटेरी ?

तूं कविकुलराजा सुकोमल हृदयाचा ख्यात
तुझे बोल असले, करिल का ती न प्राणांत !

धन्य कल्पना त्या हृदय पण काय तुला नाहीं ?
शब्दांची जाळी क्षोभकर निर्मिलीस कां हीं
बसुनी मसणांत भैरवी राग गायिलास
गायक तूं मोठा होय पण सहृदयता नाश !

जी दीना बघुनी गारठुनि वाक्शक्ती जावी
हर ! हर ! भलती ही तदा का तुला स्फूर्ति व्हावी ?

## फुलास

सुदूर बसलों, तरी तव मनोज्ञ गंधच्छटा
स्मरूनि अजुनी कशा डुलति वृत्ति हर्षोत्कटा
तुझी ललित चारुता उसळुनी समंतात् फुला !
न काय रुचिरत्व ये सुचिर रुक्ष या भूतला ?
अपार्थिव तुझ्या स्मितीं झिरपल्या किती तेधवा
प्रपंचविषयातना नमन त्या तुझ्या वैभवा !
तुझ्या प्रतिदलीं दिसे नवसुखप्रभा कोंदली
फुला, मधुर मूर्ति ही तव म्हणून मीं वंदिली !
असे सतत कंटकाकुल वनीं तुझें राहणें
कधीं न मजला गड्या मधुलवांशही लाभणें
तरी निरखुनी तुला दुरुनि धन्यता पावतों
तुझ्यावरि अहर्निशीं मधुर गायनें वाहतो !
अनंतगुणशोभि तूं तुज करीं धराया फुला,
अनंतभुवनप्रभू गमत योग्य तो एकला
न हाव भलती कधीं धरिन योग्यता आपली
स्मरून कुसुमेश्वरा, नतिशतें तुला वाहिलीं !

# स्फुट कविता

## प्रभातकाल

प्रियासंगें वाटली कामिनींतें
सुखद भारी, संपली यामिनी ते !
पहाटेचा झोंबता शीत वारा
प्रियालिंगनरत युवतिसंघ सारा !

जवळि अपुल्या ओढुनी मुग्ध बाला
पतिहि साखरझोपेंत मग्न झाला
वेढियेलें स्वतनुनें एकमेकां
तया आनंदा तुला जनिं असे का ?

त्यजुनि संकोच स्वकांतास देते
गाढ आलिंगन कामिनी मुदें ते
तिला आहा ! जिवलगा सोडवेना
बाहु कंठींचा मुळीं काढवेना

तोंचि पूर्वेला भानुराजयाची
रक्तवर्णी फडकली ध्वजा साची !
प्रयासानें सोडुनी स्वप्रियाला
आवराया गृहकर्म उठे बाला !

मुक्तकचभारा नीट सावरोनी
गलितवसना स्वतनुशीं आवरोनी
वक्रनयनें लाजुनी बघत कांता
आंत गेली निरलसा शीघ्र कांता !

अंधकाराचें पटल नष्ट झालें
सर्व जगताचें आंध्य दुरि पळालें
करी कुक्कुट रव थोर, सांगण्याला
' उठा, जन हो, हा उषःकाल आला ! '

अहा ! तारापति नभीं अजुन आहे
परी आली या कोण हो दशा हे !
असे हातीं अधिकार तोंचि लोकां
तेज असतें या जगामधिं विलोका !

नभोभूषण भूषवित भूतलाला
उदयगिरिशिरिं आरूढ मित्र झाला !
करित गुंजारव गुंग भृंगसंघ
अहा ! झाले मकरंदपानदंग !

करायाला पद्मिनी सुरतलीला
निशीं वेढी जणु मृदुलदलिं अलीला !
दिशा साऱ्या उजळल्या प्रकाशानें
म्हणुनि लाजुनि सोडिला सखा तीनें !

उटी अंगा लाविली सानुराग
तसा देहावरि शोभतो पराग !
लुटुनि तीच्या शठ भृंग यौवनातें
दुज्या वेगें चालला नव वनातें !

मंजुगुंजारव करुनि खल दुजीला
अजुनि अनुभव या जगाचा न जीला
अहा ! मोहीं निज पाडुनी तियेला
भ्रष्ट करुनी शठ हसत पुढें गेला !

कुणी सेविलि नच अशी कमलिनी हे
मंद अनिलें कंपिता विलसताहे !
भृंग येतां मोहुनी तिच्यापाशीं
नको म्हणते जणु मुग्धवधू ऐशी !

सुभग सृष्टी निजललितविलासानें
त्वरित विलया हास्थिता आळसा ने
झटति मंजुस्वनिं विहग तोषवाया
यत्न त्यांचा जाईल काय वाया ?

न तरु पवनें वाकती थोर सान
रविस मस्तक नमवुनी देति मान !
भानुरायाचा उदय बघुनि सारे
गाति विहग स्तुतिपाठ हा कसा रे !

वृक्षपर्णीं दवबिंदु पडुनि फार
भानुतेजें चमकती ते अपार
जणों स्वागत करण्यास भास्कराचें
अलंकारीं महि सजे मौक्तिकाचे !

अहा ! वेळा बहु असे सौख्यदा ही
मधुरगंधें कोंदल्या दिशा दाही !
कमलवृंद भ्रमरार्थ विकसलाहे !
कोण मानव बघुनी न तोष लाहे !

अधरखंडित बालिका निशीं झाली !
रमणदंतव्रण दिसति यत्कपोलीं !
मलिनकेशा आरक्तलोचना ते
मंदगमनें उदकार्थ सरा जाते !

तरुणलोकांची दृष्टि चाळवीत
स्वतांमागुनि तन्मनें चालवीत
अहा ! यष्टीला सहज मनोहारी
कुंभ घेउनि चालली जला नारी !

कमल नीरीं विकसुनी विलसताहे
वदन तीरीं युवतिचें शोभताहे
भ्रमर उभयस्थळिं मनीं भ्रम धरोनी
जवें मधुलोभें जाति आदरोनी !

प्रभातींच्या वैभवा मधुरवानें
विहग गाती आदरें गौरवानें
असो दुःखी नर परी या सुकालीं
वृत्ति आनंदी पाहिजेच झाली !

उषःकाल प्रिय कविस फार वाटे
मनीं त्याच्या आनंद पूर्ण दाटे
वर्ण्य वस्तू येतात आढळून
मनीं स्फूर्ती जातसे खळबळून !

## विधीला

क्षारांबुपूर्ण जलधी जगतास ठावा
मार्गें तृषाकुलहि पाहुनि ज्या हटावा !
त्याशीं अहा ! मधुजला अमरापगेला
संयोजितां त्यजुनि तूज विवेक गेला !

गुर्वंगनेस खळ सेवि, धरी कलंक
रात्रीं खुशाल फिरतो बघ हा शशांक !
त्याशीं अहा ! धवल शीतळ चंद्रिका ही
संयोजितां तुज विचार सुचे न कांहीं !

लोकीं विधे ! विषम भाव सदा असावा
दुःखानलांत अबलाजन दग्ध व्हावा
आहे तुझा प्रखर कीं वद कायदा हा
न्यायें अशा बुध न सेविल काय दाहा ?

जें रत्न सादर शिरीं रसिकें धरावें,
तें हाय ! काय पशुच्या चरणीं रहावें ?
पाहोनिया त्वदविवेक विधे ! असा हा
खेदोर्मि बा उसळतात मनांत हा हा !

भोक्ता नसेल तरि वस्तु कशास व्हावी
केली; नसे रसिक, ती विलयास जावी ?
मूढास अर्पुनि करीं न हसें स्वताचें
हें बोलणें तुज कुठून रुचावयाचें ?

## जिवलगे ! —

" मजवरी प्रेम तव भारी
परि आज कुठें तें गेलें ? वद गडे !
" लागती नयनिं जलधारा
या दीना बघसि न बाले ! वद कशी ?
" तुजविणें शून्य जग दिसतें
चंद्रिका ग्रासिली काळें ही खरी !
" सुंदरी ! कृति न ही बरी येइ लवकरी
" भेट दे विमले
मन विरहव्याकुल झालें ! प्रियकरे ! "
" प्रियकरा ! काय हें वदतां ?
भुजपाशीं आहे दासी ही पहा !"

चमकुनी नेत्र उघडोनी
संभ्रांत प्रिय दयितेसी पाहतो !

गालासि लावुनी गाल
कवळुनी प्रिया भुजपाशीं कामिनी

" कां " ह्मणे " शोक हा झाला ?
असुनी मी जवळी ऐसी मज कथा "

बाहुनी गाढ वेढुनी अधर चुंबुनी
कांत तो बोले " जिवलगे ! — "

## स्त्रीप्रेम

शुद्ध प्रेम कुठें मिळेल भुवनीं ? कोणी विचारी असें
धन्योद्गार तदा सदर्प अबलाप्रीत्यर्थ मीं काढिले
होता संभ्रम तो परी समजुनी आलें असें मानसा
योषित्प्रेम असेल शुद्ध, मदनें तें टाकिलें नाशुनी !

नाहीं होत समागमाविण पुरें स्त्रीप्रेम ऐसें दिसे
प्रीती कामविकारपूर्ण असतां संशुद्ध मानूं कशी ?
स्त्रीप्रेमोज्ज्वलरूप ये दिसुनिया कांतेचिया मानसीं
हें तों सत्य; परी समागमसुखा ती नित्य वांछी मनीं !

नातीं स्त्रीसह ठेविती बहु, परी तीं गौण मी मानितों
जैसा मित्र नरांत थोर, अबलासंघांत कांता तशी
संभोग त्यजुनी जनीं तिजसवें संबंध ना ठेववे
सांगावें जन हो ! पवित्र मग मी स्त्रीप्रेम कैसें म्हणूं ?

कांता ' भोग्य ' असें मनीं ठरवुनी प्रीती जनीं ठेविती
हें कीं प्रेम ? —वृथा प्रलाप करुनी मूढ भ्रमीं पाडिती !
चित्तीं कामविकार खेळ करितां, तारुण्य अंगीं स्फुरे
तों दांपत्य परस्परास हृदयीं चिंती न ते प्रीतिनें !

## प्रेमप्रतिज्ञा

उडुगण सखे हा होईल प्रभोज्झित निश्चयें
सकल भुवना जाळो तापें सुधांशुकला प्रिये
मृदु कुसुम तें काठिन्यानें करो मणिभेदन
तरिहि अचल प्रीती माझी! विशंक करी मन !

गगन न पुरें मोजायातें मम प्रणया खरें!
खचित लिहितां माझी प्रीती महीतलही भरे!
अचल चल ते सारे! प्रीती प्रिये अचला असे
विफल मनिंचे सोडीं सोडीं कुतर्क गडे कसे!

चपल चपला नाचे व्योमीं परी स्थिर जाहली!
पवनलहरी गंधोद्दामा उभी बघ राहिली!
सुमुखि! तुझिया प्रेमोत्कर्षें प्रभाव घडे असा
कमलिं अलिसा झालों बद्ध त्यजीन तुला कसा!

## आकाश

उसळति हृदयीं मोदलहरी!
उडुगणभूषित नील गगन हें सकलहि खेद हरी

प्रेमें निजकरिं तुज धरुनी
सखये! फिरतों उद्यानीं
तैसा इंदु पहा गगनीं
विहरे सस्मित उडुरमणीतें वेढुनि मृदुल करीं!

फिरती अंबुवाहखंडें
तेणें चंद्रिकौघ खंडे
दावित गज वरि निजशुंडे
नभःसरोजलिं मग्न होय कीं, लीला मेघ करी!

राहति दूर उभ्या रुसुनी
चमकुनि बघती फिरफिरुनी
दाविति पतिप्रेम हसुनी !
शशिललना या धन्य तारका ! तुझीच यांस सरी !

सखये ! पहा नभोगंगा
करिते सहज खेदभंगा !
पसरिसि नवप्रणयरंगा
तैशी रात्री नित्यनवीना रूपीं केलि करी !

इकडे सौख्य ! सौख्य तिकडे !
तेथें आनंद क्रीडे !
नाचे उत्सुकताहि गडे !
सकल कुतूहलमय अंबर हं ! वेळा धन्य खरी !

कांते ! तुझिया हृदयिं जसें
प्रेमावांचुनि अन्य नसे
अंबरिं कुतुक तसें विलसे !
तव सहवासें आनंदाची लुटतों नित्य झरी

## झपूर्झा

येति सुखाचे लोट नवे !
काय करावें
कसें करावें

चिन्ता सगळी मावळली !
वृत्ती आनन्दीं वळली !
तेजोलहरी चहूकडे
दिसतात गडे
मन त्यांत बुडे

गमे यावया नको कडे—
झपूर्झा ! गडे झपूर्झा !

स्वच्छंदानें पिऊं सुधा !
हा मार्ग सुधा
प्रिय होय बुधा
अटक कुणाची मुळीं नसे !
होऊं या उन्मत्त जसे !

वेड सुखाचें गमे मना !
दुजा काम ना
हीच कामना
भुलुनी पाडूं भूल जना !—
झपूर्झा ! गडे झपूर्झा !

चमकवुं तारे प्रेमानें !
हसवुनि सुमनें
खुलवुं उपवनें !
जिकडे तिकडे रंग भरूं !
आनन्दी आनन्द करूं !

हसूं हासवूं सकलांला
शोक आटला
खेद निरसला
हासत हासत म्हणा चला—
झपूर्झा ! गडे झपूर्झा !

दुःखी कष्टी जन जगतीं
किंतीक असती
कुणी न पुसती

त्यांचे आम्ही कैवारी
ताप वारूं सिंचुनि वारी !
सुखशान्ती लाभो त्यांना
म्हणुनी नाना
करीत गाना
नाचूं सोडुनिया भाना !
झपूर्झा ! गडे झपूर्झा !

## आम्ही

विश्वेशानें प्रथम रचिली सृष्टि ही कौतुकानें
केलें तेव्हां प्रगट अपुलें सर्व चातुर्य त्यानें !
आनन्दाची फुटत उकळी दृष्टि जेथें पडावी
आश्चर्यानें स्तिमिताचि मनोवृत्ति होऊन जावी !

ठायीं ठायीं खचुनि भरलीं बोधतत्वें कितीक
येई भारी अमृतमधुरप्रीतिचें येथ पीक
वाहे तापा हरपित जिथें मन्द वायू सुखाचा
झाला ऐशी स्वकृति बघुनी त्यासही तोष साचा !

हर्षें लोकांपुढाति मग तो ठेवि ती रम्य सृष्टि
हा हा ! अन्य क्षणिंच हृदयीं जाहला फार कष्टी !
एकानेंही मुळिं तिजवरी फेकिली नाहिं दृष्टी !
नैराश्यानें हृदयिं भरला राहिली दूर तुष्टी !

'अज्ञानानें अहह ! गणिती मत्कृती तुच्छ मूढ
यांना सृष्टिस्थित न कळती बोधतत्वें निगूढ !'
ऐशा दुःखें क्षणभरि बसे स्वस्थ विश्वेशराय
कांहीं कालें उचित सुचला एक त्याला उपाय

स्वीयांशानें बनवुनि कवी शीघ्र निर्माण केले
याया बोधामृत जडजनां भूवरी धाडियेले !
ते हे आम्ही भुविं विचरतों स्वार्गिंचे देवदूत
वाङ्माधुर्यें सतत करितों पापचित्तास पूत !

## कवितेचें स्थान

निर्झर वाहति मन्दगती
स्वच्छन्दें मृग बागडती
उडते अम्बरिं विहगतती
मञ्जुरव श्रवणीं भरती
सृष्टि सुन्दरी
गान मधुर करि
मनोवृत्ति हरि
दिशा सुखानें दुमदुमती
मोहित होते लोकमती !

स्वैर पवनलहरी फिरते
नर्तन नवलतिका करिते
सहकारीं पिकशुक खग ते
बसुनी करिती गानातें
मृगशिशु इकडे
सुखें बागडे
मृगी त्या कडे
उत्सुकतेनें कशि बघते
प्रेमरसाला ये भरतें !

पारतन्त्र्य कोठेंहि नसे
सर्व स्थलिं आनन्द वसे

प्रतिभा कविची उल्हासे
रमणी आनन्दून हसे
काव्य बन्धनीं
निपजे कुठुनी ?
सुकवी म्हणुनी
येती विपिना प्रेमरसें
काव्य निर्मिती रम्य असें !

समाप्त

# अनुक्रमणिका.


| कवितेचें नांव. | वृत्त. | पान. |
|---|---|---|
| **मन्दारमञ्जरी.** | | |
| राधाविलाप | चन्द्रकान्त | १ |
| प्रेमनिकृन्तन | शार्दूलविक्रीडित | ४ |
| कविता आणि कवि | ,, | ६ |
| उत्कंठितार्चे गाणें | केशवकरणी | ७ |
| उद्यान. | राजसा व चंद्रकांत | ८ |
| माझ्याच सुखासाठीं | पृथ्वी | १० |
| कोकिल | शा. वि. व दिंडी | १२ |
| कांता आणि कविता | पादाकुलक | १५ |
| दे नाझी मगिनी मला | शार्दूलविक्रीडित | १६ |
| सुप्तशिशुप्रबोधन | सूर्यकांत किंवा राजसा | १७ |
| अमर कसें व्हावें ! | शा. विक्रीडित | १७ |
| चिरसम्मेलन | ,, | १८ |
| सुधाकल्लोल | शिखरिणी | २० |
| यथार्थ दर्पोक्ति | शा. वि. व स्रग्धरा | २२ |
| कवितादर्शन | केशवकरणी | २४ |
| प्रेममहिमा | शिखरिणी | २५ |
| प्रेमसाम्राज्य | बालानंद | २६ |
| सुहृद्दर्शन | दिंडी | २७ |
| कवीचें मन | शा. विक्रीडित | २९ |
| पश्चात्ताप | अंजनीगीत | ३० |
| कविप्रभाव | ,, व व. तिलका | ३४ |
| कवितेचा जन्म | शा. विक्रीडित | ३५ |
| देवगिरींतील सायंकाळ | ,, | ३७ |
| अर्थ कीं अनर्थ | आर्या | ४० |
| यामिनीवल्लभ | पृथ्वी | ४१ |
| प्रेमासाठीं– | स्वर्गगा किंवा फटका | ४४ |
| कविता | शा. विक्रीडित | ४५ |
| सुन्दरी | ,, | ४६ |
| आलिंगन | केशवकरणी | ४७ |
| गुणज्ञ पाहिजेत | दिंडी | ४९ |
| सत्कविवंदन | अनेकवृत्त | ५१ |
| **काव्यकुसुममाला.** | | |
| शोकाचा आनंद | वसंततिलका | ५४ |
| अधर | भूपतीवैभव | ५५ |
| प्रकृति | पृथ्वी | ५६ |
| आलिंगन देशील तर | स्वर्गगा किंवा फटका | ५७ |
| भगिनीप्रेमाकरितां | मेनका | ५८ |
| वृथानिंदक व कवि | शा. विक्रीडित | ६० |
| प्रियेचें हास्य– | स्वर्गगा किंवा फटका | ६१ |
| माझी प्रीति | शा. विक्रीडित | ६२ |
| इंद्रधनुष्य | स्रग्विणी | ६३ |
| आशेची निराशा | आर्या | ६५ |
| रम्य कुसुम | दिंडी | ६६ |
| पुनर्मेलन | वसंततिलका | ६८ |
| कवि आणि जग | शिखरिणी | ७० |
| कादम्बरीप्रवाह | साकी | ७२ |
| रंगपंचमी | पांडुनृपाति | ७४ |
| अहाहा कवे ! | भुजंगप्रयात | ७५ |

| कवितेचें नांव. | वृत्त. | पान. |
|---|---|---|
| प्रबोधन | उषा | ७६ |
| निस्वार्थ प्रेम | बालानंद | ७७ |
| चंद्रास पाहून | ,, | ७८ |
| इंद्रधनुष्यास पाहून | शा. विक्रीडित | ७९ |
| माझें तें माझें नव्हे | ,, | ८० |
| पतंग | ,, | ८१ |
| मुलें– | स्वर्गंगा किंवा फटका | ८२ |
| प्रेम आणि व्यवहार | वसंततिलका | ८३ |
| माझी ज्योत्स्ना | साकी | ८४ |
| भाऊ भाऊ ! आम्ही सारे भाऊ ! | सूर्यकान्त किंवा राजसा | ८६ |
| नीज नीज लाडके ! | राजहंस | ८७ |
| शीघ्र कवि नरहर गंगारामसा गुजर यांस दिलेलें शिफारसपत्र | शा. विक्रीडित | ८८ |
| उन्मत्ताचे प्रलाप | केशवकरणी | ८८ |
| मुलांचें गाणें | बालानंद | ९० |
| शरत्कालांतील एक रमणीय रजनी प्रसंग | वितस्ता चतुर्गणी अपूर्ण | ९१ |
| नराश्याचें साम्राज्य | अंजनीगीत | ९२ |
| अद्वैताची अनुभूति | साकी | ९३ |
| कांहीं स्मृतिचित्रें | शा. विक्रीडित | ९४ |
| माझें पिशाच | साकी | ९५ |
| गानलुब्ध | शा. विक्रीडित | ९६ |
| शेवटची निराशा | ,, | ९७ |

| कवितेचें नांव. | वृत्त. | पान. |
|---|---|---|
| भारत सम्राट् पंचम जॉर्ज यांचें राज्यारोहण | ,, | ९८ |
| तारकोद्वार | आर्या | १०० |
| दावाग्नि | शा. विक्रीडित | १०१ |
| मुग्धकलिका | ,, | १०२ |
| तुषारस्नान | इन्दुकला | १०३ |
| गंगावतरण | श्यामाराणी | १०६ |
| संयोग | साकी | १०८ |
| माझें हंसरें फूल | शा. विक्रीडित | १०९ |
| रडगाणें | श्यामाराणी | ११० |
| जातिकलिका | शा. विक्रीडित | १११ |
| दग्धप्रेम | ,, | ११३ |
| पुष्पास | बालानंद | ११४ |
| तारा | शा. विक्रीडित | ११६ |
| काराबद्ध | श्यामाराणी | ११८ |
| प्रतिबंधित स्त्रीवर्ग | वसंततिलका | ११९ |
| तुफानांतील वारा | पादाकुलक | १२१ |
| ओढ्याची खळखळ | श्यामाराणी | १२३ |
| डास | ,, | १२५ |
| डाकवाळा | ,, | १२७ |
| हृदयभेदन | शा. विक्रीडित | १२९ |
| तो काल | ,, | १३० |
| मूक गायन | ,, | १३१ |
| तूं | पृथ्वी | १३२ |
| सायंप्रसंग | चन्द्रकान्त | १३२ |
| शून्याकाश | शा. विक्रीडित | १३४ |

| कवितेचें नांव. | वृत्त. | पान. |
|---|---|---|
| मुक्ता | शा. विक्रिडित | १३५ |
| स्वप्न | बालानंद | १३६ |
| अनुताप | शा. विक्रीडित | १३७ |
| कवीचें आत्मसमाधान | ,, | १३८ |
| चिरदुःखी | बालानंद | १३८ |
| काव्याचें रसवस्व | शा. विक्रीडित | १३९ |
| प्रणयोद्गार | ,, | १३९ |
| शब्दसृष्टि आणि तूं | ,, | १४० |
| माझा भाऊ | ,, | १४१ |
| मनुष्याची परतंत्रता | ,, | १४१ |
| उपचाराचें प्राबल्य | ,, | १४२ |
| डबक्यांत पडलेलें फूल | श्यामाराणी | १४३ |
| आशा-निराशा | बालानंद | १४५ |
| खरी उन्नति | शा. विक्रीडित | १४६ |
| समाज आणि व्यक्ति | ,, | १४७ |
| अणु | ,, | १४८ |
| गुप्तस्वर्ग | ,, | १४९ |
| गिधाड | श्यामाराणी | १५० |
| मी तुझाच आहें | शा. विक्रीडित | १५२ |
| पुष्प आणि स्त्रिया | ,, | १५४ |
| रम्य कहाणी | श्यामाराणी | १५५ |
| उलटी सृष्टि | वसंततिलका | १५६ |
| निरोप | शा. विक्रीडित | १५८ |
| भूतदयेचे अश्रु | ,, | १५९ |
| तूं-मी | ,, | १५९ |
| विरही | भूपतीवैभव | १६० |
| शिंग | श्यामाराणी | १६१ |
| माझें राज्य | अभंग | १६४ |


## कर्णमंगल.


| कवितेचें नांव. | वृत्त. | पान. |
|---|---|---|
| रानफूल | शा. विक्रीडित | १६६ |
| शरत्संगीत | ,, | १६७ |
| कोरांटीचीं फुलें | पादाकुलक | १६८ |
| निवडुंगांतून सुटका | ,, | १६९ |
| मनोगत | पृथ्वी | १७२ |
| उद्भ्रम | बांसरी | १७३ |
| संकीर्तन | भुजंगप्रयात | १७४ |
| कवितादेवीचें आगमन | श्यामाराणी | १७५ |
| अभिनंदन | शा. विक्रीडित | १७८ |
| रसिकाभिवादन | ,, | १८० |
| भावस्तोत्र | ,, | १८१ |
| माझें गाणें कुणासाठीं | पादाकुलक | १८२ |
| गंगेसाठीं | वधूवल्ली | १८३ |
| मंगलपंचक | शा. विक्रीडित | १८४ |
| मृत्यूस | ,, | १८५ |
| मांगल्याचा विजय | भूपतीवैभव | १८६ |
| जॉर्ज गीत | स्रग्विणी मात्रा | १८७ |
| भरतभूमि | ओवी | १८८ |
| भावगीत | मेनका | १८९ |
| धर्मनिष्ठ | शा. विक्रीडित | १९० |
| केशवसुतास | ,, | १९३ |
| माझी ताई- | स्वर्गंगा किंवा फटका | १९४ |
| तारका | भूपतीवैभव | २०३ |
| निराशेंतील आशा | शा. विक्रीडित | २०४ |
| कोकिलास- | स्वर्गंगा किंवा फटका | २०६ |

| कवितेचें नांव. | वृत्त. | पान |
|---|---|---|
| दिव्य मंदिर आणि लेख | स्रग्धरा | २१२ |
| प्रेम आणि सत्कार | शा. विक्रीडित | २१३ |
| हास्यसंगीत | मोहिनी | २१४ |
| कृष्णा | चन्द्रकान्त | २१५ |
| वसंत | सूर्यकान्त किंवा राजसा | २२० |
| निरोप | चन्द्रकान्त | २२४ |
| कोकिलास | दिंडी | २२८ |
| खरी कविता | वधूवल्ली | २३० |
| ईशस्तवन | चन्द्रकान्त | २३३ |
| पुरी निराशा | राजहंस | २३४ |
| पांखरास | चंद्रकान्त व केशवकरणी | २३५ |
| विश्वेशा | शा. विक्रीडित | २३६ |
| शांतिसाठीं | चन्द्रकान्त | २३७ |
| स्थित्यंतर | शा. विक्रीडित | २३७ |
| पुढ पहा | राजहंस | २३९ |
| कवि | अभिमन्यू | २४० |
| उजाड मैदान | चन्द्रकान्त | २४२ |
| पूर्वस्मृति कां ? | राजहंस | २४३ |
| हृदयमार्दव | पृथ्वी | २४४ |
| तारा | दिंडी | २४५ |
| तीर आणि गान | स्रग्विणी | २४९ |
| ताराप्रकाश | स्रग्विणी मात्रा | २४९ |
| नामलेखन | शा. विक्रीडित | २५२ |
| धन्य तूं कोकिला | स्रग्विणी मात्रा | २५३ |

| कवितेचें नांव. | वृत्त. | पान. |
|---|---|---|
| कृष्णातीरावर | चन्द्रकान्त | २५५ |
| अनुतप्त मनोवृत्तीला | ,, | २६४ |
| शैशवस्मृति | शा. विक्रीडित | २६५ |
| धर्महानीचें भय | स्रग्धरा | २६५ |
| शोकरजनी | चन्द्रकान्त | २६६ |
| सुखनिवास | ,, | २६७ |
| एकामागून एक | चन्द्रकान्त | २६८ |
| दीनात्मे | शा. विक्रीडित | २६९ |
| अमर | चन्द्रकान्त | २७० |
| स्वप्न | ,, | २७१ |
| विधीचा फेरा | शा. विक्रीडित | २७३ |
| कागदी नाव | पृथ्वी | २७४ |
| अचल प्रेम | शा. वि. | २७५ |
| माझें कोणीच नाहीं | स्रग्धरा | २७७ |
| समापन | शिखरिणी | २७९ |
| पुढें चाल | शा. वि. | २८० |
| आज काय | केशवकरणी | २८१ |
| कवि लेंभे यांच्या पत्रास उत्तर | शा. वि. | २८२ |
| चिंतन | चन्द्रकान्त | २८३ |


## काव्यगुंफा.


| | | |
|---|---|---|
| शूर्पणखा-पत्रिका | सूर्यकान्त किंवा राजसा | २८५ |
| प्रतीक्षा | केशवकरणी | २९० |
| ईशप्रार्थना | शा. वि. | २९१ |
| प्रबोधन | माळिण | २९३ |
| भारतमाता | मोहिनी | २९५ |

| कवितेचें नांव. | वृत्त. | पान. |
|---|---|---|
| वनवासस्पृहा | शा. वि. | २९७ |
| सत्कवीची आंतरिक इच्छा | ,, | २९८ |
| व्याधास | साकी | २९८ |
| मृत कन्या | साकी | २९९ |
| जीवितसरिता | शा. वि. | ३०० |
| स्वागतगीत | स्रग्धरा | ३०० |
| काव्यदेवीला | पृथ्वी | ३०१ |
| सत्कवि माधवानुज यांचा मृत्यु | स्रग्धरा इत्यादि | ३०२ |
| शुक्राची चांदणी | प्रहर्षिणी | ३०५ |
| मांगलिक | शा. वि. | ३०७ |
| आर्तांची विनवणी | पृथ्वी | ३०८ |
| उत्तिष्ठत जाग्रत | मंदाक्रांता | ३०८ |
| स्फुट श्लोक | शा. वि. | ३०९ |
| —ला | भूपतीवैभव | ३०९ |
| मेघास | शिखरिणी | ३१० |
| अन्योक्ति | स्रग्धरा इत्यादि | ३११ |
| इच्छेविरुद्ध | केशवकरणी | ३१२ |
| शृंगार | ,, | ३१३ |
| हास्याचा पडदा | पृथ्वी | ३१५ |
| व्यर्थ | शा. वि. | ३१५ |
| बिजेची चंद्रकोर | मेनका | ३१६ |
| प्रार्थनाष्टक | पृथ्वी | ३१७ |
| वसंतदेवी | केशवकरणी | ३१९ |
| उषा-संगीत | हरिणी | ३१९ |
| काल-आज-पण-उद्यां | शा. वि. | ३२० |
| अपूर्णता | हरिणी | ३२० |
| प्रीतीची जादू | केशवकरणी | ३२१ |
| संक्रांत | दिंडी | ३२२ |
| रुक्मिणी-पत्रिका | राजहंस | ३२३ |
| मुद्रिका | ,, | ३३० |
| सीतेचा निरोप | ,, | ३३२ |
| बाभळीचें फूल | पृथ्वी | ३३८ |
| खरें सांग | उषा | ३३९ |
| उत्कंठित | ,, | ३४० |
| शुष्कगुलाब | शा. वि. | ३४१ |
| राम अरण्यांत जातांना | सरिता | ३४३ |
| आनंदी हो | शा. वि. | ३४४ |
| हताश | स्रग्धरा | ३४५ |
| बाळे नीज सुखें | शा. वि. | ३४६ |
| कलिका | पंचचामर | ३४६ |
| भरतभूमि | शा. वि. | ३४७ |
| चंडोलास | स्रग्धरा | ३४८ |
| पारिजातकाचीं फुलें | पृथ्वी | ३४९ |
| विसरावें म्हणून | शा. वि. | ३५० |
| जन्मभूमीची आठवण | पंचचामर | ३५० |
| एक इच्छा | शिखरिणी | ३५१ |
| भलती इच्छा | शा. वि. | ३५२ |
| वंदन | मंदाक्रांता इ. | ३५२ |
| मधमाशी | मधमाशी | ३५३ |
| सीतेस अरण्यांत टाकतेवेळीं लक्ष्मण म्हणतो | म्हातारा | ३५४ |
| एकत्वासाठीं | बालानंद | ३५५ |

| कवितेचें नांव. | वृत्त | पान. |
|---|---|---|
| रानफूल | बालानंद | ३५६ |
| सरितेस | ,, | ३५७ |
| बाभळीचें फूल आणि गुलाबाचें फूल | अभिमन्यू | ३५९ |
| दोन मनोवृत्ती | उपजाति इ. | ३६० |
| वृद्ध कोण | मेनका | ३६१ |
| धिक्कार त्यांनां असो | शा. वि. | ३६२ |
| टेंकडीवरील तारा | दिंडी | ३६४ |
| व्यर्थ प्रेम | राजहंस | ३६६ |
| आकाशांत टक लावून पहाणाऱ्या मुलीस | वसंततिलका | ३६७ |
| तूं उदास कां ? | राजहंस | ३६८ |
| संक्रांत | शा. वि. | ३७० |
| डॉ. जगदीशचंद्र बोस | स्रग्धरा, शा. वि. व वसंततिलका | ३७१ |
| मार्ग दिव्य | दिंडी | ३७३ |
| कशास हससी वृथा | पृथ्वी | ३७४ |
| प्रार्थना | उषा | ३७५ |
| माझ्या भगिनीला | दिंडी | ३७६ |
| वर्षादिन | शिखरिणी | ३७६ |
| सदाफुली | बालानंद | ३७७ |
| तारका | स्रग्विणी | ३७८ |
| जर्मनीचा केसर | अनेकवृत्त | ३८० |
| काल चंचल आहे | बालानंद | ३८१ |
| उत्कंठा | शा. वि. | ३८२ |
| निराशा | ,, | ३८३ |
| एकदां हास | केशवकरणी | ३८३ |
| वसंतास | शा. वि | ३८४ |
| विकास | पृथ्वी | ३८५ |
| मधमाशी | दोहा | ३८५ |

| कवितेचें नांव | वृत्त. | पान. |
|---|---|---|
| मूर्तिकार आणि प्रीति देवता | शा. वि. | ३८६ |
| अज्ञात पांखरास | ,, | ३८७ |
| निजू दे स्वस्थपणें आतां | दिवाकर | ३८८ |
| फूल आणि थडगें | शा. वि. | ३८९ |
| जादूगारीण | राजहंस | ३८९ |
| नुकत्याच फुललेल्या फुलास | शा. वि. | ३९१ |
| मधुमालती | दिंडी | ३९१ |
| नाहींच कधीं गाणार | राजहंस | ३९३ |
| अकालवीणावादन | वधूवल्ली | ३९५ |
| राजापुरची गंगा | शा. वि. | ३९६ |
| काय बरें झालें | केशवकरणी | ३९७ |
| देवाचें आवडतें फूल | शा. वि. | ३९८ |
| प्रेमभंग | चंद्रकांत व केशवकरणी | ३९९ |
| अजुनि चालतोच वाट | उषा | ४०० |
| द्रौपदी | शा. वि. | ४०० |
| केशवसुत व म्हातारी | इंदुकला | ४०३ |
| फुलास | पृथ्वीवृत्त | ४०६ |


## स्फुट कविता.


| | | |
|---|---|---|
| प्रभातकाल | दिंडी | ४०७ |
| विधीला | वसंततिलका | ४१० |
| जिवलगे | नृपममता | ४११ |
| स्त्रीप्रेम | शा. वि. | ४१२ |
| प्रेमप्रतिज्ञा | हरिणी | ४१३ |
| आकाश | मेनका | ४१३ |
| झपूर्झा | बालानंद | ४१४ |
| आम्ही | मंद्राक्रांता | ४१६ |
| कवितेचें स्थान | बालानंद | ४१७ |